ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : द्रौपदी-स्वयंवर

लेखक : अवचितसुत-काशी

प्रकाशक : वा. दा. गोखले

प्रकाशन वर्ष : १९६१

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे


पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

अवचितसुत-काशीकृत

# द्रौपदी-स्वयंवर



895.2

संपादक: वा. दा. गोखले

D. /.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00931

श्री

अवचितसुत-काशीकृत

# द्रौपदी-स्वयंवर

संपादक
वा. दा. गोखले

प्रकाशक
महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें

श्री

अवचितसुत-काशीकृत

# द्रौपदी-स्वयंवर

संपादक
वा. दा. गोखले

प्रकाशक

महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें

डॉ. म. म. द. वा. पोतदार;
ग्रंथ संग्रह

म/२५०४

प्र का श क
चिटणीस महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळकरोड, पुणें २.

मूल्य ५ रुपये

मु द्र क
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय, पुणें २.

## प्रकाशनामागील

## भूमिका

डॉ. वा. दा. गोखले, एम्. ए., पीएच्. डी. यांनी संपादिलेला हा ग्रंथ परिषदेचें स्वतःचें प्रकाशन म्हणून प्रसिद्ध होत आहे. 'अवचित-सुत काशी' या शिवकालीन कवीचा हा काव्यग्रंथ प्रकाशित करतांना परिषदेला सकारण अभिमान वाटत आहे. अवचितसुतकाशीकृत "द्रौपदीस्वयंवर" हा ग्रंथ अनेक दृष्टींनी लोकविलक्षण ठरेल, हें डॉ. गोखले यांची या ग्रंथाची चिकित्सक प्रस्तावना वाचूनहि ध्यानांत येण्यासारखें आहे. हा कवि सोळंखीकुलोत्पन्न मराठा क्षत्रिय आहे ही गोष्टदेखील थोडी विलक्षण म्हणून लक्षांत भरण्यासारखी आहे. जुन्या-नव्या मराठी साहित्यांत क्षत्रिय-वैश्यादिकांनी श्रेष्ठ दर्जाची कामगिरी केलेली असली, तरी या काव्यासारखें, विदग्ध संस्कृत काव्याच्या वळणाचें काव्य एखाद्या लढवय्या कुळांतील क्षत्रियाने लिहिणें ही गोष्ट विलक्षणच म्हटली पाहिजे.

सारांश, स्वतः कवि, काव्यविषय, काव्याची भाषा यांकडे डॉ. गोखले यांनी शोधून, संपादून प्रकाशांत आणीपर्यंत कोणाचें लक्ष गेलें नव्हतें ही गोष्टहि थोडी विलक्षणच म्हटली पाहिजे. डॉ. गोखले यांच्या चिकित्सक परिश्रमामुळे आज जुन्या काळचें एक विदग्ध काव्य मराठीला नव्याने प्राप्त होत आहे, याबद्दल परिषदेप्रमाणेच सर्व रसिकांना आनंद होईल, असा मला भरवसा आहे.

परिषद् ही केवळ संशोधनसंस्था नव्हे हें उघड आहे. परिषदेचें मुख्य कार्य भाषा, साहित्य व साहित्यिक यांच्यासंबंधी सामान्य वाचकांत प्रेम निर्माण करणें हें आहे. पण त्याबरोबरच एका त्रैमासिकाचें व कांही ग्रंथांचें प्रकाशन हेंहि आनुषंगिक म्हणून परिषदेतर्फे होत आहे. डॉ. गोखले यांचें वैशिष्ट्य हें की, परिषदेच्या सर्वच कार्यांत त्यांनी गेल्या पंचवीस वर्षांत मातब्बर हातभार

लावला आहे. कै. रावबहादुर पाध्ये, रावसाहेब चापेकर, खिस्तवासी र. ल. जोशी या धुरंधर साहित्यसंघटनाकारांच्या यादींत डॉ. गोखले यांचें नांव परिषदेच्या इतिहासांत नमूद आहे, हें सर्वांना विदितच आहे. परिषदेच्या कारभारांतून निवृत्त झाल्यावर आणि साठी उलटल्यावर आज त्यांनी परिषदेच्या संशोधन विभागाची जबाबदारी अंगावर घेतली आहे. साक्षेपीपणा, निरलसता आणि मार्मिक बुद्धि हे डॉ. गोखले यांचे गुण संघटनाकार्याप्रमाणेच त्यांच्या अध्यापनांत व लेखनांतहि दिसून येतात. परिषदेतर्फे प्रकाशित होत असलेल्या या 'असाधारण' प्राचीन काव्याला डॉ. गोखले यांच्यासारखे साक्षेपी संपादक लाभले हा एक सुयोग होय. अनुभवामृताची अधिकृत आवृत्ति काढण्याचें याहूनहि महत्त्वाचें, पण याहूनहि बिकट काम गोखल्यांनी आधीच हातीं घेतलें आहे. परिषदेच्या अठरा कारखान्यांपैकी हा अत्यंत जिकिरीचा कारखाना असेंच मोजकें पण मोलाचें काम करीत राहील अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी '**महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळा**'ने पंधराशें रुपयांचें आर्थिक साहाय्य केलें आहे. ही गोष्ट कृतज्ञतापूर्वक नमूद करणें आवश्यक आहे. याबद्दल साहित्य परिषद् या मंडळाची ऋणी आहे.

ग्रंथालयें, विद्यापीठें व विद्वान् यांच्याकडून या ग्रंथांचें यथोचित स्वागत होवो, ही इच्छा!

शके १८८३ मार्गशीर्ष शु. १५
दत्तजयंती

***श्रीकृष्ण केशव क्षीरसागर***
*कार्याध्यक्ष*
महाराष्ट्र साहित्य परिषद्,

## ऋण

संशोधनाला पूर्ण अवकाश देणाऱ्या म. सा. परिषदेचें देवऋण; कळवणचे श्री. भाऊराव चांदोरकर, ज्यांनीं जुन्या पोथ्या स्वेच्छेने आणून दिल्या, मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें, मराठी संशोधन मंडळ ( मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय ), भवानी म्युझियम व ग्रंथालय, औंध, या संस्थांच्या चालकांनी आपल्या संग्रहांतील पोथ्या पाहण्यास दिल्या या सर्वांचें ऋषिऋण, महाराष्ट्र-राज्य व संस्कृति मंडळ, विश्वकर्मा मुद्रणालय, आणि ज्या व्यक्तींनी अनेक तऱ्हांनी कमीअधिक साहाय्य केलें, तें मनुष्यऋण; या ऋण-त्रयीने भारावलेला लेखक ‘ आभार ’ या कृतज्ञतावाचक शब्दाशिवाय काय लिहूं शकणार ?

प्र स्ता व ना

## अवचितसुत काशी – चरित्र आणि काळ

संस्कृत वाङ्मयांत कविचरित्रविषयक माहिती अगदीच अल्प असते. कालिदास, भवभूति इत्यादि महाकवींचें जीवन शोधून काढण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतात. सामान्यतः हीच गोष्ट मराठी प्राचीन कवींच्या बाबतींत दिसून येते. बाणभट्टाने आपलें चरित्र आपल्या ग्रंथांत दिलें आहे, तद्वत् अवचितसुत काशीने आपल्या जीवनासंबंधी कांही महत्त्वाची माहिती आपल्या श्लोकबद्ध व ओवीबद्ध ' द्रौपदीस्वयंवर ' या ग्रंथांत दिली असल्यामुळे वाचकास त्याचें चरित्र समजण्यास साहाय्य होतें. आपल्या श्लोकबद्ध ग्रंथांत कवि सांगतो की

श्रीवंशाधिपती निशारमण तो वृत्ति स्वदेशाननी
सोळंखी कुळधर्म श्रीपति कुळस्वामी रुहूलोचनी
भारद्वाज सुगोत्र जाण जननी ते अन्नपूर्णा असे
तात श्री अवचीतराव अवनीं प्रौढीप्रतापें वसे ९९३
पितृराज तयासि भक्ति पढिये श्रीकेशवाची सदा
ठेवी श्रीपति पैरनाम नगरा सेवी हरीच्या पदा
वृत्तीपाळण सैन्यपाळण करी शत्रू रणीं मोडिले
तेणें विग्रह वाढला मग जगीं वैरी बहू जोडिले ९९४
त्या दुःखें त्यजिला निवास जनकें गोपाळ नामें गिरी
बांधूनी बळकाविला नृपदळें चालौनि आलीं वरी
संग्रामीं गड नागवे मग तिहीं विश्वासघातक्रिया
केलें बंधन संकटांत पडलों हा हा हरी सावया ९९५
बंधू त्र्यंबकराज तात विषयीं होते सवें सोयरे
आतां काय उपाय घाय न चुके दिल्येंद्र मारील रे

ऐशा घोर भवार्णवांत जनकें बोधासि आरोपिलें
ध्या रे ध्या हरि सांवळा तिं वचनीं सर्वांतरीं लागलें १९६

ओवीबद्ध ग्रंथांत थोडी आधिक माहिती आहे :— प्रसंग २९

देशवदन आमची वृत्ती । निशारमण वंशाधिपती ।
कुलतरी सोळखी आदि म्हणती । गोत्र सांगती अत्रि एसें ९४
वास तरी गौतमप्रदेशीं । आम्ही मराठे सोमवंशी ।
दोनच पुत्र पित्यासीं । त्रिंबक काशी नामें त्यांचीं ९५
अवचित आमुचा पिता । तो नगर जाला वसविता
भारम नाम ग्राम होता । वस्ती केली बहुसाल ९६
विठ्ठलभक्ती पंढरीं पित्यासीं । सदनीं स्थापिला हृषीकेशी
आषाढ शुद्ध एकादशी । यात्रा भरे देवाची ९७
भार भगवंतें घेतला । मग भारम कैसें म्हणावें तिजला
म्हणोनि जनकें विचार केला । नाम ठेविलें विठ्ठलपूर ९८
त्या विठ्ठलपुरींचे जन । कलियुगीं देखिले सज्जन
पुरस्वामीचें विठ्ठलीं मन । तेथेंच तल्लीन सर्वहि ९९
मुलेंबाळें नर पुरनायका । सहज व्यवहारता आयका
सत्यमिथ्या परी रमानायका । आळविती वेळोवेळां १००
तात आमुचा अहंकारी । शक्त्यनुसार सेना संचारी
विग्रह (लढाई) दाक्षण्यांसीं करी । वृत्ती मंडळी रक्षीत आपुली १
भोंवते दिधले अधिकारी । त्यांची आज्ञा करी न करी
म्हणे एक स्वामी माझा हरी । तो निर्वाह करी तयाचा २
सुखें राज्य करितां आम्हांसीं । कुबुद्धी निर्माण झाली ऐसी
विठ्ठलपुर सोडूनि पर्वतासीं । वसवुनी बळकाविलें ३
नाम ठेविलें गोपाळगिरी । तीन मास राहिलों वरी
तट सांगो गेले दूरी । अविंधदळ युद्धासि आलें ४
क्रियाशपथद्वारें घर घेती । विश्वासघाता प्रवर्तती
त्यां न कळे कर्माची निर्गती । कैसी अंतीं होईल ५
नव्हे पूर्वदत्त आलें फळासी । वृथा शब्द न ठेवावा कोणासी
दिल्लींद्राचे बंधनफांसीं । गुंतलों तिघेजण ६

ते वेळे दिशा लंघिल्या सुखें । ब्रह्माण्ड अवघें भरलें दुःखें
ऐसीये समयीं पिता मुखें । म्हणे भजा रे भगवंता ७
अनन्यभक्ति असतां आपण । हरि नुपेक्षी तारील जाण
कदापि कर्मे आणिलें मरण । तरी पावन हित आहे ८
ब्रह्म निरूपण रात्रंदिवस । पिता करिता झाला आम्हांस
एक सर्वात्मा हृषीकेश । दुसरा नाही सर्वथा ९
हृदयीं भरला सांवळा हरी । तोही आम्हांवरी कृपा करी
बंधन नव्हे आनंदलहरी । वाटे संसारीं सार्थक १०
येणें स्थिति भोगितां भोगू । आला अदृष्टाचा लागू
जाला पितयाचा वियोगू । कठिण समय वर्तला ११
श्रीविठ्ठलपुरनिवासी जन । स्नेहाळ सत्वाथिले गहन
नाना विघ्नांचा वर्षे घन । तरी अंतर आम्हां न देती १२
कुटुंबाचा सांभाळ करणें । धान्यें वेंचिती आम्हांकारणें
परी न उठे कर्माचें बसलें धरणें । होणें तें होऊं लागलें १३
परिवार राहिला विठ्ठलपुरीं । आम्ही होतां नवरंगनगरीं ( दिल्ली )
अवचित निमाला देवगिरी । प्रारब्धगति विचित्र १४

वरील उताऱ्यावरून आपणांस समजतें की, कवीचे वडील भारम गावचे देशमुख असून ते चंद्रवंशीय क्षत्रिय होते. आडनांव सोळंखी, गोत्र अत्रि[१].

अवचितरावांनी भारम गांव वसविलें. त्यांना दोन मुलगे. एक त्रिंबक व दुसरा काशी ( प्रस्तुत काव्याचे कर्ते ). अवचितराव पांडुरंगाचे भक्त होते. आपल्या वाड्यांत त्यांनी पांडुरंगाच्या मूर्तीची स्थापना केली होती. आषाढांतील महाएकादशीच्या दिवशीं तेथे यात्रा भरत असे. भारमगावाला पुढे विठ्ठलपूर हें नांव ठेविलें. गांवचा मालकच सात्त्विक असल्यामुळे ग्रामस्थहि मोठे सत्प्रवृत्त झाले.

१ श्लोकांत ' भारद्वाज सुगोत्र जाण ' असा उल्लेख आहे व ओव्यांत ' गोत्र सांगती अत्रि ' असें स्पष्ट म्हटलें आहे. ' सांगती ' शब्दावरून कवि या बाबतींत निश्चित नाही असें वाटतें ' शिवाजी निबंधावली खण्ड २ ' मध्ये ' मराठ्यांचा ९६ कुळींच्या दोन जुन्या याद्या ' या लेखांत कै. चिं. वि. वैद्य यांनीं दिलेल्या नामावलींत सोळुंकी साळुंखे या कुळींचें भारद्वाज गोत्र दिलेलें आहे.

मूळची वृत्ति क्षात्र, म्हणून अवचितराव राजाधिकाऱ्यांशीं नेहमीच नमून वागत असें नव्हतें, केव्हा केव्हा राजाज्ञांचीहि ते पर्वा न करतां पांडुरंगावर भार ठेवून दाक्षिणात्यांबरोबर लढाई करण्यास सिद्ध होत. अशाच एका प्रसंगीं शेजारचा एक गड हस्तगत करून त्यांनी त्याला 'गोपाळगिरि' हें नांव ठेविलें. या गडावर आपल्या मुलांसह ते राहूं लागले. तीन मास लोटले आणि अविंध सैन्याचा हल्ला आला. कांहींनी विश्वासघात केला व बापलेक दिल्लीपतीच्या 'बंधन फांसीं' गुंतले. सुख दुरावलें, 'ब्रह्माण्ड अवघें दुःखें भरलें'. परंतु अवचितरावांची पांडुरंगावर अव्याज निष्ठा. त्यांनी उभयतां मुलांस उपदेश केला-'ध्या रे ध्या हरि-सांवळा'. 'भजा रे भगवंता'.दिल्लींत कारागृहांत असतांना 'अदृष्टाचा लागू आला' आणि पितयाचा वियोग (मरण) झाला. दुःखाचा पर्वत कोसळला, आकाश फाटलें. अशाहि दुरवस्थेंत गांवच्या लोकांनी कुटुंबाचें रक्षण केलें. कुटुंबियांना कांही उणें पडूं दिलें नाही. पुढे ईश्वरीकृपेने बंधमुक्त होऊन ते दक्षिणेंत परत आले.

हा काळ कोणता असावा हें इतिहासावरून व दोन्ही ग्रंथांत शेवटीं दिलेल्या कालविषयक संदर्भावरून अनुमानितां येतें.

ओवीबद्ध ग्रंथाचा काळ प्रसंग २९ मध्ये आहे.

> शालिवाहन शके सुंदर। सोळाशतें अठरा वर
> ते दिवशीं पांचाळी स्वयंवर। टीका संपूर्ण समाप्ती	१३२
> धातानाम होतें संवत्सर। पौष वद्य दशमी गुरुवार
> ते दिवशीं द्रौपदी स्वयंवर। टीका संपूर्ण समाप्ती	१३३

धातानाम संवत्सर पौष वद्य १० गुरुवार शके १६१८ (इंग्रजी ७ जानेवारी १६९७).

प्रस्तुत ग्रंथांत १००२ श्लोकांत कालाचा उल्लेख आला आहे.

> विधिसुतसुतसाक्षीपल्लवी नाम होता
> निशिवरसुतवारीं श्रावणी शुद्धभूता
> वचनसुमनराशी तद्दिनीं पूर्ण झाली
> अवचितसुत काशी दास साष्टांग घाली १००२

विधिसुत = नारद त्याचा सुत = संवत्सर नामें प्लव (पल्लव). निशिवर = चंद्र त्याचा सुत = बुध. श्रावण शुद्धांतील बुधवार. ग्रंथाधारें प्लवनाम

संवत्सर शके १५८३ व बुधवारीं प्रतिपदा व अष्टमी या तिथि येतात. शके १६४३ तहि प्लव संवत्सर आहे. परंतु कवित्व, शब्दसौष्ठव, कल्पनाविलास व रसपरिपाक या दृष्टींनी ओवीबद्ध ग्रंथ अधिक सरस उतरला आहे. यावरून तो नंतरचा असावा व श्लोकबद्ध ग्रंथ शके १५८३ ( इ. १६६१ ) मध्ये लिहिला गेला असावा असें अनुमान चुकीचें ठरणार नाही.

महाराष्ट्रीय संत-कवि-काव्य-सूचीकारहि श. १५८४ असा काळ देतात (पृ. १८).

## ऐतिहासिक परिस्थिति

दक्षिणेंत सत्ताभिलाषेने पहिलें पाऊल टाकणारा मुसलमान सरदार अल्लाउद्दिन खिलजी इ. स. १२९६ त देवगिरीवर चाल करून आला. रामदेवरावाचा पूर्ण पराभव झाला. १३०८ त मलिककाफूरने रामदेवरावावर स्वारी केली व रामदेवरावास कैद केलें. यादवांची सत्ता संपुष्टांत येऊन मुसलमान सुभेदार देवगिरीस राहून राज्य करूं लागले. पुढे बहामनी राज्य आलें. तो काळ सामान्यतः इ. स. १३४६ ते १५२६ पर्यंतचा मानण्यांत येतो. याच कालावधींत विजयानगरचें हिंदु राज्य उदयास आलें. धर्मरक्षणाचें मोठें कार्य या राज्याने केलें. दोन शतकांतील आपल्या आयुर्मर्यादेंत या राज्यांतील कांही महान् व्यक्ति ध्येयवादाने तळमळत होत्या. परंतु हें राज्य वैभवाने उभें राहिलें, प्राणपणाने लढलें व अंतीं स्मृतिशेष झालें. हिंदु राज्याची घडी विसकटली. ती नीट बसविण्यासाठी महाराष्ट्रांत एक प्रभावी शक्ति पुढे अवतरली. मुसलमानांचें राजकीय वर्चस्व दृढ झालें खरें, परंतु राजधानींचीं ठिकाणें वगळल्यास खेड्यांतील जीवनावर विशेष परिणाम झालेला दिसत नाही. हिंदुसमाजाची घडण अशी होत आली आहे की, राजकीय फेरबदलाचा धक्का खेड्यापर्यंत क्वचितच लागतो. प्राचीन काळची ग्रामव्यवस्था फारशी पालटत नसे. इ. स. १५२६ ते १७०७ हा काळ मोंगल साम्राज्याच्या वैभवाचा. उत्तर हिंदुस्थान काबीज केल्यावर अकबराची नजर दक्षिणेकडे वळली. या पूर्वीच दक्षिणेंतील बहामनी राज्याचे तुकडे होऊन पांच राज्यें अस्तित्वांत आलीं होतीं. या राज्यांत लोक गांजले होते. स्त्रियांवर बलात्कार, हिंदूंचे उघड उघड खून, मंदिरांचा नाश, गोवध इत्यादि अनन्वित कृत्यांनी राज्यांत थैमान घातलें होतें. यांतून महाराष्ट्राची मुक्तता करण्यासाठी छत्रपति शिवाजी महाराज अवतरले. 'द्रौपदीस्वयंवर'कर्ता अवचितसुतकाशी याच कालांत भारम गावीं देशमुखी करीत

होता. त्याने आपलें पहिलें काव्य रचिलें त्या सुमारास श्री शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली व सुप्रतिष्ठित केली. पण तत्कालीन परिस्थित्यनुरूप पुष्कळ मराठे सरदार मुसलमान राज्यांत सेवा करीत होते. खेडेगांवापर्यंत महाराजांची कीर्ति पसरली असलीतरी सरदार-दरकदार, कुळकर्णी-पाटील, देशमुख-देशपांडे आपल्या दैनंदिन कामांत मग्न होते. मोंगलाचें राज्य दक्षिणेंत स्थिर करण्यासाठी औरंगजेब इ. स. १६३६ ते १६४४ पर्यंत दक्षिणेंत सुभेदारीच्या पदावर होता. या वेळीं त्याने बागलाण प्रांत जिकला. १६५३ सालीं तो दुसऱ्यांदा दक्षिणेंत आला. इ. स १६५८ सालीं शहाजहान आजारी पडल्याची बातमी ऐकून तो उत्तरेंत गेला व श्रीशिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्याने दक्षिणेकडे तोंड फिरविलें. ही स्वारी इ. स. १६८१–१७०७ पर्यंत म्हणजे औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत चालू राहिली. मध्यंतरींच्या कालांत श्रीशिवाजी महाराजांनी ‘स्वराज्य’ स्थापून महाराष्ट्रदेश व मराठी भाषा यांचा मान पुष्कळच वाढविला होता. एवढा इतिहास देण्याचें कारण अवचितसुतकाशीचे दोन्ही ग्रंथ याच कालावधींत निर्माण झाले. श्लोकबद्ध द्रौपदीसैंवर इ. स. १६६१ व ओवीबद्ध इ. स. १६९७. परंतु आश्चर्य हें की, दोन्ही ग्रंथांत श्रीशिवाजी महाराजांच्या नांवाचा वा कार्याचा उल्लेख नाही. द्रौपदीसैंवराला उपस्थित झालेल्या मराठे राजांचीं नांवें कवि देतो त्यांत ‘भोसले’ हें नांव नाही. मात्र शिसोदे आहे. महाराष्ट्र देश व मऱ्हाटी भाषा यांचा अभिमान बाळगणारा कवि क्षत्रियकुलोत्पन्न असूनहि हा उल्लेख टाळतो याचीं कांही कारणें अनुमानितां येतात. एक तर मुसलमानांच्या आज्ञेत वागणारे कांही मराठे सरदार श्रीशिवाजी महाराजांच्या कार्याकडे अनुकूल दृष्टीने पाहत नव्हते, व दुसरें म्हणजे प्रत्येक परगण्यांत असणारे देशमुख-देशपांडे हे अधिकारी वंशपरंपरागत असत. परगण्यांतील जमाबंदीचा हिशेब ठेवणें व वसुलीवर देखरेख करणें हीं सामान्यतः त्यांचीं शासनीय कार्यें. त्यासाठी पदरीं थोडीफार शिबंदी ठेवणें अगत्याचें असे. त्यांतील एखादा महत्त्वाकांक्षी निघाला तर गढ्याकोट बांधून राजा बनण्याचा प्रयत्न करी व आसपासच्या मुलखांत आक्रमक दंगाहि करी. अवचितराव याच स्वभावाचे होते. म्हणून श्रीशिवाजी महाराजांच्या पवित्र कार्याकडे त्यांचें तितकेंसें लक्ष गेलें नसावें. शिवाय सोळंखी सोमवंशी व भोसले सूर्यवंशी ही वंशभिन्नता ‘भोसले’ शब्दाच्या अनुल्लेखाला कारणीभूत असावी. तसें पाहिलें तर जुन्या मराठी

काव्यांत राजकीय घटनांकडे फारच थोड्या कवींनी लक्ष दिलें आहे. मात्र इतर सामाजिक व धार्मिक माहिती अधूनमधून आढळते. या काव्यांतहि कवीच्या वेळची वेषभूषा, भोजनांतील पक्वान्नें, उद्योगधंदे करणारे लोक यांचें वर्णन आलें आहे. त्याची दखल योग्य ठिकाणीं घेण्यांत येईल.

## मराठींतील पंडित – कवि

हा कवि पंडित कवींच्या पंक्तींतील आहे. जुन्या मराठी काव्यांत दोन प्रवाह स्पष्ट दिसून येतात. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि संत कवि. त्यांचें काव्य परतत्त्वस्पर्शात्मक. अज्ञ समाजाला धर्माभिमुख करून परमार्थाचा मार्ग समजावून देण्यासाठी प्रायः साध्यासुध्या ओवी-अभंगांच्या रूपाने हें काव्य अवतीर्ण झालें. लोकोद्धाराच्या उदात्त हेतूने प्रेरित झालेली, ‘ बोले तैसा चाले ’ हें सूत्र अनुसरणाऱ्या विभूतींच्या तोंडची ही अमृतवाणी अमरपदवी पावून लहान-थोरांच्या मनांत दुमदुमून राहिली आहे. दुसरा प्रवाह क्वचित् बहुढंगी पण मुख्यतः बहुरंगी आहे. त्या प्रवाहांत संतवाङ्मयांतील भक्तीचा जिव्हाळा जरा कमी प्रमाणांत आहे, पण पांडित्याची झळाळ मोठी वेधक आहे. नरेंद्र, भास्करभट्ट, मुक्तेश्वर, वामनपंडित, सामराज, नागेश, विठ्ठल, मोरोपंत, रघुनाथपंडित ही मालिका व्युत्पन्न, बहुश्रुत, विद्यावृद्ध, पांडित्यदर्शी विद्वानांची आहे. यांपैकी पुष्कळांचें संस्कृतभाषाप्रभुत्व उत्तुंग असल्याने त्यांच्या काव्याचा उद्गम आणि विकास संस्कृतनिष्ठ झाला. संतकाव्यांतील निवृत्तिपरभावनेला या पंडिती काव्याने प्रवृत्तीची वृत्तालंकारयुक्त पैठणी नेसविली. महाभारत, रामायण, भागवत इत्यादि पुराणांतून मार्मिकतेने टिपलेले प्रसंग आख्यानरूपाने गणवृत्तांच्या सजावटींत मराठींत उतरूं लागले. कीर्तन-पुराणांना यांचें भरपूर साहाय्य झालें. धर्मप्रचार आणि मनोरंजन हे दोन्ही उद्देश सफल होऊं लागले. अवचितसुतकाशीचा ‘ द्रौपदीस्वयंवर ’ हा ग्रंथ याच पंडित-काव्यांत पडतो.

‘ स्वयंवर ’ हा पंडितकवींचा भारी आवडता विषय दिसतो. संत-कवि-काव्य-सूचींत ‘ स्वयंवरें ’ निर्दिष्ट केलीं आहेत तीं:–

| | |
|---|---|
| १ अभिमन्युविवाह ( त्र्यंबक ) | २३ रुक्मिणीस्वयंवर ( यादव ) |
| २ अभिमन्युविवाह ( विश्वनाथ ) ( कृष्णदास ) | २४ रुक्मिणीस्वयंवर ( विश्वेश्वरवल्लभ ) |

३ उषास्वयंवर ( सखोबा ) ?
४ उषास्वयंवर ( वामन )
५ कौसल्यास्वयंवर ( एकनाथ )
६ गणपतिस्वयंवर ( भास्कर )
७ द्रौपदीस्वयंवर ( अनंत )
८ द्रौपदीस्वयंवर ( काशी )
९ द्रौपदीस्वयंवर ( जनाबाई )
१० द्रौपदीस्वयवर ( यशवंतसुत )
११ द्रौपदीस्वयंवर ( पांडोबा )
१२ द्रौपदीस्वयंवर ( पांडुरंग )
१३ नलदमयंतीआख्यान ( रघुनाथ )
१४ रुक्मिणीस्वयंवर ( अनंत )
१५ रुक्मिणीस्वयंवर ( अनंतसुत )
१६ रुद्रिमणीस्वयंवर ( गोविन्दात्मज )
१७ रुक्मिणीस्वयंवर ( एकनाथ )
१८ रुक्मिणीस्वयंवर (कृष्णदास-गोविंद)
१९ रुक्मिणीस्वयंवर ( जयरामस्वामी )
२० रुक्मिणीस्वयंवर ( दिनकर )
२१ रुक्मिणीस्वयंवर ( पांडोबा )
२२ रुक्मिणीस्वयंवर (मुद्गल-अनंतसुत)
२५ रुक्मिणीस्वयंवर ( विठ्ठल )
२६ रुक्मिणीस्वयंवर ( विश्वनाथ )
२७ रुक्मिणीस्वयंवर ( सखारामतनय )
२८ रुक्मिणीहरण ( सामराज )
२९ शिवपार्वतीपरिणय ( शंकरदास )
३० सीतास्वयंवर ( अनंत )
३१ सीतास्वयंवर ( अमृतराय )
३२ सीतास्वयंवर ( आनंदतनय )
३३ सीतास्वयंवर (हिंदी) ( गिरिधर )
३४ सीतास्वयंवर (गोसावीनंदन)
३५ सीतास्वयंवर (चिंतामणि)
३६ सीतास्वयंवर (जयरामस्वामी)
३७ सीतास्वयंवर (नागेश)
३८ सीतास्वयंवर (नागेशकेत)
३९ सीतास्वयंवर (प्रल्हादबोवा)
४० सीतास्वयंवर (यशवंतसुत)
४१ सीतास्वयंवर (वामन)
४२ सीतास्वयंवर (विठ्ठल)
४३ सीतास्वयंवर (वेणीस्वामी-वेणाबाई)

शिवाय नरेन्द्राचें रुक्मिणीस्वयंवर, कृष्णदास-संतोष मुनीचें रुक्मिणी-स्वयंवर यांचाहि समावेश केल्यास व वेणीस्वामी आणि वेणाबाई या व्यक्ति भिन्न असल्यास एकंदर ४६ स्वयंवरांची संख्या लेखकाच्या माहितीप्रमाणे होते. महाभारत व रामायण यांवर आधारलेलीं अन्य काव्यें पुष्कळच आहेत. संस्कृत-रत्नाकरांत अवगाहन करतांना जीं जीं वाङ्मयीन रत्नें गवसलीं तीं बाहेर आणून

मराठी सरस्वतीच्या भूषेंत उंची कण्ठाभरणाची योजना करण्यांत मराठी कवि जीवनाचें सार्थक्य मानीत असत.

हीं स्वयंवरें व भारतरामायणादि पुराणांतर्गत इतर आख्यानें मराठींत काव्यबद्ध करतांना पंडित कवि आपल्यापुढे संस्कृत कवींचा आदर्श प्रायः ठेवतात. कालिदास, भारवी, माघ, श्रीहर्ष इत्यादिकांच्या काव्यावर व काव्यपद्धतीवर हे कवि विलक्षण लुब्ध झाले आहेत. वृत्तांचें वैविध्य, चित्रकाव्यांतील बंधयोजना, चमत्कृतिजनक यमकें, कर्णमधुर अनुप्रास यांच्या प्राचुर्यासमवेत मनोहर अर्थालंकार, संस्कृतांतील रूढ कविसंकेत व भरपूर तत्सम शब्द यांचा पुरेपूर उपयोग या काव्यांत दिसून येतो. म्हणून भक्तीला चढविलेला कलेचा ' कोल्हापुरी साज' शोभून दिसतो व रसिकांचें चित्त आकृष्ट करतो यांत शंका नाही.

## द्रौपदीस्वयंवर - एक महाकाव्य

अवचितसुत-काशीने ' द्रौपदीस्वयंवर ' कांही अंशीं संस्कृत महाकाव्याच्या[1] पद्धतीनुसार रचिलें आहे.

द्रौपदी-स्वयंवर हें चौदा सर्गांत विभागलेलें असून त्याचा प्रारंभ ' मंगला ' ने झाला आहे. यांतील कथानक महाभारतांतून घेतलें आहे. साहजिकच पांडवांसारखे धीरोदात्त शूर नायक सर्वांच्या परिचयाचे आहेत. द्वारकानगरी, उद्यानें, अरण्यें, स्वयंवर, युद्ध इत्यादिकांच्या सुरस व स्वभावोक्तिपूर्ण वर्णनांनी हें काव्य युक्त असून, उपमा, उत्प्रेक्षा रूपकादि ठळक ठळक अर्थालंकार; यमक, अनुप्रासादि

१. संस्कृत साहित्यशास्त्रांत महाकाव्याचीं प्रधान लक्षणें पुढीलप्रमाणे देण्यांत येतात. महाकाव्यांत सर्ग असावे; सर्गांची संख्या आठांहून कमी वा तिसांहून अधिक नसावी; आरंभ आशीर्वाद, नमस्कार वा वस्तुनिर्देशाने व्हावा; कथानक ऐतिहासिक वा सदाश्रित असावें; नायक चतुर, उदात्त असावा; नगर, समुद्र, पर्वत, ऋतु, चंद्र-सूर्य यांचे उदय, उद्यान, जलक्रिडा, मधुपान, रथोत्सव विप्रलम्भ ( शृंगार ), विवाह, पुत्रजन्म, मंत्र, दूतप्रयाण, नायकाचा अभ्युदय इत्यादींचीं वर्णनें असावीं; अलंकारयुक्त, दीर्घ, रस-भावांनी भरलेलें असावें. वृत्तें मोठीं श्राव्य व विविध असावीं; तें वाचून लोकरंजन व्हावें; काळाच्या कसोटीला उतरावें इत्यादि लक्षणें दण्डी काव्यादर्शांत देतो व असेंहि सांगतो की, या लक्षणांपैकी कांही नसलीं व इतर घटकांनी या न्यूनतेची भरपाई केली तरी प्रत्यवाय नाही.

प्रचुर शब्दालंकार; त्यांच्या जोडीला कमलबंध, रारायंत्रबंध, माळाबंध, हारबंध, चक्रबंध, शेषबंध अशा स्वरूपाच्या चित्ररचनेची कलाकुसर यांनी तें अलंकृत आहे. वृत्ताची योजनाहि सयुक्तिक व मार्मिक असून त्यांची विविधता कविकीर्ति-विवर्धिनी ठरेल.

पांडवांच्या जीवनांतील हा काल संकटमय असल्यामुळे करुणरसाच्या आविष्काराला पूर्ण अवसर मिळतो व नैकविध आपत्तींना धीराने तोंड देतांना कुन्तीच्या मनाचा हळुवारपणा, धर्मराजाचें स्थिरमतित्व, भीमाचें 'मुसळकंदत्व', 'अर्जुनाचा भीमपराक्रम यांचें प्रकर्षत्वाने केलेलें चित्रण अप्रान्तमति व्यासमहर्षींनी मुळांत जितक्या उत्कटत्वाने केलें आहे तितक्याच प्रसन्न पद्धतीने प्रतिभासंपन्न काशीकवीने मराठी भाषेंत तें रंगविण्याचा मोठा यशस्वी प्रयत्न केला आहे. कवि महाकाव्याच्या संस्कृत लक्षणाचें अक्षरशः पालन करीत नसला[1] तरी आपलें काव्य महाकाव्याच्या धर्तीवर त्याने लिहिलें आहे असें दिसून येतें.

## द्रौपदीस्वयंवराचें मूळस्थान

आदि अलंकृत सत्कृत संस्कृत हे वचनाकृत प्राकृत पाही ( १. ३ )
ओवीबद्ध ग्रंथांत—
ऐका श्रीव्यासकाव्य मनोहर । पावन कथा पांचाळीस्वयंवर
हें **आदिपर्वींचें** सार । रम्य आणि पवित्र ( प्रसंग १·४३ )
तैसी हे **आदिपर्वोदरीं** । द्रौपदी स्वयंवर कथा ( प्र. १·४९ )

**आदिपर्वी** भीष्मद्रोण सांगातें । परी **कथाकल्पतरूचेनि** मतें । म्यां नाहीं घेतले क्षमा मातें । विचक्षणीं करावी ( प्र. ९·१८ )

या उल्लेखांवरून कथेचें उगमस्थान महाभारत-आदिपर्व व कथाकल्पतरु या ग्रंथांत आहे हें स्पष्ट होतें.

महाभारत आदिपर्वांतर्गत अध्याय १३८, जतुगृहपर्व अध्याय १४१-१५१, हिडिंबवधपर्व अध्याय १५२-१५६, बकवधपर्व अध्याय १५७-१६४, चैत्ररथपर्व अध्याय १६५, स्वयंवरपर्व अध्याय १८४-१९२, वैवाहिकपर्व अध्याय

१. न्यूनमप्यत्र यैः कैश्चिदङ्गैः काव्यं न दुष्यति (काव्यादर्श १·२० ). कांही घटक कमी असले म्हणून कांही महाकाव्य दोषार्ह ठरत नाही.

१९३-१९९; विदुरागमनराज्यलम्भपर्व अध्याय २०८-२१२ (महाभारत १ आदिपर्व, चित्रशाळा आवृत्ति ); व कथाकल्पतरु (मराठी भाषांतर भाग ३, दामोदर सावळाराम आणि मंडळी, स्तबक ५-६-७; १९१०) स्तबक ५, अध्याय ११.१२ या दोन ग्रंथांच्या आधाराने प्रस्तुत काव्य रचिलें आहे. केवळ कथानक उसनें, त्यावर प्रसन्न आभरण कवीच्या प्रतिभेने चढविलें आहे. अधिक कल कथाकल्पतरूकडे दिसतो. कामाख्यादेवीचें आख्यान मूळ वनपर्वांत अ. १९१-२ मध्ये निराळ्या स्वरूपांत आहे

## कथानक-सारांश

काव्याचा आरंभ द्रौपदीच्या रहस्यमय जन्माने होतो. उपवर झालेल्या द्रौपदीच्या विवाहाची द्रुपदाला लागलेली चिंता, अर्जुनाशीं तिचा विवाह व्हावा ही मनीषा, पांडवांचें-वारणावतास गमन, जतुगृहदाह, कृष्णकृपेने पांडवांचें संकटहरण, हेडंब-वध, भीम-हिडिंबा-विवाह, जतुगृहांत पांडव दग्ध झाले हें ऐकून द्रुपदाला झालेलें दुःख, द्रुपद-कृष्ण भेट, स्वयंवराची तयारी, कृष्णाचें आगमन, इकडे वनांत किर्मिर-पांडवांचा संघर्ष, कामाख्यादेवीपुढे पांडवांचें बलिदान, भीमाचें साहस व त्यामुळे टळलेला अनर्थ, बकासुरवध, पांचालदेशगमन, गंधर्वपराभव, स्वयंवरप्रसंग, ब्राह्मणवेषांत पांडवांची उपस्थिति, दुर्योधनाची फजिती, अर्जुनाने केलेला मत्स्यवेध व त्यामुळे उद्भवलेला युद्धप्रसंग, भीमार्जुनांचा पराक्रम, कौरवांचा पाडाव, पांच पति व एक वधू यामुळे निर्माण झालेला पेंचप्रसंग, व्यासऋषींनी प्रकट होऊन द्रुपद राजाची घातलेली समजूत, नारदाने सांगितलेलें सुंदोपसुंद आख्यान या सर्व एकीवर एक अशा बहारदार घटना कवीने आपल्या प्रसादमय भाषेंत साजेशा वृत्तांच्या आधाराने मोठ्या रसिकतेने सांगितल्या आहेत.

## कांही सरस बदल

कृष्णभक्ति ही प्रस्तुत काव्याच्या मूलस्थानीं ठेवून कवीने स्वयंवराची सर्व जबाबदारी श्रीकृष्णाकडेच सुपूर्त केली आहे व श्रीकृष्णाने ती मोठ्या प्रेमाने स्वीकारली आहे. देव उद्धवाला सांगतात, 'या कामीं ब्रिदभार थोर चरणीं म्या तोडरू घातला, '१२५; द्रुपदालाहि जाणीव करून देतात, ' हे जे तुम्हासि मखजा मज काय नोहे' ५००; कारण द्रुपद राजा देवाला नंदाइतकाच

प्रमाण आहे ७५; म्हणून तर फक्त अर्जुन सिद्ध करूं शकेल असा ‘ रारायंत्रपण ’ भगवंतांनी स्वतः उभारला. दुर्योधनाचें तेजोहरण भर सभेंत केलें. या कार्यांतील भगवंताचा प्रमुखपणा महाभारतांत तितका स्पष्ट नाही.

तीच स्थिति घोषित केलेल्या पणाची. महाभारतांत धृष्टद्युम्न सभेंत येऊन म्हणतो—

इदं धनुर्लक्ष्यमिमे च बाणाः शृण्वन्तु मे भूपतयः समेताः ।

छिद्रेण यन्त्रस्य समर्पयध्वं शरैः शितैर्व्योमचरैर्दशार्धैः ॥ १. १८५. ३५

“ येथे हें धनुष्य व बाण आहेत; सर्व राजांनी माझें भाषण ऐकावें; आकाशांत भ्रमण करणाऱ्या या यंत्राच्या छिद्रांतून या पांच बाणांनी लक्ष्यभेद करावा ” कथाकल्पतरुकार लिहितात, ‘ जो हें धनुष्य घेऊन जमिनीकडे पाहून वर फळीच्या भोकांतून बाण सोडून माशाला खालीं पाडील त्यालाच द्रौपदी माळ घालील. ’ काशीकवीचा पण जीवघेणा आहे :—

‘ पहा वंशाग्रीं जो भ्रमण करितो मच्छ वळसा
कढैमध्ये त्याचें विलसित गतीबिंब गिंवसा
अधोदृष्टी मुष्टी वरि धरुनियां वामनयनीं
प्रतापें पाडावा सितरुनि महा मीन अवनीं.
त्रिबाणाची संख्या करिल नृप जो पूर्ण विजयी
तया घाली माळा अचुक निज बाळा गुणमयी
परी आहे माझा कठिण पण घोरांदर महा
चुके तो घालावा उचलुनि कढैमाजि सहसा.

हा पण ऐकून उपस्थित राजांची अवस्था कशी झाली याचें मजेदार वर्णन कवीने केलें आहे. या कठीण पणाबद्दल अनेक सैंवरें झालीं, पण ‘ कढै घातले भूपती कोणकोणें ’ या शब्दांत काशीराजाने केलेली द्रुपदाची निर्भर्त्सनादेखील वाचनीय आहे. असाच मुळांत नसलेला दुसरा एक प्रसंग कवीने वर्णिलेला आहे. ‘ मुद्रिका घ्या व मला पोटभर जेवण घाला ’ असें म्हणत फिरणाऱ्या भीमाने राजगृहांत उडवून दिलेली धांदल हास्यरसाला पोषक अशीच आहे. कामाख्यादेवीचा वृत्तान्त, रारायंत्रपण, मुद्रिकाप्रसंग व इतर बारीकसारीक घटनांची भर घालून कवीने आपल्या काव्यांत एक प्रकारचा चटकदारपणा

आणला आहे. या घटना कवीच्या प्रतिभेंतून निर्माण झाल्या असें नव्हे, त्याने त्या कथाकीर्तनांत ऐकल्या असतील अगर अन्य पोथ्यांतून वाचल्या असतील. त्यांचा योग्य ठिकाणीं उपयोग करून मूळ कथानकाच्या रसाळपणांत कवीने भर घातली हें निश्चित.

## काव्याची प्रसादित निर्मिति

या काव्याचा उद्गमच मोठा चमत्कारजन्य आहे. काशी आणि त्रिंबक या दोन मुलांसह अवचितराव दिल्लीशाच्या कारागृहांत सचिंत काळक्रमणा करीत होते. विठ्ठलावर पूर्ण श्रद्धा; अशा घोर भवार्णवांतहि ते मुलांना बोध करीत, " घ्या रे ध्या हरिसांवळ्या तिं वचनीं. " याचा परिणाम असा झाला की,

> गेले दोष मनांत तोष भरले श्रीकृष्णघोषें पहा
> कैचें बंधनमुक्त युक्त हृदयीं आनंद जाला महा
> श्रीकृष्णें निजरूप दाउनि मला स्वप्नांत आलिंगिलें
> प्रेमाचा पुर फूटला मग मुखीं वक्तृत्व हें लोटलें

श्रीकृष्णकृपेने स्फुरलेल्या या कवित्वाला अव्याज भक्तीची भक्कम बैठक असल्याने तें सत्काव्य या नामाला पात्र ठरतें. त्यांतील रसाळपणा हृदयंगम असून विविध प्रसंग वा घटना वाचतांना रसिकांचीं हृदयें हेलावल्याविना राहत नाहीत. सहज उद्गार निघतात की–

> सरसापि कवेर्वाणी हरिनामाङ्किता यदि ।
> सादरं गृह्यते तज्ज्ञैः शुक्तिर्मुक्तान्विता यथा ॥

कवीच्या रसाळ काव्याला हरिनामाची जोड मिळाली तर मोत्याने युक्त असा शिंपला जसा तज्ज्ञ एकदम घेतो, तद्वत् असलें सत्काव्य रसिक मोठ्या आदराने सेवन करतात.

## थोडेंसें रसग्रहण

धनुर्धर पार्थाला द्रौपदी द्यावयाची अशी मनीषा उराशीं बाळगणाऱ्या द्रुपदाला, पांडव जतुगृहांत जळून गेले ही अनपेक्षित दुःखद वार्ता समजली. त्याला अपार शोक झाला. तो म्हणतो, ' देवा, मला अद्याप जिवंत कां ठेवलेंस ? '

आतां सुतेसि नयनींच कसें पहावें
कन्येविना क्षणभरीचि कसें रहावें.

मानवी स्वभावांतील सहज लघिम्याने त्याच्या तोंडून

‘ रे कौरवा कुरुपती जळनास कां तूं
नष्टा खळा हृदहळाहळ नासका तूं ’

असे अपशब्दहि बाहेर पडतात आणि

बोले मुखें गतसुखें द्रगतोय गाळी
दुःखासि चंदन करोनि सभे उगाळी

मानवी स्वभावाचें हें यथार्थ वर्णन रसिकांना पटल्याविना राहत नाही. दुसऱ्या सर्गाच्या आरंभीं आलेलें द्वारकावर्णनहि तितकेंच सरस उतरलें आहे. द्वारकेच्या शिरावर तेजाचें पालाण घातलें गेल्याने ‘ निशा तेथिंची मायपोटीं रिघाली ’ हा युक्तिवाद, किंवा ‘ शशी सूर्य लोकीं न राहे न भासे ’ हे काव्यात्मक सत्यकथन, एक-मेकांना फळें वोपणारे तरु, झाडांना पाणी घालण्याची आवश्यकताच नाही, कारण ‘वनामाजि खेळे सदा पूर्ण पाणी,’ पक्षांचें गायन, ‘ पुराणांतरीं गुह्य जें अप्रसिद्ध ’ तें प्रसिद्ध बोलणारे हिळे-पिंगळे, ‘ भजा रे भजा श्री यदूनायका त्या ’ असें सांगणाऱ्या पक्षिपक्षिणी हीं दृश्यें नवल निर्माण करणार नाहींत का ? अशीं सुंदर वर्णनें प्रस्तुत काव्यांत ठायीं ठायीं विखुरलेलीं दिसतील. या वर्णनांत भर पडली ती प्रसाद गुणाची[१] व शोभिवंत अलंकाराची. त्यामुळे काव्याचें स्वरूप हृदयंगम झालें यांत नवल नाही. उदाहरणासाठी पुढील उतारे वाचा –
द्रौपदी जन्माला आली ती –

गांधार कर्मकुळ निर्मुळ हो कराया
ते पार्वती प्रकट पावन होय राया
ते सुंदरा उपवरा दिसमास दावी
चिंता पिता करि सुता कवणासि द्यावी

---

१. प्रसादवत् प्रसिद्धार्थं... ... प्रतीतिसुभगं वचः ॥ काव्यादर्श १·४५ ( अर्थाची स्पष्टता व सुबोधता )

द्वारकेचें वर्णन कसें बहारीचें आहे पाहा —

सुरीं सांडिलें सौख्य शक्रावतीचें
सदा सेविती प्रेम द्वारावतीचें
विधी रुद्र लाचावले त्या सुखासी
पुसे कोण तेथें नरां निर्जरांसी
दुरोनी अशी द्वारका देखियेली
पुढां चालतां दीसती वृक्षवल्ली
वनें दाटलीं ताळ माळां जनांहीं
धरा तेथिची भास्करा दृश्य नाहीं

भीम-बकासुर युद्धप्रसंगांत क्रोधाविष्ट झालेला तो राक्षस–

दावाग्नि घृतिं सिंपिला कडकला कीं काळ ववाळला
कीं तो व्याळ महाफणी वर गिरी पुच्छासनीं ताडिला
तैसा राक्षस कोपला रणमहीं युद्धाप्रती ठाकला
आला भीम वरी तयाप्रति कसें तो तोडिया बोलिला

दोघेहि युद्धाला–

पेटले दोघही घोर द्वंद्वासले
हाणिती घाव ते एकमेकां बळें
फोडिती चंड हाका महासंगरीं
व्योम कांपे तळीं भूमिका थर्थरी

स्वयंवराची तयारी चालू आहे, त्यासाठी–

प्रौढा प्रगल्भा अबला नि बाळा
मुग्धानुपम्या सगुणा सुढाळा
सुवासिनी ब्राह्मणि कामरेखा
रामा मिळाल्या करि कोण लेखा

अभ्यंगस्नान झालें आणि द्रौपदीने वस्त्रपरिधान केलें –

पायघोळ कटि सुंदर नागरा
नेसली तगडी मृदु घागरा
कंचुकी तटतटी उरिं कैसी
पावकेंचि दिधली उटि जैसी

वस्त्रालंकारांनी नटलेली द्रौपदी कशी दिसते –

नव्हे सौंदर्याब्धीवरिल लहरी साकृतवली
नव्हे तारुण्याची सबळ सरिता तुंबळवली
नव्हे लावण्याची लवलव लता एकवटली
नव्हे तेजाग्नीची त्रिभुवनकळा नारि नटली

स्वयंवर-मंडपांत जातांना प्रेमळ माता मुलीला आशीर्वाद देते –

पाव तूं चिंतिलें मंडपा जाउनी
भेट देईं मला मागुती येउनी
दृष्टि लागे झणीं प्राणगंगे तुला
कस्तुरीचा टिळा म्हणूनी रेखिला

सौंदर्यवती द्रौपदीला पाहून–

कोण पुण्य पाप माय बाप बंधु सासरी
कोण दान धर्म कर्म नेम नित्य वासरी
कोण देव कोण भाव भक्ति मुक्ति को वरी
को जपादि को तपादि सर्व धर्म नोवरी
टकमक नयनाचे देव जाले गुणाचे
विनमुख वचनाचे मौन्य जाले मनाचे
वधुशर वदनाचे लागले वेधनाचे
हृदईं जनजनाचे रंगले वेध नाचे

कारण

उगवली रजनीच मुखी वधू
विचरला जनिं कामकरू वधू
सुरवरीं सुरता क्रमु सांडिला
मुनिवरीं नवरीजप मांडिला
मनीं येक जाले महाचंचळस्तू
विराले सभे येक जाले गलिस्थू
गळालीं धनुष्यें धरेमाजि माती
असे ते पणा भेदिती काय माती

व्यञ्जना म्हणजे ध्वनि ज्या काव्यांत उत्कट तें उत्तम काव्य समजलें जातें. हा ध्वनि सिद्ध होण्यास अलंकारांची आवश्यकता प्रायः असते. त्यांतहि शब्दालंकारांपेक्षा अर्थालंकारांना महत्त्व अधिक. महाकाव्याच्या व्याख्येंतहि सुंदर अलंकारांचा ( सदलङ्कृति ) उल्लेख आहे. काशी कवीच्या या काव्यांत शब्दालंकार व अर्थालंकार भरपूर दिसून येतात.

शब्दालंकारांत यमकाला पहिलें स्थान द्यावें लागेल. प्रत्येक श्लोकांत चरणान्तीं यमक आहेच व तेंहि प्रायः शास्त्रपूत. समान व्यंजनांच्या आधींचा स्वरहि समान ठेवण्यांत कवीने प्रभुत्व प्रकटित केलें आहे. उदाहरणार्थ; मतीसी-पतीसी, नोवरातो -सोयरा तो, ग्रंथराशी—सैंवरासी. मधून मधून येणारे अनुप्रासहि हृद्य वाटतात; विशेषतः सवाई म्हणजे अमृतललिता वाचतांना ठेक्यावर येणारें तेंच तें अक्षर चित्तहारी ठरतें. ' आदि अलंकृत सत्कृत संस्कृत हे वचनाकृत प्राकृत पाहे ' किंवा

शतावधादि बायका पवित्र विप्रनायका

समग्र अन्न आइका तयासि वाढिती यका

संस्कृत महाकाव्याच्या प्रथेला अनुसरून कवीने एक सर्गच्या सर्ग चित्रकाव्याने सजविलेला नाही, पण मधून मधून विविध बंध बांधून रसिकाला बौद्धिक मिष्टान्नें वाढलीं आहेत. या बंधांचा विशेष असा आहे— संस्कृतांतील बंधाचा अर्थ कष्टद, दूरान्वित असतो. या काव्यांतील बंधांचा अर्थ सामान्यतः सुलभ आहे, तो लावतांना बुद्धीला फारसे श्रम पडत नाहीत.

' पद्मचक्रहारमाळशेषपंचभूषणें ' हरीसि वाहिलीं असें कवि सांगतो. हे पांच बंध – पद्मबंध, चक्रबंध, हारबंध, माळबंध, शेषबंध अनुक्रमें ४९२ – ४९६ या श्लोकांत आहेत. त्याशिवाय धनुर्बाणबंध ( श्लो. ६२६ ). अष्टदलकमलबंध ( ६२१ ) इत्यादि चित्रकाव्याचीं निदर्शनें मधून मधून आढळतात.

शब्दालंकारांपेक्षा अर्थालंकाराचें महत्त्व केव्हाहि अधिक. काशीकवि यांतहि आपलें प्रभुत्व प्रत्यक्षास आणतो. उपमा, रूपक, उत्प्रेक्षा हे अलंकार तर भरपूरच

कै. म. म. द. वा. पोतदार,

आहेत. त्यांबरोबर अतिशयोक्ति, व्यतिरेक, दृष्टान्त, अपन्हुति इत्यादि महत्त्वाचे अलंकारहि मधून मधून रसिकांच्या मनाला आल्हाद देतात.''[1]

## काशीकवीची व्युत्पन्नता

काशी कवि हा मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत इत्यादि कवींप्रमाणे संस्कृतभाषा-निपुण होता हें विधान धिटाईचें ठरेल. त्या काळीं संस्कृतविद्या ब्राह्मणवर्गापुरतीच होती. ती या वर्गाचें एक उपजीविकेचें साधन मानलें जाई. पण क्षत्रियादि वर्ग या विद्येपासून निश्चित दुरावले नव्हते. गावांतील व्युत्पन्न पुराण-कीर्तनकारांना मोठा मान असे. चातुर्मास्यांत नित्य पुराण-प्रवचनांचें श्रवण लोक मोठ्या भक्ति-भावाने करीत. प्रत्येक घरींसुद्धा दुपारच्या वेळीं अगर रात्रौ पोथ्यांचें वाचन नियमाने होई. यामुळे बहुश्रुतपणा व लोकशास्त्रादिकांतील निपुणता हे गुण सुप्त प्रतिभाशक्तीला जागृत करीत व काव्यनिर्मिति होई. काशी कवीहि मोठा बहुश्रुत व धारणाक्षम आहे. महाभारत, रामायण, भागवत इत्यादि पुराणें, कथाकल्पतरू-सारखे ग्रंथ त्याच्या अवलोकनांत होते. भगवद्गीताहि त्याला पाठ होती.

पुष्कर ( आकाश ), व्यस्त, उल्का अशासारख्या प्रायः कठीण वाटणाऱ्या व इतरहि अनेक तत्सम शब्दांची योजना; स्वयं, अतिशयं यांचा यमकासाठी केलेला उपयोग, स्त्रीबुद्धिः प्रलयंगता, न भूतो न भविष्यति अशा सुभाषितांचे योग्य उल्लेख, यावरून त्याच्या मनावर संस्कृत भाषेची मोठी छाप बसली होती असें म्हणावें लागतें. मात्र संस्कृत योजनेंत त्याने अनेक चुका केलेल्या आहेत. तो संस्कृतज्ञ नव्हता, पण संस्कृताशीं त्याचा परिचय होता. जातवेद ऐवजी वेदजात, गत-शक्तिच्या ठिकाणीं शक्तिगत, रसोगुण, नकुळस्सहदेवो, भोटस्महाभोटीचे, भानात्मज इत्यादि शब्दयोजना संस्कृत व्याकरण मान्य करणार नाही.

## महाराष्ट्र आणि मराठी भाषा

काशी कवीने महाराष्ट्र आणि मऱ्हाटी भाषा एतद्विषयक आपला अभिमान मोठ्या प्रौढोक्तीने प्रकट केला आहे.

---

१. उपमा १०९, १३०, १८०, ६४३ इ० रूपक ३७, ४३, ४४, ५३ इ० उत्प्रेक्षा ९६, १३४ इ०

द्रौपदी स्वयंवर-मंडपांत जाण्यासाठी तयारी करते त्या वेळीं तिला अलंकार चढवावयाचे असतात. त्याविषयी कवि म्हणतो–

भाषामची प्रकृत राष्ट्रिक हो मऱ्हाटी
वाहे विशेष कविवंशकुळी मऱ्हाटी
ते दक्षणेसि तनया कुळही मऱ्हाटी
श्रृंगार यास्तव करी मग ते मऱ्हाटी

अशी प्रस्तावना करून हा पुण्यपावन ' महाराष्ट्र देश ' जो स्वदेशाथिला त्यांतील 'मी साधारण बोलतों कुळरवें श्रृंगार धर्मापुला' या शब्दांत तत्कालीन महाराष्ट्रांतील अलंकार द्रौपदीच्या अंगावर चढविले. ते अलंकार म्हणजे राखडी, मूद, मोरबोर, वेणींतील सुवर्णशलाका, वेणीच्या अग्राला श्यामल गोंडे, सीसफूल, मयूराकृति बेसर (नथ), कानांत पखे, बाळ्या, तरवणें, गळ्यांत दुलडी, तिलडी, पंचलडी, चंदनहार, येकावळी, चौरसा, रत्नावली, धुकधुकी, पटी, बाहुबंद, तोळबंद, कांकणें, दशांगुळीं मुद्रिका, अंदुवाकी, सांखळ्या, अनवट, बीजवे, विरोदीया इत्यादि.

प्रत्यक्ष स्वयंवरप्रसंगीं प्राचीन देशांतील राजांच्या बरोबरीने महाराष्ट्रांतील ' मराठे ' कुळींतील राजेहि उपस्थित होतात.

शीसोदे, शिरसाट, वाघ, चवरे, शेलार, साठे बरे
गाडे, गायकवाड, घोरपडिये, श्रीघाटगे, डेवरे
साळुंखी, जगताप, जाधवचि ते, इंडायिते, इंगळे
माने, तुंबर, मोहिते, मगर, ते मोरे, प्रखंडागळे.
श्रीसावंत, निकुंभ, राठवडिये, ते गौड गुंजाळ जे
कोकाटे, कुरुकांकळीज, सुरवे, काटे, प्रधूमाळ जे
श्रीचव्हाण, पवार सोनगरिये, काळे, सितोळे, भले
शिंदे आणि अहीर, दोरक, कड्ड, खैरे उसीराथिले
सोमौंशादिक सूर्यवंश उभयीं छत्तीस राजेकुळी
जे होते नृपमंडपीं मिरवले छत्रातपत्रातळीं

या विधानांत कालविपर्यास होईल याची तमा मुक्तेश्वरादि कवीप्रमाणे काशी कवीनेहि बाळगली नाही.

भोजनप्रसंगीं तयार केलेलीं पक्वान्नें महाराष्ट्रीय आहेत. प्रचारांत असलेलीं मिष्टान्नें भारतीयकालीन लोक मिटक्या मारून खात आहेत.

घृतादि शर्करोदऱ्या पवित्र पोळिया पुऱ्या
घडीत घारिया बऱ्या मधूसगर्भ सांजुऱ्या
करूनि भात पर्वडी विशेष वाढिती कढी

युद्धप्रसंगावर केलेल्या रूपकांत भात, घृत, गूळ, कढी, पुऱ्या, पापड, तेलवऱ्या, वरण या पदार्थांचा उल्लेख आहे ( श्लोक ७३५ ).

शेवटीं उपसंहारात्मक भागांत अत्यंत विनयाने ' तुम्ही संत केला कृपे ग्रंथ सर्ता ' असें म्हणून लडिवाळपणें कवि एक मागणी करतो की–

मऱ्हाटी टिका देशभाषा मऱ्हाटी
मऱ्हाटी कुळी जन्मवाणी मऱ्हाटी
गुरुग्रंथही सेविला म्यां मऱ्हाटी
करावी क्षमा न्यूनते पूर्ण दृष्टी ॥

## कांही दोष

अशा तऱ्हेचें काव्यकौशल्य कवीने प्रदर्शित केलें असलें तरी कांही ठिकाणीं रसिकांना खटकल्यासारखें वाटल्याविना राहणार नाही. कवीचें वृत्तप्रभुत्व चांगलें आहे, पण त्यांतील मधूनमधून दिसणारी शाब्दिक ओढाताण टीकाकार सहन करूं शकणार नाही. संस्कृत साहित्यांत कांही दोष क्षम्य मानले आहेत. पिङ्गलाच्या छन्दःशास्त्रांत ' इयादिपूरणः ' ( ३.२ ) सूत्रान्वयें ' वरेण्यम् ' चें ' वरेणियम् ' करतां येतें. " अपि माष मषं कुर्यात् छन्दोभङ्गं न कारयेत् ". ' माष ' शब्दाचें रूप ' मष ' करावें पण छन्दोभङ्ग करूं नये असें स्पष्ट वचन अन्यत्र आहे. कवीच्या निरंकुशत्वाला याप्रमाणे मोकळीक मिळाली आहे, पण तें निरंकुशत्व अमर्याद झालें तर सहसा क्षम्य होणार नाही. या काव्यांत कुसुमायावती (कुसुमावती), धृतराष्ट्रर (धृतराष्ट्र), इन्द्रप्रहस्त ( इन्द्रप्रस्थ ), भाग्नि ( भगिनी ), अभारवा ( आभारवा ), काळविलसा ( काळविलास ), सर्वस ( सर्वस्व ), आसाधारण ( असाधारण ), अपदीं ( आपदीं ), द्वादशोजनें ( द्वादश योजनें ), उष्टर ( उष्ट्र ), आवनी ( अवनी ), सल्लज ( सलज्ज ), वरकोदर ( वृकोदर ), सूक्षम ( सूक्ष्म ), हरास ( ऱ्हास ) इत्यादि अनेक शब्दांचीं रूपें वृत्ताच्या सोईसाठी योजिलीं आहेत ( यांची नोंद पुढे आहे ). कवीने आपल्या बोलींतील

शब्द वापरले असें या बाबतींत म्हणतां येईल. शिष्ट भाषेंतील शब्दप्रयोग केले नाहीत म्हणून काव्य कमी प्रतीचें म्हणतां येणार नाही हेंहि खरें. पण शब्दांची विकृति करण्याचा प्रसंग कवीवर येणें हें तेवढेंसें सयुक्तिक नाही. काशी कवि पंडित नसेल पण त्याचा बहुश्रुतपणा विलक्षण आहे. विद्वान् कवींच्या काव्यांत प्रायः येणारे तत्सम शब्द कवि मोठ्या प्रमाणांत योजतो. हें पाहिलें म्हणजे ही शब्दाची ओढाताण कांही स्थळीं रसभंगाला कारणीभूत होते.

या कवीच्या भाषेचा दुसरा विशेष म्हणजे ठायींठायीं दिसून येणारे संधि-विशेष. सुतार्पणें (सुता + अर्पणें), स्तवनादरी ( स्तवन + आदरी ), चुकलासल ( चुकला + असल ), वचनैसें ( वचन + ऐसें ) इ० ( यांची नोंद पुढें पाहा ). संस्कृतभाषेसारखी मराठींतील ही संधियोजना चिन्त्य आहे.

मोरोपंत, रघुनाथपंडित हे कवि वगळल्यास इतर पंडित कवींच्या काव्यांतहि वरील भाषादोष कमी-अधिक प्रमाणांत दिसतात. तरीसुद्धा मूळ काव्याची सरसता फारशी कमी झालेली दिसत नाही. महाराष्ट्र कवि-चरित्रकार कै. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर लिहितात, ‘ चुकीची वृत्तरचना, अशुद्धशब्दप्रयोग व शब्दांची ओढाताण हे प्रकार या ग्रंथांत ठिकठिकाणीं आढळतात. मात्र प्रसादाच्या दृष्टीने पाहिल्यास ग्रंथांत नांव ठेवण्यास जागा नाही ’[1] ( महाराष्ट्र कविचरित्र, भाग १ ला, पृ. २९३ ).

१. अशुद्ध शब्दप्रयोग, शब्दांची ओढाताण या गोष्टी शिष्ट भाषेंत दोषास्पद ठरल्या तरी त्यांकडे पाहण्याची दुसरी एक दृष्टि आहे. आपल्या बोलभाषेंतील शब्द कवीने वापरणें दोषार्ह म्हणतां येणार नाही. भाषाशास्त्रदृष्ट्याहि या शब्दांना भाषाभ्यासांत फार महत्त्वाचें स्थान आहे. अशी भाषा कशी निर्माण झाली याबद्दल महात्मा फुले यांनी आपल्या एका पोवाड्यांत एक युक्तिवाद केला आहे तो असा—

**मराठी भाषेवर एक पोवाडा**

मराठि भाषा थोर आमुची जोरदार खाशी
भले हो, जोरदार खाशी
हुरूप देऊनि आम्हां, मिळविले वैरि तिणें धुळिसी ॥ ध्रु० ॥
पूर्णत्वाला संस्कृतभाषा गेली तींतून
उच्चाराच्या सुलभपणांतुन प्राकृत जन्मून
तीहूंने सोप्या उच्चारांचा पारे आवेशाची
निघे मराठी प्रशस्त भाषा महा-रट्ठांची

कै. आजगांवकरांच्याच भाषेंत लिहावयाचें म्हणजे 'नैसर्गिक कवित्वशक्ति, उत्कृष्ट व्यवहारचातुर्य, मधुर व समर्पक शब्दयोजना आणि ठिकठिकाणीं प्रकट केलेला अत्यंत विनय, यांहींकरून काशी कवीच्या ग्रंथास एक प्रकारची मनोहर शोभा प्राप्त झाली आहे' ( महाराष्ट्र कविचरित्र, भाग १ ला, पृ. २९८ ) हा अभिप्राय ओवीबद्ध ग्रंथासंबंधीं असला तरी श्लोकबद्ध प्रस्तुत ग्रंथासहि तो पुष्कळ अंशीं लागू पडतो.

## कवि महानुभावपंथीय का ?

अवचितसुत काशी हा महानुभावपंथीय असें मानतात, पण त्याला पुरावा नाही ( महाराष्ट्र-सारस्वत – पृ. १०१२ ). काशी कवि हे महानुभावपंथीय असल्यामुळे, या ग्रंथाचें त्या पंथांतील लोकांत मोठें महत्त्व आहे ( कै. ज. र. आजगांवकर– महाराष्ट्र कविचरित्र, भाग १ ला, पृ. २९० ). 'महानुभावीय मराठी वाङ्मय' या पुस्तकांत श्री. यशवंत खुशाल देशपांडे या विद्वानांनी काशीदासकृत द्रौपदी-स्वयंवर या नांवाने श्लोकबद्ध ग्रंथाचा समावेश केला आहे. जी हस्तलिखित पोथी प्रस्तुत ग्रंथाला आधारभूत मानली आहे तिची चर्मवेष्टित बांधणी महानुभावीय पोथ्यांप्रमाणे आहे व या पोथीबरोबर आलेल्या पोथ्यांत महानुभावपंथीय ( कांही संकेत लिपींतील ) आहेत. मात्र कवीचे पिताजी अवचितराव हे विठ्ठलभक्त होते असा स्पष्ट उल्लेख ग्रंथांत आहे. महानुभावी पंथ श्रीकृष्ण, दत्त इत्यादि देवतांना मान देतो हें ध्यानांत घेतलें तर श्रीकृष्ण म्हणजेच श्रीविठ्ठल असें उपासनान्तर केलें असेल एवढेंच अनुमान करतां येईल. स्पष्ट पुरावा नाही, परंतु परंपरा दुर्लक्षिता करतां येत नाही.

विशेष पांडित्य अंगीं नसतांना केवळ बहुश्रुतपणाच्या बळावर एक प्रदीर्घ विदग्ध काव्य एका रणमर्द मराठा वीराने रचावें ही एक विलक्षण घटना तर खरीच, पण तीमुळे असें सिद्ध होत आहे की, तत्कालीन सर्वच 'मऱ्हाटा' वर्गाच्या ठिकाणीं महाराष्ट्र व मराठी भाषा यांबद्दल ज्वलंत अभिमान होता. हें सिद्ध होण्यासाठी संशोधन झालें पाहिजे. मराठवाड्यांतील संशोधनाचार्य श्री. वि. अं. कानोले म्हणतात की, 'प्रचंड वारशाच्या मानाने संशोधनकार्याचा व्याप तोटका वाटतो. क्षितिजापर्यंत अफाट कार्यक्षेत्र अजून मोकळें आहे व तें भरून काढलें पाहिजे याची जाणीव आपण ठेविली पाहिजे.'

## कवीने योजलेल्या कांही शब्दांची मीमांसा

### स्वरप्रक्रिया

आद्य अलोप - धिराज (अधिराज), धिराजत (अधिराजत), नुपम (अनुपम), क्षौणी (अक्षौहिणी). आद्य अ चा आ - आगोचर (अगोचर), आचाट (अचाट), आद्रिजा (अद्रिजा), आमृत (अमृत), आसाधारण (असाधारण), आसो (असो), आसता (असता), आसल (असेल).

मध्य अलोप - कर्तळीं (करतळीं), जन्मेजय (जनमेजय), विप्रीत (विपरीत), पुर्ते (पुरते), मिर्वला (मिरवला).

मध्य अ चा आ—साखया (सखया), अन्त्य अ ची जोड - घोरम (घोरम्), गिरिवत (गिरिवत्), दिग (दिग्), धिग (धिग्), वाग (वाग्), विलसा, (विलास) यांत अ चा स्थानव्यत्यास. अन्त्य अलोप - अधर्, उग्रमान्, खचित्, चतुर्, वितंड्, विराजमान्, विहंगम्, समर्, सहित्.

मध्य इ चा लोप - भग्नि - भगिनी

मध्य उ चा अ - दमनु (द्युम्न)

मध्य उ चा औ - कौंती (कुन्ती)

मध्य ऋ चा रु - द्रुग (दृग), द्रुष्टद्युम्न (धृष्टद्युम्न), सक्रुत (सकृत्)

आद्य ऐ चा अइ -- अइरावत (ऐरावत)

मध्य औ चा अउ - गउड (गौड)

### व्यंजनप्रक्रिया

मध्य च चा लोप - उचारिजे (उच्चारिजे)

मध्य य चा ऐ - सैंवर (स्वयंवर)

मध्य य चा लोप - प्रतक्ष (प्रत्यक्ष)

मध्य य चा व - माविक (मायिक), वित्पत्ती (व्युत्पत्ति)

अन्त्य य चा लोप - वैनत (वैनतेय), क्षेत्री (क्षत्रिय).

मध्य र चा स्थानव्यत्यास - क्रिमिर (किर्मिर)

मध्य ल चा स्थानव्यत्यास - सल्लज (सलज्ज)

मध्य व चा उ-औ - सोमौंशादिक (सोमवंशादिक)

मध्य ह चा झ – दाझे (दाहे)

अनुनासिकलोप – सिह (सिंह), रहवर (रहंवर).

अनुनासिक-व्यत्यास – सिंहनाद (सिंहनाद), रंहवर (रहंवर)

स्वरभक्ति – कलेषु (क्लेषु), दरुशन (दर्शन), धृतराष्टर (धृतराष्ट्र), परस्तुत (प्रस्तुत), वरकोदर (वृकोदर), वरुष (वर्ष), सपर्ष्टी (स्पर्ष्टी), सवता (स्वता), सलप (स्वल्प), सूक्षम (सूक्ष्म), हरास (ऱ्हास), हरुष (हर्ष).

साम्याभास – अनेकमनेक (एकमेक), सुरश्चंद्र (हरिश्चंद्र), षष्टम (पंचम).

अकारान्त पुल्लिंगी नामाचें प्रथमा एकवचन आकारान्त – गुरुसुता (गुरुसुत), धर्मा (धर्म), नकुळा (नकुळ), भीमा (भीम), विदुरा (विदुर), सहदेवा वो (सहदेव).

विशिष्ट भाषास्तरांतील (स्थानिक बोलींतील) शब्द :—असल, म्हणल, सांगन, जळनास, देवदाराचीवाणी, म्हुण, म्हुणशानी, जल्पौनिशानी, निरक्षुनीशानी, को (कोण) इत्यादि. 'प्र' उपसर्गाचा चिन्त्य उपयोग :—प्रभूमिका, प्रखंडागळे, प्रदाटले, प्रगंगाथले इत्यादि.

नाम आणि विशेषण यांपासून धातूचीं रूपें-- अस्तला, तटस्थावला, तळ्हातिती, दोषाथिला, नराकारला, नामाथिला, नीचवी, प्रदाटले, प्रगंगाथली, प्रतापाथिला, प्रसंगाथिले, मुक्तली, यथानुक्रमवुनी, रथार्जिले, व्यर्थला, समीपावलें, सेनासिले, स्वदेशाथिला.

## समासविशेष

अकस्मातार्जुना, कृष्णार्चिला, कृष्णार्चौनि, तथाठरा, ताराचळ, दीर्घदोषाचरा, देवावधारी, द्रुमोदार, पणोच्चारिला, प्यालांजुळ, बोलिलाग्रजा, भाषामची, मनोच्चाटलें, मलावतार, माळाद्यापि, म्यांर्पिली, रमणारती, रामायोध्ये, वळघलार्कज, वाचागळी, वांचलेसता, वेष्टिलार्जुन, वोपिलाद्‌भुत, शृंगारधर्मापुला, सखयाग्रजोत्तमा, समोदरींची, सुतार्जुनासि, सुनानंत, सोज्वळभ्यंग, होतान्नपाकार्जिला.

प्रस्तुत संहिता सिद्ध करतांना पुढील हस्तलिखितांचा उपयोग केला आहे. गणवृत्तांतील काव्य असल्यामुळे ऱ्हस्वदीर्घादि अशुद्धें शुद्ध करणें सोपें गेलें. पाठभेदांचीहि विशेष मीमांसा करावी लागली नाही.

| | | |
|---|---|---|
| (१) | सटाणा-चांदोरकर–संग्रहांतील पोथी | ह |
| (२) | ,, ,, अपूर्ण पोथी | हअ |
| (३) | मुंबई मराठी संशोधन मंडळांतील पोथी | मु |
| (४) | भवानी लायब्ररी, औंधमधील ,, | भ |
| (५) | ठाणें संग्रहांतील शिलालिखित ,, | ठ |

क्रमांक १ ही आधारभूत पोथी. तिचा लेखन-काल साके १६९८ अठ्यानेउ द्रमुखनाम सवत्सेर माहे मागेस्वर सुल्क पक्षी बुधवार त्रुतीय प्रहरी संपुर्ण सुभं भवस्तु.

## क्षमापन

| | |
|---|---|
| श्लोक २१५ ओळ १ | नभरे ऐवजी न भरे |
| श्लोक २७९ ओळ २ | नगरदेशीं ऐवजीं नगरप्रदेशीं |
| श्लोक ३१२ ओळ ३ | प्यालंजुळवरी ऐवजीं प्यालांजुळ वरी |
| श्लोक ४९३ ओळ १ | भूतळीं ऐवजीं भूतई |
| श्लोक ५४० ओळ २ | भरभाटिव ऐवजीं भटभाटिव |
| श्लोक ६८३ ओळ १ | रधिया ऐवजीं रथिया |
| श्लोक ७१६ ओळ ४ | सळमूं ऐवजीं मूसळें |
| श्लोक ७६३ ओळ ४ | घर्म ऐवजीं धर्म |

श्लोक ६२७ हा इन्द्रवज्रा आहे. कृपया शुद्धिपत्र पाहावें.

टिप्पणीच्यासंबंधी सांगावयाचें म्हणजे कांही ठिकाणीं योग्य अर्थ करतां आला नाही. कांही शब्दांचे अर्थ स्पष्ट करतां आले नाहीत.

How Commentators each dark passage shun
And hold their farthing candle to the Sun.

हेंच यंग् चें सुभाषित खरें!

प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनासाठीं
पुणें विद्यापीठानें रुपये ५०० चें अनुदान दिलें
त्याबद्दल संपादक विद्यापीठाचा अत्यंत ऋणी आहे.

# सर्ग पहिला

श्रीकृष्णाय नमः । श्रीदत्तात्रयाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

अमृतललिता ( सवाई )

श्रीगणराजधिराज मनांतरिं माज विराज नवाज मतीसी
तूं महाराज शिरीं सिरताजन साजत भाजकिला जपतीसी
अंतरिं गाज अगाध दिगन्तारिं माजवि ये कविकाजगतीसी
श्रीगजगंडण विघ्नविखण्डन मंडण हो रसराजरतीसी १

ब्रह्मसुते[1] सिनते मति ते तुज वीणवते लपते रसखाणी
वारुनि दूषण भूषणमंडित हर्षण दे मज दर्शन वाणी
श्रीगुरुभाव तुझे पदिं लाव मला निज दाव तुं पाव निदानीं
कृष्ण-कथा करणें उलथा करुणा विचरोत्तरीं सज्जनध्यानीं २

आदि अलंकृत सत्कृत संस्कृत हे वचनाकृत प्राकृत पाहे
वागशरासन बाण रसोगुण दूषण ही गुणिं वाहेचि वाहे
लक्ष धरेवरि दक्ष धनुर्धर चालविता शर आनांचि आहे
काय करील कवी बळ निर्बळ धर्मदयाचि तुम्हाप्रति लाहे ३

१. श्लोक २ व ३ भ. प्रतींत नाहींत.

शिखरिणी

वदे राजा जन्मेजय मुनिसि हो वंदुनि यथा
म्हणे 'सांगा स्वामी द्रुपददुहितास्वैंवरकथा'
मुनी सांगे राया अमरपुरिं तो इन्द्र विलसे
तसा राजा नांदे द्रुपद कुसुमायावतिं वसे ४

तयालागीं पार्थें समुख समरीं बालपणिं रे
गुरुआज्ञें नेलें धरुनि करुनी युद्ध रणिं रे
विषादें त्या राजा द्रुपद करि यागासि वहिलें
निघे यागीं माया द्रुपदि नगजा तेज पहिलें ५

दुजा धृष्टद्युम्नू कुमर द्रुपदा प्राप्त हवनीं
असे जाला केला अमुप मग आनंद अवनीं
तदा तो शीखंडी तवं च मख-कुंडीं उपजला
प्रसन्न श्री-सौरी म्हणत नृप संपूर्ण मजला ६

वसंततिलका

रत्नें सुवर्णवसनें द्विजवर्धनासी
संतोषवी बहुत देउनियां धनासी
मानूनि भाग्य करि यागविसर्जनासी
पाहूनि ज्येष्ठ-मुख बोलतसे जनासी ७

हा द्रोणदृष्टदमनू नृपनामभासी
कृष्णा सुता निज सुखें भरिते नभासी
कन्या कशी भुवन-मोहन मूळमाया
दक्षीं जळूनि वळली नृपती निमाया ८

गांधार-कर्मकुळ निर्मुळ हो कराया
ते पार्वती प्रगट पावन होय राया
ते सुंदरा उपवरा दिसमास दावी
चिंता पिता करि सुता कवणासि द्यावी ९

जेणें मला समरिं मंचकिं नीजवीलें
नेऊनि शुष्क गुरु अंतर भीजवीलें
द्यावी तयासि तनया नर नोवरा तो
जोडेल धर्म मज सार्थक सोयरा तो १०

प्रीती अशी मनिं धरी नरवर्धनाची
कीर्ती तदा उजळली जगिं अर्जुनाची
स्वर्गासि बांधुनि धनुर्धर पंथ बाणीं
ऐरावती छळुनि इन्द्र महीसि आणी ११

साधौनि कार्य पुनरावृति त्याचि थाटें
दे पाठवोनि चढवी गज बाण-वाटे
हें ऐकुनी नृपति सांगति शूद्रसेना
श्रीमंत्रिया त्वरित घेउनि शेषसेना १२

जा हस्तनापुरिं सबंधु विचारि राया[१]
भेटे अनेक मम आवडि धर्मराया
वस्त्रें पदार्थ नग पार्थवरास न्या हो
कृष्णा-सुतार्थ[२] घटितार्थ करोनि या हो १३

तैसाचि पंडुजपुरा मग जाय मंत्री
वंदोनि धर्म वरितो नरदेव-मंत्री
संकल्प पार्थचरणीं नृपती-सुतेचा
घालोनि साक्ष करि निश्चय भाषतेचा १४

गेला प्रधान मग तो स्वपुरासि पाहें
मागें परंतु नृप कौरव दुःख वाहे
जैं अर्जुना द्रुपदजा मखरत्न-राणी
तैं हें जगीं धिग जिणें तरि तीस आणी १५

नाना पदार्थ मग पार्थवधार्थ साधी
रक्षोनि भीम अनुजां कुरुजांसि बाधी
लागे कुदन्द्व असुरां-अमरांसि जैसें
तें देखवेल वडिलांप्रति नित्य कैसें

तों द्रोण-भीष्म-विदुरा धृतराष्ट्रासी
सांगोनि पुत्र कळ वांटित राष्ट्रराशी

१ ठ. जा हस्तनापुरि सबंधविधा चराया; २ ठ. कृष्णा

धर्मा निवासपुर इन्द्रप्रहस्त देती
दुर्योधनादि पद भद्रपुरासि घेती १७

ऐसें असूनि नवटे सुख भूपतीसी
लाक्षागृहा उभविलें वरुणावतीसी[1]
नाना असत्य शकुनी कथि धर्मदेवा
आणि गृहांत मग त्या करि भूपसेवा १८

श्येनिका

अग्नि लाविला निशांतरीं मठा
भीम देखुनी म्हणे उठा उठा
ज्वाल तो अभाळ-भाळ पावला
क्रोध बहुवा अपार बाणला १९

ताडिला बळें पदें लता क्षिती
रक्षिता हरी अपूर्व देखती
द्वार तें असे विदारिली मही
घालिती उड्या तयांत पांचही २०

द्वादशांतरें प्रमाण योजनें
मार्ग निर्मिला असे दयाघनें
माय ते सवें सहीत साजणें
जान्हवी-तटा तयांसीं पावणें २१

---

१ ठ. अरुणा

देखिला हरी किरीट कुंडलें
पीत अंबरीं पुनीत पाउलें
शंख चक्रही सहीत ते गदे
कुंति मा धरी पदें मुखें वदे २२

' घालि आपुल्या रुपांत पांचही
मारिती कुरू नको त्यजूं मही '
धैर्य दे हरी ' शिणूं नको ' म्हणे
' जाई जे तुम्हीं वनासि दक्षिणे ' २३

' सत्व तें धरोनि गुप्त राहिजे
द्रौपदी-स्वयंवरा बिजें किजे. '
भक्त चालिले प्रभूसि वंदुनी
पातले तदा हेडंब-काननीं २४

मारिला हेडंब भग्नि बहुवें
पर्णिली वनीं प्रताप-लाघवें
राहिजे असे वनांत पांडवीं
वर्तलें कसें चरित्र कौरवीं २५

वसंततिलका

हा धर्मघात शकुनी हित बोलताहे
हें भूप आयकुनि आसनिं डोलताहे

बोले गयंद गुढरा हय पांखरा रे
घाला रथावरि यथा गुळ शर्करा रे २६

वाद्यें करा समपुरा उमटे ठसा रे
दानें करा अभरवा भट–भाट[1] सारे
आज्ञा अशी नृप करी न-करा-करातें
हाकारिलें नृपवरां मकराकरांतें २७

केला विराज विधिमंडप भूपतीनें
झालीं परंतु वडिलें अतिदुःखदीनें
हें[2] राजकाज विदिशोदिश काय केलें
धर्मांगती दिगपतीं सुरिं आइकीलें २८

इंद्रादिकादि जनकां बहु दुःख जालें
योगी मुनी त्रिभुवनीं सुख केंवीं जालें ?
त्यानंतरें द्रुपदराज पुरासि पाहे
आली कुमात-करणी नृपमंडपा हे २९

तूणक

कौरवी कुळें करौनि धर्ममेळ दाहिला
आयकौनि तो नरेश त्राह्य त्राह्य[3] बोलिला

१ ह. भवभाट; २ ठ. हें पांडवांसह विधी असें काय केलें;
३ ठ. राम राम;

आसरा[1] अनंत पांडवांसि चंड आथिला
काय हा अनर्थ लाभ कौरवांसि दीधला ३०

संतभक्त तारिले जगीं अपार माधवें
मारिले अमीत दैत्य लाघवें रमाधवें
जैं[2] हिरण्यकश्यपें सुतासि अग्नि घातिलें
पाठवूनि सिंहरूप भक्तकाज साधिलें ३१

आजि सोडिलीं कशीं ब्रिदेंचि भक्त-रक्षकें
भक्त भक्षिलेतिकी कुरेश-कर्म-तक्षकें
इन्द्र चन्द्र सूर्य शेष वानिती तुझ्या गुणा
आजि पांडवीं अपेश आणिलं कृपाघना ३२

पार्थ म्यां सखा करूनि धर्मपाय जोडिले
काळ–पातकें मनोरसाळ कुंभ मोडिले
म्यां विचारिलें जगत्रयासि आणुनी घरा
देव-धर्म-मंडपीं सुतार्पणें धनुर्धरा ३३

वसंततिलका

हे श्रीहरी नरहरी हरि काय केलें
धर्मार्थ दग्धधरणीं मज कां न केलें

१ ठ. आश्रयो
२ ठ. गोपवृंद सर्वही पावकाग्नि घातलें
रक्षिलें धरौनि रूप त्यासिहिं अघातलें

कां कोपला मज हळाहळ-शूळपाणी
जाला कुजन्म जडलें जिविं ज्वाळवाणी ३४

आतां सुतेसि नयनींचि कसें पहावें
कन्येविणा क्षणभरीचि कसें रहावें
संसारपार दुहितेसि कसें करावें
हें दुःख दुर्धर अती किति म्यां भरावें ३५

रे कौरवा कुरुपती जळनास कां तूं
नष्टा खळा हृदहळाहळ नासका तूं
हा गोत्र-घात कपटें कुळ-पारध्या त्वां
केला किमर्थ तुज धर्म अपार ध्यातां ३६

बोले मुखें गतसुखें दृग-तोय गाळी
दुःखासि चंदन करोनि सभे उगाळी
ते मंडपीं चतुर पंडितराज होते
आरंभिती मग उपक्रम काय हो ते ३७

‘ हे धर्मराज-सखया धरणी-धनी तूं
राजाधिराज नृप-चक्र-चुडामणी तूं
हे जल्प कींव-करुणामय कल्पना तूं
सांडी समर्थ करि सांवरि आपणां तूं ’ ३८

‘ होणार होय नर किंकर कोण राया
हा तो पदार्थ न दिसे गतशोक राया

केलीच वृष्टि व्रज वेढुनि जैं घनांहीं
तैं वांचलेति गवळी भिजलेचि नाहीं ' ३९

' निर्विघ्न पंडुसुत कीं नृपती निमाले
हें तों कळा अकळ वेद अतर्क जाले
कृष्णार्चिला अमळ त्या नृपनंदनांहीं
तोही तयांसि कधिं अंतरलाचि नाहीं ' ४०

' दासा उपेक्षिल हरी सहसा घडेना
कांहीं चरित्र-रचना परि आतुळेना
सारांश धैर्य पुरुषें धरुनी रहावें
कर्ता करील जितुकें तितुकें पहावें ' ४१

ऐसें प्रवीण जन सज्जन मानमंत्री
राया बुझाविति अनेकमनेक मंत्री
केलें विसर्जन पहा मग मंडपासी
अंतःपुरीं विचरणें घडलें नृपासि[1] ४२

राहे सदाचि परि तो नृपती सचिंतू
हें धर्मराज्य करि नित्य नव्हे निचिंतू
ऐसाचि काळविलसा पदरीं पवाडे
तैं राज-लाज-लतिका दिसमास वाढे ४३

१ ठ. आतां पुरीं विचरणें घडलें तयासि

जों जों सुताननशशी करि पूर्णिमा ते
तों तों जगीं जनक-शोक-समुद्र माते
केला विचार द्रुपदें मग मंत्रियासी
‘ जाणें मला शरण त्या हरि सावळ्यासी ’ ४४

‘ हें वर्म[1] मी प्रभुसि सांगन शूद्रसेना
वेगें सुसिद्ध करि अल्प सुढाळ सेना ’
तैसाचि मंत्रि करि हो नगरांत[2] वाजी
घे चातुरंग रथ-वारण-वीर-वाजी ४५

सत्सार सार निवडी दवडी असार
तें कोण कोण परिसा समयानुसार
धीरत्व भाव गहनत्व महत्त्व मानू
संतत्व सत्त्वपरमत्व तथा प्रमाणू ४६

वैराग्य बोध परमार्थ विवेक पाहे
आनंद छंद गुण आवडती नृपा हे
कुक्रोध काम कुरुकंक कुडा कलेषु
द्वेष प्रपंच मद-दंभ-विकार-लेशु ४७

हे त्याजणेंचि पडिले गुण मंत्रियासी
द्वारावतींत न मिळेल पवाड त्यासी

१ ठ. गुह्य; २ ठ. कटकांत

देऊनि घाव रथिं राव विराजवीला
श्रीद्वारके द्रुपद उत्कट चालियेला ४८

जातील दोष-दुरितें पुरि देखतांचि
होतील पावन पदार्थ परेखतांचि
श्रोता करी श्रवणवासचि द्वारकेसी
वक्ता पवित्र पठणें हरिदास काशी ४९

*॥ इति श्री द्रौपदी सैंवर विश्रांताध्याय पहिला ॥*

# सर्ग दुसरा

भुजंगप्रयात

उदेलें दिसे दैव त्या द्रौपदाचें
समीपावलें सौख्य मुक्तीपदाचें
जिये चिंतिताती मुनीराज ध्यानीं
नृपें देखिली ते प्रभू-राजधानी ५०

समुद्रोदरीं द्वारिका ब्रह्मशाळा
लता भोवत्या ढाळ देती ढिसाळा
तयाते शिरीं तेज पालाण घाली
निशा तेथिंची मायपोटीं रिघाली ५१

दिगंतामुखीं रंग[1] ओपी प्रभा ते
भरौनि भरी[2] ऊर्ध्वतेजें नभातें
झळाळे तिच्या सर्व एकत्र भासे
शशी सूर्य लोकीं न राहे न भासे ५२

शुरू तो समुद्रोदरीं पद्म पाहे
हरीचंद्र योगें विकासोनि राहे

१ ठ. पुण्य; २ ठ. उरे

द्रवे प्रेम आमोद धात्रीं न माये
विमानें वरी भोंवतीं भृंग-न्यायें ५३

सुरीं सांडिलें सौख्य शक्रावतीचें
सदा सेविती प्रेम द्वारावतीचें
विधीरुद्र लाचावले त्या सुखासी
पुसे कोण तेथें नरां निर्जरांसी ५४

दुरोनि अशी द्वारका देखियेली
पुढें चालतां लागल्या वृक्षवेली
वनें दाटलीं ताळमाळांजनांहि
धरा तेथिंची भास्करा दृश्य नाहीं ५५

तरूराज ते नांदती राजमानें[१]
फळें वोपिती एकमेकांस मानें
तळीं, कूप, वापी हिरेहेमबद्ध
सदा पूर्ण पाणी सुपद्मीं सुगंध ५६

रहाटांतरें पाट तोयामृताचे
वनीं लागती लाग होती लतांचे
न लागे तयां लावणें पायपाणी
वनामाजि खेळे सदा पूर्ण पाणी ५७

१ ठ. दृश्यमाने

क्रिडा सारिती सारसें हंस मोरें
बकें चातकें चक्रवाकें चकोरें
करीती वनीं कोकिळा गायनातें
छळीती स्वरीं स्वर्ग-वारांगनांतें ५८

विहंगम् मुनीराज ते सागरींचे
सुसंवादती भेद वेदांतरींचे
पुराणांतरीं गुह्य जें अप्रासिद्ध
हिळे पिंगळे बोलती तें प्रसिद्ध ५९

शुकीं प्रार्थिजे सारकातें विचित्र
'पुनः कृष्णकीर्ती वदावी पवित्र'
कथा सांगती पक्षिणी नायका त्या
'भजा रे भजा श्रीयदूनायका त्या' ६०

'निरालंब साकार हो वेदवाणी
अनंतू अनंतू सदा शेष वाणी
जगीं तोचि हा धर्म तारावयासी
नराकारला नष्ट मारावयासी' ६१

'धरा धन्य हे धन्य हा विप्रसिंधू
तरू धन्य हे लोकपक्षी प्रसिद्धू
जगीं दुर्लभू लाभ ये द्वारकेचा
पुन्हा कृष्ण साकार जोडेल कैसा' ६२

'घडीने घडी हे लया जाय काया
भजा रे भजा रे यदूनायका या,
असे ते सुपक्षी सदानंद मस्तु
चिदानंद संवाद वर्ते समस्तु ६३

द्रुमोदार ते पांथिकां तत्समानें
फळें वोपिती डोल देऊनि मानें
असी देखिली द्वारका ब्रह्मशाला
अतिक्राळ ते द्वार भिंती विशाळा ६४

द्रुतविलंबित

विचरला नृप तो पुरिभीतरीं
नवल मानित देखुनि अंतरीं
कनक-भू-खचितें वरि मंदिरें
झळकती गगनागत गोपुरें ६५

बहु मनोहर सुंदर द्वारका
जगत-लोचन ते पुरि तारका
सुरपुरी अति सुंदर वाणिजे
परि तिये कुरवंडिसी आणिजे ६६

भुजंगप्रयात

समस्ता घरीं व्यस्त कैवल्य केणें
जना वोपिती मोक्ष लावण्य लेणें

तया मोल घेती हरि नाम वाणी
भरा व्योम घोषें श्रुती शेष वाणी ६७

पुरीचा उरीं काळ वाहे दरारा
दिशा कांपती दैत्यराजे थरारा
कृतांतासि दुर्गीं रहीं वास नाहीं
विनाशा रिघे नाशके वासनाही ६८

तूणक

द्वार भाळ कीं अभाळ दुर्गशाळ देखिले
रत्नरंग माणकें सुरंग रंग रेखिले
तेज अर्पिताति केत अंबरासि अंबरें
दुंदुभी तुरें विशाळ वाजताति सुस्वरें ६९

चातुरंग सैन्य कीं समुद्र तुंबळांगणीं
घालुनी उभे गयंद-शैल सर्व आंकणीं
द्वारपाळ मंडळांत उद्धवादि येउनी
आदरें नृपासि जाति मंडपांत घेउनी ७०

श्रीसभांगणीं सुपर्ण पक्ष जोडुनी तसे
हेम-पर्वताकृती उभे नभांत लालसे
कृष्णरूप पाहती अमूप भूपती उभे
यक्ष देव धर्म इंद्र चंद्र दाटले सभे ७१

भुजंगप्रयात

नृपें देखिला मंडपू श्रीधवाचा
रवी राविला काय वर्णील वाचा
दुजें कांचनाकाश तें चित्तहारी[१]
सुरत्नावली त्याचि नक्षत्र हारी ७२

जिये मंडपीं कृष्ण कामावतारी
बसौनि करी न्याय विश्वास तारी
असो भद्रभाळीं धरी भूप धूर्ती
तदा देखिला सच्चिदानंद मूर्ती ७३

तनू सांवळी घोळ पीतांबराचा
पदीं अंदु वांकी ब्रिदें नेम ज्याचा
करीं मेखळा कौस्तुभू ज्वाळमाळा
करीं कंकणें मुद्रिका चंद्रढाळा[२] ७४

स्वागता

श्रीहरी मग मनांत विचारी
द्रौपदासि नगजा सुकुमारी

---

१ ठ. कांचनाकार तें दिव्य भारी

२ ठ. अधिक श्लोक

श्रवणिं कुंडलजोड झळाळिती । मुकुटीं रत्नकिळा किळ फांकती
तिलक भानुकळे सम रेखिला । कमळनेत्र असा हरि देखिला

ते प्रमाण मज नंदचि जैसा
घालितो मग उडी प्रभु कैसा ७५

धाउनी कवळिला निज बाहीं
भेटवी नृपवरां अमरांही
स्वासनानिकट त्या विलसावी
मुक्तिचें सुख समस्तहि दावी ७६

क्षेम कीं हरि पुसे श्रुतसेना
सद्गदीत नृप त्या वदवेना
सौख्य सारुनि असा निववीला
उद्धवें तव हरी विनवीला ७७

मालिनी

'गुणनिधि यदुराया संपदा तिष्ठताहे
जननि जगतमाया मंदिरीं वाट पाहे'
सुजन-वचन कानीं कर्णुनी दिव्य-दानी
धरुनि द्रुपद-पाणी ऊठला चक्रपाणी ७८

परमपद सभेसी रंगराजीव जाला
सकळ सुर नरेंसिं राउळीं देव आला
अभिनव रचना ते धन्य ते धन्य धात्री
परमपुरुष जेथें नांदतो पुत्रपौत्रीं ७९

नृपवर सुरपंक्ती भोजनें दिव्य-पानें
करुनि सकळ घेती देव-आज्ञेसि मानें
यदुपति द्रुपदेसी गुह्यशाळेसि आला
हरुषभरित देवें धर्म-एकांत केला ८०

कलिन्दनन्दिनी

धरूनि आवडी हरी नृपावरी कृपा करी
'उचारिजे म्हणे, 'मला असेल जें गुजांतरी'
स्तुती करौनि भूप तो म्हणे 'प्रभू दयार्णवा
सुतार्जुनासि म्यांपिली मनीं धरूनि उत्सवा' ८१

'विधीसि लग्न तें न पावतांचि विघ्न कौरवें
करौनि छद्म जाळिलेचि पंडुपुत्र गौरवें
अधर्म कर्म देखुनी सवर्म बाण लागला
सुतेसि मी करूं कसें पुसें जगत्पती तुल' ८२

स्वभू म्हणे, 'क्षितीपती त्यजूनि वर्म-काळिमा
रचोनि सैंवरा तुम्ही वदा पणा पराक्रमा
पण प्रचंड म्यां विचारिला असे नृपोत्तमा
सभेसि मीचि येउनी रचीन त्या निरूपमा' ८३

'मनांत हर्ष खेळवा समस्त भूप मेळवा
करील भेद त्या पणा नसे कपिध्वजाविना

सधर्म वाचलेंसती तरी पणासि पावती
यथार्थ मानिजे नृपा ' अशी प्रभू कृपा करी ८४

तूणक

धन्य धन्य हें जिणें सुखासि आजि पारणें
ऋद्धि-सिद्धि पावल्या मनोरथादि कारणें
दाटला कृतार्थ राव लोटला पदावरी
त्यासि आवडी धरी उरींचि आवळी हरी ८५

काय पांडवांसि भेटलोंचि वाटलें मनीं
होय तो दयाळु देव तोय गाळि लोचनीं
पाठि थापटोनिया म्हणे नृपासि बांधवा
' जा तुम्हीं त्वरें पुरासि मंडपासि साधवा.' ८६

स्रग्विणी

भोग जाला पुरा पांडवांचा वनीं
तांतडी वर्तली देवराया मनीं
रत्नमाळादि दिव्यांबरें देउनी
बोळवी द्रौपदा मंडपा येउनी ८७

चालिला भूपती वंदुनी पाउलें
पावला राज्य तो पूर आनंदलें
पुत्रमंत्री सभे सर्व साकार्णिले
श्रीपती-भेटिचें सौख्य तें वर्णिलें ८८

शिखरिणी

म्हणे ‘ मंत्री-राया अभिनव दिसे हेच रित रे
कशी वर्णूं माया जनकतनयेचें चरित रे
प्रभू आज्ञा कीजे निज अनळजा सैंवर चरे
विधातीया आतां चमुपति असंभव्य रच रे ’ ८९

‘ पुरी शृंगारावी प्रभव सुरशाळेपरिस रे
वदे कानीं पंडूसुत अमर केले परिस रे
तिनी ताळे आणीं सुमनवटिके मंत्रि सजना ’
असा आला राजा गृहिं मग विडे देउनि जना ९०

द्रुतविलंबित

नृपवधू करिते रमणारती
सुख पुसे जशि ते मदना रती
निजहिता दुहिता मग पातली
झड मिठी चरणाप्रति घातली ९१

स्वागता

क्षेम देउनि पिता तनयेसी
देतसे बसुनि अंकिं तियेसी
तांबुलासि पसरी कर माया
लागला तिजसवें करमाया ९२

माझना हरुष तो असमानी
संपती सफळ सर्वस मानी
कृष्ण-भेटि सुख धर्म सिराणी
सांगतो जिविं धरी कशि राणी ९३

शूद्रसेन सुमती नृपमंत्री
मंडपीं बसुनि चित्रविचित्रीं
घालितो त्रिभुवनीं सुचनेसी
उर्वि शोध करि विप्रजनेसी ९४

पत्रिका कनककुंकम रेखे
भीमदूत-दळ सन्मुख देखे
वांटितो ‘ पृथक त्या प्रति घ्या रे
सैंवरा त्वरित घेउनि या रे ’ ९५

फूटिले नमुनि भार गणाचे
सूटले शर महीं मदनाचे
कीं विहंगम गडी गगनाचे
संचले गगनिं वेग मनाचे ९६

यूथिका

चित्रकार मग आणुनि हाटकी
रत्नरंग रस ढाळक पावकी

घातली कनक बुंथि पुरी प्रती
गोपुरें कळसमंडित शोभती ९७

द्रुतविलंबित

कनककेत सुदिव्यपटांबरीं
उजळती गगनीं सह अंतरीं
झळकली नगरी कुसुमावती
उतरली अवनीं अमरावती ९८

बनकरी स्वकरी वनहारिका
सलिल त्या सजिल्या स्मरकारिका
निरज ते करुनी अवनी रजें
फुलविली करुनी नवनीरजें ९९

द्रुतपदा

गगनचुंबित तमाळ उभारे
द्रुमलताहि लविती फळभारें
परम गोड रस हा तुम्हि चाखा
करिति आदर परस्पर शाखा १००

सुमनमंदमकरंद दुणावे
समिर घेउनि दिशांवरि धावे
पडलिसे परम शीतल छाई
मयुर नाचति वितांडव घाई १०१

खगिनि देति रमणांतरिं दाही
स्मर मुनीवर मनांत तदाही
क्रिडति हंस-बक-सारस माजें
सितरले सजन सारस माजे १०२

स्वागता

शक्ति-स्वैंवर घडी सुखदाती
कोकिळा मधुर मंगल गाती
वाटिका-परिघ-वेष्टित भिंती
स्वर्णरंग रस ढाळुनि देती १०३

यूथिका

मंत्रिराज मग नेमुनि भूमिका
दाखवी चतुर मंडप-कारका
एक योजन तिहीं महि मोजिली
मंडपाकृति तियेवरि योजिली १०४

स्वर्गशाळ विकराळ उभारणी
सप्तताळ वितळातळ ताळिणी
रत्न-हेम-रसरंग खणोखणीं
नृत्यकार पुतळ्या कळपेखणी १०५

इन्द्रवज्रा

पालाणिलें त्यावरि मंडपाला
आकाश कीं दिव्य विकाश झाला
ठेवोनिया एक गवाक्ष मध्यें
ते बांधिती भतळ पांचि बंधें १०६

शार्दूलविक्रीडित

मोत्यांचे बरवे सुघोस अलघू हिंदोळवीले कसे
देती ढाळ सताल त्यावरि लता गोत्राशिरीखा तसे
पेरोजादि प्रवाळ नीळ गरुडोद्गारू हिरे माणिकें
वैडूर्यादिक पुंक्ष गोमद मणी रत्नप्रवाळादिकें १०७

नाना तेज कळा झळाळ मग त्या भद्रासनीं वोपिती
जेथें श्रीयदुराज पावन पदें ठेऊनियां बैसती
वृध्दी मंडप पावला त्रिभुवना जो अंतरीं सांठवी
सामुग्री नगरांत सर्वहि किजे मंत्री मनीं आठवी १०८

मालिनी

प्रमुदित पुरवासी हर्षले सैंवरासी
करुनि विविध राशी तिष्ठले अध्वरासी
उदित नगरनारी सर्व लेऊनि लेणीं
विचरति पुरगर्भी देवदाराचिवाणी १०९

शार्दूलविक्रीडित

वाजी वाहन वारणें रथ तुरें शृंगारिलीं सुंदरें
गायी गोवळ लेंकुरें मिरविती लेवूनि हेमांबरें
ऐशी ते पुरि-नायका निजशिरीं श्री शोभली संभ्रमें
आलंकार झुकार हार कुसुमा ल्यांली यथानुक्रमें ११०

रथोद्धता

यापरी भुवन सर्व शोभलें
पाक धाम रसकाम वांटिलें
ते स्थळीं चतुर पाक-निर्मिते
नेमिले दशसहस्र जाण ते १११

श्येनिका

वाद्यशाळही विशाळ राजवी
दुंदुभी तुरें वरी विराजवी
जाउनी नृपा प्रधान जाणवी
दाउनि पुरी प्रभूसि मानवी ११२

कै. म. म. द. वा. पोतदार ग्रंथ संग्रह

राव मंत्रिया बहू करी कृपा
हस्तकीं धरूनि येति मंडपा
धन्य भूप तो मुखें वदे तसें
दान कारका अपार देतसे ११३

'विश्वकर्मिया-परीस वित्पती
दाविली कसी करूनि ये क्षितीं
कायरे तुम्ही नव्हाल मानवी'
मान देउनी तयासि मानवी ११४

बैसकार ते सभेस घातले
गादिया मुडे विचित्र मांडिले
आइती अशी समस्त सारुनी
'कां' म्हणे, 'प्रभू न येति आझुनी' ११५

शार्दूलविक्रीडित

आतां यादवराज भाव भजनीं राजा भरी आदरें
श्रोते पावन सावधान सुचिते होती कथा नंतरें
हा साधारण धर्म काव्य वचनें नाहींति गाढें गुढें
काशीदास हरी-पदांबुज मनीं चिंतूनि बोले पुढें ११६

*॥ इति श्रीभारते द्रौपदी सैंवर विश्रांताध्याय दुसरा ॥*

# सर्ग तिसरा

श्रीपरेशाय नमः । श्रीकृष्णाय नमः ॥

शिखरिणी

मनीं चिंती राजा द्रुपद चरणांबूज हरिचे
'न येती कां स्वामी रमण पयराशी-कुमरिचे
दिलें होतें मातें वचन यदुराजें हरिनि जें
दुजें नाहीं राया करिन तुज मी पाठिचि बिजें' ११७

'त्वरें तूं शृंगारी नगर करि भूपासि लिखितें
सभे मी येऊनी करिन[1] पण (रा) रायंत्र सुचितें
सभास्थानीं लेणीं नुमप सह ल्याली मृदुवनें
उपेक्षा कां केली कमल-नयनें कोमल मनें' ११८

अमृतललिता

स्नेह करोनि रमा मनमोहन आवडिनें म्हणती मज 'बंधू
जाय पुढें करि मंडप सत्वर येइन मी वदले गुणासिंधू
आगमना नकरी तरि अजुनि कीं हरि अंतरिं आणिक आलें
दक्षिण देश बहू दुर जाइल कोण मला मुळपत्रहि नालें' ११९

---

१ हअ. सजिन

शार्दूलविक्रीडित

‘ कीं गेला सदना अनंत शयना श्रीइंदिरीं गुंतला
किंवा विस्मृति जाहली विसरला मी रंक राजा मला
आत्मा अच्युत येइना निज घरा टाकौनि जैं सैंवरा
तैं शृंगार समर्थ भार नगरा कैंचा मला सोयरा ’ १२०

स्वागता

लागला द्रुपद खेद कराया
वाटलें भुवन भेदक राया
ब्रह्मचिद् घन चराचर आत्मा
व्यापकांतरि जगीं जगदात्मा १२१

चित्त वित्त जनिं जो हरि देवो
चिंतितातिं मनिं जोहरिं देवो
रावभाव हृदयांत विझाला
द्वारकापति उतावीळ झाला १२२

वसंततिलका

श्रीकृष्णराज गुज बोलत उद्धवासी
‘ होईल भेटि द्रुपदाघरिं पांडवांसी
हें धर्मगुह्य सखया करि यत्न यासी
वेगीं चमू प्रचळवी पुरि दूरवासी ’ १२३

शार्दूलविक्रीडित

ऐसें उत्तर ऐकुनीचि समयीं येरू तटस्थावला
‘ हा तो श्लोक अपूर्व पंकजमुखें देवा तुम्हीं वाचला
आतां देखुनि सौख्यरूप नयनीं आम्हीं पुन्हा त्यांजला
आसाधारण बाप बाप अवनीं हा खेळ भीमार्जिला ’ १२४

बोले अच्युत उद्धवाप्रति ‘ तुम्हां भावार्थ जाणीतला
या कामीं ब्रिदभार थोर चरणीं ज्यां तोडरू घातला
होतो खेद नृपा ’ दयाळ मग तो भद्रीं उभा ठाकला
आले सैनिक सैन्य-मंडित-गती सेनापती पातला १२५

वसंततिलका

तें सैन्यवर्णन सहस्त्र-मुखें सरेना
मी रंक अल्पमति सैंवर आवरेना
झाली सुसिध्द समयीं अति भीमसेना
छत्रें ध्वजा ढवळल्या सविता दिसेना १२६

उपजाति ( द्रुतपदा + द्रुतविलंबित )

हळधराप्रति पुरी निरवीली
सह चमू गमन गंभिरवीली
निजरथीं यदुराज विराजला
विविध वाद्य घटा घन वाजला १२७

स्वागता

उद्धवाक्रुर रथारुढ झाले
पुष्टि सैन्यसह सात्त्विक चाले
कोटि यादव महारथि पाहे
एक एक नर इंद्रचि आहे १२८

द्रुतविलंबित

वसविली नगरीं दळ बाहिरी
उचलल्या चळथा चळथावरी
निजभवें विभवें हरि चालिला
भुवन भूधर मंथर हालिला १२९

भुजंगप्रयात

चमू निर्जरांची रवी-रंग राजे
तशी वाहिनी दिव्यतेजें विराजे
यदूराज सेना बळें फार चाले
गिरी गर्वभारें पथीं पिष्ट जाले १३०

शार्दूलविक्रीडित

सौराष्ट्रीं विचरौनि गुर्जर तथा विंध्याचला टाकिलें
सह्याद्री वळघूनियां गुणघनें गोदेसि आटोपिलें
द्वापारीं कुसुमावती कळयुगीं खांदार नामाथिलें
आले श्रीपति सैंवरासी द्रुपदीतातें असें कार्णिलें १३१

मंदाक्रान्ता

होता राया श्रवण परमानंद पोटीं न माये
जाली मोठी गडबड तयां त्या सुखा वर्णु काये
छत्रें ढालागणित गुढिया आतपत्रें निशाणें
वाद्यें नाना स्वदलसरिसे सर्व घेऊनिश्याने १३२

वसंततिलका

पुत्र प्रधान गुण पंडित पुण्यराशी
ज्ञाते प्रजाजन महाजन पौरवासी
श्रोत्री श्रुती-विहित वैदिक वैद्य जोशी
योगी तपोधन दयाघनध्यान ज्यांसी १३३

अभीष्ट

सकळ चालति हे सुखासनीं
कितिक राजति ते रथासनीं
कितिक शोभति नाग-वाहनीं
इतर धांवति कोण त्या गणी १३४

शार्दूलविक्रीडित

चाटे शेट सराफ साव उदमी कासार पांडे तथा
तेली तांबट साळि माळी हडपी सोनार सिंपी तथा
संन्यासी भट ज्योतिषी द्विज ऋषी श्रीपाद तीर्थाटणी
यज्ञोपासक सिद्धसाधक मुनी साधू निजध्यासनी १३५

जोगी जंगम सेवडे कविकुळें पात्रें महा पावनें
आला चिद्घन धांवती सहबळें हो लोचना पारणें
सामोरा नृप चालिला निज भवें कित्येक राजे सवें
छाया छत्र महीं पडे नभ भरे वाद्याचिया आरवें १३६

अमृतललिता

याहुनि भव्यभवें विभवें भगवंत चमू बहुसन्निध आली
सांडुनिया रथ राव निघे मग दोनि दळें परि एकचि जालीं
धांवुनियां हरिच्या चरणांवरि ठेवितसे नृपती मग माथा
बापदयाघन दे कवटाळुनि आपण भेटि तया नृपनाथा १३७

माळिनी

ऋषिमुनि नृपपुत्रां क्षेम दिल्हें कृपाळें
मिरवित मग नेले देव पांचाळ-पाळें
पवळिं पवळिं दारा दाटल्या सानुरागें
विधिलयपदपद्में देखिली पूर्णभाग्यें १३८

रथोद्धता

तारिले नगरनेत्र माधवें
लंघिल्या नव दिशा पुरी भवें
मंडपा मग मुकुंद पातला
देखतां सुरचना सुखावला १३९

थोकलें कटक मंडपांगणीं
वेंधला प्रभु सभासिंहासनीं
मेळले कुकुर मंडपीं कसे
शोभले अमर ते सभे जसे १४०

षोडशादि उपचार घेउनी
पूजिला प्रभु नृपें सिंहासनीं
धायतो चरणतीर्थ घेतलें
शिंपिलें विभव सर्व आपुलें १४१

अच्युत

ठेविला चरणावरि मस्तकू
बोलिला मग जोडुनि हस्तकू
माइना सुख तें गगनोदरीं
कोंदला हरिखें स्तवनादरी १४२

दोधक

'शेखर अंतर तूं सुखराशी
दुर्लभ पाय तुझे अमरांसी
निर्गुण तूं गुण वर्णित वाणी
योगि मुनी तुज लक्षिति ध्यानीं' १४३

'आढळतां रतिरूप तयांसी
होय सुधारस-पान-सुखासी

तो प्रभु तूं जपदानतपासी
आचरल्याविण येसि घरासी, १४४

स्रग्विणी

'येउनी आजि त्वां दिव्यदानोदयीं
थोर केलें मला लोकपाळत्रयीं
शक्र भोगी सुखा त्या सुखा वीटलों
आजि मोक्षप्रदा पायरी वेंघलों' १४५

'येचि देहीं मला मोक्षसा लाधला
हेंचि वाटे तुझी आण देवा मला
मानसानंद पालाणितो मेदिनी
गोड वाटे मला राज्य हें ये दिनीं' १४६

श्येनिका

बोलितां असें दयाळु बोलिला
आइके नृपा प्रभाव आपुला
बंधु तूं सखा जगांतरीं मला
नाहिं ज्यां दुजा पदार्थ राखिला १४७

पावलों सपुत्र-सैन्य राजिया
लग्न बाइचें विराजवावया
मार्गिं चालितां मनांत बांधवां
वांटिलें वऱ्हाडकाम यादवां १४८

'उद्धवें ऋषी सभेसि राहिजे
भाव सात्त्विकें सुरांसि प्रार्थिजे
सारणें प्रजाजनांसि तोषिजे
सात्यकें गुणी जनांसि पोषिजे' १४९

'चक्रजें विखार-वर्म बोधिंजे
चित्त अक्रुरें क्रुरांसुरां दिजे
राजपुत्र सन्मुखें असो वसो
शूरसेन भूपतींत लालसो' १५०

'मांडुनी खचीत चाउरी तदा
बैसिजे सभामुखीं तुम्ही सदा
यापरी मनें विधान हो दिजे'
धन्य भूपती म्हणे असें किजे १५१

शिखरिणी

'न गुंतावें आम्हां यदुघर वऱ्हाडी द्रुपदिचे
तुम्ही व्याही मानादर इतर लोकांप्रति किंजे'
असें जों जों बोले निगम–हरणू–प्राण–हारिया
सभे तों तों सांडी नृप हरिख-सिंधू लहरिया १५२

असो ऐसे आले कुकुरपति लग्नासि गजरें
अती मानें केलें विविध उपचारा नृपवरें

पुढां कैसें जालें लिखित अनुसंधान मुळिचें
मुळें गेलीं होतीं कथन परिसा राजकुळिंचें १५३

द्रुतविलंबित

द्रुपददूतिं धरातल जेतुलें
निजबळें चरणांतळिं घातलें
जलनिधी-वलयांकित धात्रिका
नृपवरा दिधल्या मुळ-पत्रिका १५४

स्वागता

एक हेर सरिसेचि निघाले
हस्तनाकृत पुराप्रति आले
मंडपीं कुरुपती बसलासे
रागरंग-रमणीं रतलासे १५५

राजकूमर सहोदर हारीं
बैसले मुगुट-मंडितकारी
चामरें वरि उलाळहि घेती
दूत पत्र समई मग देती १५६

वसंततिलका

'पांचाल देश कुसुमावति राजधानी
राजाधिराज द्रुपदेश्वर दिव्य-दानी
बाळा विलोलनयना गुणरूपराशी
सायुज्य-सौख्य-पदवी पर दैवराशी' १५७

'पार्थासि पूर्वीं दिधली परि ते निमाले
या लागिं सैंवर तिचें पण तात बोले
शक्ती यथा बळ यथा दळ राजभारें
यावें स्थळा त्वरित मंगळ-घोषवारें[1] १५८

इंद्रवज्रा

पत्रार्थ ऐसा द्विजराज वाणी
संतोष कैंसा कुरुराज मानी
'पार्थादिकां अर्पुनि अध्वरासी
होतों इच्या तिष्ठत सैंवरासी' १५९

'स्यां पर्णनें ते मखजे विलासें
संकल्प माझा मनिं हाचि आसे
नोहे जरी तो पण साध्य मातें
ते जिंकणें साधुनि भूभुजांते' १६०

बोले, 'निशाणावरि घाव द्या रे
सेनासिले संजुति सर्व घ्या रे'
मंत्री दळा लोह-पालाण घाली
लक्षावधी पायदळें निघालीं १६१

---

१ ठ. वोरवारें

शार्दूलविक्रीडित

त्या नंतें हयराज सिद्ध करुनी शाळापदें सांडिती
दंडी ढाळिति चामरें महिं पदें नानापरी मांडिती
सारंगे जरदे कुमाइत निळे कल्याण पंचाक्षरी
माने मोर समंद बोर तुरकी चालेति तोयावरी १६२

गंगावर्ण विशामकर्ण उजळे कच्छी विराखी तुरी
ल्याले रत्न-झकार हार हृदयीं मोत्येंहि लाख्या वरी
अंगीं दर्पण-पाखरा झळकतो माथा हुमे राजती
तोडी साज जडीत जीन सडका दोहींकडे साजती १६३

आले नृत्य करीत अश्व नटवे लक्षावधी बाहिरी
वेगी वेगविराज[1] बाज बहिरी पक्षी जसे भूवरी
भांडारें चळचित्रिंचीं उघडिलीं आलीं क्षितीं उड्गणें
कीं शृंगारनिधी धरे पसरला जालें दशां पारणें १६४

वसंततिलका

त्यानंतरें गज गिरीवत कज्जळाचे
शृंगारिले गगनिं होति झळाळ त्यांचे
लोहार्गळा मुसळ शुंडि विशाळ दंती
वाहूनि लक्षिति करूं नग चूर्ण दंती १६५

१ हअ. वेगीं वेग करी विराज

गाढे गयंद गजराज गताड मस्तू
ऐरावतीसि म्हणती शचिकांत-बस्तू
पूर्वीं धरेवरि धनंजये आणिला हे
तो तोचि कीं उजळ आपण देखिला हे १६६

स्रग्धरा

खिंखाती वोरबारें श्रुत करित दिशा कुंजरें घोषकारें
'तुम्ही पृथ्वीसि भारें दडपुनि धरिलें चंडशक्तीनुसारें
आम्हां हे आर्ति गाढे किति बळ तुमचें तेंहि पाहूं स्वपाडें
या रे या वेग वाडे श्रवणदळ पुढें पालवीती निवाडे' १६७

शार्दूलविक्रीडित

ऐसे वारण चालिले दणदणा दंडोनि भारें क्षिती
घंटा घोष घणाणिले घणघणा अंदू झणत्कारिती
एकैकावरि पंच पंच बसले ते दैत्य-देहादरें
पाणीं तीक्ष्ण शूळ शक्ति लहुड्या अंगीं घुऱ्या बक्तरें १६८

शिखरिणी

तदा सर्वे साजू करुनि रथराजू झळकले
खचित् वाटे चक्रें कठिण मकराकार गमले
सशस्त्रास्त्रें अंकीं धनु तुणिर बाणें भरियले
हळू कैसे स्वांगें अनळ-जनकाहूनि वहिले १६९

गुणाचे रूपाचे गति गडि मनाचें बळ पुरें
रथाजींले घोडे चतुर बसले सारथि धुरे

प्रतापी नामाचे वरि वळघले वीर बळिये
वदो त्यांचें कांहीं रणननवरे[1] नाम बळिये १७०

वसंततिलका

जो दानशूर अपदीं त्रिपदीं उदारू
शत्रू-दळार्णव-जळीं निज सैन्य तारूं
आला बहूत समयीं नृपतीसि कामा
तो स्यंदनीं वळघलार्कज कर्णनामा १७१

जो पूर्व-वंद्य गुरु कौरव-पांडवांचा
विद्या विवेक घनविक्रम थोर ज्याचा
वाहे अभंग तनु जो मनु वाटिवेचा
तो मिरवला स्वरथिं अग्रज हो कृपेचा १७२

जो द्वंद्वकंद परदंभरु ज्या न साहे
गाढा धनुर्धर परा धुमकेत आहे
ज्याचे अखंड हृदयीं रणरंग राहे
तो द्रोणनंदन रथासनिं शोभताहे १७३

ज्याची परावरि पराक्रमवृत्ति लाठी
युद्धांत होय वडवानळ घेचि पाठी
जो मानसीं समररंग सदैव वाहे
तो वीरराज रथिं शाल्व विराजताहे १७४

१ हअ. मरगमनगरे

दुःशासनापरिस कोण बलाढ्य आहे
ज्याचा लता-प्रहर पर्वत पिष्ट होये
हा भीमसेन दुसरा परि पाप-सिंधू
तो जाहला निजरथारुढ राजबंधू १७५

जो मेहुणा परम आप्त नृपासि लागे
दोषाथिला दयलया न कधींचि भागे
ज्या अंतरीं प्रखर पाप पवाड जागे
तो वीर जैद्रथ रथावरि शीघ्र वल्घे १७६

जेणें विचार-वचनीं नृप वश्य केला
बुद्धीबळेंचि कुळविग्रह सिद्धि नेला
रायें जयासि दिधला निज-मंत्रि-मानू
नाहीं जगांत कपटी शकुनीसमानू १७७

चित्राक्ष कौशिक सुलोचन वीरवर्मा
चित्रांगदू विकट चित्र विचित्रवर्मा
सर्पाक्ष दुर्मद विदुर्मद वीरबाहू
उग्रश्रवा रहन दुर्मुख दीर्घबाहू १७८

भुजंगप्रयात

बळी सोमकीर्ती सुशर्मा सुधर्मा
अनाधीश भूरिश्रवा कृत्यवर्मा
असो ते कुरू धीर वीरप्रतापी
कुकर्मी कृपामंद कल्पांतकोपी १७९

स्वागता

पातले सकळ कौरव कामीं
सैन्यकार्क-तनयादिक नामीं
एक एक अवनीतळ जिंक्ती
ज्यासि इंद्रवरुणादिक भीती १८०

तिष्ठलें सकळ सैन्य सजोनी
चातुरंग अठरा दळ क्षौणी
त्यांत जाण अकरा गुण यांच्या
सप्त कर्दम-रिपू-तनयाच्या १८१

उपजाति (अच्युत + स्वागता)

दोन लक्ष सहस्त्र तथाठरा
सप्त आणि तयांत शतें धरा
क्षौणि एक इतुकी ऋषिवाणी
यापरी गणित घ्या समजोनी १८२

द्रुतपदा

झळकला रथ मनोहर कैसा
उगवला रवि धरेवरि जैसा
तळपला जळिं जसा चळमासा
मिरवला रहवरीं नृप खासा १८३

वसंततिलका

तो भूपमंडित मही तृण तुल्य पाहे
मी एक इंद्र अवनीं सम कोण आहे
ते वेद-जात-तनया मज होय भाजा
संकल्प कल्पुनि निघे सहसैन्य राजा १८४

रथोद्धता

भाट यंत्रधर फार गर्जले
वाद्यमेळहि अपार वाजले
द्वादशोजन दळेश दाटती
छत्र सांवलि पडे सभोंवतीं १८५

श्येनिका

भार लोटले चळाळली धरा
फूटले जसे खळाळ सागरा
धांवती करी उलाळती तुरीं
केत दाविती झळाळ अंबरीं १८६

गर्व तो करी चमूसि लक्षुनी
पालथी म्हणे करीन आवनी
चिन्ह तों पुढें अशूभ देखती
वैभवें मनांत मात्र नाणिती १८७

स्वागता

सैंवरा द्रुपद दक्षिण देशा
चालिला नृप धरून जयाशा
देव देइल फळीं यश कोणा
काय होइल भविष्य कळेना १८८

मांडिलें गमन कौरविं ऐसें
जाहलें परि दिगंतरिं कैसें
सप्तद्वीप वसुधा नवखंडें
सागरांकित धराधिप-बंडें १८९

कर्णिली द्रुपदजा मखरेशा
चालिले सकळ सैंवर देशा
थोर थोर नृप पर्वत देशीं
होतसे श्रवण संतसभेसी १९०

शार्दूलविक्रीडित

अंबू इक्षु मधू दधी घृत पय क्षारांबुधी सप्तमा
हे सप्तै गुणनाम सागर जगीं नाहीं दुजी ऊपमा
शाक श्रृंगि पलाश शाल्मलि कुशक्रौंचादि जंबू पहा
हे द्वीपावति सप्त सागर मही राजे प्रतापी महा १९१

श्रीनेपाळ वराड लाड गउडे भोटस्महाभोटिंचे
कालिंगांग कळिंग वंग शबरी राजे नगकोंटिचे

मारू काउर बागलाणिक तथा बंगाल तैलंगणी
सौराष्ट्री मगधादि माळवि महाराष्ट्री प्रभू कोकणी १९२

कांबोधी नृप काश्मिरी परहरी नागाहुरी बर्बरी
दंडाराजपुरी तथा अनगरी जाळंधरी शांबरी
राजे द्राविडि ते मधूकरि खुरासानी फिरंगाणिचे
लीलाऊळ कनोज नैषधपती चीनी महाचीनिचे १९३

मैळाद्री-उदयागिरी-हिमागिरी-मंद्राचळींचे प्रभू
मेरूमंडळिचे कुळाचळपती चंद्रावळींचे स्वभू
पुण्यश्लोक पराक्रमी नगवती शेषाद्रि ज्यांची दळें
ते भूपांकित वाहिनी विधिवरा चालौनि घेती बळें १९४

काळांतीं सरितापती डहुळती शांति क्षिती सांडती
तैसे चक्रवती दिशादिगपती चक्रास्थिती चालती
भारें भू भरिली धरा धरकली नौका जशी डोलली
दिक्मंती चरणांतळीं दडपली शेषा मही जाणिली १९५

मालिनी

खळबळ बहु जाली लोक पाताळवासी
फणिवर सुरनंदी चालती सैंवरासी
वरि रजमय जालें सर्व आकाश पाही
कनकगिरिवरांनी लक्षिलें निर्जरांहीं १९६

शुद्धकामदा

सुरपती म्हणे ' माधवें महीं
चरित पांडवीं मांडिलें सही
सकळ घेउनी स्वर्ग संपती
समय शोभना जायिजे क्षिती ' १९७

अमर हर्षले चालिले किती
झळकल्या नभीं यानपंगती
गणपती गुरू ब्रह्म-कन्यका
नवल पेखणी अष्टनायका १९८

वसंततिलका

गंधर्व यक्ष गण गुह्यक किन्नरादी
श्रीसिद्ध चारण मुनीवर नारदादी
ऐसा विराजित धिराजित इंद्र पाहे
कृष्णा-स्वयंवर-पुरावरि येत आहे १९९

शौरी-विराज कुसुमावति राजधानी
वर्णील काय महिमा कवि-शेषवाणी
दाही दिशा धवळिल्या यशकीर्ति-चिन्हीं
आले स्वयंवरपुरा मग लोक तीन्ही २००

भुजंगप्रयात

पुरी चांगली भोंवतीं बागशाही
तियेभोंवतीं उत्तरे भूपशाही

रथांच्या गजांच्या वळी अश्वपागा
दळीं लागल्या रुंद या सर्व जागा २०१

स्रग्धरा

आले द्वीपादि जंबू उजळ पसरिली जेवि कल्पांत अंबू
रत्नस्तंभू स्वयंभू उभउनि क्षितिसी दीधले स्वर्णतंबू
धाडा जो उष्ट्रांचा प्रबळ चहुंकडे चंड धावे कबाडा
सामा पौरांत गाढा भरुनि निजरथीं आणिती आत्मचाडा
२०२

शिखरिणी

असो ऐसे आले नृप उतरले वेष्टित वनें
वनस्थानीं जाले स्थिर ऋषिमुनी तापसपणें
जळाहारी यांसी समिप मिळतां शीतळ जळें
फळाहारी तेथें स्वरुचि करिती पावन फळें २०३

तथा आले वक्ते द्विजवर सभा-पंडित गुणी
महा संतें पूर्ते चतुर बरवे ते गृहमुनी
कळाधारी आले चतुर नटवे नृत्यरमणी
स्थळें देवां दैत्यां पृथक दिधलीं मंडपखणीं २०४

भुजंगप्रयात

उभारूनि यंत्रासिही भीमवेशें
समारंभ केला यदूवंश-धीशें

सभे भूपती पातले सर्व कैसे
नमूनी प्रभू बैसले मान जैसे २०५

कथा पातली पांडवांची प्रतापें
जिये ऐकितां नासती घोर पापें
वनामाजिं कैसें तयालागिं जालें
बिजें सैंवरा काय जाणोनि केलें २०६

मालिनी

सकळिक परि आतां सांगणें सर्व लागे
जरि मन चतुरावें व्यग्र वाटे न लागे
तरि कृत फळराशी तोष देईल मातें
म्हणउनि कर काशीदास जोडी तुम्हांतें २०७

*॥ इति श्री द्रौपदी सैंवर विश्रांताध्याय तिसरा ॥*

## सर्ग चौथा

श्रीपरेशाय नमः।

शिखरिणी

सह्याद्रीपाठारीं परम वन हो दुर्गम असे
तिये स्थानीं राजा अनुजसह यूधिष्ठिर वसे
वनेन्द्रू हेडंबू अदट बळिया दिग्गजबळी
प्रतापें श्रीभीमें समरिं निजवीला महितळीं २०८

तयाची हेडंबी बहिण परिणीली निजपणें
बहू जाणे माया विषयिं वश केला वर तिनें
धरी रूपस्तंभा पतिसि रतिरंभा गमतसे
गिरीं रम्य स्थानीं रमणसह इच्छा रमतसे २०९

विढारीं श्रीकौंतीसहित सुत चारी वसतसे
निशाक्षीपूर्वीं[1] ती द्रुमफळमुळें काळ विलसे
किजे राजे धर्में निशि दिवस दुःखाप्रति पहा
म्हणे पार्था आतां मज भव भवेना कठिण हा २१०

१ मु. निरक्षी

उपजाति ( अच्युत + स्वागता )

सत्य जाण सहोदर साखया
लागलें वन रे मज खावया
दुःख पर्वत दिसा तुडवीतों
शोकसागर मला बुडवीतो २११

स्वागता

गोत्र बंधु मन त्याविण दाझे
प्राण भीष्म विदुरादिक माझे
पंडु साच धृतराष्ट्र ताता
त्याजवीण न गमे मज आतां २१२

चाल आत्मनगराप्रति जाऊं
राज्य देउनि सखा समजाऊं
तो करूनि चुकलासल अंतीं
आमुची करित आसल खंती २१३

फार होइल सुखी मज पातां
सर्वथा न करि विग्रह आतां
सांडि बा वन मला सुख वाटे
लाग कौरवपती-पुर वाटे २१४

उपजाति ( अच्युत + स्वागता )

काळ हा नभ रे स्थळिं ये कदां
दावि जन्म-मही मज येकदां
भीक मागुनि असों परिवारीं
अर्जुना विपति हे परिहारी २१५

वसंततिलका

राजाधिराज करि धर्म सदैव ऐसें
बुद्धीबळें वळि धनंजय तोय जैसें
ऐसेंचि एक वरुषांतर शांत जालें
तों विघ्न टाकुनि घरा महदंत आलें २१६

शार्दूलविक्रीडित

पूर्वीं जोचि वृकोदरें वनपती हेडंब निर्दाळिला
तेणें जन्म पहा स्वगोत्र अनुजापोटीं पुन्हा घेतला
तो नामें क्रिमिरू निशाचरपती क्रौंचा तयाची प्रिया
सांगे सलुज आत्मवल्लभ पतीपाशीं स्वगर्भक्रिया २१७

'जी जी सक्रुत डोहळे परियसा वाटे मला स्वामिया
प्यावें पांडवरक्त मस्तक कुळ-स्वामीसि वाहूनियां
कामाख्या कुळदेवता नवसिली संकल्प माझा असे
सिध्दी नेइल कोण वांछित पती हा धर्म तुम्हां असे' २१८

पत्नी-उत्तर आयकोनि पतिनें आश्वासिली अंगना
' कांते आणिन सर्वथा भुवन मी शोधोनि पांचा जणां
आले पांडव कर्णिलें गणमुखें हेडंब-राजा-वना
मी आतां गमनासि सारिन सखे तूं सौख्य सारी मना२१९

व्योमीं संचरला नभांत शिरला तो क्रीमिरू चालिला
स्त्रीबुद्धी प्रलयोगता वडवली काळेंचि आकर्षिला
आला टाकुनि योजनें शत पहा संख्या मुहूर्तांचि ना
जाला विप्र विवेक-मंडित मुनी धुंडी वनें कानना २२०

इन्द्रवंशा

जो रेखिला वेष विदेश वंदनें
तो देखिला पंडुकनिष्ठनंदनें
बोले ' म्हणे जी सखया-ग्रजोत्तमा
आला पहा पैल मुनींद्र आश्रमा ' २२१

तैसीचि धर्मे मग धांव घेतली
ग्रीवेसि त्याचे मिठि भीम घातली
हातीं धरोनी भवनासि नेतसे
' मी धन्य मी धन्य ' मुखें म्हणे तसें २२२

केलें विधीपूर्वक पूजनार्चना
लोटांगणें घालुनि दे प्रदक्षिणा
प्यालाहि प्रक्षाळुनि पाय तोय तो
राजा नव्हे केवळ धर्म होय तो २२३

'जी जी दयाळा मज आजि तारिलें
ये पर्वतीं पावन अंबु पाजिलें'
बोले मुनी 'बा शशिवंश-भूषणा
म्यां ऐकिलें तूं वळलासि रे वना' २२४

'होतें मला आर्त बहूत लागलें
देखोनि तुम्हां भवदुःख भागलें'
जों जों वदे भाविक विप्र मोकळा
तों तों सुखावे मनिं धर्म आगळा २२५

शिखरिणी

खुणावे बंधूसी अमर-गज-पातार्जुन पहा
न ये जी विश्वासों वनिं वसति नीशाचर महा
तयालागीं धर्में कठिण दिधला शब्द निसुगा
'दयासिंधू हा रे मुनि तुज कळेना असं उगा' २२६

स्वागता

ध्यान मांडुनि ऋषी कृतकाळीं
न्यासकर्म उजळी कर चाळी
लाविली मग महामुनिं टाळी
विघ्न कोण हरिवांचुनि टाळी २२७

बैसला चतुर मांडुनि फांसा
पांचही न पुरती मुनिघांसा

ठक तपादरुनी भरि खांसा
सगळची बगळा गिळि मासा २२८

शिखरिणी

असो रात्री झाली करुनि मुनि शय्या निजविला
सहित् माता बंधू मुनिचि जवळीं धर्म निजला
निशामध्या जाली परमतम घोरांदर दिसे
तया निद्रा आली अकळ कपटी जागत असे २२९

वसंततिलका

तो धर्म पार्थ सहदेव नकूळ कौंती
पांची जणेंचि विपती अनुकूळ होती
निद्रिस्थ देखुनि उठे मग तापसी तो
विद्या तयावरि समोगरि तामसी तो २३०

शार्दूलविक्रीडित

केलें व्यग्र समग्र वाहुनि शिरीं स्कदीं उभा ठाकला
जाला काळ कुरूप वैनत-गती व्योमा क्रमूं लागला
आला स्वात्मपुरा यशांकित पती पत्नी बहु हर्षली
पांची रक्षुनि बंधनीं निशिचरें विद्या विसर्जीयली २३१

शिखरिणी

बहू जाली त्यांचे नगरिं नवसाची गडबडी
अराती मारावे चतुर जन कौंती चरफडी

असो कैसें जालें चरित मग वर्कोदर वनीं
स्वकांतेसीं होता नृप पहुडला शेजशयनीं २३२

महा निद्रेमाजीं भय दरुशनें भीम छळिला
मनीं स्वप्नीं देखे वनिं अजगरें धर्म गिळिला
बळें तैं बोभाला द्विकर उठला आपटुनिया
त्वरें जागी केली रसकुळवती थापटुनिया २३३

भुजंगप्रयात

म्हणे 'मंदिरा चाल वो तांतडीसी
मला दाखवी धर्म येची घडीसी'
तिये राक्षसी वेष विक्राळ केला
निज-स्कंध-भागीं पती बैसवीला २३४

उडाली बळें चालिली व्योमपंथें
क्षणामाजिं आली निजस्थान जेथें
न देखे घरीं बांधवांलागि बंधू
कळत्रेवरी क्षोभला वीर्यसिंधू २३५

मालिनी

'रसविषविषयीं त्वां पूर्ण गोवूनि मातें
जननिसहित बंधू दीधले गोत्रजातें
धरिन चिरिन आतां हे तुझी क्राळ काया
न तरि स्वजन माझे दाखवी सांडि माया' २३६

थरथर उभि कांपे काम आगोचरी ते
निज पुर परिवारालागिं पृच्छा करी ते
सकळ म्हणति बाई तापसी एक आला
क्रिमिर कपट चिन्हीं कार्य साधूनि गेला २३७

स्वागता

भासलें वचन तें चतुरेला
पांडवां क्रिमिरु घेउनि गेला
स्कंधिं घेउनि पतीसि उडाली
ऊर्ध्व-गर्भ-गगनांत बुडाली २३८

ठाकलें क्रिमिरपूर मुहूर्तें
देखिलेंचि मग देउळ तेथें
देउळीं त्यजुनि कांत निघाली
गुप्त ते नगर पाहुनि आली २३९

मंदाक्रान्ता

'जी जी स्वामी सकळ असती आणिले मावपंथें
प्रातःकाळीं क्रिमिर नवसा त्यांसि आणील येथें'
ऐशी वार्ता श्रवण करितां भीम संतोष लाहे
हेडंबीसी मग अहर्निशीं देउळीं तोचि राहे २४०

मंदाक्रान्ता

जाला सूर्योदय मग निशाक्षी मिळाले समस्तू
वाजंत्रें वाजति गति महा जाहले सर्वमस्तू
राजा बोले वचन गुरवा देवळीं जाय आधीं
वारासारी उघडुनि करीं तोरणें चांग बांधी २४१

वसंततिलका

तो शैव शीघ्र मग जाउनि देउळासी
द्वारें सबंध उघडी नुघडेति त्यासी
आश्चर्य मानुनि करी स्तुति दीर्घवाणी
'हे आद्रिजे कमळजे तुळजे भवानी' २४२

'राजा तुझा नवस घेउनि लाडवाडें
येतो सपौर जन कां जडलीं कवाडें
कांहीं असेल पडिली चुकि सेवनांतू
ते सांवरी करि दया वरदे जनां तूं' २४३

हें आयकोनि मग आंतुनि वीर्यराशी
बोले म्हणे 'नवस रे फळला तुम्हांसी
देखूनि भाव तुमचा नियमासि आलें
मी या निशाचरपतीप्रति व्यक्त जालें' २४४

'माझें परंतु कुळरूप कराळ आहे
तें देखतां तुम्हि छळाल जळाल पाहें

आधीं मला कळस फोडुनि देउळाचा
द्या शुद्ध भोज्य मग लाभचि दर्शनाचा ' २४५

शार्दूलविक्रीडित

कामाख्या वदली म्हणूनि हरिखें तो अर्चनीं दाटला
आला पोट धरोनि धांवत पुरीं स्वामीपुढें बोलिला
तेणें तेचि घडी भरोनि दुरडी दुग्धें दधी कावडी
आला मंडित पौरभार नियमा स्थाना बहू तांतडी २४६

स्वागता

काढिला कळस देउळयाचा
सोडिला नद तयांत पयाचा
शर्करा नवनितें घृत जोडी
षड्रसामृत फळें शतकोडी २४७

मालिनी

पसरुनि मुख माजी भीम जो बैसलाहे
विविध रस विलासें सर्व घोटीत आहे
अगणित पय प्याला बाणली चंड शक्ती
गरजुनि मग बोले ' सांग रे भावभक्ती ' २४८

' दरुशन तुम्हि आतां आंत या घ्या निवाडें '
त्वरिताचि मग तेहीं मुक्त केलीं कवाडें

निशिचर सह राजा घेतसे दर्शनासी
पुरवधुसह राणी येत लोटांगणासी २४९

इन्द्रवज्रा

ख्याता यका हो बळिया भिमाची
काया दधीचर्चित सर्व त्याची
देवीपुढां मांडुनि आसनासी
पाठीसि आच्छादुनि अंबिकेसी २५०

तो बैसला भांबड भूत भासे
मुद्रा बरी खेचरि लाविलीसे
राजा करी पूजन अर्चनासी
राणी बसे घेउनि अंकनासी २५१

भुजंगप्रयात

मिळाली चमू भीम त्या राक्षसाची
पुढें आणिली दावणी पांडवांची
करी नग्न शस्त्रें उभे अष्टकोनीं
स्मरा रे स्मरा आपुला शीघ्र कोणी २५२

इंद्रवज्रा

कुंती म्हणे ' एकाचि दानवारी
त्यावीण हें कोण निदान वारी

का आसता स्वात्मज पांचवा रे
घेतां तुम्हांपासुनि पांडवां रे' २५३

' वाचागळी हे कसि ईस ताडा
आधीं हिचे हाणुनि शीस पाडा '
हा शब्द तो कर्वतरूप आहे
पद्मावतीचा पति केवि साहे २५४

शार्दूलविक्रीडित

मेरूचा खचला कडा कडकला कीं काळ वर्वाळला
मांदाराकटिं वासुकी रगडला तैसाचि बोभाइला
आरोळी फुटली दिशा दचकली उर्वी तळीं[1] डोलली
शैलेंचीं खचलीं चमू उलथली कल्पांत कोल्हाळली २५५

अच्युत

एक राक्षस मूर्च्छित मेदिनी
एक ते पडिली शव होउनी
एक ते पळती जिव घेउनी
मुक्तली मग पांडव दावणी २५६

स्वागता

मारिले अदट राक्षस पाही
लंघिल्या दुरदिशा उरल्याही

१ हअ. मु. दिग्मंडळी

घांतला क्रिमिर विक्रम खाणें
गाळिले नवस बाळक[1] राणें २५७

अच्युत

राक्षसी बसल्या पळवेचिना
जाहल्या अचला चळवेचिना
कुंति मा गिरिमा यश घेतसे
जीवदान तयाप्रति देतसे २५८

उपजाति ( स्वागता + अच्युत )

धर्म पार्थ नकुळादिक बंधू
भेटला मग तया बळसिंधू
लागले हरिचे गुण गावया
काय वर्णिल तें सुख काव्य[2] या २५९

भुजंगप्रयात

असो भीमजाया मठांतून आली
त्वरें धर्मकौंतीपदीं लीन झाली
म्हणे धर्म ' वो आमुची द्वारका तूं
तुझा प्राणदाता पती तारका तूं ' २६०

१ हअ. बाळ करानें
२ ठ. सुख सावया

इन्द्रवज्रा

कामाख्य देवी मग पूजियेली
हेडंबिया देह विशाळ केली
स्कंधासनीं कुंतिस घे प्रयाणा
पाचांसि देते भुजदंड याना २६१

अमृतललिता

पुष्कर भेदुनि दुर्गम लंघुनि
घेउनि त्यांसि गृहाप्रति आली
बैसविली सदनीं मग धर्मपदा
पण दास्य करूंचि रिघाली
सद्गुणसागर भाव तिचा दृढ
देखुनि पांडव माय निवाली
यापरि ते क्रमिले दिसचार पुढें
कवि सांगकथा काशि जाली २६२

इन्द्रवंशा

हे भारती पावन आदि पर्विंची
बोलोनि गेले ऋषिराज पूर्विंची
तेणेंचि पंथें हरिदास जातसे
काशी प्रभूचे गुण गम्य गातसे २६३

*इति श्री द्रौपदी सैंवर विश्रांताध्याय चौथा ॥*

# सर्ग पांचवा

श्रीपरेशाय नमः ।

वसंततिलका

कुंती निगर्व सहदेव नकूळ जाणा
पद्मावती-वर तथा नर पार्थ राणा
साही जणांप्रति वनीं दिस घोर जाती
कंदें-मुळें द्रुमफळेंचि सदैव खाती २६४

भुजंगप्रयात

वनीं शंखिणी डाकिनी काळ जाया
पिठें कांडिती लागती गीत गाया
गिरी गर्जती कांपती जीव नाना
मनीं होय तो काळ कंटाळवाणा २६५

वसंततिलका

राज्यार्थ सांप्रत वियोग तथा विभांडी
‘ निद्रा न ये निशिं निरंतर शोक मांडी
मी एक धर्म जगतीं बहु नांव जालें
हें काय कर्म मज टाकुनि घोर आलें ’ २६६

‘ घेऊनिया निज करीं वनवास काठी
कां लागली अवद्सा दिस-मास पाठीं
कां रूसला विसरला मज दीनबंधू
श्रीप्राणनाथ करुणामृत-तोय-सिंधू ’ २६७

स्वागता

‘ अन्न स्वप्न मजलागुनि जालें
वस्त्रदैन्य जननीप्रति आलें
धाकुटे अनुज हे द्वय माझे
यासि देखुनि सदा जिव दाझे ’ २६८

‘ भक्षितां द्रुमफळें तरुपाले
रक्तमांस सुकलें कृश जालें
पाजिती जळ मला मधरातीं
यांसि राक्षस झणीं वनिं खाती ’ २६९

‘ काय मी मुख जगीं मग दाऊं
शस्त्र घालुनि उरीं विष खाऊं
श्री दयाघन दयेंतुनि गेला
पाळितो जग मला उबगेला ’ २७०

‘ अर्जुना त्यज गिरीवन सारें
सूटले मज वनीं भय वारें
विप्रवृत्ति विचरूं परदेशीं
प्राणदान मजला जरि देशी ’ २७२

श्येनिका

धर्म घाबिरा निरक्षुनी अती
पार्थ बोलिला निशाचरीप्रती
' आजि पावतों तुझ्या निजोदरीं
रक्षिलें वनांत माय तूं खरी ' २७३

' कीर्ति जाहली तुझी त्रिभूवनीं
घालि आमुतें नरांत नेउनी
जे पथीं बरें सुपौर देखिजे
भेटती भले सुखासि पाविजे ' २७४

स्वागता

बोलिली वचन राक्षसि पाहे
' एकचक्र नगरोत्तम आहे
एक राक्षस बळी परि तेथें
वागती सुजन ते पुरिपंथें ' २७५

' बांधली पुरजनांवरि पाळी
त्यासि भक्षित असे प्रतिकाळीं '
आइकोनि जग दंडक कानीं
भीमसेन वदला मग वाणी २७६

' नेइ वो त्वरित त्याचि पुरासी
मी वधीन वनिं त्या असुरासी '

मानलें वचन तें सकळांसी
राक्षसी उपर बोलवि त्यांसी २७७

इन्द्रवज्रा

पाचारिले राक्षस वेगवाडे
पाचांसि केले मग पंचघोडे
घेऊनियां आपण सासवेसी
व्योमीं उडाली सकळां जनासी २७८

आली त्वरें त्या नगरदेशीं
कोमाइली ते उतरौनि त्यांसी
वियोगदुःखें बहु दाटताहे
श्रीधर्मराजा मग बोलताहे २७९

स्वागता

'आमची परम तूं कुळदेवी
संपती सुफळ सुकृत[1] ठेवी
पुत्रराज बळिया तव कूशीं
राज्य स्थापिल महावन देशीं' २८०

'नाम पावन घटध्वज ठेवी
त्या सुखेंचि वन दुर्धर सेवी'

१ 'सु' वर आघात

कौंतिये कवळिली मग देहीं
देतसे बहुत गौरव तेही २८१

पाय वंदुनि पुढां सकळांचे
संचली उदरिं ते गगनाचे
राक्षसी निजवनाप्रति गेली
पौरवाट सजनीं धरियेली २८२

इन्द्रवज्रा

विष्णुश्रवा ब्राह्मण ते पुरीसी
आले तयाचे मग वोसरीसी
वस्तीसि तेथें स्थळ जाण घेती
भिक्षेसि चौघे नगरांत जाती २८३

श्री धर्म कौंती असती बिढारीं
ते विप्रदारा करि शोक भारी
हें काय जालें घरिं या द्विजाचे
कौंती रिगाली भुवनीं तयाचे २८४

विष्णुश्रवा विप्र सभाग्य साचा
देवश्रवा पुत्र पवित्र त्याचा
स्त्री गौतमी आणिक पुत्रजाया
चार्‍ही जणें मोकलितााति धाया २८५

भुजंगप्रयात

वदे पुत्र जोडूनि हस्तांबुजासी
'मला स्वामियो द्या तुम्ही राक्षसासी'
पतीचे पदीं स्त्री समर्पोनि माथा
म्हणे 'जी मला द्या तुम्ही प्राणनाथा' २८६

वदे सुष्णका, 'आइका तातकासी
त्यजा दुःख जी द्या मला राक्षसासी
तुम्हांलागि कल्याण जी स्वामि जेव्हां
सुनानंत होती समर्थांसि तेव्हां' २८७

म्हणे विप्र 'म्यां काय आतां करावें
स्वहस्तें तुम्हां केविं काळासि द्यावें
कुटुंबेंचि जाईन आतां वनासी
रिपू खाउ आम्हां समस्तां जनांसी' २८८

'कृपासागरा दीनबंधू दयाळा
यदूनायका[1] मायबापा मयाळा
बहू रक्षिले दास त्वां दासपाळा
बुडाला जगीं आजि कां विप्रमेळा' २८९

उलंडे मही रूसला पद्मनाभी
तदा कुंति मा बोलिली 'ना भि ना भी

१ ह्अ. रमानायका

असें काय तें वर्म सांगा दुखाचें
हरी कृष्ण सारील रे कल्प कैचें ' २९०

प्रती उत्तरा गौतमी देत जाये
म्हणे ' काय सांगूं महादुःख माये
वनीं एक तो राक्षसू नांदताये
असे आजि तो आमुचा काळ पाहे ' २९१

' तया भोजना मानवी सर्वकाळीं
सपक्वान्न गाडा भरी म्हैस जाळी
पुरामाजिं त्याची फिरे नित्य पाळी
असे आमुची आजि कर्मी दिवाळी ' २९२

' मुळीं चारि आम्ही असो वो हिताचीं
पती पुत्र मी आणि दारा सुताची
तया कोण देऊं करूं काय गंगे
असें कर्म ठेलें उभें वर्म भंगें[1] ' २९३

इन्द्रवज्रा

कुंती म्हणे ' पांच सुपुत्र मातें
देईन एकाप्रति पालटातें
आहे क्षुधा फार परंतु त्यासी
वेगीं करा पर्वत अन्नराशी ' २९४

१ हअ. कसें कर्म हें लागलें आज मागें

बोलोनि आली निज-पुत्र ठाया
सांगे कथा सर्व निगर्व-राया
‘ म्यां दीधला बल्लव विप्र-काजा ’
बोले तथास्तू मग धर्मराजा २९५

मालिनी

परम सुख पहा हो वर्तलें विप्रधामीं
प्रचुर वधु मिळाल्या लागल्या पाक कामीं
दिनमणि उगवे तों अंगणीं अन्नराशी
गिरिवर सम केला जाणवीलें तयासी २९६

धरुनि वडिल आज्ञा मस्तकीं भीमराणा
त्वरितचि मग गेला ब्रह्मधामासि जाणा
महिताळिं पटिशाळे ताडिली कोपरानें
प्रभव करुनि गर्ता बैसला चंडमानें २९७

पंचचामर

शतावधादि बायका पवित्र विप्रनायका
समग्र अन्न आइका तयासि वाढिती यका
फिरौनि पाहती पळें रितींचि देखती तळें
सवेंचि धांवती बळें जसी उठावलीं दळें २९८

घृतादि शर्करोदऱ्या पवित्र पोळिया पुऱ्या
घडीत घारिया बऱ्या मधू सगर्भ सांजुऱ्या

करूनि भात पर्वडी विशेष वाढिती कढी
परंतु काय तो गडी, पुरे म्हणेल ते घडी २९९

स्रग्विणी

भक्षुनी सर्वही अन्नराशी निकी
पाहुं जों लागला कां न ये आणिकी
भ्यालि या देखुनी विप्रदारा पहा
काय हा राक्षसू तोचि आला गृहा ३००

उपजाति (द्रुतपदा + द्रुतविलंबित)

झणिं निवेदिल महासुखिं आम्हां
खरकल्या मग हळूहळु रामा
द्विजपतीसह कंपित भेउनी
घरधनी विनवी कर जोडुनी ३०१

स्वागता

'स्वामिया मुनिवरा बळि मेरू
संपला सकळ पाक पसारू
ठेविला परि तया असुरासी'
आणि सत्वर म्हणे बळिराशी ३०२

उपजाति (स्वागता + अच्युत)

'तो रिपू मज निवेदिल जेव्हां
त्या समोदरिंचि जाइल तेव्हां

अन्न जें हिरवें सिरवें घरीं
आणि आसल तें मज वोगरी ' ३०३

स्वागता

काढिलीं द्विजवरें मग पेवें
भक्षिलीं मग वृकोदर देवें
हरभरे तिळ गहूं गुळ दाळी
मूग माष मसुरा मठ साळी ३०४

ऊठला मुनि तसाचि भुकेला
रांजणीं जळ बरा मग प्याला
ब्राह्मणाप्रति म्हणे द्विज शेषा
पाठवी मज अरी-वनदेशा ३०५

भुजंगप्रयात

भरी विप्र गाडा घरीं आणिकाचें
तया जुंतिले चंड म्हैसे बळाचे
धुरे बैसला पाळि पावे तळ्याची
असे वस्ति जेथें तया राक्षसाची ३०६

प्रतापी बळी तोंडिया नाम त्याचें
जगद्भक्षकू शैलसें देह ज्याचें
मुखीं सूळ दंतावळि काळ दाढा
वपू काळरूपी रिपू घोर गाढा ३०७

क्षुधें पीडिला तो उभा मार्ग पाहे
तदा गाडियासी त्वरें देखताहे
रचौनी पुऱ्या कर्तळीं भीम झेली
तया दाखवोनी मुखामाजिं घाली ३०८

वरी वाकुल्या दाखवी वामहस्तें
असे देखतां धांविजे राणमस्तें
बळें मुष्टि मानेवरी घाव हाणे
बळी खाय तैसाचि जाणे न जाणे ३०९

इन्द्रवज्रा

लाता बुक्या राक्षसु देत जाये
तो भक्षितां अन्न परी न राहे
खाऊनि गेला सकळीक जेव्हां
कोपाग्नि जाला बाळि भीम तेव्हां ३१०

शिखरिणी

सिहीनादें वायोसुत गरजला घोर घनता
उडौनी आकाशीं हृदयिं रिपु हाणी पदलता
शचीकांतें जैसा अचळ उरिं वज्र प्रहरिला
तसा घायें वर्मीं वनपति उलंडोनि पडिला ३११

तया मूर्च्छा आली नगवत निजैला महितळीं
त्यजूनी त्या पाळीवरि उतरला पंडुज बळी

कर प्रक्षाळूनी प्रचुर जळ प्यालेंजुळवरी
तदा जाला पाहे रजनिचर तो सावध वरी ३१२

शार्दूलविक्रीडित

दावाग्नी घृत शिंपिला कडकला कीं काळ वर्वाळला
कीं तो व्याळ महाफणी गिरिवनीं पुच्छासनीं ताडिला
तैसा राक्षस कोपला रणमहीं युद्धाप्रती ठाकला
आला भीम वरी तयाप्रति कसें तो तोंडिया बोलिला ३१३

भुजंगप्रयात

'अरे मानवा मश्यका मंदबुद्धी
वनामाजिं आलासि तूं मृत्युशुद्धी
करोनी दिली धीट त्वां लात मातें
तरी काय तूं वांचसी काळहातें' ३१४

म्हणे भीम 'रे राक्षसा रानमस्ता
जगत्रासिया पापरूपा प्रशस्ता
बहू भक्षिले लोक त्वां पापबुद्धी
परी मृत्यु आला तुझा अंतशुद्धी ३१५

असें बोलतां मुष्टिघातें बळानें
रणीं भीम हाणीतला राक्षसानें
रिपू घाव घेऊनि अंगीं स्वकस्ते
उरीं तोंडिया ताडिला वामहस्तें ३१६

स्रग्विणी

पेटले दोघही घोर द्वंद्वासले
हाणिती घाव ते एकमेकां बळें
फोडिती चंडहाका महा-संगरीं
व्योम कांपे तळीं भूमिका थर्थरी ३१७

इन्द्रवज्रा

हस्ती हरीसा परि भीम पाहे
साधी तयासा जगिं कोण आहे
बंधू वरी धर्म जयासि साह्ये
तें कामही पुण्य परार्थ आहे ३१८

स्वागता

आणिलें मग तळीं असुरातें
फोडिलें हृदय कोपरघातें
वाहिलें रुधिर भूवरि कैसें
प्रेतसाळ पडिलें गिरि ऐसें ३१९

उपजाति (अच्युत + स्वागता)

टाकुनी तळयावरि त्याजला
गाडियावरि भीम विराजला
हाकिले कर उभारुनि म्हैसे
देखती सकळ पौरिक कैसे ३२०

इन्द्रवज्रा

पंचारत्या घेउनि पौर-जाया
वोवाळिती त्याप्रति भीमराया
आनंद तेथें बहुसाल झाला
त्या पौरिंचा धावुनि राव आला ३२१

तो भेटला भीम निगर्व देवा
राजा करी येउनि धर्म सेवा
वंदूनि माथां चरणांबुजासि
केली पुढें कांचन-रत्नराशी ३२२

स्वागता

'घातलें नगर हें सुखसाई
काय होइन तुझें उतराई
हें सुवर्ण धन तें तुज काई
अंगिकार करिजे' धरिं पायीं ३२३

द्रव्य काय करणें तपसासी
वांटिलें सकळ विप्रजनांसी
'आमचेनि जागिं कोण निवालें
भाग्य हें बहु फळाप्रति आलें' ३२४

शार्दूलविक्रीडित

धर्माचीं वचनें परीसुनि पुरस्वामी सुखें दाटला
गेला वंदुनि पाय भूप मग तो विष्णुश्रवा ऊठला

पांची पांडव भोजनीं बसविले दिव्यान्न विस्तारिलें
कुंतीपूजन गौतमी-गृहपती संयुक्त संपादिलें ३२५

केले आदर मान जाण बरवे संतोषली साजण
बोले बैसुनि विप्र काय मग तो विष्णुश्रवा आपण
'जी जी पुण्यपरायणा मुनिवरा देवा जगत्कामिया
हा सत्कार परोपकार नगरा भीमार्जिला स्वामिया' ३२६

अच्युत

'पाडिला पुरकंटक पातकी
पंथ-पाडक तापस घातकी
आजि सर्व जनां सुख वाटलें
घोर जन्म जरा जळ आटलें' ३२७

बोलिला मग धर्म कसें तया
'पुण्य हें तुमचें द्विजराजिया
कोण मारिल जी कवणाप्रती
धर्म हे तुमचे प्रबळावती' ३२८

भुजंगप्रयात

'असो आमचें दैव गा विप्रराया
तुम्हां भेटलों जोडली सौख्यछाया
सभाग्यें तुझी पावलों धर्मशाळा
सुखी जाहलों अन्नदानें दयाळा' ३२९

अमृतललिता

‘ फार गुरू श्रमलों भ्रमतां वनिं
रूक्ष फळें विटलों बहु खातां
दुर्धर दुःख किती म्हणुं सांगन
एक तुम्हां पुसणें मज आतां
पुण्य पवित्र परायण देश
जनोत्तम राव पुरोत्तम जागा
कंठल हा सकुटुंब कुकाळ
असें मज लागुनि सुस्थळ सांगा ’ ३३०

वसंततिलका

त्यानंतरें द्विजपती गुज बोलताहे
‘ पांचाळ देश कुसुमावति पूर आहे
तेथें प्रजाजन सुखी चिरकाळ पाहे
वर्ते दया विविध तापस धर्म लाहे ’ ३३१

‘ तो राव द्रौपद भला जगतींत आहे
विख्यात ख्यात जगतीं यश कीर्ति लाहे
कन्या तयासि द्रुपदी गुणरूपराशी
होता निचिंत नृप नेमुनि अर्जुनासी ’ ३३२

‘ तें पंडुराज-कुळ अग्निं अहाळियेलें
लाक्षागृहीं अकळ कौरविं जाळियेलें

तें दुःख थोर द्रुपदें मनिं मानियेलें
द्वारावती हरिसि जाउनि आणियेलें' ३३३

'आतां नरेंद्र मिनलेति समस्त तेथें
इंद्रादि देव वरुणादिक सर्व जेथें
राजा करौनि बसला पण पूर्व-साक्षी
भेदील त्या वरिल ते नव पंकजाक्षी' ३३४

'जावें अगत्य तुम्हि ठाकुनि सैंवरासी
होईल माधवसुदर्शन लाभराशी
इच्छा मिळैल धन अन्न वऱ्हाडधामीं
जातों मिळौनि सहनागर विप्र आम्ही' ३३५

कामदा

ऐकतां असे धर्म तोषला
फाल्गुनाकडे पाहुं लागला
हर्ष तो भरे श्रीधनुर्धरा
स्वामि जाइजे शीघ्र सैंवरा ३३६

मन्द्राक्रान्ता

राहो आतां वचन वचनें वाढतो ग्रंथराशी
रात्रीं तेथें क्रमुनि मग ते चालिले सैंवरासी
आली भेटी निकट हरिची त्या सुखा वर्णु काये
वाहे लोकीं अवचितसुता नंदपोटीं न माये ३३७

*॥ इति श्री द्रौपदी सैंवर विश्रांताध्याय पांचवा संपूर्णमस्तु ॥*

# सर्ग सहावा

**श्रीकृष्णाय नमः ।**

भुजंगप्रयात

निशांतीं दिशा रंगली पूर्व साची
सहित् माय ते चालिले बंधु पांची
तळ्याची पुढें वेंघळे पाळि पंक्ती
अकस्मात तेथें पडे तेज दीप्ति ३३८

वरीं पांडवीं पाहिलें पुष्करासी
तदा देखिलें व्यास योगेश्वरासी
त्वरें घालिती सर्व लोटांगणासी
ऋषी पावला भेटला साजनांसी ३३९

म्हणे धर्म ‘ जी श्रीमुनी शीण गेला
बहूतां दिसां आजि सांभाळ केला
समर्थू धनी ज्यासि ये पृथ्विमाजीं
पुसें मी तुम्हां त्यांसि हे कष्ट कां जी ’ ३४०

वदे व्यास ‘ धर्मा कळे वर्म कांहीं
अरे सार कष्टाविना आन नाहीं

फळें गोड येतील या कष्टवृक्षा
परस्तूत जा रे महा लाभ लक्षा ' ३४१

' कृपासागराची कृपा भीम व्हावी
पुढां जे मिळे वस्तु वांटूनि घ्यावी '
असें बोलुनी दिव्य देही तपस्वी
नभीं गुप्त झाला रवी-रंगरश्मी ३४२

शिखरिणी

मुखें पांची बंधू जयजय गुरू बोलुनि पहा
सुखें ते पांचाळा त्वरित चरणीं चालति महा
बहू वेगें जाती गिरिवरवनें लंघित गती
सुखी जाले गोदावरि तट पुढें देखुनि अती ३४३

शुचि स्नानें तेथें करुनि करिती पावन फळें
पुढें आली रात्री निबिड नभ झालें तम बळें
स्निहाळीं जीं काष्ठें सरळ सरळी आणुनि बरीं
बळी भीमें मोळी करुनि धरिली उत्तर करीं ३४४

इन्द्रवज्रा

अग्नी दिल्हा लावुनि काष्टभाळा
तेजाळल्या सर्व दिशा विशाळा
सव्यैक पाणी द्रुम घेत आहे
स्कंधावरी घेउनि चालताहे ३४५

चाले बळें गौतमि-कांठकांठीं
पाचीं जणें धांवत पाठपाठीं
गंधर्व चित्रांगद नाम ज्याचें
मार्गींचि होतें अवसान त्याचें ३४६

वसंततिलका

तंबू प्रचंड तटिं देउनि तेजराशी
गंगाजळीं क्रिडतसे निज राणियांसीं
होती अव्यग्र[1] भवतीं अति भीमसेना
ते मेटवीर मग हाकित भीमसेना ३४७

भुजंगप्रयात

'तुम्ही कोण उल्केसि घेऊनि येतां
सरा रे सरा रे मरूं कां पहातां'
असें आयकोनि बळी भीमराणा
म्हणे 'शीघ्र तुम्हीचि कां रे सराना' ३४८

'दुजें अस्त्र वेगें करा ऊचला रे
करा ना तरी मृत्यु निर्माणला रे'
असें बोलतां धांवले दिव्य देही
गदा मूसळीं ताडिला भीम पाही ३४९

वपू वज्र त्याची न भंगे न भागे
बळी तो द्रुमें सर्व झोडोंचि लागे

१ 'व्य' आघातरहित उच्चार

किती पाडिले गर्व गंधर्व गाढे
पळाले किती लागले स्वर्ग वाटे ३५०

विभांडोनि सेना क्षणामाजिं तेथें
अकस्मात आला रिपू मुख्य जेथें
धनुर्बाण घेऊनियां चित्रसेना–
वरी वेंघला देखिलें भीमसेना ३५१

इषू सज्जितां पंडुजें वृक्ष हाला
नभीं वक्र होऊनि वैरी उडाला
वरी राहुनी लक्षिले पंच दृष्टी
करूं लागला माधवी बाणवृष्टी ३५२

असें देखतां धर्म धारिष्ट गेलें
महासंकटीं अर्जुनें काय केलें
करीं घेउनी दीप्त उल्का तयानें
वरी अग्नि आव्हानिला मंत्रबाणें ३५३

स्वागता

सूटली मग करीहुनि उल्का
लागली कडकडूं करुं कल्का
तेज अष्टहि दिशांवरि गेलें
व्योम अग्निमय होउनि ठेलें ३५४

दीपले मग नभीं रिपु-डोळे
लागतां हृदय पावक पोळे
अग्निचक्र भवतें करि वृष्टी
आहळोनि पडिला मग सृष्टीं ३५५

भीम धांउनि तया धरि पायीं
वर्तलें तव तिये क्षणिं कायीं
त्याचिया जळविलासिनि जाया
चंचळाद्भुत विजूवत काया ३५६

भुजंगप्रयात

त्वरें पावल्या लागल्या धर्मपायीं
पती वांचवी तूं चुडेदान देईं
भवंडी नभीं भीम त्या ताडनासी
तदा बोलिला धर्म ' रे राख यासी ' ३५७

तसा राखिला हात हो भीमसेनें
पुढां वंदिला धर्म त्या चित्रसेनें
स्तुती तो करी हात जोडोनि तेथें
तुम्ही कोण हो श्रीमहावीर येथें ३५८

म्हणे पार्थ ' गंधर्वदेवावधारीं
असों विप्र आम्ही व्रती ब्रह्मचारी

तुला दंडिलें थोर अन्याय झाला
तुझें नांव आतां निवेदी आम्हांला ' ३५९

शार्दूलविक्रीडित

श्रीगधर्व निजाभिधान वदला चित्रांगदू हो बुधा
साधीसा मज अर्जुनाविण महीं नाहीं प्रतापी दुजा
बोले धर्म " यथार्थ शब्द सखया त्वां भाव जाणीतला
आम्ही पांडव " बोलतांचि चरणीं चित्रांगदू लागला ३६०

श्येनिका

क्षेम दीधलें तया युधिष्ठिरें
सौख्य मानिलें बहूत निर्जरें
धन्य मी म्हणे जगत्रयीं भला
स्वामिलाभ हा अपूर्व जोडला ३६१

कामदा

कोण हे स्थिती कोणत्या स्थळा
जातसां तुम्ही काय औकळा
सांगुनी कथा सर्व त्या सुरा
जातसों म्हणे धर्म सैंवरा ३६२

इन्द्रवज्रा

चित्रांगदू उत्तर देत आहे
तातें तियेच्या पण सारिलाहे

भेदील हा फाल्गुन एक त्यासी
मी चाक्षुषी देइन मंत्र यासी ३६३

वसंततिलका

आज्ञा निगर्व-नृप सत्वर देत आहे
पार्थासि मंत्र मग तो उपदेशिताहे
होईल तैल सह शीतळ जाय येणें
बिंबेल मीन पण भेदुनि सिद्धि तेणें ३६४

आणीक एक चरितार्थ अपूर्व आहे
मंत्रोनि बाण रणिं सोडुनि वीर्य पाहें
होती असंख्य शरराजि नभीं न माती
तेणें अमित्रगण भंगुनि सर्व जाती ३६५

इन्द्रवज्रा

आनंद जाला मग अर्जुनासी
तूं आमुचा षष्टम बंधु होसी
सांगे प्रसंगें मज कार्य तेणें
कांहीं तरी होय उतीर्ण जेणें ३६६

भुजंगप्रयात

दिल्हा मंत्र अग्नी तया सज्जनासी
असो चाक्षुषी लाधली अर्जुनासी

बिडारासि नेऊनिया पांडवांसी
अती आदरें गौरवीतो तयांसी ३६७

इन्द्रवज्रा

येरू म्हणे 'सर्व रमानिवासें
संपूर्ण केलें मज दिव्य वासें
आतंक लागे परि या मनातें
द्यावा तुम्ही पावक मंत्र मातें' ३६८

मंद्राक्रांता

केलें त्याचें अतिथ अतिसें भोजनें भोग नाना
वस्त्रें रत्नें कटिं मनगटीं भूषणें दिव्य नाना
ऐशी रात्री सुखद सरिता लोटली पांडवांसी
प्रातःकाळीं गमन वहनीं बैसवीलें तयांसी ३६९

शार्दूलविक्रीडित

इच्छाज्ञा दिधली तसें उपवलें तें यान दिव्यांबरीं
घंटा वाजत चालिलें घणघणा पांचाल देशावरी
गंधर्वेश्वर मिर्वला सहचमू गाती पुढें अप्सरा
राजा धर्म सबंधु लक्षित असे द्वीपांतरा सागरा ३७०

स्वागता

देखिलें नगर त्या द्रुपदाचें
काय वर्णन कसें करुं त्याचें

रत्नगर्भ कनकोत्तम-राशी
ऊर्ध्वरंग उजळी गगनासी ३७१

उपजाति (अच्युत + स्वागता)

आंत कृष्ण-विभा घन-सावळी
वोप दे चारिया वरि पीवळी
थोर मान चढला द्रुपदासी
मीनले त्रिभुवनोदरवासी ३७२

वसंततिलका

यानासनीं बसुनि पांडव येत होते
जाले तटस्थ गगनीं मग सर्व हो ते
देखोनि काम कुसुमावति राजधानी
बोले निगर्व अनुजाप्रति काय वाणी ३७३

भुजंगप्रयात

पहा रे पहा शक्र-शाळेचिवाणी
दुजी हे महीमस्तकीं राजधानी
घनश्याम शौरी सखा येथ आहे
कृपें भेटि देईल आम्हांसि पाहे ३७४

मालती

उतरुनि मग धात्रीं यान चित्रांगदानें
बहु हित शिकवीलें पांडवांलागिं तेणें

नमन करुनि त्यासी धर्मराजा निघाला
उपवुनि[1] मग येरू यानपंक्ती मिळाला ३७५

इन्द्रवज्रा

'गंधर्वदेवा परमस्नेहाळा
येथेंचि आम्हां उतरी मयाळा
जातां प्रतिष्ठें नगरांत पाहे
होईल चर्चा प्रभुला न साहे[2]' ३७६

रथोद्धता

पांडवीं नगर सेविलें बरें
सुंदरें परम मंदिरें घरें
पातले मग कुलाल भूवना
मानलें स्थळ निरीक्षितां मना ३७७

धांवला परम साळई सुखें
वंदिले चरण बोलिला मुखें
'आजि मी सधन जी द्विजोत्तमा
योग्य हा निज निवास हो तुम्हां' ३७८

इन्द्रवज्रा

केला बहूतादर साळियानें
धाईल कैसा परि भीम त्यानें

१ ह. उपमुविवरि, १ हअ. नृपवर. २ हअ. मध्यें हा श्लोक नाहीं.

आणीक येथें मुनि बोलियेला
मुद्रा हरी देउनि त्यासि गेला ३७९

ते मुद्रिका घेउनि भीम कैसा
पौरीं भ्रमे सारित नेम ऐसा
घालील जो भोजन पूर्ण मातें
हे मुद्रिका देइन मी तयातें ३८०

वसंततिलका

होती अमोल परि ते यदुराजमुद्रा
गेला प्रभोंवत पुरीं नृप-मंत्रिभद्रा
भक्षाल अन्न किति जी तुम्हि भूमि देवा
द्या मुद्रिका सदनिं जा मनमान जेवा ३८१

शार्दूलविक्रीडित

हातीं भीम धरूनि सेवक
जनीं तो मांडवा आणिला
जेथें या भुवनत्रया नृपवरें
होतान्न पाकार्जिला
तो बैसोनि निचिंत
आमृतहरें सर्वै निसंतानिला
घालानाणिक कां म्हणौनि
सकळां क्रोधें वदों लागला ३८२

अमृतललिता

रांधवना सुटला पळ सर्वहि
मंत्रिपदाप्रति धांवत आले
धाडुनि कोण तुम्हीं दिधला अरि
मंदिरिं अन्नगिरीचि निमाले
पाठिंचि येउनियां वरकोदर
त्यासि म्हणे ‘ गुण गौरवमुद्रा
व्यर्थ तुझा पण धाइचिना मन
जाइन मी घरिं दे निज मुद्रा ’ ३८३

स्रग्विणी

‘ आग लागो तुझ्या काळपोटावरी
अन्नमांदार त्वां घातलें ऊदरीं
मुद्रिका ही कशी मागसी ताटुनी
यासि घाला गृहा बाहिरी पीटुनी ’ ३८४

लोटिजे त्यासि त्या सर्व कामारकीं
काय लोटेल तो पर्वताकार कीं
राग आला तया ताडिले सर्वही
लोळती बस्तसे भोवतालीं महीं ३८५

उपजाति ( अच्युत + स्वागता )

जाहला कळका कळ वाढली
हाक लग्न घरीं सुरवाडली

कृष्ण येउनि तयार्पवि मुद्रा
भीम जाय मग सैन्य-समुद्रा ३८६

स्रग्विणी

कौरवांचे दळीं जाउनी एकला
एक तंबू तयानें समुत्पाटिला
चंड ग्रंथी तयाची करोनी पहा
जाय भिक्षाटणालागिं ग्रामीं महा ३८७

दीधलें दुःख त्या पूरलोकां अती
अन्न आकर्षिलें कोण जाणो किती
घातले नेउनी सर्व गंगोदकीं
अर्पिलें अन्न तें कच्छमच्छादिकीं ३८८

स्वागता

ठाकला उपरि तो निजधामा
साळयाप्रति म्हणे ' अजि मामा
मी फिरेंचि जरि व्यर्थ रिकामा
लाविजे मज तुम्ही तरि कामा ' ३८९

उपजाति ( अच्युत + स्वागता )

सत्कुलाल वदे जिविंच्या गुजा
' पाहिजे मृतिका मज हो द्विजा '

दोन पेंड गिरि घेउनि आला
साळई विभव रेखुनि भ्याला ३९०

इन्द्रवज्रा

आसो असें भीमचरित्र पाहे
तें सांगतां कौतुक फार आहे
रात्रीं क्रमूनी मग ते निवासीं
तें चालिले पांडव मंडपासी ३९१

चित्रांगदें चित्रविचित्र वस्त्रें
होतीं दिलीं भूषणयुक्त मित्रें
केळोत्रमाळा कटि ढाळ वाणी
मुद्रा करीं कुंडलजोड कर्णीं ३९२

उपजाति ( स्वागता + रथोद्धता )

लाविले मन त्रिपुंड मस्तकीं
चालिले धरुनि दंड हस्तकीं
दिव्य ते द्विजविराज राजती
वंदनें नगरलोक घालिती ३९३

भुजंगप्रयात

उभा मंडपा अंगणीं सैन्यसिंधू
मधें वाजती घोर वाद्यें प्रसिद्धू

पुढें कांबिकांच्या उभ्या भीमथाटी
असो आंत जाली जगत्रैक दाटी ३९४

वसंततिलका

देखौनि विप्र जनपावन खेदहारी
ते घालिती नमन कांचन-दंडधारी
केला प्रवेश विधिवेश विराजमाने
जाले सुखी कनक मंडप देखिल्यानें ३९५

शिखरिणी

कृपासिंधू भद्रासनिं मिरवला सन्मुख पहा
निरक्षौनी पंडूसुत हरुषले मंगळ महा
वनामध्यें होते भ्रमण करितां क्लेश भरले
दयाब्धी तो दृष्टी प्रकट पडतां सर्व हरले ३९६

शार्दूलविक्रीडित

पांची पांडव देखतांचि नयनीं जाला सुखी श्रीहरी
भद्रीं होय उभा प्रहास्य वदनें बद्धांजुळी त्यां करी
आशीर्वाद हरीसि देउनि पुढां पांची उभे राहिले
देवें दाउनि विप्रमंडळ तयां बैसा खुणावीयलें ३९७

रथोद्धता

चालिले द्विज सभेसि लक्षुनी
देखती सकळ विप्र लोचनीं

बोलती द्रुपद धन्य ये मही
पातले द्विज पवित्र पांचही ३९८

एक हा मुसळ कंद भासतो
लक्षणीं परम उग्र दीसतो
ठाव याप्रति करा त्वरा गती
नातरी करिल हा कळीप्रती ३९९

भुजंगप्रयात

असो पांचही बैसले ब्रह्ममेळीं
प्रभू उद्धवा गुह्य सांगे समूळीं
पाहा पैल ते बैसले बंधु पांची
मती मंद झाली तया उद्धवाची ४००

शार्दूलविक्रीडित

ते पंडूसुत तेचि सर्व जगतीं
कां नोळखीले तिहीं
हा भावार्थ अपूर्व भासत असे
आक्षेपिलें श्रोतिंही
वक्ता प्रार्थि म्हणे चराचर कला
सूत्रें हरी खेळवी
चक्षू आंतिल बाहुल्या निज करीं
दोरी धरी नाचवी ४०१

रात्रीं उल्क उजेडतो दिनपुढीं
अंधार तैं भासवी
तो जैं गुप्त करील पांडव जगीं
तैं कोण हो दाखवी
ऐसें उत्तर आयकोनि सुजनीं
आश्वासियेला कवी
जाला प्रश्न पवित्र हेत पुरला
आतां कथा चालवी ४०२

भुजंगप्रयात

कृपासागरा फार संतोष वाटे
सदानंद तो माजि आनंद दाटे
पुढें राजपुत्रांसि देखौनि पाहे
सुखें डोलतू बोलतू गोड आहे ४०३

अच्युत

रूपसा नळजा नृप-नंदना
तान्हया तनुजा गुणवर्धना
क्षेत्रिया अदटा अरिमर्दना
जाय सत्वर मंदिर मंडना ४०४

स्वागता

आतमसैन्य सरिसे सह घेई
थोर थोर कुकुरादिक नेई

भूषणें द्रुपदजे प्रति देई
मंडपा त्वरित घेउनि येई ४०५

भोंवते कटकदुर्ग रचावें
सावधान पथिं बा बहु यावें
गोड गोड वदले करुणाब्धी
ते पुरेश-तनया सुखबाधी ४०६

मालिनी

तर तर तर देहीं रोम रंचीत जाला
थर थर मग कांपे कंठ दाटोनि आला
ढळ ढळ ढळ नेत्रीं लोटलें पुण्य पाणी
वचनहि वदवेना कोण जोडील पाणी ४०७

वसंततिलका

सारांश कृष्ण-चरणीं निज मस्तकाला
ठेऊनि राजकुमरू निघताचि जाला
सेना समुद्रसारिसा घनसा विराजे
जाले रथारुढ यदू नर-इंद्र राजे ४०८

वाजांतरें, मृदुतरें गजरें निघालीं
छत्रें ध्वजावारि घटा घनदाट जालीं
आतां नमूनि द्रुपदीं कुळ-धर्म-राशी
श्रृंगार वर्णन करी हरिदास काशी ४०९

*॥ इति श्री द्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग सहावा संपूर्णमस्तु ॥*

# सर्ग ७ वा

श्रीकृष्णाय नमः

स्वागता

राजदुर्ग खचित प्रमयाचे
द्वार फार विकराळ तयाचें
देखिलें द्रुपद राजकुमारें
ठेविलें[1] कटक बाहिरि सारें ४१०

द्रुतविलंबित

भितरिं जाउनिया नृप-नंदनें
विनविली जननी कर-वंदनें
द्रुपदि बाइसि वो करुणा घनें
सभेसि आणविली सह भूषणें ४११

शार्दूलविक्रीडित

'शृंगारासि करा
त्वरा विधिवरा पाचारित्या सुंदरा

१. हअ ठाकिलें.

लाभा-लाभं बरा विलंब न करा
वेगीं मुहूर्ताचिरा
तिष्ठे मंडपिं या
दयाळ समया वांछा यदूराजिया
आलें[1] सैन्य पयाळ
या सम उभें द्वारीं वधू न्यावया ४१२

स्रग्धरा

ऐशी हे पुत्रवाणी सुखद निजसुखें
शोभनाची शिराणी
प्रेमें कर्णीनि कानीं प्रमुदित हरुषें
दाटली पूर्ण राणी
'सारा गे उष्ण पाणी मृग-मद-उटणीं
तेलवा रत्नन्हाणीं
आणा माजी भवानी अनळ कमळिणी
तारका माव तान्ही' ४१३

इन्द्रवज्रा

प्रौढा, प्रगल्भा, अबला नि बाळा
मुग्धानुपम्या सगुणा सुढाळा
सुवासिनी बाह्मणि कामरेखा
रामा मिळाल्या करि कोण लेखा ४१४

१ हअ. आलें सैन्यकसैन्यपाळ समईं द्वारीं वधू न्यावया

अमृतललिता

घेउंनियां सखिया सारिख्या
उपरी वरि सुंदरि खेळत होती
जाउनियां वनिता कडियेवरि
घेउनिया तिसि सत्वर येती
मांडुनि रत्नजडी चवरंग
घडी घट साधुनिया सुतवीती
तेलउनी तनु मार्जन सारुनि
सोज्वळभ्यंग जळें करवीती ४१५

इन्द्रवंशा

ते न्हातसे नेसुनि पट्टनापटी
वाद्यें तुरें वाजति दुर्ग-मूकुटीं
एकी करें कुंतळिं गंध चोळिती
एकी पदांभोजतळें तळ्हातिती ४१६

त्यानंतरें ते मखज्योतिचें बरें
अभ्यंग जालें विधियुक्त साजिरें
पाटावरी साजणि अंग वोपि ती
पट्टांबरें सुंदरि तीस वोपिती ४१७

उपजाति ( अच्युत + स्वागता )

पायघोळ कटी मग नागरा
नेसली तकटी मृदु घागरा

कंचुकी तटतटी उरिं कैसी
पावकेंचि दिधली उटि जैसी ४१८

स्वागता

वाळवूनि कबरी सुखदेणी
घातली सखिजनी मग वेणी
भूषणें खचित जांबुनदाचीं
लेइली मग लता कनकाची ४१९

वसंततिलका

भाषामची प्रकृत राष्ट्रिक हो मऱ्हाटी
वाहे विशेष कविवंशकुळी मऱ्हाटी
ते दक्षिणेसि तनया कुळही मऱ्हाटी
श्रृंगार यास्तव करी मग हो मऱ्हाटी ४२०

शार्दूलविक्रीडित

हा साधारण पुण्यपावन महाराष्ट्र स्वदेशाथिला
मी साधारण बोलतों कुळरवें श्रृंगार-धर्मापुला
पांचाळी शशिवंश-तारकसती जे पंचतत्त्वोन्मनी
हे माझी कुळदेवता अनळजा अर्चीन मी भूषणीं ४२१

स्वागता

भांगरेख अतिसुंदर भांगीं
दर्पणाकृति पट्या द्वयभागीं

राखडी खचित मूद विराजे
मोर बोर तळिं नर्तत राजे ४२२

अमृतललिता

गुंफुनि मूर्ध्निं सुवर्ण सुतें दिल्हि
सोडुनि वेणिमहामृदु कैसी
पृष्ठिं सकोमल कर्दळिपत्र
लसे वरि नूतन नागिणि जैसी
चुंबिति अग्र नितंब तिचे जशि
दिव्यफळें करिणी धरि सोंडे
रत्नजडीत अधोमुख झाळ
झळंबित राजस शामल गोंडे ४२३

भुजंगप्रयात

असो मस्तकीं मुक्त-नक्षत्र माळा
सुढाळा बहु गुंफिल्या आळुमाळा
रवी शीसफूलीं शशी अर्धचंद्रीं
कृपें बैसवीला तिनें भाळभद्रीं ४२४

तळीं रत्नज्योती जशी दीपकाची
टिळा कीं किळा अंधकारी तयांची
अती सूक्ष्मा भ्रूलता शामवक्रा
धनुष्याकृती अर्चिती कामचक्रा ४२५

स्वागता

चक्षुबाण नव अंबुरुहाक्षी
जे क्षणीं सजुनि सादर लक्षी
तैं पडे त्रिभुवनीं स्मर-धाडी
अंबिका अमर भेदुनि पाडी ४२६

नासिकासि उपमा वदुं काई
होय तो निगम धर्म निकाई
कल्पवल्लि नृपजा कळि नासा
साजनी भ्रमर पंक्ति सुवासा ४२७

भुजंगप्रयात

सुरध्वंसपितृवनध्वंसत्राता
सुखी होय तेथेंचि तो येत जातां
असो नासिकीं नायका नम्रतेनें
कशी आइका लेइली दिव्य लेणें ४२८

शार्दूलविक्रीडित

नृत्यैकार मयूर बेस रविकीं
ल्याली जशी राजसी
खालीं मुक्त प्रभावळी उडुगणें
आलीं निवासा जशीं

दाणे दोन तयावरी झळकती
ते शुक्रतारापती
जाले पावन पावले सुख महा
स्पर्धत्व आहे किती ४२९

वर्षी निर्मळ सा ऋतांत शरदीं
आश्वीनिशी पूर्णिमा
तो तारापतिराज येक वदनीं
साजे तिच्या चंद्रमा
चंद्राचे रथिं शोभली सुरसभा
त्यानंतदंतप्रभा
कीं तीं बत्तिस लक्षणोंचि बसलीं
वक्त्रीं सुखा सौरभा ४३०

पांचाळी – अधरोत्तमा प्रियतमा
देऊं अरूणोपमा
तो विक्राळ कठोर विद्रुम कुडा
कंदर्प आंगोळिमा
भेदी बाळरवी उदीत समयीं
ज्या रंगरश्मीं तमा
त्या रेषाकृति पावती परि सुधा-
धत्यां सुधा हीन मा ४३१

ऐसें नोपमतें सुखोत्तम मधीं
वस्ती करी मोहिनी

वाणी सौरस ढाळ दे मग पडे
राजगृहीं मोहनी
फाके दिव्य विकास हास्य करितां
जैसी लवे दामिनी
[1]होती वेष्टित दृष्टिमंद सकळां
पद्माक्षिया कामिनी ४३२

शिखरिणी

असो कर्ण स्वर्णी मग जडित पंखे झळकले
महामोतीं पर्णी प्रभव तरणीसे तळपले
तळीं बाळ्या पंक्ती भरुनि झळमुक्ती मिरवल्या
जशा बारा सोळा रवि शशिकळा एकवटल्या ४३३

तथा कर्णी चापीं खचित ताळिं रत्नें रजगुणें
स्वभूचक्राकारें तळपदक ल्याली तरवणें
असो कंबूकंठीं दुलडि तिलडी पंचलडितें
प्रभाळा मोत्यांच्या वळि सघन माया मिरविते ४३४

इन्द्रवज्रा

श्रीचौसरा अंबरसाब्जमाळा
रत्नावळी मोहन मुक्त माळा
चाफेकळी चंदनहार घाली
एकावळी हारहि रम्य ल्याली ४३५

१ ठ. ऐसी ते द्रुपदात्मजाचि नयनीं लज्जीत आठैजणीं

वसंततिलका

वक्षःस्थळीं धुकधुकी मग राजवीते
त्याहीं तळीं पद्कराज विराजवीते
पेटी गळा गहन घालुनि कोंद्णाची
जाला प्रभार मग आणिक लेइनाची ४३६

तूणक

बाहुदंडि बाजुबंद् तोळबंदि दंडिले
तीं ब्रिदें विलोकितां अकामयोगि दंडिले
कांकणें रवे जवे चुडे मणींद्र मुद्रिका
बैसल्या वळीं दशांगुळीं झळाळ चंद्रिका ४३७

तोळबंद् तो कटीनिबंध भूतटी रुळे
घे वरी बिजावरासि काय त्या विजू तुळे
चांद् चाळुनी जशी लताचि आणुनी घडे
पायघोळ नेसतां महीसि चांदणें पडे ४३८

अंदु वाकि साखळ्या रुळ्या अनर्घ्य घागऱ्या
अनोट बीजवे फुलें विरोदिया जटा बऱ्या
मध्य तो बरा तिचाळं[१] कार जेविं भासला
मेखळा तिये स्थळीं अमोल दिव्य घातला ४३९

१ 'ळं' ऱ्हस्व उच्चार

मालिनी

प्रकृत वचन त्याचें आइका नाम साचें
जरि कमर म्हणावें मोल नोहे तयाचें
उपरि पदर घेते वेल विद्युल्लतेचा
अवनीं टिंपित आहे अग्र त्या अंबराचा ४४०

शिखरिणी

मुखांभोजालोकीं मग मुकुर घेऊनि विजया
करी श्रीकंजाक्षी जन हडपिनी देति विडिया
अशी सर्वें लेणीं तनुवरि यथानुक्रमउनी
उभी ठेली जैशी नविन फुलली दिव्य नलिनी ४४१

शार्दूलविक्रीडित

पायीं भार तुमूळ चूळ वदनीं
सर्पीणिशी वानिमा
भासे तीव्रं तमाळ जाहलि जशी
काळाचिही काळिमा
कीं द्वंद्वोदरवारधीं विनमथें
बुद्धी निघाली रमा
कीं ते क्षोभहिमालयांतुनि सती
बाहेर आली उमा ४४२

शिखरिणी

नव्हे सौंदर्याब्धीवरिल लहरी साकृतवली
नव्हे तारुण्याची सबळ सरिता तुंबळवली
नव्हे लावण्याची लवलव लता एकवटली
नव्हे तेजाग्नीची त्रिभुवनकळा नारि नटली ४४३

कशी वर्णू शोभा ससुर-असुरीं किन्नरिं नरिं
न पावे ती रूपा मलिन करि ती कांप शरिरीं
जिचे लोकीं नाम-स्मरण करितां दोष हरिती
पवित्राची गंगा मग वचनमात्रेंचि तरती ४४४

उभी आहे द्वारांगणिं चकित बा राजनवरी
जशी गौरी सीता गहन गवसीता सहचरी
निजानंदें नाना परिमळ रवें व्योम भरिती
जशा अष्टैंगाना रसविलसती मंगळ रती ४४५

स्रग्विणी

रत्नदीपारती घेऊनी अंगना
शीघ्र आली तिची माय द्वारांगना
लक्षितांची तिच्या श्रीशशांकानना
जन्मदुःखा तिनें धाडिलें कानना ४४६

सारिते शीघ्र ते प्राण पंचारती
होय ते मातृका वीडिया चारिती

रत्नमाळा करीं देउनी कर्णिका
घेउनी बोलिली शब्द लौकर्णिका ४४७

पाव तूं चिंतिलें मंडपा जाउनी
भेटि देईं मला मागुनी येउनी
दृष्टि लागे झणीं प्राणगंगे तुला
कस्तुरीचा म्हणौनी टिळा रेखिला ४४८

शिखरिणी

तदा आले मंत्री नमन कर जोडोनि करती
त्यजा बाई हे विव्हळरस सुधावेळ चरती
शशी वक्त्रें झालीं मग दृग-चकोरे अमरसीं
महाद्वारीं राजात्मज सदळ तिष्ठे समरसीं ४४९

उभी सालंकारायुतगजसुतोपायनवती
निघे वेगें गंगे अभिजित मुहूर्तासि गिवसी
असो वंदी माते मग गजगमा गूणविजया
म्हणे लाभस्तेषाम् जन पसरिती पायघडिया ४५०

भुजंगप्रयात

कशी हंसचाली ढळे मंदमंदू
गती चिंतनीं शाम जाला गयंदू
सुढाळी अशी द्वारपाळें निघाली
प्रभा भाकतां ते दिशा दिव्य जाली ४५१

इन्द्रवज्रा

श्रृंगारिला पर्वत कज्जळाचा
आकार तैसा करि आत्मजेचा
श्री रुक्मबंदीवरि डोलहारा
हेमांबरीं राजस दिव्य सारा ४५२

शिखरिणी

महामंती बाळा धरुनि करिं तेजांकुश-फरें
मती कीं वेदांची चतुर बसली ग्रीव-सदरे
असो जाली पूजा वरि वलघली चंद्रवदनी
तडिद्वाकीं ताराचळ मिरविली मेघसदनीं ४५३

असो ते डोल्हारीं प्रमुदित करी वास रमणी
झळाळे चिद्रूपा मनिं चक धरी वासरमणी
भ्रमोदारा दारा प्रफुलित जशा देवदुहिता
निघाल्या तीसंगें वरि दचकल्या नंदनलता ४५४

द्रुतविलंबित

कळस राजति ते सकळां शिरीं
विविध भोगदळें असती करीं
परिमळोद्धळिती धुळि राजंसा
विलसती रसराजस राजसा ४५५

शशिमुखी करिणी-वरि राजते
उडुगणें सम घेउनि चालते
दळ हळाहळसें मग हालिलें
जळनिधीवत वेष्टित चालिलें ४५६

शार्दूलविक्रीडित

पृष्ठीसी अनुजोत्तमू मिरवला
छत्रातपत्रातळीं
मंत्री यादव थोर थोर रथिये
चालेति दोहीं वळीं
जैसा जाय वसंत पंचवदना
वोपावया पार्वती
कीं बंधू अनुराग पंचमशरा
अर्पावया ने रती ४५७

ऐसें उत्तर आयकोनि विनवी
जन्मोजयो भूपती
स्वामी काय निमित्य पुण्यसरिता
हे पंचकांतावती
वैशंपायन बोलिला नृपवरा
पांचाळ पाळाप्रती
जालें संकट रे यदर्थीचि पुढें
आले मुनी सद्गती ४५८

स्रग्धरा

तेंही मूळ कथावसान कथिलें
तें मी यथानुक्रमें
आकर्णीन तुला तदा परिस बा
ते चालिली संभ्रमें
भेरी झल्लरि टाळ मंगल तुरें
वाद्यें तुरीं दुंदुभी
नानामिश्रित वाजलीं घनरवें
संपूर्ण झाली नभी ४५९

जाला भू हलकायलोळ कलका
दाटेति लोकांबुधी
पाणीं वाहुनि हेमदंड समुहो
लोटे सहस्रावधी
आली रे अनळा जळाल परते
व्हा रे सरा लौकरी
देती घाव निशंक एकचळथा
घालीत एकावरी ४६०

श्रीऐरावति मत्त कुंजर ढळे
धीरत्व धीरागती
घंटा घोळ घणाणिती घणघणा
आंदू झणत्कारिती

ये राजस्थित-मंडपा द्रुपदजा
देवी अशी चालिली
नादें पुष्कर कोंदलें दुमदुमीं
भारें धरा हालिली ४६१

स्रग्धरा

पांचाळी राजभारें मिरवत गजरें
मंडपालागिं आली
तेथें हो भूपभारें अमुप चमुभरें
अंगणीं दाटि केली
त्यांचीं मारोनि ठाणीं विजय वधुगणीं
जाहले वेत्रपाणी
सेनामंडीतशानी मग विधिभवनीं
ते प्रवेशे भवानी ४६२

शिखरिणी

सुवर्णाचें लीळा-गगन फुललें त्याजुनि मळा
मधें नक्षत्रेंसी जाशि विचरली श्रीशशिकळा
नव्हे कीं त्या रत्नाकारिं निजसुखें सोज्वळपणें
रिगाली ते गंगा सहचरि-सहस्रांदिवदनें ४६३

वसंततिलका

संगे जशा अमरजा अवतार नारी
त्या पद्मिनी जगतिं लोचन-तारनारी
मध्यें झळाळत सुढाळत राजसा ते
आली पणासि गिवसीत परा जशी ते ४६४

शिखरिणी

असो यंत्रापृष्ठीं नगवत महा मंगलमयी
उभी ठेली साळंकृत मग करी राजतनयी
वरी कृष्णादेवी जशि उजळली चंद्रसमयीं
विकासी तेजातें त्रिभुवनकळा मोहनमयी ४६५

भुजंगप्रयात

सभा वक्रदृष्टी निरक्षौनि गौरी
तदा देखिला ब्रह्म साकार शौरी
विचारी मनीं हा हरी आदिबंधू
चिदानंद–मूर्ती निजानंद–सिंधू ४६६

वसंततिलका

आहे सहाकृत सखा मधुकैटभारी
कैचें मला तरि जगीं भय कीट भारी
प्राणारती करुनि कृष्ण मनेंचि वंदी
घाली जगासि मग मोहिनि रूपबंदी ४६७

इन्द्रवज्रा

आतां सभा मोहन वर्णनासी
आणा मना हें अधिवर्णनासी
तैसा कलौवासचि द्वारकेसी
केला म्हणे श्रीहरिदास काशी ४६८

॥ इति श्री द्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग सप्तम ॥

## सर्ग ८ वा

श्रीकृष्णाय नमः

शार्दूलविक्रीडित

होता मंडप राजकाज-समयीं
लोकत्रयीं दाटला
कृष्णातेज विलोकितां त्रिभुवना
विस्मो बहू वाटला
अष्टौ दिक्पति सार्वभौम नृपती
जे पुण्यकीर्ती भले
छत्रें मंडित चामरांकित सभे
होते यथा शोभले ४६९

श्रोत्री ब्रह्मऋषी तपोधन मुनी
जे भूसुखा रूसले
स्पर्धी दैत्य पिशाच पन्नगपती
ते मंटपीं बैसले
होते देव खणोखणीं तळवटीं
हे सर्वही दाटले

जाले चित्रचमूपमा चकित ते
चोजेंचि चाकाटले ४७०

मागां सुंदरि जालिया प्रियतमा
शास्त्रीं जयां वर्णिलें
जेहीं भूजग मोहिलें सुरवरां
धात्री-तळा आणिलें
ब्रह्मा शंकर घातले स्मरमठीं
इंद्रादिकी डोलिले
नाहीं हेपरि तेज तन्मय ऋषी
रायादिकीं वर्णिलें ४७१

प्रत्यक्षाप्रति साक्षि काय अनळीं
कोणें सदा स्नानिलें
झालें मंद मयंक अर्क गगनीं
द्वैपायनें वर्णिलें
कृष्णा तारक तेज अद्भुत जगीं
म्यां काय व्याकर्णिलें
तेंही वर्म पुढें अनुक्रमरवें
जाईल वाखाणिलें ४७२

पूर्वीं रत्नसमुद्राजमथनीं श्रीमोहिनी पातली
जाली तल्लिन देव-दानव-कळा तैशी सभा वर्तली

को तारापद को सुरेंद्रपद को कैलास रुद्रौपदी
को वैकुंठ विराट सत्यपद को सर्वस्व हें द्रौपदी ४७३

तूणक

कोण पुण्य पाप माय बाप बंधु सासरीं
कोण दानधर्म कर्म नेम नित्य वासरीं
कोण देव कोण भाव भाक्ति मुक्ति को वरी
को जपादि को तपादि सर्व धर्म नोवरी ४७४

मालिनी

टकमक नयनाचे देव जाले गुणाचे
विनमुख वचनाचे मौन्य जालें मनाचें
वधुशर वदनाचे लागले वेधनाचे
हृदायिं जनमनाचे रंगले वेध नाचे ४७५

द्रुतविलंबित

उगवली रजनीच मुखी वधू
विचरला जनिं कामकरू वधू
सुरवरीं सुरता क्रमु सांडिला
मुनिवरीं नवरी-जप मांडिला ४७६

वसंततिलका

राजात्मजा कमळिनी तंव फूललीसे
लोकांतरा सभवतीं भ्रम भूललीसे
झंकारती वरि मधूकर किन्नरादी
गाती वसंततिलकामरकोकिळादी ४७७

द्रुतविलंबित

स्मरवरें गुणिं चंड विवाइला
त्रिभुवना उरिं बाणचि लागला
परम पावकिं लावहि कोत्तमा
सकळ बोलति होचि मनोरमा ४७८

रथोद्धता

लुब्धले त्यजुनि एक सर्वसा
बैसले धरुनि एक भर्वसा
लागले स्वदळ एक सावरूं
वर्तले वसन एक आवरूं ४७९

एक सागरबळें कलोळती
एक भूवरि निशंक लोळती
एक ते पणकळाचि लक्षिती
एक ते निज जिवीत रक्षिती ४८०

भुजंगप्रयात

मनीं एक जाले महाचंचलस्तू
विराले सभे एक जाले गळिस्थू
गळालीं धनुष्यें धरेमाजिं माती
असे ते पणा भेदिती काय माती ४८१

वसंततिलका

एकीं प्रतापविजयीं दृढ नेम केला
जिंतूनि भूभुज हरूं नृप-कन्यकेला
एकासि जाय पळ सोसपसोस खातां ४८२
जाईल हे चपळ घेउनि जीव आतां

मंदाक्रांता

एका चित्तीं चकित जडलें दिव्यता दीप्ततेनें
एका पोटीं भयचि भरिलें सोडिला कंप तीनें
ऐसे सर्वे सुरनरपती वित्पती वित्पतानें
मंदाक्रांता सदन भुलले देखिलें श्रीपतीनें ४८३

शिखरिणी

सभा भीमा जाल्या प्रभु उभय भागीं अढळती
विराजेती राजे वरि कनकदंडें सुढळती
महा मध्यस्थानीं खचित मणि भद्रासन असे
वरी मेरू जैसा नवकमलपत्राक्ष विलसे ४८४

पदीं वाकी अंदू झळफाळित पीतांबर कटीं
करीं मुद्रा रत्नें वरि घन सुरेखा मनगटीं
घनश्यामत्वांगीं लखलखितची चंदन उटी
रवी-रश्मी-रेषा तिलक निढळीं चाप भृकुटी ४८५

स्वागता

मेखळा पदक कौस्तुभ माळा
कुंडलें मुगुट युक्त न्यहाळा
सावळा भुवनसुंदर आहे
ब्रह्मचिद्घन चिदांतरिं पाहे ४८६

भुजंगप्रयात

नखीं काम कोटी मुखीं काम कोटी
दिठीं लोपले भानु कोट्यानुकोटी
नये वर्णितां कृष्ण तेजोविराटी
रिगाल्या श्रुती मौन्य मेरू-कपाटीं ४८७

अच्युत

संत जो हरि मानस जो हरी
धर्म जो हरि तारक जोहरीं
कर्मकंटक बोहरि बोहरी
काय बोलत हो वच तो हरी ४८८

कामदा

सकळ देखिला स्तब्ध मंडपू
वचन बोलिला यादवो नृपू

पुरपती अहो भूभुजोत्तमा
क्षितिपतीमधें उत्तमोत्तमा ४८९

वधु विलासली सत्सभांगणा
तुम्हि विलंब कां लाविला पणा
नृप सभे प्रती-वादि जे
करिल पूर्ण त्या द्रौपदी दिजे ४९०

परम गौरवें बोलिले हरी
सुख समाविलें द्रौपदांतरीं
उठुनिया नृपें गंभिर स्वरें
स्तवन मांडिलें जोडिल्या करें ४९१

मालिनी—पद्मबंध

जय जय सचेरेशा पद्मपाणी परेशा
अमरवरदवेशा सूर्य शेषा सुरेशा
विधिहरमाणिभूषा निर्गुणाकाशकोशा
मुनिवरमनतोषा मूकलों कर्मदोषा ४९२

स्रग्विणी—चक्रबंध

भासली केशवी भूतळीं लीळभा
भाळली इंदिरा जालि कांता विभा
भाविता कांतिभा-ज्योति जाते नभा
भानुतेजा तुवां भान केली सभा ४९३

स्रग्धरा—हारबंध

श्रीशामा शामशामा
जयजय जय राराभिरा भीमभीमा
वाचा आचा वचाल्या
ठकमक ठकल्या स्वासिली सीमसीमा
नाही कांहीं कहीं म्यां
जपतप उपदा अंकली कष्टकर्मा
आलें जालें भलें हें
झळफळ फळ यागाधगाध स्वधर्मा ४९४

वसंततिलका—माळाबंध

विस्तारली विखर कृष्णचिदा कृपेची
निस्तारली निबर कूकुचिता कुळाची
सत्वाळली सकळ जी भुमि आज स्वामी
सर्ता जगीं सहज हं तमिं जाहलों मी ४९५

शिखरिणी—शेषबंध

सुखद्रूपाभूपा भुवनपति पद्माक्षिरमणा
महामूढायुक्तायुत करिसि देसी सुख मना
सुरश्चंद्रा चंद्रा दिकचतुर तुर्या मुखरणी
रसोक्षीसी स्वत्वें खळ वधिसि देसी शिखरिणी ४९६

तूणक

पद्म चक्र हार माळ शेष पंचभूषणें
वाइलीं हरीसि योग्य होतु मंद भूषणें
धन्य हें सुलग्न धन्य धन्य हाचि मंडपू
धन्य धर्म धन्य कर्म धन्य आजि मी नृपू ४९७

धन्य हा सुदेश धन्य धन्य हे प्रभूमिका
धन्य पौर लोक धन्य धन्य पौरनायका
धन्य हे सुता जिचेनि जोडिलासि तूं सखा
भोगितों नृपांत आजि मी सुरेंद्रसत्सुखा ४९८

वसंततिलका

राजस्तुती परमसी परिसोनि कानीं
संतोषला भुवननाथ रथांगपाणी
बोले म्हणे ‘ पुरपती दुसरेंचि नाहीं
तेथें स्तुतीसि करणें उपरोध पाहीं ४९९

जो का गुरू जनक मान्य जगांत पाहे
तो आपणां उभयतांप्रति एक आहे
हे जे तुम्हासि मखजा मज काय नोहे
आतां त्वरें पण करा गण तिष्ठताहे ’ ५००

अमृतललिता

वंदुनिया हरिचे चरणांबुज
पौरपती मग शीघ्र निघाला

टाकुनि दांभिक राजसभा नृप
मंडळिमाजिं उभा नृप ठाला
छत्रपती वसुधापति अष्टदिशापति
भूपति विक्रमराशी
गर्वनिधी नृपती नर निर्जर
दैत्य धराधर जाणति ज्यासी ५०१

शार्दूलविक्रीडित

श्रीगांधार गवेशणादि सुरथू
श्रीशैल्य हंसध्वजू
वैदर्भेंद्र मचेंद्र हंस नृपती
काशींद्र नीळध्वजू
वैराटादि प्रथेंद्र नैषधपती
यौनाश्व ताम्रध्वजू
नाना मंडपिं बैसले कुळरवें
नामाथिले भूभुजू ५०२

शीसोदे शिरसाट वाघ चवरे.
शेलार साठे बरे
गाडे गायकवाड घोरपडिये
ते घाटगे डेवरे
सोळंखे जगताप जाधवचिते
इंडायिते इंगळे

मानें तुंबर मोहिते मगर ते
मोरे प्रखंडागळे ५०३

श्रीसावंत निकुंभ राठवडिये
ते गौड गुंजाळ जे
कोकाटे कुरुकांकळीज सुरवे
काटे प्रधूमाळ जे
श्रीचव्हाण पवार सोनगरिये
काळे शितोळे भले
शिंदे आणि अहीर दोरक कडू,
खैरे उशीराथिले ५०४

सोमौंशादिक सूर्यवंश उभयीं
छत्तीस राजे कुळी
ते होते नृप मंडपीं मिरविले
छत्रातपत्रातळीं
राजा तोचि सगर्व पर्वत मधें
तो पुण्यमेरू उभा
आहे द्रौपद बोलतो पण वितंड
स्वस्थ प्रशस्त सभा ५०५

'श्रीगोत्राधिपती तुम्ही भुजबळें
संरक्षियेली मही

द्वंद्वीं दानव दंडिले द्विजमुनी
केले सुखी स्वस्थही
आनंदें सुर गर्जताति तुमची
सत्कीर्ति गाती अही
ते तुम्ही नरवीर धीर पण हो
हा आयका सर्वही' ५०६

शिखरिणी

'पहा वंशाग्रीं जो भ्रमण करितो मच्छ वळसा
कढैमध्यें त्याचें विलसित गती बिंब गिंवसा
अधोदृष्टी, मुष्टी वरि धरुनियां वाम नयनीं
प्रतापें पाडावा सितरुनि महामीन अवनीं' ५०७

'त्रिबाणाची संख्या करिल नृप जो पूर्ण विजयी
तया घाली माळा अचुक निजबाळा गुणमयी
परी आहे माझा कठिण पण घोरांदर असा
चुके तो घालावा उचलुनि कढैमाजि सहसा' ५०८

'टळेना या शब्दा करिन जगिं हे साच करणी
प्रभू अग्नी, वायो सुर शशि रवी साक्ष धरणी'
असा केला रायें परमभयदाता पण पहा
परीसौनी पृथ्वीपति दचकले कर्कश महा ५०९

मनीं होतें त्यांचे फुकट पण भेदा म्हणल हा
कढै घालायाचा हृदयिं नव्हता लेश लव हा

अजासर्पन्यायें कुरु दचकले जे म्हणियरे
अधो वक्त्रें, चित्रें लिहित बसले श्वास न धरे ५१०

शार्दूलविक्रीडित

रारायंत्र कराळ काळ कढई
विक्राळ देखूनियां
कैंचे लग्नविचार फार चुकलों
आधींचि येऊनियां
भ्याले ते नृप कांपती थरथरा
मृत्यूसि लेखौनियां
कैंचा नेम नरेंद्र घालिल कढे
हा सर्व नेवोनिया ५११

इन्द्रवज्रा

बोलाउनी भूभुज या नृपानें
आरंभिला हा नरयाग यानें
जाला प्रभू याप्रति साह्यबुद्धी
हा सर्वथा नेइल धर्म सिद्धी ५१२

एकाप्रती ते मग राजबाळी
प्रत्यक्ष भासे मग[1] राजकाळी
दारा नव्हे प्राणयुगान्त माया
अग्नी वितो काय जगांत जाया ५१३

१ अ. महदन्तकाळी.

भुजंगप्रयात

नव्हे यंत्रवेळू इचा सव्यपाणी
उभारूनि आहे उभी ही भवानी
नव्हे मच्छपाणी महायंत्र[1] वाहे
कढै तापली तें इचें तोंड आहे ५१४

सहस्रार्जुनें मारिली राममाया
पुन्हा जन्मली क्षत्रियांतें वधाया
कशी शांत जाली वधू बाळजाया
नव्हे नेणती मांडिलेसें उपाया ५१५

शार्दूलविक्रीडित

कैचें सैंवर घातपात चुकती
जातांचि येथौनिया
तोही निर्फळ लाग यादव उभे
घेतील घेरौनिया
राहो वीर्य विवेकहीन नृपती
ते काय लेखोनिया
पांचाळेंद्र पुन्हा वदे क्षितिपती
ते स्तब्ध देखोनिया ५१६

१ अह. चक्र.

भुजंगप्रयात

उभा प्रार्थितो हात जोडूनि दोन्ही
म्हणे राय तो, ' कां न बोलाचि कोणी
सगोत्रापती आजि येथें असूनी
वृत्तीशून्य जालेति कां सर्व मौनी ' ५१७

शार्दूलविक्रीडित

' गेले गर्व गळोनि सर्व तुमचे
कीं गर्व थोरावले
कीं हा न्हस्व नये मनासि पण कीं
धाकें दरारावले
किंवा हारपलेति विक्रम मही-
तें धुंडितां आपुले
नेदा उत्तर सर्वधोमुख तुम्ही
वाग्बंद कां राहिले ' ५१८

ऐसा द्रौपद-शब्दबाण हृदयीं
भूपाउरीं आदळे
तेणें वीर्यनिधी सभे डहुळला
काशेश्वराचे बळें
ज्ञाता पुण्यपवित्र तो नृप जगीं
प्रौढी प्रतापाथिला

नामें मंडित रावपाख्य समयीं
बुद्धीबळें बोलिला ५१९

' श्रीपांचाळ धरापती नृपवरा
भाग्योनिधी नागरा
सत्कीर्ती तुमची जगीं उजळली
त्रैलोक्य आलें घरा
राया आजि तुम्हां नरेंद्र-समुहीं
इंद्रत्व आलें असे
बुध्दीचा परि हो हरास हृदयीं
अत्यंत जाला दिसे' ५२०

इन्द्रवज्रा

' शब्दें चि तुम्हीं नृप न्यून केले
ते काय शक्तीगत सर्व जाले
दाऊं तुम्हां विक्रम आजि भारी
द्वंद्वें हरूं नोवरि कोण वारी' ५२१

' ख्याती क्षणीं लाउं रणीं तुम्हां ही
आम्हांसि हें संकट येथ नाहीं
येते परी भीड यदूविराची
स्वांगें करी जो स्थित सैंवराची' ५२२

स्वागता

‘ हा पुराणपुरुषोत्तम आहे
वर्णिती निगम ज्याप्रति पाहे
मांडिलें चरित कांहिं कळेना
एऱ्हवीं पण नितीसि मिळेना ’ ५२३

भुजंगप्रयात

‘ जगीं सैंवरें काय जालींचि नाहीं
पुराणांतरीं ठाउकीं ते तुम्हांही
युगें तीन जालीं असें एक होणें
कढे घातले भूपती कोण कोणें ’ ५२४

शार्दूलविक्रीडित

‘ पूर्वीं श्रीचतुराननें पण जगीं
कन्येविशीं सारिला
जो पृथ्वीसि प्रदाक्षिणा करिल मद्-
बाळा वरी त्याजला
केला तो पण गौतमें सुरपती
हारोनि कां बैसला
घाला यासि कढे असें निजमुखें
नाहीं विधी बोलिला ’ ५२५

'त्यानंते जनकें पणा उजविलें
सीतेचिया सैंवरीं
जो कोदंड सजौनि दंडिल सभे
श्रीजानकी त्या वरी
तेथें रावण भंगला चढवितां
चापें तळा आणिला
घाला यासि कढे असें निजमुखें
नाहीं पिता बोलिला ५२६

भुजंगप्रयात

'असीं सैंवरें फार केलीं नृपांनीं
परी कर्णिलें चंड हे चोज कानीं
धरास्वर्गपाताल यामाजिं पाहे
नसे वर्तलें हें अलौकीक आहे' ५२७

'अधोदृष्टि व्हावें वरी लक्ष द्यावें
तिन्ही चूकतां बाण मृत्या मिळावें
दिल्हेसें शिवें त्या सुखाही मुकावें
असें नोवरीचें जगीं काय घ्यावें!' ५२८

'वरांतप्रयाणी महामारगामी
निसंतान जाया मरीची असामी
करा राज्य जा तूमची आण तुम्ही
शिवाच्यान हो जोडिले हात आम्हीं' ५२९

असा राव तो जाण काशीपुरीचा
चतुर् बोलिला भाव सर्वांतरींचा
सभे शब्द झाला पणें द्रौपदीचा
जगीं व्यर्थला व्यर्थला नेम याचा ५३०

असें कर्णितां जल्प कल्पप्रयाचा
सभेमाजिं हो लोटला द्रौपदाचा
'कटा रे कटा क्षत्रवी धर्म काचा
जळो रे जळो गर्व हा वैभवाचा' ५३१

'तुम्हीं कांबिटें व्यर्थ वोझीं वहातां
नराकार देही परी वृत्ति कांता
वृथा साभिमानें जगीं मस्त मातां
वृथा कष्टवील्या तुम्हीं स्वस्थ माता' ५३२

'बुडालेति रे सर्वही धाक-डोहीं
अहंता मनीं ना धरी एक तोही
पणोच्चारिला स्यां तुम्हां क्षत्रियांचा
नव्हे हा तरी काय धर्म द्विजांचा' ५३३

'परी शब्द नाहीं तुम्हां सत्य वाचा
जगीं अर्जुना संपल्या क्षेत्रि कैंचा
विना येक तो पार्थ पृथ्वीपतींचा
दिसे आजि रे भार अत्यंत साचा' ५३४

अच्युत

‘ भूपधैर्य सुरालयिं लोटला
विक्रमोदधि रे जगिं आटला
वीर्यवेग वितंड विलंबिला
क्षात्रधर्म जगांत विटंबला ’ ५३५

स्वागता

‘ भू नराविण धराधिप नारी
संपल्या कठिण कोण निवारी
अर्जुना रहित रे नृप गाई
गांजिल्या पण-सिंहें बहु काई ’ ५३६

‘ व्याघ्रराज निज कानन त्यागी
व्याध रे वनचरां मग गांजी
संपल्या जगिं धनंजय राया
कोण लाज रजकाज कराया ’ ५३७

द्रुतविलम्बित

‘ निजभवें विभवें जगिं राजतो
चतुर पंडित सुंदर साजतो
रज जयांत नसे रजही भरी
रजक तो त्यजि जन्म वृथा भरी ’ ५३८

स्वागता

‘ अस्तला नृपकुळीं रविराणा
सोमवंश दिसतो किलवाणा ’
बोलतां कठिणसें नगरेशा
लागलें वचन कौरवधीशा ५३९

द्रुतविलम्बित

‘ निजबळें स्वकुळें जग नीचवी
अदट मी भरवाटिव उंचवी
समयिं जो करणी न करी बरी
रजक तो त्यजि जन्म वृथा भरी ’ ५४०

क्षोभला कुरुमहाजळराशी
बोलिला मग कसें द्रुपदासी
हात जोडुनि पदोपादिं कासी
दास सादर म्हणे चतुरांसी ५४१

*॥ इति श्री द्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग आठवा ॥*

# सर्ग ९ वा

श्रीकृष्णाय नमः

वसंततिलका

छत्रातळीं निजदळीं कुरुराज कैसा
होता विराजत सभे अमरेंद्र जैसा
जालें चुरा हृदय त्या पुरिनाथ बोले
कोपायला गहन पर्वत गर्व डोले ५४२

इन्द्रवज्रा

'रे द्रौपदा दक्षिणदेशपाळा
जाली कशी आजि तुलाचि बाळा
त्वां निंदिले सर्व नरेंद्रसृष्टी
कोणी तुझे भूप नयेचि दृष्टी' ५४३

'आलें तुला आजि महत्त्व भारी
तूं सांडिसी यास्तव शुद्ध सारी
म्यां दंडिलें भूभुज भूतळींचे
भीती मला राय रसातळींचे' ५४४

स्वागता

‘ आजि मी जगपती कुरुराणा
घातले अदट अंगणिं जाणा
सोमराज करितो रवि साना
तूं किमर्थ म्हणसी किलवाणा ’ ५४५

‘ वंदितातिं मज छत्रधरादी
वर्णितातिं यश कीर्ति सुरादी
वैभवें उगवतो शशि राणा
तूं किमर्थ म्हणसी किलवाणा ’ ५४६

‘ नांदतातिं गजरें कुरुराजे
दर्प दिग्गज उरावरि गाजे
मिर्वतो नभिं विधू जळवाणा
तूं किमर्थ म्हणसी किलवाणा ’ ५४७

‘ फाकली कुमुदवंश विभारें
डोलिले बुध कुळीं नृप सारे
नीच आजि करितो शशिभाना
तूं किमर्थ म्हणसी किलवाणा ’ ५४८

शार्दूलविक्रीडित

‘ वार्ता कीतिक विक्रमें हरुनिया
नेणे मला सुंदरा

नेऊं या भुवनत्रयासि शकतों
बांधोनि मोळी घरा
द्रोणाद्री हनुमंत पुच्छमथनीं
वाग्बंध जाला जसा
राया मंडप हा तुझा मज नये
नेतां न बोले तसा' ५४९

'पूर्वीं शंकर वाहनें त्रिभुवनीं
केला स्वकीर्ती ठसा
स्वासें ओढुनिया विहंगम पती
नेला स्वधामा जसा
आला अब्धि उगाचि रे पसरितां-
गस्तिासि पाणी पसा
राया मंडप हा तुझा मज नये
नेतां न बोले तसा' ५५०

'नाहीं संकट दे शरद्वय मला
पाहे शरीं पंचमीं
देतों लक्ष बळें करोनि तुजला
एकाक्ष हा मच्छ मी'
ऐसा[१] माजि सभेसि वेष्टित उभा
ठेलाचि भद्रासनीं[१]

१ ह. ऐसें बोलत माजि वेष्टित

मेरुमान-समान-गर्व जगतीं
तो भूप वाहे मनीं ५५१

इन्द्रवज्रा

त्रेतायुगीं एक निशाचरेंद्रू
हा दूसरा द्वापरिं कौरवेंद्रू
तीजा जगीं यासम गर्वगर्भू
भूपाळ भूतो न भविष्यती भू ५५२

शिखरिणी

असो भूपांमध्यें उदित बळसिंधू नृप उभा
निरक्षौनी जाले चकित रजराजे सह सभा
पुरस्वामी पद्मापतिसि कर-जोडी करितसे
प्रभू बोले 'द्या हो जरि कुरुपती याचित असे' ५५३

तदा पांचाळेंद्रें शर मग दिले पंचम पहा
महाराजा-पाणीं धनुषिं वसवी हर्षित महा
निघाला वेगेंसी दशगजसहस्रोन्मत बळी
खटाटोपें चाले गवसित सपर्ष्टीं गुणफळी ५५४

मंदाक्रान्ता

रारा यंत्रासमिप मग तो राव गांधार आला
त्रैलोक्याचा प्रकट समुहो देखता त्यासि जाला

नाना भाषा नवल करिती ' धन्य हा वीर्यराशी
चित्तीं याचे रतिभय नसे भीडला काळफाशीं ' ५५५

भुजंगप्रयात

' भला रे भला सोमवंशी प्रतापी '
तदा त्या नृपें लाविला बाण चापीं
असें आगळें चंड देखोनि त्याचें
मनोच्चाटलें आसनीं अच्युताचें ५५६

इन्द्रवंशा

सांडौनि भद्रासन देव आइका
ल्याला पदीं रत्नजडीत पादुका
हातीं समर्थें भवदंड अर्जिला
यंत्राकडे यादवराव चालिला ५५७

पृष्टीं प्रतापी कुकुर प्रदाटले
दुर्योधनातें यदुराज पातले
' रे कौरवेंद्रा द्दगमंदनंदना
आलासि तूं आपण लक्ष-भेदना ' ५५८

' आहेति पाणीं शर पंच तूजिया
आधीक म्यां एक दिला त्यजीं भया
सा बाणही तूं जरि चूकसी यथा
तैं मी कढै घालिन तूज सर्वथा ' ५५९

भुजंगप्रयात

म्हणे यादवांसीं ' तुम्ही काय पाहा
कढे भोवताले उभे शीघ्र राहा
पिटा वीर याचे करा येकला हा
चुके बाण सा तैं कढे यासि दाहा ' ५६०

असो लोटिले लोक तेही परावे
कढे भोंवतीं कृष्णसेना पऱ्हावे
कुरूराज देखे न कोणी स्वपक्षी
मनीं शंकला तो वरी यंत्र लक्षी ५६१

तदा तें नभीं टेकलें काळ कैसें
भ्रमे मच्छ त्या पालवीं चक्र जैसें
नये लक्षितां एक तोही पिसारा
कळे नेत्र कैसा महायंत्र-रारा ५६२

स्रग्विणी-रारायंत्रबंध

लाघवें भूभुजू यंत्र भू वेंधला
लाग डायानितां तखुंनी डागला
लाळ भाळी वधू तो मुळीं भाळला
लाळ पोटीं वसे सेवटीं पोळला ५६३

शार्दूलविक्रीडित

लक्षी लागविलाग मच्छ लव त्या
डाया नये सर्वथा

पाहे खालिं तदा विशाळ कढई
ते लाल जाली यथा
भांबाळे उकळे भयानक दिसे
काळप्रभा भाळसी
भोंवे धूम्रकलोळ लोळ वरि जो
तो आदळे तोंडसी ५६४

तेणें तो दचके चके अवचके
कालाचके वोचके
झोके आणि झके जके हपचके
मागें सरे संचके
लज्जा वाटतसे नसेति सरिसे
कोणीचि रक्षीतसे
वीर्यें धैर्य धरोनि मीन मग तो
ध्यानींचि लक्षीतसे ५६५

शिखरिणी

अधोदृष्टी मुष्टी वर धरुनिया बाण सजिला
भरौनी कानाडी सुभट करि संधान वहिला
वृथा गेला यंत्रासहित शर तो मीन चुकला
कसा साधे मासा समिप कळसूत्री विमुखला ५६६
पुन्हा तेणें चापीं सजुनि त्यजिला बाण दुसरा
वृथा[1] गेला तोही मग सजियला बाण तिसरा

१. अह. न साधेची जाला अफळ तिसराही शर बरा
द्रौ. स्व. १२

जिवाही ना भीना सजित उठला बाण चवथा
सभेमध्यें तेव्हां बहु दचकला कौरव-जथा ५६७

वसंततिलका

तैसाचि शस्त्र करि खेटक कर्ण वाहे
धांवे प्रवेश करि त्या कुकुरांत पाहे
हातीं धरौनि मग कौरवराज त्यानें
निर्भर्त्सिला परम शब्द कठोर बाणें ५६८

भुजंगप्रयात

म्हणे कर्ण ' रे भूभुजा भूललासी
कुबुद्धीचि काळें कसा वेढिलासी
दिसेना कढेमाजिं रे मीन-साई
तरी विंधिसी बाण देखोनि काई ' ५६९

' चुकौनी शरीं जाइजे सर्व यंत्रा
कसें भेदिलें जाय त्या वामनेत्रा
सगर्वे स्वतां मूर्ख जालासि कैसा
पतंग प्रदीप्तीं पडे अंध जैसा ' ५७०

' उभा कृष्ण हा कोण आसे कळेना
कदा धर्मदुःखा हरी वीसरेना

सहस्त्रां शरीं तूज हें साधवेना
कढै घालितां वेळ[1] येथें असेना ’ ५७१

‘ मघा बोलिलें काय काशी-पतीनें
कळेना चरित् मांडिलें श्रीपतीनें
नृपीं जोडिले हात या नेमराया
कसा तूंचि आलासि मानें मराया ’ ५७२

म्हणौनी हरी हातिंच्या चापबाणा
बळें लोटिता होय त्या कर्ण जाणा
तदा यादवीं घातले हात त्यासी
‘ कसा बाण विंधूनि तूं जीत जासी ’ ५७३

शिखरिणी

तदा आले त्याचे सुहृदजन धाऊनि धरती
न सोडीती त्यासी कुकुर कुरु वोढीत असती
सभेमध्यें राजे परम हरुषें हास्य करिती
कशी माळाद्यापी नवारि न यया घालि म्हणती ५७४

तदा वाहे पाणी धनु कणकदानी दृढ पहा
म्हणे ‘ लक्ष्मीकांता अनित करिती यादव महा
तुम्ही सांगा यांसी नृप न चुकतां सा शर पर्णी
बळें वोढीवोढी कुकुर करिती काय म्हणुनी ’ ५७५

१ हअ. वेळ तेही टळेना.

स्वागता

'तीन बाण उरले पण-काजीं
एक बाण तुमचा तुम्हि घ्या जी
दों शरींचि पण-लोचन संज्ञा
भेदितों मज दिजे तुम्हि आज्ञा' ५७६

दासकर्ण नसता प्रभु जेव्हां
हा कढैंत पडता नृप तेव्हां
भास्करीं वचन बोलत ऐसें
देतसे यदुवरोत्तर कैसें ५७७

शिखरिणी

म्हणे 'भो कर्णा तूं अचुक धनुवाडा परमगा
परी या नेमाची स्थित तुज कळेना अस उगा
तुला जालें वाचो कुरुपति कढैपासुनि भला
तरी म्यां गांधारी-तनुज दिधला दान तुजला' ५७८

भुजंगप्रयात

असें बोलितां वाक्य देवांनि पाही
त्वरें भूप तो सोडिला यादवांहीं
मुखीं काळिमा बैसली वीर्य गेलें
कळाहीन जाला कुळा दैन्य आलें ५७९

रमानायका नावरे पूर्ण भर्तें
म्हणे ' कौरवा हें जिणें काय सतें
वृथा वांचसी प्राण दे पापरूपा
खरा दीर्घ-दोषाचरा कर्मकूपा ' ५८०

' कुळांगारका घातका पापराशी
जगा दाविसी तोंड लाजेसिनासी
अरे पांडवांसारिख्या बांधवांसी
स्वहस्तें कसा दग्धुनी बैसलासी ' ५८१

उपजाति (अच्युत + यूथिका)

' आजि फाल्गुन रे असता जरी
भेदिता पण हा सहसा तरी
उच्च तूंचि जगतीं दिसतासि कीं
भोगितासि पदवी यशकीर्ति की ' ५८२

मालिनी

न धरत वचनैसें केशवें बोलियेलें
त्वरित मग कुरेशें यान तेथौनि केलें
बसुनि दळिं विचारी ' आजि हे राजबाळा
वरचि वरिल कैसी कोण घेईल माळा ' ५८३

इन्द्रवज्रा

' गांजीन गोत्रापति सर्व बाणीं
दंडीन राजा कृतज्याप्रदानी

मारीन हा वैरि रथांगपाणी
पर्णीन हे आजि अपर्ण राणी ' ५८४

भुजंगप्रयात

असा राव गांधार जल्पौनिश्यानी
मनीं कल्पितो कल्प कोपायमानी
असो द्वंद्व निर्धारिलें पूर्ण तेणें
पुढें काय जालें कथे चित्त देणें ५८५

शार्दूलविक्रीडित

भद्रीं भानु विराजमान् यदुपती
भागद्वयें भूपती
जाले भाट जिभाट वेदमहिमा
आचाट वाखाणिती
वाद्यें गंभिर वाजती रुणझुणा
वीणे झणत्कारिती
होती किन्नरगायनें नटकळा
नृत्यांगना नाचती ५८६

नाना गंध सुगंधराज तबकें
लक्षांत नाहीं मिती
पाणी मंडितउत्तमार्चन सभे
चक्रोपमा वर्तती

पुष्पाचे बरवे सभेप्रातिसभे
केले महा मोघवे
वायू घेउनि तो सुवास विचरे
त्रैलोक्यनासा शिवे ५८७

नाना नोपम मंडपीं मृदुपणें
मांगल्यशोभा क्रमे
जाले तल्लिन लोकपाळ अवनीं
वैकुंठ आलें गमे
आसाधारण मांडिला द्रुपदजा–
देवी-सती-सोहळा
काशी श्रीपतिदास रास वदती
वर्णीतसे मोकळा ५८८

॥ इति श्रीद्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग नववा ॥

# सर्ग १० वा

श्रीगणाधिपाय नमः

शार्दूलविक्रीडित

सस्मेरानन पद्मलोचन
    घनश्याम प्रभू सावळा
माळा कीरिट कुंडलें
    पदक त्या पीतांबरीं मेखळा
तो पैं निर्गुण ब्रह्म भव्य
    फुलला वोपी दिगंता कळा
लीलालाघवि कृष्ण धर्मचरितें
    खेळे महीं मोकळा ५८९

इन्द्रवंशा

भद्रासनीं तो उपविष्ट हो हरी
आहे उभा द्रौपद जोडिले करीं
चिंता करी भूप विशेष अंतरीं
भेदील आतां पण कोण केसरी ५९०

भुजंगप्रयात

कुरूवर्धनासारिखीया वरिष्ठा
अबाधीत आली पणीं अप्रतिष्ठा
असो कोण आतां धरी धैर्य वक्षीं
करीं चाप वाहे महायंत्र-लक्षी ५९१

इन्द्रवंशा

क्षोणींद्र आतां क्षणएक पाहती
मिथ्या प्रतिज्ञा मग निंद्य बोलती
जाती अभेदोनि उठोनि सर्वही
हें दैन्य आले मज थोर ये मही ५९२

स्रग्धरा

चिंतेसी भूप भारी करित विण हरी
कोण आदानवारी
सर्वात्मा दानवारी दुरित दुर करी
दुःख द्वंद्वें निवारी
दुष्टांचे दर्प हारी खळपिळ उजरी
भक्त-आर्धा प्रहारी
बोले तो श्रीमुरारी ‘ पुरपति न करी
खेद तूं धैर्यधारी ’ ५९३

शिखरिणी

‘ पणार्थी भूपाचे समुळ जरि सद्वीर्य समलें
तरी राया येथें त्रिभुवनं असे आजि मिनलें
असो कोणी कैसा करु शफीर-दृक्भेद विजयी
तया देऊं बाळा जळरुहदळाक्षी गुणमयी ’ ५९४

भुजंगप्रयात

‘ त्यजी व्यर्थ चिंता पुसे सावधोनी
सभे सर्वथा यंत्र भेदील कोणी ’
अशी अच्युताची यशोदार वाणी
टळेना कदा जे पदा वज्रवाणी ५९५

शार्दूलविक्रीडित

तद्वाक्यें नृप तोषला हरुषला
अत्यंत संतोषला
स्वानंदें फुगला तटस्थ उगला
योजूं मनीं लागला
जो देवें पण साक्षपें करविला
तो कां फळेना मला
मी आहें मतिमंद अंध हृदयीं
चिंता करीं आपुला ५९६

पद्माकांत-पदांबुजें पुरपती
वंदूनियां चालिला
चत्वारांगणिं शीघ्र येउनि उभा
मध्यस्थळीं राहिला
त्रैभागीं रचना अपूर्व गगना
स्पर्शीति वर्णीजना
त्यामध्यें विविधा खणोखणिं सभा
जाल्यासती पावना ५९७

भुजंगप्रयात

सभा निर्जरांची सभा किन्नरांची
सभा यक्षगंधर्व चक्षुश्रव्यांची
सभा दैत्य-रक्षो-गणा-दानवांची
सभा सिद्ध-साधू-मुनी-मानवांची ५९८

शार्दूलविक्रीडित

प्रातीज्ञा पण सारिला नृपवरें
सर्वांप्रती आइका
कोणीही परि वीर्य उत्तर न दे
पुष्पावतीनायका
देखे द्रौपद मंडपांत अवघे
त्रैलोक्य चित्रोपमा
कैसा होइल यंत्रविंधन विधी
सत्कीर्ति लाभोद्यमा ५९९

भूपांचीं मग अर्बुदान्त कटकें
होतीं उभीं बाहिरी
तेथें प्रेरुनि दूत राव समयीं
संकेत सर्वां करी
त्यासर्वी कर जोडिले वधुकडे
'ते आमुची माउली
पर्णावी नृपजा नृपींचि इतरां
गंगा प्रगंगाथिली' ६००

हे वाणी परिसौनि भूभुज मनीं
चिंता करी आदरें
आतां कोण करील साच पण हा
हें दैन्य आलें खरें
आहे विप्र-सभाचि एक उरली
शास्त्रज्ञ ते बापुडे
कैसा नेम करूं तयांत नृपती
हे हांसती रोकडे ६०१

शिखरिणी

कसा जाऊं तेथें सकळ म्हणती भूप भुलला
न जातां मद्भेदें दनुजरिपु दंडील मजला
असो हो कैसेंही वचन हरिचें सत्य करणें
मला ब्रह्मीं नाहीं विहितमपि लौकीक धरणें ६०२

स्वागता

याचिया न करिती वचनासी
लौकिकासि धरिती जिवनासी
धर्म त्या फळद होइल कैसा
मूर्ख मी धरितसें मनिं संसा ६०३

द्रुतविलम्बित

उचित हेंचि गमे सहसा मला
द्विज-सभे मग भूभुज चालिला
नृपवरागमनें सगळे स्वयं
हरुषले द्विजराज अतीशयं ६०४

स्रग्विणी

धन्य रे भूप हा पुण्यकीर्ती भला
दक्षणा द्यावया स्वयें हा पातला
मंत्र उच्चारिती एक ते आदरें
एक होती पुढें घेउनी लेकरें ६०५

कलिन्दनन्दिनी

‘ धिरे धिरे द्विजोत्तमा बसा बसा धरा क्षमा ’
नगस्वरूपिणी मुखें वदे नरेन्द्र वाणि मा
म्हणौनि मध्य पातला उभा पुरेन्द्र राहिला
समस्त देखती भला सभा विलोकुं लागला ६०६

इन्द्रवज्रा

भूमंडळींचे द्विजमात्र जेथें
होते मिळाले मुनिमान तेथें
ऐसे स्थळीं द्रौपद दानपाणी
आहे उभा नेम वदेति वाणी ६०७

तोटक

'परिसा परिसा द्विज हो परिसा
करितों पण मी तुम्हि सावधसा
भ्रमतो शफरी नभिं चक्र जसा
उडवा द्रुग तो तिं शरांसरिसा' ६०८

'धनु वाउनिया गुण सज्ज करा
तळिं पाहुनिया वरि लक्ष धरा
करिल स्थिति जो पणभेद बरा
मिरवेल सभे नर तो नवरा' ६०९

'परि विंधुनि बाण तिन्हीं चुकला
जगिं तो द्विजराज जिवा मुकला
कढईंत तया उचलौनि पहा
गण घालिति हा पण घोर महा' ६१०

शार्दूलविक्रीडित

'त्राहे त्राहि अनर्थ' विप्र म्हणती
'श्रीरामसीतापती

क्षेत्रीं धर्म विसर्जिले द्विजवरां
घालूं कढे बोलती
स्वप्नींही शरकार्मुका स्परसलों
नाहीं नरेंद्रा कधीं
आम्हां हा पण बोलणें उचित हें
नाहीं जगत्रामधीं' ६११

'आलों वांछित दक्षिणा विधिवरा
दारिद्र्य आम्हां त्यजो
नेदा अर्थ तरी अनर्थ वरणें
जा कां म्हणाना द्विजो'
या बोला नृप बोलिला
'माहितळी निर्वीर जाली दिसे'
हे वाणी परिसौनि अर्जुन मनीं
आवेश भावीतसे ६१२

स्वागता

धर्म भीम नकुळा सहदेवो
पांचवा अमर-वारण-चेवो
पंडुराज सुत पंचम होते
बैसले द्विजसभेप्रति हो ते ६१३
लागले वचन फाल्गुनराया
जाहली स्फुरणमंडित काया

विप्र वेश तरि माविक आहे
क्षात्रधर्म उगलाचि न राहे ६१४

इन्द्रवज्रा

धर्माप्रती जोडुनि हात बोले
'जी जी नृपें या नर निंद्य केले
निर्वीर भूमंडळ बोलताहे
हा शब्द आम्हांप्रति केंवि साहे' ६१५

'आज्ञा दिजे साह्य समर्थ आहे
भेदीन हें यंत्र मला न साहे
आनंदला धर्म म्हणे सुबंधू
दे द्रौपदा मच्छ करोनि अंधू' ६१६

तोटक

'लटिका पडिला नृप हा दिठि रे
करि साच पणा उठि बा उठि रे'
वचनेंचि तया किरिटी उठिला
पद वंदुनि शब्द शिरीं धरिला ६१७

द्रुपदाप्रति येउनि शीघ्र पहा
वदला पण मी पण भेदिन हा
भणतांचि असें सकळीक सभे
द्विज हांसिनले सभले सभले ६१८

भुजंगप्रयात

म्हणे ' सत्य हो सत्य संदेह नाहीं
जगीं यंत्रवैरी नुरे आजि कांहीं
गुरूनें तुम्हां ताडिलें काय देवा
उदेला कसा तूमचा कर्मठेवा ' ६१९

असो द्रौपदालागिं आनंद जाला
घरौनी करीं श्रीपतीपासिं नेला
म्हणे ' जी प्रभो विप्र भेदी पणाला '
तदा अर्जुनें मूर्धनी नम्र केला ६२०

मालिनी—अष्टदळकमलबंध

' जयजय दनुजारी देवदेवा मुरारी
तुजविण भवगारीं कोण दासासि तारी
निशिदिनिं बतमारी पावलों दंडभारी
शरण शरण सौरी दैन्य माझें निवारी ' ६२१

भुजंगप्रयात

वदे देव ' विप्रोत्तमा वीर्यवंता
महालक्ष भेदी त्यजी सर्व चिंता
वरी वन्हिजा उद्धरी तात माता
जगत्रांत तूं नोवराहोय आतां ' ६२२

असें बोलतांल्हाद पार्थासि जाला
पदांभोज वंदोनि वेगें निघाला
त्वरें ठाकिली यंत्रउर्वी तयानें
टणत्कारिलें चाप वंदोनिशाने ६२३

इन्द्रवज्रा

घेऊनिया दर्भशिखा समेकी
गंधर्व मंत्रोक्त कढैंत टाकी
जालें महाशीतळ तैल कैसें
स्वस्थ स्थिर स्तब्ध तडाग जैसें ६२४

होवोनियां दर्पण सर्व दावी
कृष्णापती कार्मुकिं बाण लावी
सज्ञोनि पाणी शर वज्रठाणीं
दृष्टीसि मच्छप्रतिबिंब आणी ६२५

स्रग्विणी—धनुर्बाणबंध

भासतां स्नेहगर्भांतरी मीनभा
भार्गवी ठाण मांडूनि राहे उभा
भानुसी वीर्यभा तेज वोपी नभा
भाट झाली सभा धन्य शौर्यप्रभा ६२६

आजानुबाहो द्विजराज हा हो
पार्थाचि ऐसा दिसतो पहा हो

होईल हा दंडुनि नेम नाहो
आला सभे मीन-मयंक-राहो ६२७

शार्दूलविक्रीडित

ठाणीं भार्गव उग्रमान् दिनमणी
काळप्रकोपी यथा
मेरूधैर्य सुवीर्यवान् जळनिधी
रुद्रस्वरूपी यथा
सत्सौंदर्य विराजमान् द्विजपती
जिंको शके मन्मथा
केले नीच नरेंद्र विप्र विजयी
होईल हा सर्वथा ६२८

इन्द्रवंशा

तो फाल्गुनें मच्छ कढैंत लक्षिला
आकर्ण वोढी वरि बाण विंधिला
वामाक्ष बाणें प्रथमेंचि भेदिला
मंडीत मासा गगनीं विसंचला ६२९

भुजंगप्रयात

पुनर्मंडपीं पाडिला मच्छ बाणें
चमत्कार तो देखिला लौकिकानें

सभे हाक जाली द्विजें साधिला रे
पणाचा पती भेदिला भेदिला रे ६३०

मालिनी

प्रलय गजर केला वाद्यवाद्यांतुरांहीं
किरिटि वरि फुलांची वृष्टि केली सुरांहीं
उदित मग गयंदी लोटुनी राजबाळा
रवि-सुत-रिपुकंठीं घालिते सूत्रमाळा ६३१

भुजंगप्रयात

वरी घेतला नोवरा विक्रमाद्री
न बैसे उभा राहिला स्कंधभद्रीं
सभालोकितां जाहला रुद्रकोपी
तदा देखिला कौरव द्रोहरूपी ६३२

महानष्ट चांडाळ जे काळयाती
कुकर्में कुळध्वंसि विश्वासघाती
मनीं बाणला पूर्ण आवेश डोले
धनुष्यामुखीं बाण देऊनि बोले ६३३

शिखरिणी

म्हणे ' पृथ्वीपाळा पण उजविला दारुण असा
असह्ये कोणासी असल जरि जाला परमसा

तरी या रे बाणीं पुरविन रणीं कोड सहसा '
म्हणोनी कर्णारी नर गरजला माधव जसा ६३४

स्वागता

शब्दबाण गुणघोरम याचा
मंडपांत सुटला विजयाचा
खोंचले सह धराधिप जाणा
क्षोभला परम कौरवराणा ६३५

इन्द्रवंशा

आधींचि द्वंद्वोदर भूप आथिला
त्याहीवरी फाल्गुन द्वंद्व बोलला
दावाग्नि जैसा प्रलयीं धडाडिला
तैसा कुरूराज सभे कडाडिला ६३६

श्येनिका

' काय वीर हो चरीत पाहतां
विप्रवाणि हे अनर्थ साहतां
द्वंद्व कर्णुनी उगेंचि राहतां
कासिया तुम्ही स्वधर्म वाहतां ' ६३७

' जीत विप्र हा रणांगणीं धरा
दंड यासि रे प्रचंड तो करा

घ्या वधू हरा मुखीं मनोहरा
मर्कटामणी सुगंध सूकरा' ६३८

शिखरिणी

'धरा पाडा मारा द्विज अधम हा संगारिं भवा
वदे छेदा जिव्हा करिणि-पुसिं बांधोनि फिरवा
कदापी ये मध्यें द्रुपद कुकुरेशासह रणीं
पिटा त्रासा बाणीं भुइताळिं करा भीमकरणी ६३९

द्रुतविलंबित

डहुळला मग कौरव सागरू
धरकला नरमंडप नागरू
गलबला नट होउनि वर्तला
प्रलयकाळ सभाजनिं वर्तला ६४०

भुजंगप्रयात

निघाले कुरूवीर भारें सभारें
पुढें साउमें पातलें सैन्य सारें
रथी बैसले मंडपद्वार जेथें
असंभाव्य झालें चरित् काय तेथें ६४१

स्वागता

अंगणीं वधुवरें सम पाहीं
वेढिलीं मिरवितां अधमांहीं

यंत्रधारक समग्र पळाले
भोंवते अरि असंख्य मिळाले ६४२

कुंजरीवरि कपिध्वज मेढा
लक्ष लावुनि रिपुस्थळ वेढा
क्षौणि जाण अठरा दळ कैसें
अब्धिचें पसरलें जळ जैसें ६४३

भुजंगप्रयात

असो कौरवीं वेढिला पार्थ ऐसा
तदा मंडपीं वर्तला भाव कैसा
क्षितीचे पती शीघ्र सर्वै निघाले
त्वरें आपुलाले दळीं ते मिळाले ६४४

तुरें दुंदुभी वाजती ते प्रसंगीं
उभे ठाकले ते रिपू[1] अष्टभागीं
चमूचे गरे गोल बांधोनिशाने
उभारूनि ढाला विचित्रें निशाणें ६४५

वसंततिलका

यानंत भूपकुळ बाहिरि सर्व आलें
त्यानंतरीं चरित मंडपिं काय झालें

१ हअ. पुरीं

आकाशमंडळ सुरीं सम सेवियेलें
तेथूनि कौतुक विलोकन मांडियेलें ६४६

ते मंडपीं द्रुपद सैन्यक हो मिळाले
होऊनि यादव रथारुढ सर्व जाले
आवेशमंडित उभे सह शस्त्रपाणी
शौरी पुढें वदति विक्रम घोर वाणी ६४७

स्रग्धरा

‘ जी जी देवा दयाळा
कमळनवदळाक्षीवरा दासपाळा
आज्ञा देई कृपाळा
समरिं कुरुदळा दाखवूं हातमोळा
तोडूं नक्षत्रमाळा
विखरुं रविकळा पाठवूं धाक काळा
दंडूं या ब्रह्मगोळा निवटुं अधमळा
ख्याति लावूं भुगोळा ’ ६४८

स्वागता

‘ विक्रमें सचर सर्वस डाळूं
पालथी भुजबळें भुवि घालूं
बापुडीं कुरुदळें किलवाणी
दंडिजेतिल रणीं क्षणमानीं ’ ६४९

दृष्टदुम्न वदला मग वाणी
आइकें वचन पंकजपाणी
'मातले पतित कौरव पाहीं
वेढिलीं वधुवरें अधमांहीं' ६५०

'द्रौपदी समरिं कष्टल आतां
देखवेल मज जी यदुनाथा
पेटला प्रलय पावक पोटीं
आजि मारिन रिपू कुळकोटीं' ६५१

टाकिला रथ म्हणौनि तयाने
वाहिलें धनुष वासवि ठाणे
बैसला द्रुपदही रथिं पाहीं
धावला मग दयाघन पायीं ६५२
दोघही कवळिले निजबाहीं
बोलिला स्वहित सुंदर कांहीं
'द्रौपदीचि जरि कष्टल राया
मी समर्थ तरि काय पहाया' ६५३
'सर्वथा परि तया भय नाहीं
भक्तराज[1] मम हे द्वय पाहीं
दाटली महितळी कुरुदोषें
क्षोभली मग वधूवरवेषें' ६५४

१ अह. शीवशक्ति

'दीसतो द्विज तुम्हांप्रति कैसा
याचिया न पुरती प्रति घासा
आजि होइल वितंड तमासा
शांत होउनि पहा स्थिर बैसा' ६५५

बोलिला निगम-रंजन ऐसें
भासलें पुरपती प्रति कैसें
विप्रवाटिंत हरी वदताहे
'काय हा द्विज नव्हे नर आहे' ६५६

'ठाणमाण गुणलक्षण याचें
धैर्य वीर्य वय रूप नराचें
भेदिला नृपकुळीं पण भारी'
बोलतो बळविशेष मुरारी ६५७

'पूर्विंही वचन हा वदलाहे
नेमनिर्गम नराविण नोहे
तुष्टला मज दयाघन पाहे
सर्वथा द्विज धनंजय आहे' ६५८

शार्दूलविक्रीडित

स्वानंदें भरला सुखें डवरला
हर्षें महा दाटला

पोटीं प्रेमविला सरास नटला
उल्हास कोंदाटला
क्रोधा अंतरला तमा तरखला
शांतस्थिती लाधला
पुत्रेंसी उगलाचि शांत बसला
पाहूं चरित् लागला ६५९

द्रुतविलंबित

कुकुर वर्जुनिया घनसावळा
मुदित लोकितसे नरसोहळा
प्रथम कौरव पांडव संगरा-
र्णवकथा सुचिते श्रवणादरा ६६०

इन्द्रवंशा

वेढिलार्जुन कौरविं आइका
एक तो दुसरी वधुनायका
कुंजरी चवथी महमंतिका
वेष्टितां अमितीं परिथाटिका ६६१

स्वागता

मांडिलें चरित चंड विलोका
सागरीं तरतसे जशि नौका

यापरी करिसुता सगुणाची
कौरवांत मिरवे विजयाची ६६२

धर्म भीम नकुळो सहदेवो
लक्षिती दुरुनियां रणभावो
कोपरोप मनिं पेरुनि पाहे
संगरा उदित बल्लव आहे ६६३

रामताड तरुराव तरूंचा
लांब खांबचि जसा गगनाचा
घेतला त्यजुनियां द्रुम येरू
स्कंधिं वाहुनि उभा बळि मेरू ६६४

भुजंगप्रयात

असो द्रौपदाचा पणोद्धार झाला
पुढा विग्रहो चंड ठाकोनि आला
अरी लक्ष कोटी रिपू एक पाहे
म्हणे दास काशी अलौकीक आहे ६६५

*॥ इति श्री द्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग दहावा ॥*

# सर्ग ११ वा

## चक्रपाणिये ( ने ) नमः

स्वागता

वारिणीवरि धनंजय आहे
चाप लाउनि कुरूदळ पाहे
चातुरंग चळथा कटकांच्या
देखिला प्रथम थाटि रथांच्या ६६६

राहिलीं गजदळें रथलागें
स्वार तुंबळ तयाहुनि मागें
पायभार सह वेष्टित राहे
सैन्य दुर्ग रचना अशि आहे ६६७

भुजंगप्रयात

असो अर्जुनाभोंवतीं कौरवांहीं
टणत्कारिलीं कार्मुकें चंड पाहीं
गुणीं बाण सज्जोनि जल्पप्रवाहीं
अधच्छेदिती आपुलाले रदांहीं ६६८

‘रथीं मांडुनी वज्रठाणें विशाळें
न राहा किती गर्व ढाळें ढिसाळें
द्विजा सांडि रे सांडि हा मृत्युमोहो
उडी घालिं वेगीं वधू वेगळा हो’ ६६९

तोटक

‘वृति भिक्षुक तूं भिक माग बरी
तुज राजसुताधन केंवि वरी
त्यजि रे[1] त्यजि रे मलिना नवरी
सवतां न रिगे मरणाविवरीं’ ६७०

स्रग्विणी

‘बाण घाईं तिळप्राय आतां रणीं
चूर्ण होसी क्षणीं त्यागि रे वारिणी’
दापिती हाकिती बाण लाऊनियां
वोढिती कार्मुकें हाक देऊनियां ६७१

भुजंगप्रयात

असें देखतां मुख्य दुर्योधनानें
रथ प्रेरिला पापबुद्धी तयानें

१ ठ. मृगराजसुता अर जंबुक तूं
वरिसील कशी सुखदायक तूं

विदारींत सेना तुरी-वृंद धांवे
वरी भानुचक्रोपमा छत्र भोंवे ६७२

पुढां दृष्टि घालौनियां सव्यपाणी
उभारोनि राजा वदे चंड वाणी
'अरेरे झणीं बाण विंधाल कोणी
मदें लागतां हात छेदीन दोन्ही' ६७३

'नव्हे रे वधू हे सुधावेलि आहे
शरप्रेरणीं प्राण सांडील पाहे
प्रयत्नेंचि हा विप्र येथोनि टाळा
प्रयत्नेंचि हे ऊतरा राजबाळा' ६७४

असा बोलिला राव गांधार पाहीं
रणीं राखिले हात सर्वां जनांहीं
पुढें कर्ण होता रथीं चापपाणी
विलौकोनि पार्था वदे काय वाणी ६७५

स्वागता

'आइके वचन रे द्विजदेवा
विग्रहो बहुतसा न करावा
आपुलाचि कुळधर्म धरावा
अन्य धर्म सहसा न करावा' ६७६

‘ काय जाणत हलाहल खावें
आपुलें स्वहित तें वळखावें
ज्यामुळें समुळ निर्मुळ पावे
काय तेंचि मुळिं मूळ पहावें ६७७

क्षोभला कुरुपती–दळसिंधू
कोण तारिल तुला बळि बंधू
काय होसिल निरक्षुनि अंधु
कोण भाज फटकाळ सबंधु ६७८

विप्र तूं नृपसुता तुज जाया
त्याग लाज न धरी द्विजराया
पावसी समर-सागरिं दुःखा
बाण कां सजियला त्यजि मूर्खा ६७९

‘ बैस येउनि रथीं मजपासीं
कोण पाडिल तुला मग फांशीं
अंगिकार करि कर्ण जयाचा
रोम वक्र करि कोण तयाचा ’ ६८०

‘ नायिकेसि जरि हे निजवाणी
तीळतुल्य तरि होशिल बाणीं ’
भास्करी सघन बोलत आहे
आयकौनि मग फाल्गुन पाहे ६८१

शार्दूलविक्रीडित

चापीं देउनि बाण ठाण समयीं
मांडोनियां भार्गवी
मेरूधैर्य विराजमान् करिसुता-
स्कंधीं उभा वासवी
केले सर्व अलक्ष लक्षुनि पुढें
मार्तंडपुत्राप्रती
आरंभीं प्रतिउत्तरें समधुरें
गंभीर धीरागती ६८२

'गा वीरा राधिया महाद्ळपती
तूं बोलिलासी खरें
द्यावी काढुनि अंगिंची परि कशी
छाया नरें नागरें
दीप्ती चाळुनि आपुली जगीं नये
देतां तया भास्करा
तैशी जाण निजांगना कुळवधू
देतां न ये रे नरा' ६८३

'चंद्रीं शीतळता सुमिश्रित कशी
वांचूनि तो दे परा
गोडी गंभिर आमृतोदरिं असे
ते प्राप्त कैशी खरा

देतां येइल आपुली प्रजडता
कैशी महा डोंगरा
तैशी जाण निजांगना कुळवधू
देतां न ये रे नरा ' ६८४

स्वागता

' बोलिलासि गुण-गर्व-गुमानें
क्षोभला दळनिधी म्हणुशाने
क्षोभ रे मृगजळें जरि केला
काय जाइल गिरी बुडवीला ' ६८५

अच्युत

' सिंह घेउनि रे वनिं भातुकें
चालिला सदनाप्रति कौतुकें
धावलीं जरि कोटिक जंबुकें
काय तें फळ पावति रे निकें ' ६८६

स्वागता

' सत्य साह्य मज अच्युत आहे
दीर्घ अंत तुमचा दिसताहे
भासतां मशक रे मज सारे
आज लाविन उभें रणिं वारें ' ६८७

गर्जला म्हणुनि जीमुत ऐसा
देखिला परदळीं मग कैसा
ग्रीष्मकाळिं रवि दुर्धर जैसा
भासला नर धुरंधर तैसा ६८८

पोळले सकळ कौरव राये
बोलिले मग परस्पर काये
'देखतो परिघ हा कटकाचा
केवढा स्थुळ पराक्रम याचा' ६८९

'सर्वथा अधम हा द्विज नोहे
क्षत्रियान्त परपावक आहे'
शाल्व ऐकुनि मनांत जळाला
शीघ्र लोटुनि पुढां रथ आला ६९०

ठाण मांडुनि म्हणे 'रिपु रंका
भिक्षुका नपुंसका व्रति कंका
आगळें वचन मारुनि हाका
बोलसी त्यजुनि दुर्धर धाका' ६९१

'साहि रे शर धुरंधर आला'
विंधितां म्हुण बळें क्रुर जाला
बाण लक्षुनि बळें अवलीळा
पाडिला रणिं दुखंडुनि हेळा ६९२

भुजंगप्रयात

पुन्हा तो शरांकीत कोदंड दंडीं
तदा अर्जुनें भेदिला बाहुदंडीं
गळालें धनू मूर्छनाद्भूत पाहे
रणीं शात्वनामा उलंडोनि राहे ६९३

इन्द्रवंशा

देखोनि त्याची महदंतवेदना
भूरिश्रवा लोटुनि शीघ्र स्यंदना
आला पुढें भीम करीत गर्जना
विंधी बळें लक्षुनि बाण अर्जुना ६९४

स्वागता

अर्जुनें शर निरक्षुनि त्याचे
भेदिले गुणगुती सहजाचे
तो पुन्हा सजुनि कार्मुक लक्षी
बैसला तंव रिपू शर वक्षीं ६९५

भुजंगप्रयात

उरीं लागतां बाण तो वीर्य सोडी
उलंडे रथीं पातकी पायखोडी

वधावें पुढें त्या अमित्रासि पाहे
तदा वीरवर्मा म्हणे ‘ साह साहे ’ ६९६

समाकर्ण संधान केलें तयानें
न येतां वरी भेदिलें अर्जुनानें
रथीं पाडिला जाण तोही कुकर्मा
असें देखतां क्षोभला तो सुशर्मा ६९७

स्वागता

पेटला प्रलय पावक पोटीं
कल्पहाक दिधली मग मोठी
लोटिला धडधडा रथ कैसा
अंबरीं कडकडी घन जैसा ६९८

पंचबाण गुणिं सज्जुनि पाहे
ठाण मांडुनि उभा रणिं राहे
पार्वती-पतिपुढें स्मर जैसा
भासला वधुवरा उजु तैसा ६९९

भुजंगप्रयात

म्हणे ‘ रे द्विजा दीनरंका कळंका
रिपू सांवरी धीट हो सांडि शंका ’
अतीमानसंधान केलें प्रयासें
नरें भेदिलें सर्व तें अप्रयासें ७००

पुन्हा बाण लावी रिपू कार्मुकाला
तदा दासरायें अती वेग केला
इषू प्रेरिला तो अकस्मात आला
ध्वजस्तंभ भेदूनि भाळीं निवाला ७०१

शिखरिणी

मृगन्यायें घायें रहवरिं सुशर्मा उलथला
तदा भारद्वाजात्मजतनुज कोपें कडकला
चिरंजीवत्वांगीं कवच मुकुटीं टोप विलसे
महाकोदंडाची मग गवसणी काढित असे ७०२

स्वागता

लोटिला रथ खगेश्वरवेगें
अर्जुनासमुख येउनि अंगें
सज्जिले शर शितीं नव पाहे
धीर वीर वचनीं वदताहे ७०३

भुजंगप्रयात

'भला रे भला रे भला विप्रवेशा
समर्पंडिता युद्धबुद्धीविशेषा
तुवां आजि संग्राम रे थोर केला
महावीर मेळा विरामासि नेला' ७०४

शिखरिणी

‘ परी आले वज्रप्रहर शर माझे तुजवरी
अमित्रा सांभाळी ’ म्हणुनि नभिं संधान पसरी
अती शक्ती पंक्ती धरुनि गुण येती ग्रहगुणें
सतेजाळाभाळीं जशिं पसरलीं सूर्यकिरणें ७०५

स्वागता

फाल्गुनें शर निरक्षुनि बाणीं
झाडिलें धनुष दुर्धर पाणीं
वज्रबाण गुणिं सज्जुनि सोडी
एकलाचि नवही शर तोडी ७०६

शिखरिणी

सुपर्णें आकाशीं उरग नव जैसे झडपले
तदन्यायें शत्रू शर वरखुनी शासिनइले
अशी पार्थ प्रौढी नयनिं मग देखौनि परिसा
रणीं अश्वत्थामा द्विज खवळला अंतक जसा ७०७

भुजंगप्रयात

शताचीं शतें बाण लक्षौनि घाली
सथाटी शराच्या नभीं दाटि झाली

लघूलाघवी जिष्णु संधान सारी
न येतां अरींचे वरी बाण वारी ७०८

स्वागता

शिष्य एक सुत एक गुरूचा
एक विंधनविधी उभयांचा
दोघही चतुर संगरधर्मी
नाथिला परि यशत्व अधर्मी ७०९

आगळा म्हणुनि अर्जुन पाहे
ज्यासि अच्युत अनूकुळ आहे
वर्षतां गुरुसुता शरधारा
चंड चोज वितलें अवधारा ७१०

वसंततिलका

वेगांत वेग नरनायक साधिताहे
बाणद्वयीं द्विज निरक्षुनि विंधिताहे
एकें शरें अचुक सारथि पाडियेला
एकें रिपू हृदयमंडळिं भेदियेला ७११

मंदाक्रांता

ठाणीं पाणी सजुनि गुणि जो बाण विंधीत होता
तो शत्रूचा इषु अवचिता लागला दुःखदाता

मूर्च्छा आली असुप शरिरीं चांचरीं जात जातां
अश्वत्थामा रणिं पडियला पाहतां काय आतां ७१२

भुजंगप्रयात

दळीं हाक आली द्विजें भेदिला रे
गुरूपुत्र तो साधिला साधिरा रे
कदा नागवे एकला विप्र गाढा
मिळा सर्व झोडोनियां खालिं पाडा ७१३

झडा घातल्या लोटले वीर सारे
रथ प्रेरिती एकमेकां पुढां रे
रणीं वारणीं चंड खिंखाट केले
तुरीं हिंसती गर्जते वीर झाले ७१४

समग्रींचि केला रणीं एकमेळा
अती भीम वाजिन्नला वाद्यमेळा
रजें व्योम धुंदावलें सर्व दावी
रवी गौप्य झाला क्षिती कंप भावी ७१५

तूणक

वाहिनी-समुद्रकोप रुद्ररूप जाहला
लोटला कलोळलोळ भूमिगोळ हालला
भिंडपाळ पाश बाण शूळ चक्र चंडकी
सळमूं गदा परीघ अर्गळा प्रचंड कीं ७१६

वर्षला अपार भार धुंद्भार मातला
वाटलें जगासि आजि कल्पकाळ पातला
आइका कपिध्वजू प्रतापि वीर एकला
वारितो समग्र वेग काय जाय वानिला ७१७

स्वागता

रुद्रवेष मुळिं त्या विजयाचा
कल्पवेळ तरि खेळ तयाचा
गर्जला विविध देखुनि मारा
घालितो शरमुखीं मग सारा ७१८

भुजंगप्रयात

कळेना सजी केधवां बाण सोडी
असंभाव्य वेगी परंजाळ तोडी
गुणांकीत आकर्ण कोदंड दंडी
भ्रमे चक्रसें वामदोर्दंड दंडी ७१९

शराचा वमी चापदंड प्रवाहो
नभीं होतसे शस्त्रजाळ प्रवाहो
बळें भांडती बाण भालीस भाली
पडे अग्न तेणें जळे सैन्य खालीं ७२०

स्वागता

शस्त्रजाळ नभ लोपित होतें
तें नरें उडविलें शरघातें
भेदिलें न भरतां क्षण सारें
पाडिलीं समरिं शस्त्रढिगारें ७२१

हें तरी अघटितोत्तर साहे
मानिती नवल पंडित पाहे
बोलिल्या पडत अंतर येणें
वक्तया उचित उत्तर देणें ७२२

स्वर्गभूतळ तळातळ कोडी
ज्या मनेंचि करतो घडमोडी
तो समर्थ वरदप्रद साहे
काय त्या अघटितोत्तर आहे ७२३

चक्र तेंचि[1] हरिचें करिं होतें
भोंवतें भ्रमित भेदित होतें
बोधले चतुर ऐकुनि ऐसें
वर्तलें चरित यावरि कैसें ७२४

१. ह्अ. तेज

शार्दूलविक्रीडित

ऐसा संगरिं लोटला दळनिधी
पार्थावरी वैभवें
जाला कल्पकराळकाळ समयो
तो देखिला बल्लवें
स्कंधीं वाउनि रामताड बळिया
होता प्रदेशीं उभा
त्याचा क्षोभ-महोदधी डहुळला
काळांत-काळ-प्रभा ७२५

भुजंगप्रयात

सिंहनाद हेळावला शाळपोटीं
दिल्ही हाक तैशीच कल्पांत मोठी
प्रतीशब्द केला नभें भीम गाढा
अती पावल्या क्लेश वाराहदाढा ७२६

शार्दूलविक्रीडित

आरोळी फुटली गिरा उमटली
दिग्मंडळें डोललीं
गर्ता गर्जिनली धरा धरकली
भूमीहि हेलावली

शेषा जाणविली फडी दुडपली
कूर्में मही मानिली
सेना संचरली समूळ खचली
आत्मक्रिया वंचिली ७२७

भुजंगप्रयात

गतप्राण जाले कितीएक पाहो
रणीं लोटला लोटला काळबाहो
विदारीत धांवे विधी-आडवारा
चमू फोडिली पेटला चंडमारा ७२८

स्वागता

पादपें प्रथम पायदळासी
झोडितो भुजबळें बळिरासी
हाणितो प्रथम पाहुनि दाटी
पाडितो कशि रिपूरजथाटी ७२९

वृक्षलाट वसुधातळघाणा
वैरि तीळ रगडी बळिराणा
वाहिनीउडिद भूतळपाटा
वाटितो द्रुम करोनि वरौटा ७३०

अमृतललिता

श्रीवर ज्यावर तोचि वृकोदर युद्धविचार विनाविधि जाणे
चंड रणीं करणी करि येक धरी चरणीं धरणीवरि हाणे
व्योम भरी वरि येक दिगंतरिं सागरि येक धरातळिं घाली
जो रगडी नरडी धरि येक गळे घरडी दरडी मढिं जाली
७३१

भुजंगप्रयात

विभांडी चमू घाव मारी उडानें
मृगामाजिं शार्दूल फोडी ठिकाणें
असो भंगिलें पायभारासि पाहीं
तदा हाकिला भीम अश्वारुढांहीं ७३२

महावीर कोपानळें दग्ध जाले
अकस्मात घ्या घ्या म्हणोनी मिळाले
गदा खेटकें बाण बल्वंड भाले
फिरंगापटें घाव घालीत आले ७३३

द्रुतविलंबित

प्रहर घेतचि बल्लव लोटला
रिपुरजां रगडूं रणिं लागला
उजविला द्रुमराज दळाशिरीं
निजावल्या चळथा चळथावरी ७३४

अमृतललिता

विक्रम तो नवरा मिरवे वधु कीर्ति अरीजन तेचि वऱ्हाडी
आदर भीम करी रुधिरें रस रंगुनि जन्म-जरा-मळ झाडी
भात बुकी घृत लात वरी गुळ गर्जन कोप कढी बहु गाढी
थापपुऱ्या पद पापड तेलवऱ्या मरणें वरणें द्रुम वाढी
७३५

स्वागता

संगरा बहु तुरंगम आले
प्रेत पर्वत रणांगणिं जाले
सर्व ते समर-भूतळ पाहे
मेदमांसमय होउनि राहे ७३६

शुद्धकामदा

रुधिर लागलें मेदिनीं ढळूं
भडकले तुरी लागले पळूं
गजब जाहला चंड ते दळीं
उलथली चमू फूटली फळी ७३७

तोटक

पळतां करि भीम कशी करणी
प्रहरें चळथा निजवी धरणीं

चळती सिहवातवसें हरणी
पळती हयभार तसे धरणी ७३८

भुजंगप्रयात

असो फोडिली थाटि अश्वारुढांची
तदा लोटिली भीम मांदी गजांची
गिरींसे करी ऊर्ध्व वाऊनि सोंडा
महासांखळा शक्तियुक्ता प्रचंडा ७३९

वरी काळरूपी बळी स्वार जाले
त्रिशूळार्गळा घाव घालीत आले
उठावा गजांचा निरक्षूनिश्यानें
बळी क्षोभला भीम कल्पायमानें ७४०

सिहंनाद केला नभीं देव भ्याले
गळाले करी गर्व उत्पात जाले
मिळाला दळीं पादपें हस्ति ताडी
फिरे चक्र जैसें पडे प्राण सांडी ७४१

भवंडी नभीं एकएकेंचि ताडी
चुराडा गजाचा करी मांस काढी
शतें योजनांची नभांमाजि घाली
बळी रे बळी रे दळीं हाक जाली ७४२

फळी फूटली भार सैरां गजांचे
पळों लागले तुंग जैसे घनांचे
असें देखतां कोपला शाल्वनामा
रथ प्रेरुनी हाकिता होय भीमा ७४३

तूणक

दंडुनी धनूवितंड शत्रुचंड गर्जला
ठाणयुक्त बाण जाण अप्रमाण वर्षला
लागतां गदायुधासि कल्पकोप बाणला
सर्व ते तृणापरी करोनि भीम लोटला ७४४

रामताड लांब अभ्र-खांब जेविं मस्तकीं
ताडिला रिपू रणांत मेळवूनि मस्तकीं
पावतां प्रचंड घाव शाल्व शीघ्र स्यंदनीं
वक्र होय आडवा उडोनि जाय मेदिनीं ७४५

मालिनी

रहवरसह घोडे पिष्ट केले तरूनें
चुकवुनि परि पाईं लाग केला कुरूनें
विजुवत चपळूनी भीमसेनासि पाहे
गिंवसुनि कटिशक्ती सर्व तो वेंचिताहे ७४६

भुजंगप्रयात

ढळेना चळेना नगाकार भीमा
रिपूच्या बळाची तदा होय सीमा
अशी धीटता चंड देखोनि त्याची
उरीं ताडिली थाप वज्रप्रयाची ७४७

शिखरिणी

उताणा चक्रत्वें भ्रमुनि पडिला शाल्व समरीं
हताहाता आले बहुत रथिये लोटुनि वरी
तरूपाणी मध्यें मग मिसळला पंडुज यथा
बळें ताडी पाडी हय रथ सह स्वार चळथा ७४८

द्रुतविलंबित

शर-सुटी न मनी वपुवैभवें
सितरिलें बळ तें बळि बल्लवें
प्रहर दुर्धर देतुचि ऊठिला
मग रणीं रथियां पळ सूटला ७४९

भुजंगप्रयात

रिपू विक्रमा चंड देखूनि गाढा
त्वरें टाकिती अर्जुनावर्त वेढा
करौनी गदागोळ सेनासमूहो
निगाला रणीं राव दुर्योधनू हो ७५०

असो मुक्तिला पार्थ शत्रुप्रयासीं
उभा राहिला भीम येऊनि पासीं
पुढां झुंजले कोण कोण प्रतित्वें
मना आणिजे दास काशी मतित्वें ७५१

*॥ इति श्री द्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग अकरावा ॥*

# सर्ग बारावा

श्रीपरेशाय नमः

शिखरिणी

विराजे संग्रामीं करिणिवरि कर्णारि विजयी
सपृष्ठीं वेल्हाळाग्रज तळिं उभा अंतकमयी
अमित्राची सेना शर वरुषते बांधुनि फळी
वमी क्रोधज्वाळा उरगपति बाळावर बळी ७५२

तरूरारापाणी चमुसि यमठाणीं गमतसे
सिहंनादें भीमा मग समरिं सीमा करितसे
मिळाला एकाकी प्रहर उठला देत विगती
रिपू हाणा हाणा म्हणत शर कोटी वरुषती ७५३

न मानी घायातें दळिं भुजबळें वृक्ष उजवी
रणाचे पर्यंकीं बळिं निज शतां सैन्य निजवी
भवंडी आकाशीं द्रुमबळ विकासी शतगुणें
सवें दे आरोळी रण रंवदळी अंतकपणें ७५४

क्षणामध्यें गेला भुवनबळि भेदूनि कटका
चमूमाजीं जाला प्रलय हलकल्लोळ कलका

पयोब्धीचे पोटीं गहनगति मांदार घुसळे
भ्रमे तैसा मध्यें दळ सभवतें दुग्ध उसळे ७५५

भुजंगप्रयात

रथी सारथी वीर लोटौनि आले
बळें विंधिती बाण त्या भोंवताले
इषू लागती त्यास येऊनि पाहीं
न भेदे परी तें वपू वज्र कांहीं ७५६

विशेषें[1] कृपाहस्त जेथें हरीचा
नव्हे सर्वथा रोमही वक्र त्याचा
असें देखतां कल्पकोपायमानें
रथीं ताडिलें चाप दुःशासनानें ७५७

गदा घेउनी चंड वैरी उडाला
रिपू सौह्य रे साह्य शब्दीं मिळाला
सिहंनाद दोघांजणीं शाळ केला
कळीकाळ जैसा रणीं एक जाला ७५८

गदा मस्तकीं ताडिली कौरवानें
बसावी तदा साधिली पांडवानें
तरू भंगला तो पुन्हा घाव मारी
न येतां वरी भीम वेगेंसि वारी ७५९

१ हअ. वसे हो

शार्दूलविक्रीडित

द्वंद्वें देउनि हाकधाक समई
दाऊनि शत्रूप्रती
एकाकी धरिला छळूनि कवळी
वरकोदरें दुर्मती
ऐसें देखुनि कौरवें निजगदा
ढाळोनिया टाकिली
त्या दोघें रणिं मल्लयुद्ध रचना-
संभाव्य आरंभिली ७६०

तूणक

दोघही दहासहस्रनाग ते महाबळी
लोटले रणांत मांडिली प्रचंड रौंदळी
लाविती कळा सरोनि देति वज्रमूसळी
हाणिती सवेंचि मुष्टिघात जीवनस्थळीं ७६१

व्याळसे पिळोनि कल्पकाळसे कडाडिती
वातसे उडोनि वेदजातसे धडाडिती
गर्जती गिरा गभीर मेघसे गडाडिती
थर्थरी वसुंधरा नगोदरें तडाडिती ७६२

शक्र येक वृत्र येक रुद्र येक अंधकू
वाळि येक दुंदुभी कृतांत एक अंतकू

नक्र तो गजेंद्र एक स्वामि येक तारकू
भावसारिखा परंतु धर्म नावतारकू ७६३

वसंततिलका

आरंभिलें परम त्या द्वयद्वंद्वरासा
वेडावलें कटक पाहतसे तमासा
देखे दुरौनि नर बांधव वेढिलासा
तो क्षोभला प्रलयपावक पेटलासा ७६४

स्वागता

ब्रह्मकल्पसमयो जरि पावे
रुद्रकोप भुवनावरि धांवे
सर्व जाळिन म्हणे जग जैसा
रूसला नर परावरि तैसा ७६५

द्रुतविलंबित

स्परशिली चरणीं महमांतिका
रणिं तिनें विजिली करिकन्यका
चपळिली करिणी हरिणी जशी
शरसुटी करि पार्थ रणीं कशी ७६६

स्रग्विणी

सज्जुनी बाण आकर्ण वोढी भरी
घोर संधान कल्पांत कोपें करी

लागतां पादपाणीशिरें संगरीं
तूटती गर्गरां भोंवतीं अंबरीं ७६७

भुजंगप्रयात

हहाकार झाला महासैन्य पारीं
रवीनंदनें देखिला तो स्वभारीं
शिरीं टोप आंगीसिलें वज्रसारी
महाकुंडलें कंकणें तेजधारी ७६८

स्वागता

काढिली गवसणी धनुषाची
वोढिले सरसुनी शर पांची
रुक्मस्यंदनपती खचिताचा
प्रेरिला समरिं मित्र पणाचा ७६९

शिखरिणी

चतुश्चक्री धांवे घडघडित घंघाटत रणीं
पताका तेजाळा वरि तळपती तेजतरणी
विदारोनी सेना चपळपवनापक्षि वहिला
अकस्माताजूंना समुख रथराणा झळकला ७७०

स्वागता

वीर्यसागर धनंजय आहे
धैर्यपर्वत रवीसुत पाहे

बोलिला 'द्विजवरा स्थिर राहे
आमचें स्वहित् उत्तर साहे' ७७१

'जें कुरेशकटकार्णवपाणी
मेदिनी करुं शके जळवाणी
तें तुम्हीं द्वयजनीं भुजभारें
आजि आदळविलें दळ सारें' ७७२

'धन्य धन्य जननीजनताता
जे तुम्हां प्रसवली उभयेतां
आलिया यश पुरें रण हाता
एक मी पुसतसें तुज आतां' ७७३

'सर्वथा द्विज तुम्ही द्वय नोहा
क्षत्रियान्त परपावक आहां
विग्रह त्यजुनिया रण राखा
सख्यसौरससुधारस चाखा' ७७४

स्रग्विणी

'वोळखीलें धनुर्धारिया म्यां तुला
आपुलें नाम तूं सत्य सांगे मला'
कर्ण बोले गिरा वज्रठाणीं अशी
आयकोनी वदे जिष्णु वाणी कशी ७७५

भुजंगप्रयात

‘ अगा वीर्यवंता रसोदारशीला
नव्हे सर्वथा ही रसाची र वेळा
महासंगरीं कायसी सौम्य पृच्छा
अरी मी तुझा तूं करी युद्ध इच्छा ’ ७७६

‘ असो रे हरीकेसरी ब्रह्मयाती
जगत्रीं कुरू मातले भद्रजाती
परीसौनि आलों असों पक्षपाती
करायासि निर्मूळ विश्वासघाती’ ७७७

‘ निरर्थें तुम्ही युद्ध पाडौनि आतां
न वांचाल ब्रह्माण्ड फोडौनि जातां ’
अशीं उत्तरें पार्थ जो बोलताहे
रिपुक्रोधसीमा उलंघीत आहे ७७८

प्रतापें झणत्कारिला काळमेंढा
मुखीं कर्करा खादल्या दांतदाढा
रिपू दीससी क्रीम बद्रीफळाचा
सुपर्णापुढें गर्जला थोर वाचा ७७९

‘ तदन्याय केला तुवां कर्महीना
प्रतापाबळें बोलसी दुःखदीना
अरे विप्र जाणौनि म्यां युद्ध पाहें
मनां नाणिलें वैरिया घाव साहे ’ ७८०

म्हणोनी बळें विंधितां कर्ण जाला
न येतां वरी पार्थ भेदोनि गेला
असे पांचही बाण तोडोनि सांडी
तदा कर्ण अद्भूत संधान मांडी ७८१

महामेघसा मातला वर्षताहे
नभीं बाण जंजाळ होवोनि राहे
असें घोर संधान भानात्मजाचें
कसें ठाणविंदान त्या फाल्गुनाचें ७८२

असंभाव्य आरंभिला वेग त्यानें
न जाणों किती भेदिले बाण बाणें
गगन् पावकाकार जालें समानें
पळों लागलीं निर्जरांचीं विमानें ७८३

स्रग्धरा

दोघेही चंडमाने सुभट खवळले दीर्घ द्वंद्वावधानें
कोदंडें रामठाणें दमुनि भुजबळें भेदिती बाण बाणें
वर्मै लक्षोनिशानें करिति शरसुटी मेघधारासमानें
व्योमाचें पोट त्यानें समुळ भरियलें घेतली बुंथि भानें ७८४

भुजंगप्रयात

महायुद्ध तें देखती देव जाणा
भला भास्करी मानवी देवराणा

असो वर्णितां शब्दसिंधू सरे ना
मनीं अर्जुनें योजिलें काय कर्णा ७८५

स्वागता

कर्णवीर परपावक रासी
सद्गुरू भजन भार्गव यासी
नागवे मज इषूपथवाहीं
शस्त्र घालिन रिपूवरि कांहीं ७८६

अग्निबाण मग मंत्रुनि पाहे
बोलिला सजुनि सत्वर साहे
घालितां प्रलयवात झडाडी
वेदजात सरिसाचि धडाडी ७८७

भुजंगप्रयात

उदेला अकस्मात वन्ही उबाळा
नभीं लागल्या ज्वाळज्योती विशाळा
वरी लागतां खेचरां आट जाला
पळा रे पळा रे पळा अग्नि आला ७८८

तदा जाहला साह्य तो वात हा हो
शिखा शीघ्र सैराचि झेंपावल्या हो
कुरूसैन्य पालाणिती ज्वाळमाळा
चमूसागरें भाविली कल्पवेळा ७८९

स्वागता

डंखिलें कटक पावनकाळें
देखिलें चरित भास्करबाळें
घेतला शरधुरंधर पाणीं
वोपिलाद्‍भुत जळंधर बाणीं ७९०

भुजंगप्रयात

नभीं घालितां मेघ गर्जे गडाडी
बळें वावडे घोर धाडें घडाडी
फुटों लागले भीमघोषें तडाडी
विजा खेळती व्योमशाळा कडाडी ७९१

क्षणामाजिं केला घनें शांत वन्ही
धरा जाहली सर्वही तोयवर्णी
रिपूअग्नि जाळीत जो येत होता
घनें भग्न केलाचि जैसा न होता ७९२

इन्द्रवज्रा

देखौनि ऐसें मग पार्थराणा
निर्वाण मंत्रावळि बाण जाणा
तो योजिला सागर हो शरांचा
चिंतामणी अंतक जो परांचा ७९३

झाडौनि कोदंड वितंड पाहे
बाणासनीं फाल्गुन बाण वाहे
आकर्षिले सीत सकर्ण जेव्हां
भावी मनीं अर्जुन काय तेव्हां ७९४

भुजंगप्रयात

'जगीं सत्त्वसिंधू जरी धन्य आहे
रणीं भीमशत्रू तृणाकार पाहे
जरी म्यां प्रभू अर्चिलासैल भावें
तरी या शरें सैन्य मारोनि द्यावें' ७९५

स्रग्विणी

'साह रे साह संधान माझें अरी'
घातला बाण गर्जूनियां अंबरीं
चंड मंत्रावळी शक्ति घोरांदरीं
बाण जाले किती कोण संख्या करी ७९६

लक्षकोटी शतें अर्बुदें पद्महीं
ना पुरे बोलतां मिथ्य लेखासही[1]
बाण कैसे महामेघसा वोळला
व्यापिली भू तमें श्रीरवी लोपला ७९७

१ ठ. शीणले शेषही

मंडपाकार आकाश धात्री दिशा
सर्व आच्छादिल्या जेविं जाली निशा
लागले बाण वृष्टी करूं भूवरी
अभ्रधारा जशा सैन्य झेली शिरीं ७९८

स्वागता

बाण अष्टहि दिशांतुनि येती
टोळसे उतरती दळशेतीं
भेदिती रथ-करी-नर-वाजी
पाडिती मृगगती महिमाजीं ७९९

जाहला गजब कौरवभारीं
बाण बाण वदली चमु सारी
बह्मगोळ शरसागर व्याला
कोण तारिल कुरूकटकाला ८००

हेरिलें भुवन भानुकुमारें
देखिलें शरमये सम सारें
अर्जुनास्त्र अनिवारक आहे
भास्करी चकित होउनि राहे ८०१

भुजंगप्रयात

करी काय बुद्धी न चालेचि कांहीं
बसों लागले बाण येऊनि देहीं

असें देखतां सारथी वेग सारी
रथा काढितो युद्ध सांडोनि हारी ८०२

निघाला निघाला रणीं कर्ण जाणा
पळों लागलें सैन्य झेलीत बाणा
दुजें युद्ध त्या बल्लवें वज्रघातें
उरीं ताडिली लात दुःशासनातें ८०३

बळें बैसतां घाव अत्यंत जाणा
भ्रमूनी पडे चक्र जैसें उताणा
वरी बैसला पाडिला पापसिंधू
वधावा तवां लोटले वीरबंधू ८०४

श्येनिका

घाबिरें रणीं करौनि बल्लवा
काढिलें बळें कुरेशबांधवा
नेउनी त्वरें रथांत टाकिला
रक्त तो वमी परंतु वांचला ८०५

शांत जालिया सवर्म वेदना
जाय आंगिची समग्र मूर्च्छना
लक्षुनी पुढें सहोदराननां
काय बोलिलाग्रजा सुयोधना ८०६

भुजंगप्रयात

म्हणे 'भीम रे भीम हा वज्रकाया
दुजा वारिणीस्वार तो पार्थराया
करीसी परी काळ विप्रीत मांडी
मुकुंदें रिपू रक्षिले युद्ध सांडी' ८०७

असें कर्णितां बाण दुःखार्णवाचा
उरीं लागला जाण दुर्योधनाचा
गळालें धनू त्यामुखीं चंद्र कैचा
तदा पूर आला नराच्या शरांचा ८०८

दिल्ही पाठ दुर्योधनें धाक घेतो
बळें सारथी वारुवा साट देतो
निघाला रणीं मुख्य राजा चमूंचा
फुटे भार आपंपरी कौरवांचा ८०९

स्वागता

थोर थोर जन कौरवकामीं
सैन्यकार्ककुमरादिक नामी
बाण भेदित वरी विजयाचे
चालिले नृपतिवेष्टित साचे ८१०

भुजंगप्रयात

पळे सैन्य सैराचि तें धैर्य सोडी
मधीं भीम भोंवे बळें हांक फोडी



कै. म. म. द. वा. पोतदार

गदा खड्ग झाडें शिळा बाण धोंडी
पडे हस्तकीं तेंचि घेऊनि झोडी ८११

रथें स्यंदनासी गजें वारणासी
हयें अश्व हाणे विरें वीर नाशी
करी भीम धर्मांचिया कारणासी
वधी पातकी पूर्ण आणी रणासी ८१२

मालिनी

गगन भरित बाणीं पार्थ पाठींचि येतो
जळधरशरधारीं वैरिया मुक्ति देतो
निजगति निजशक्ती संगरीं सर्व पाही
कटक कुरुपतीचें काढिलें पांडवांहीं ८१३

स्वागता

देखिलें चरित रुक्मिणिरंगें
वेंधला प्रभु रथावरि वेगें
दाटलें सकळ सैन्यक पाठीं
लोटला रणरमावर गांठी ८१४

स्रग्विणी

कौरवां पांडवां माजिं घाली रथा
काय बोले प्रभू भीमपार्थां तथा

'धन्य रे धन्य रे तूमची वीरता
आजि संतोषलों मी अनंतू स्वता' ८१५

स्वागता

'द्रौपदें पण धुरंधर केला
तो तुम्हीं सकळ सिद्धिस नेला
काढिले रिपु रणीं घण घावें
याहुनी यश किती म्हुण द्यावें' ८१६

भुजंगप्रयात

'तुम्हीं आजि नेलें असे सर्व सिद्धी
पळे त्यासि मारी महादोष बाधी
पुरे युद्ध आतां किती कीर्ति व्हावी
भुजातूर माझ्या मला भेटि द्यावी' ८१७

स्वागता

घातली मग उडी विजयानें
वंदिले चरण धावुनिशानें
भेटला मग दयाळ तयासी
भीमसेन धरिला हृदयासी ८१८

इन्द्रवज्रा

दोघांजणांचें श्रमदुःख भारी
आलिंगुनी अच्युत सर्व वारी

आनंद तेथें बहुसाळ जाला
तों अस्तमाना रविराज गेला ८१९

द्रुतविलम्बित

तिमिर बुंथिसि घे निशि-नायिका
उजळल्या मग कोटिक दीपिका
नृपदळें सकळीक समाजलीं
मृदुतुरें अगणीतचि वाजलीं ८२०

वधुवरें करिणीवरि राजती
सकळ भूभुज पाठिसि साजती
रहिंवरीं बळि भीम विराजला
भुवनसुंदर मिर्वत चालिला ८२१

स्वागता

जाहले विजयि पांडव गाटे [ गाढे ]
लागला कुरुपती पुरवाटे
वीर जे पहुडले रणवासी
भेटलें प्रलय-दुःख तयांसी ८२२

शार्दूलविक्रीडित

वाजी वारण वीर धीर पडिले ते कोण संख्या करी
एकाचे कर कंठ पाय तुटले कित्येक गेले उरीं

जाली मांसमयी रणांगणिं मही अश्वीं नरीं कुंजरीं
वाहे रक्त विशाळ विभ्रम दिसे व्याली वरी शार्वरी ८२३

हुंकारें भरिती भयानक गिरा जे वीर जाले चुरा
घायें घूर्मिति गर्गरानुभवती कल्पांत दुःखांतरा
आल्या शाकिनि डाकिनी सहगणीं झोटिंग धावूनिया
घाली गोंधळ भूतमेळ सहसा वेताळ घेऊनिया ८२४

शिखरिणी

असो ग्रामामध्यें परम यदुराजें वधुवरें
समारंभें नेलीं मिरवित अतीशाळ गजरें
पुढें गेला जाणा द्रुपदभुवना श्रीयदुपती
बिढारासी गेले सहितद्रुपदी पांडव गती ८२५

स्वागता

कौरवांप्रति पराजय आला
पांडवां यशनिधी वश जाला
पातला परि पुढें रसराशी
दास सादर म्हणे चतुरांशी ८२६

पुण्यपावन कथांतर आहे
रम्य आम्रतरुची रस वाहे
कर्णितां भव धुरंधर नाशी
प्रार्थिता अवचितात्मज काशी ८२७

*इति श्री द्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग बारावा ॥*

# सर्ग तेरावा

श्रीकृष्णाय नमः

शिखरिणी

निगर्वें उल्हासें अनुज लघु घेऊनि सरसे
पुढें आला बोले सुहृद वचनें माय परिसे
तुझ्या पुण्यें भिक्षा द्रुपदसदनीं साधिलि बरी
वदे कौंती ' धर्मा सकळ तुम्हि घ्या वांटुनि तरी ' ८२८

तदा भीमें पार्थें सहित द्रुपदी भीमगजरें
बिजें केलें माता नमुनि चरणीं ठेवित शिरें
उठौनीयां कौंती सकळ तनुजां आरति करी
मुखांभोजा पाहे बसवुनि निजांकीं सुन बरी ८२९

मालिनी

झळफळ कारि शाळा दीपही श्वेत जाले
रुपस द्रुपद-बाळा पाहतां नेत्र धाले
मनहर भुवनाचें धाम सर्वें धनाचें
गगन गुण घनाचें जोडिलें आजि साचें ८३०

तरण भवनिधीचें सार चंद्रोदरीचें
सदन नवनिधींचें दीप दीपांतरींचें
सुकृत कुळजयाचें पुण्य वंशावळीचें
मुदित फळ तपाचें जोडिलें आजि कैचें ८३१

' द्रुपदभुवनिं माते तुष्टला देवरावो
मथुनि पण–रणाब्धी काढिलें रत्न हें वो
द्रुपद-अनळ-बाळा द्रौपदी नांव घ्यावें '
वचन-सुमन-माळा अर्पिली धर्म देवें ८३२

इतर कथन राहो शार्वरी होत आहे
द्रुपदसदनिं शौरी सत्सुखें डोलताहे
पुरपति कर जोडी ' काय जी देवराया
अझुनि मज न सांगा कोण हे दीर्घ माया ' ८३३

' न धरत मन माझें भीड सांडोनि बोले
अति कट रण ऐसें ब्राह्मणां केविं तोले
उजउनि पण जेणें जिंकिली भीम सेना
अघटित विण नोहे अर्जुना भीमसेना ' ८३४

' मजहि द्रुपदराया जाण ऐसेंचि वाटे
स्फुरण करित बाहू अंतरीं हर्ष दाटे
सफळ जिवित[१] माझें मागुता धर्म भेटे
चुकतिल तरि माझे लोकनिंदाच पेटे ' ८३५

१ हअ दिवस. हा जें

‘ रुखवत सुत धाडा घ्या परीक्षा समेळीं
प्रकट पुसुन त्यांसी मी उद्यां राजमेळीं ’
द्रुपद मग नमूनी आइतीलागिं जातो
नकळत हरि कोण्हा पांडवां भेटि देतो ८३६

तूणक

सावळें स्वरूप तें विजांबरीं विराजलें
कुंडलें किरीट पद्मपाणि दिव्य राजलें
पांडवां कुलाळ-मंदिरीं प्रतक्ष दाविलें
पंडुपुत्र वंदिती धरूनि पुण्य पाउलें ८३७

शिखरिणी

चहूं हातीं चारी धरुनि माधिं धर्मासि कवळी
करीं मौळी मोहें हृदयिं कवटाळोनि कवळी
पिलीं जैसी पाखें खगिनि वनिं झांकौनि बसते
तशी पंडूपुत्रांवरि व्रजपती माय लसते ८३८

बराड्याचे गांवीं धनकनकवृष्टी वरुषला
दुकाळ्याचे देशीं प्रकट पयराशी पसरला
अनाथांच्या माथां सुरतरु विराजौनि फळला
तसा पुंडूपुत्रांवरि व्रजपती बाप वळला ८३९

चकोराचे खोपे रजनिपति राजा उगवला
मयूराचे गुंफे जळधरपती इंद्र सुदला

नव्हे रामा युद्धीं भरत जिवदेतां उतरला
तसा पंडूपुत्रांवरि व्रजपती बाप वळला ८४०

कामदा

पांडवां दिलें क्षेम यापरी
कौंतिला हरी हृत्कजीं धरी[1]
'बाप बाप तूं मायबाप कीं
ही ब्रिदें तुझीं भक्तपाळ कीं'[2] ८४१

'बैस रे हरी देवराजया'
दे कुशासनातें बसावया
बैसला हरी गौरवी मुखें
दाटलीं घरीं सर्वही सुखें ८४२

आठवूनिया दुःखसागरा
कौंति मा वदे कोंदिली गिरा
'काय रे हरी दैव हें असें
पांडवां वनीं टाकिलें कसें' ८४३

इन्द्रवज्रा

'बांधोनि ते राक्षस पांडवांसी
मारीत होते वनिं घोरवासी

१ ठ. पाय कौंत मा वंदिते शिरीं
२ ठ. निष्ठुरा कसा जाहलासि कीं

तेथूनि येतां मग देशदेशीं
भिक्षेसि हे मागत दीनवेशीं ' ८४४

' तूं पांडवांचा प्रतिपाळ होसी
कां लागली रे तरि वृत्ति ऐसी
गेलासि आम्हां विसरौनि आतां
झालें असें हें तरि काय ताता ' ८४५

बोले मुखें लोचनिं तोय गाळी
धर्में दिल्हें उत्तर तोचि काळीं
' माते हरी हा विसरौनि गेला
कोणें तरी जोहरिं पंथ केला ' ८४६

' हे जिंकिली आजि पुरेश-बाळा
ते वोपिले वैरि अपेश काळा
कैवारिया हा हरि आपुला हो '
यानंतरें बोलत कृष्णदेवो ८४७

वसंततिलका

' आते वनीं विपति ज्या घडल्या तुम्हांसी
मी जाणतों हरि सदैव तुम्हांचि पाशीं
माते तुझ्या विसर जैं पडिला सुतांचा
तैं संपला सकळ हा अवतार कैंचा ' ८४८

कामदा

बोलतां असें धर्म कांपला
जोडुनी उभा हात राहिला
'बाप बाप हानर्थ बोल रे
आमुचे मुळीं मोल तोल रे' ८४९

श्येनिका

'सर्व सार तूं निरूपचार तूं
निर्विकार तूं निरावतार तूं
वाणि वैखरी परे परात्परू
धातया हरा सुरां अगोचरू' ८५०

'जाणसी तुझा अपार पार तूं
बोलसी असे नरा विचार तूं
तूं कृपानिधी म्हणौनि यापरी
लोटसी जला तृषातुरांवरी' ८५१

शिखरिणी

'असो आम्ही आतां प्रकट महिं कीं गुप्त विचरूं'
दयासिंधू बोले 'उदइक महामंडप करूं
तुम्हीं व्हावें तेथें प्रकट मजला सत्य पुसतां'
दिजे आज्ञा कौंती नमुनि हरि तो होय निघतां ८५२

प्रभू काळे रात्रीं पदगमन गात्रीं टणकला
सुखाचे डोल्हारीं सुमन अरुवारीं पहुडला
तदा धृष्टद्युम्नें रुखवत अवर्जून विभवें
गृहा आला सांगे 'उदित पितया चिन्ह बरवें' ८५३

असो प्रातःकाळीं उदयवर केला दिनकरें
दयाळाची पूजा करि द्रुपदराजा पडिभरें
प्रभू बोले 'राया नृपसह सभामंडप करा
तिन्ही लोकां आणा सुरनरविखारांदि असुरां' ८५४

भुजंगप्रयात

महामंडपा पातला भूप वेगीं
सभा सोज्ज्वळा साधिल्या अष्टभागीं
सुवर्णीं खणीं बाळणीं चित्रकारी
कळापेखणी पूतळ्या नृत्यकारी ८५५

पुरीं भोंवताले महीमंडळीचे
नृप स्थीर होते शहाण्णौ कुळींचे
उधाळीत वारू त्वरें कांबिकांहीं
सभे राय हाकारिले सर्व पाहीं ८५६

शार्दूलविक्रीडित

आले भूप अमूप सैन्यक सभे
लोक प्रजा सर्वही

साधूसंत महंत विप्र मुनि जे
नामाथिले ये महीं
आले किन्नर देव ते दिगपती
गंधर्व ते गायनी
यक्षोनारद शारदा गणपती
अष्टांगना नाचनी ८५७

आले तक्षक दैत्य दानवपती
ते बैसती आदरें
आले यादवराव घावगजरें
लक्षान्त वाद्यंतरें
वाद्यें घोर घणाणिलीं घनरवें
ब्रह्मांड नादावलें
मंत्री मूळ करावयासि वहिलें
श्रीमाधवें बोलिलें ८५८

वसंततिलका

शृंगारिले रथ मनोहर पंच त्यांसी
वाजी करी गुढरिले शिबिकादि दासी
छत्रें ध्वजा मृदुतुरें गणिका विलासी
गेला प्रधान गजरें मुळ पांडवांसी ८५९

वंदूनि धर्म मग पूजित बंधु पांची
दिव्यांबरें झलक कोटिर कुंडलांचीं

माळा गळां पदकहार करीं पवित्रें
श्रीकंकणें मनगटीं कटिं दिव्यसूत्रें ८६०

तोटक

चढले मग ते रथराजपदीं
शिबिकासनिं कुंति तथा द्रुपदी
ढळती ढळचामर दंडवरी
तंव चक्रि समोखन कौंति करी ८६१

धनगौरव त्यांप्रति मंत्रि कसा
करि भूप दुजा नगरांत तसा
मग पांडव ते मिरवीत कसे
गति जानवशाप्रति नेत असे ८६२

कनकोत्तम मंदिर तें विलसे
सुनमंडित कौंति तयांत बसे
गजरें मग पांचहि इन्द्र जसे
नृप मंडपिं पांडव आणितसे ८६३

स्रग्धरा

'आले रे तेचि आले नरवर समरीं अंबरीं देव भ्याले
जेंहीं दुर्योधनाच्या हृदयिं सम दळीं मारिले भेंव भाले'

ऐसें त्रैलोक्य बोले तंव रथ त्यजुनी मंडपीं ते रिघाले
देवें सन्मान केले अमर नृप उभे आसनीं सर्व ठेले ८६४

अमृतललिता

वंदुनि तो हरि सन्मुख चाउरिं
पांडव त्यावरि शोभति कैसे
पाहति भूप अमूप विराजति
पांचहि ते नर इंद्रचि जैसे
गंध सुगंध विडे सुमनें उपचार
समग्र सभेप्रति आले
वर्जुनि वाद्यघटा घननीळ सुलोचनि
धर्म निरक्षुनि बोले ८६५

स्रग्धरा

'आहो विप्रप्रतापी नवल माहिं तुम्ही
देखिले वीरधर्मी
पाताळीं स्वर्गताळीं असुरसुर असे
इन्द्र ना चंद्र ना मी
धन्यत्वें धन्य धालें यशमय जग हें
व्योम कीर्तीसि व्यालें
सांगावें सत्य आतां मम वचन तुम्हां
नान्यथामान्य जालें' ८६६

अमृतललिता

‘ कोण पिता जननी कुलवंश पुरोहित
को पुर कां भव जाले
को महिं जन्म तुम्हां नाभिं कीं सुर कीं
नर कीं विर कोठुनि आले
प्रश्न असा परिसोनि पुढें मग जोडि
युधिष्ठिर सत्वर पाणी
‘ अंतर बाह्य निरंतर व्यापुनि तूं
वससी जागें वर्णित वाणी ’ ८६७

‘ कोड कृपें करिसी तरि सांगन ऐक
दयानिधि निश्चळ आतां
हस्तनपूर सुधाकर वंश कुरूकुळ
व्यास गुरू कुळदाता
जन्म महीं तटिं जान्हवि कुंति निजालय
पंडु नृपोत्तम ताता
श्रीकुळस्वामि तरी सचराचर जीवन
यादवराज विधाता ’ ८६८

‘ तात सहोदर होय सुयोधन तो करि
वैर विना अपराधू
घालुनि अग्निं मठीं दिधला मग
वांचवि दीनदयालय बंधू

फार वनीं अवनीं पिडिलों धरुं पाय तुझे
म्हुण धांवत आलों
भीम धनंजय माद्रिसुत द्वय धर्म 'सनाथ'
म्हणे 'हरि जालों' ८६९

कामदा

घातली उडी कर्णितां असें
धांविला हरी लागलें पिसें
'काय रे तुम्हीं पंडुचे महीं
भेटले मला प्राण पांचही' ८७०

पांडवां धरी वक्षि हस्तकीं
बोलतो कसे स्वस्ति शब्द कीं
शब्द बोलतो सद्गदीतसे
'जोहरीं तुम्ही वांचले कसे' ८७१

श्येनिका

'सारथी हरी तुम्हा विसंबला
लोक निंदिती समस्तही मला
बाप बाप म्यां तुम्हांसि देखिलें'
धन्य आजि हें सुलग्न लेखिलें ८७२

'देउं रे तुम्हां कितीक मी मिठी
लागती झणीं जनाचिया दिठी

स्वर्गिं नेउं कीं अगाधया[१] पिठीं
यत्न मी तुम्हां कसे करूं मठीं' ८७३

'कष्टलेति रे वनांत हिंडतां
कांटिया खडे पदासि खूपतां
म्लानता मुखीं अपार बाणली[२]
दीनता तुम्हां बहूत पातली' ८७४

श्री दयानिधी तयावरी असा
लोटला नये वदों वदेतसा
पांडवां अनंत भेटला सखा
काय वर्णवेल त्याचि या सुखा ८७५

स्रग्धरा

वाद्यांचे घोष जाले जयजय करिती
देव इंद्रादि आले
पृथ्वीचे रायराणे असुरगण सभे
त्यांसि भेटों रिगाले
धृष्टद्युम्नें प्रधानें सकळ नृपवरीं
यादवीं धर्म केले
रत्नें वोवाळितातीं कनक वरुषती
भाटही भूप जाले ८७६

१ मुं. पयाळ
२ ढ. सूकलेति रे भक्षितां फळें ॥ म्हूण हृदयीं धरियलें बळें ('हृ' दीर्घ उच्चार)

शार्दूलविक्रीडित

देवाचीं स्तवनें स्तुती सुरवरीं
योगेश्वरीं मांडिल्या
'भक्तां रे हरि रक्षिता त्रिभुवनीं'
वाचा नभीं फूटल्या
आनंदें नभ दाटलें दुमदुमी
देवध्वनी गर्जल्या
जालें रे जगिं धर्मराज्य पुढतीं
स्वर्गीं ध्वजा लाविल्या ८७७

ऐसें अद्भुत वर्ततां चरित रे
जालें कसें द्रौपदा
गेला तो विसरोनि देह भुवनीं
आत्मस्थिती संपदा
डोळां देखतसे परंतु न दिसे
कानीं पडे नायिके
येथें भूभुज इंद्र चंद्र मिनले
नाहींति ज्या ठाउके ८७८

कैंचे पांडव कोण कृष्णद्रुपदी
मी कोण कैंची कथा
जाला हो नृप सर्व शून्य शरिरीं
तो पूर्वपुण्यें यथा

त्याचे अंतरिं विस्तरें विरुढला
आनंदमेरू कसा
त्याचें लक्षण वर्णितों सकळिं तें
श्रोतीं दिजे मानसा ८७९

स्रग्धरा

आधीं ते पुण्यपृथ्वी मग वरि नभ तें
भाग्य त्या द्रौपदाचें
मध्यें आनंदमेरू अभिनव विलसे
आयिका रूप त्याचें
विश्रामाष्टांगभोगी गहन अचळ तें
अष्टभागीं स्वभावें
मेरू विस्तार माथां गणित परियसा
लक्ष बत्तीस गावें ८८०

स्वागता

कंप जाण अमरावति आहे
रोम ते पुरिंत निर्जर पाहे
धर्म चार पुरुषार्थहि चाऱ्ही
अष्ट ते दिगपती द्वयहारीं ८८१

वाणि चारि श्रुति चारि सुगाना
नायिका चतुर अष्टहि जाणा

श्रीगणेश तरि मंगळ गाभा
शारदा गमतसे मज शोभा ८८२

हर्ष नारदविणा स्फुरणाचा
घोष तुंबर करी स्मरणाचा
सत्त्व तो गुरुबृहस्पति पाहे
धन्य तोचि अइरावति आहे ८८३

शिखरिणी

मधीं त्या प्रेमाचें लखलखित दिव्यासन असे
वरी आत्माराजा अमर जागिं तो इन्द्र विलसे
कृतार्थांचे अंगीं कवच मुकुटीं सार्थक दिसे
सुखासंतोषाचें श्रवण दळ दोन्ही समजसें ८८४

कृपाकृष्णस्नेहो अढळ वरि इच्छातरु असे
फळें जो इच्छेचीं प्रकट जागिं देऊनि न दिसे
यशाचे कीर्तींचे मग शशिरवी ते उजळती
शचीकांता शक्रा भ्रमत परिवेशीं मिरविती ८८५

स्वागता

मुक्ति जाण चवथीशाचि आहे
वेवधान भुवनीं पथ आहे
नांव ठेविन मनासहि कांहीं
आथिलें परपदीं मन नाहीं ८८६

इन्द्रवज्रा

संपूर्ण जाला महदांतरींचा
आनंदमेरू द्रुपदांतरींचा
त्याचे मुखीं काय फुटेल वाचा
जाणोनि बोले प्रभु यादवांचा ८८७

आलिंगुनी चेतन दे नृपासी
तैं भेटवी पांडव देव त्यासी
'राया तुझें दैव कसें उदेलें
घालोनि पोटीं गगनासि गेलें' ८८८

श्येनिका

'धर्मराज हा जगांत लोपला
वाटलें मलावतार संपला
मंडपीं तुझे प्रतक्ष देखिला
आजि म्यां तुझा सुजन्म लेखिला' ८८९

शार्दूलविक्रीडित

'जालों पावन मीचि पावन तुझे
जालों घरीं भूपती
वर्णूं याहुनि काय पुण्य महिमा
तूं धन्य धन्य क्षितीं

ऐसा दासविलासरास करि हो
श्रीपीतवासस्वभू
जो का भक्तभवारि वत्सल सखा
श्रीइंदिरा वल्लभू ८९०

दावी एक दिसोनि एक लपवी
येक स्तवी उद्धवी
खेळे आपण खेळ भक्तमहिमा
लोकत्रयीं वाढवी
पंडूपुत्रचरित्र अत्र उघडें
केलें दयाळें असें
भद्रीं देव विराजमान परिसा
त्यानंत जालें कसें ८९१

मालिनी

द्रुपद कुळ उपाध्ये प्रार्थिती श्रीअनंता
'विलसुनि नृपधामीं लाविजे लग्न आतां'
सुरनरसह शौरी मंडपासी विसर्जी
उपरि भुवन कौंती पावला कार्य-सर्जी ८९२

नकळत हरि सांगे कुन्तिये गुह्यभावें
'वदलिसि गुजधर्मा दान वांटोनि घ्यावें
प्रकट वचन आतां तें समस्तां करावें
बळकट परि चित्तीं निंद्य होतां धरावें' ८९३

भुजंगप्रयात

असो थोर केली सभा वासुदेवें
म्हणे देव कौंतीसि ' लग्ना चलावें '
वदे कौंत मा ' दान वांटौनि घ्यावें
असें बोलिली मीं कसें या करावें ' ८९४

द्रुतविलंबित

दचकला नृप तो द्रुपदांतरीं
' न कळतां वदली जननी हरी
तरि निषेध नसे अनुशब्द हा
तुम्हि मनांत विचारुनियां पहा ' ८९५

स्वागता

पार्थ जोडुनि वदे मग पाणी
' बह्मरेष जननी मुखवाणी
सत्य सत्य करणें मज देवा
लग्न पंचवर अर्चुनि लावा ' ८९६

तूणक

पार्थशब्द बाण हा सभे अनर्थ सूटला
द्रौपदासि वज्रघातसा उरांत लागला
पंचकान्त बोल हा सुतेसि माझिया असा
ब्रह्मकल्प पातला म्हणे कटाकटा कसा ८९७

प्राण हा त्यजीन काय वांचुनी जगांत या
सूद्रसेन तैं म्हणे प्रभूसि 'देवराजिया
सर्वसें सखा नृपांत हा पुरेश आपुला
काय जी करौनि थोर घोर घाव घातला' ८९८

शार्दूलविक्रीडित

बोले श्रीपति मंत्रियासि 'न करी
चिंता अशी सज्जना
आतां येइल व्यास होइल तुझा
आनंद मेरू दुणा'
धांवा कुंति करी विलोकुनि वदे
'गा व्यास मुद्रा मुनी
तूं ये लौकर धांव पाव समयीं
मीं निंद्य जालें जनीं' ८९९

होता पैं मुनि बद्रिकाश्रमपदीं
तो व्योम भेदी कसें
लक्षीतां जनिं ऊर्ध्व तेज पडलें
विद्युल्लतेचें जसें
वंदी सर्व सभा तदा यदुपती
'बैसा म्हणे आसनीं'
सांगे संकट वर्तलें घटित हें
'या काय कीजे मुनी' ९००

अमृतललिता

व्यास म्हणे ' अति उत्तम हें प्रभु
दान करोनि सुता पितयानें
पुण्यनिधींत बुडीसि दिजे मग उद्धरिल्या
कुळकोटि तयानें '
द्रौपद तें विनवी कर जोडुनि
' हें अघटीत वदा मुनि कैसें
नाहिं धराधरिं सर्व सुरासुरिं
कर्म दिगंतरिं पावन ऐसें ' ९०१

स्रग्धरा

त्या व्यासें द्रौपदासी समुख बसविलें
' आइके पुण्यसिंधू
रुद्राचे प्राण पांची जगिं अवतरले
जाण हे पंच बंधू
कृष्णा ते सत्य माया सुरवरवरदी
आदिनारायणी रे
सांगो यांचे कथेसी श्रवण कर
सुखें होय पापा धुनी रे ' ९०२

भुजंगप्रयात

' निराकार तें शून्य साकार जालें
स्वभू रुद्र माया म्हणायासि आलें

विधी जन्मला विष्णुनाभीसि जाणे
विधात्याकुळीं पुत्र संख्यापुराणें ' १०३

स्रग्धरा

' माया रूपासि येतां सुरवर वरदा
बोलिली पंच वेळां
शूळीं संकल्प केला वर तिज दिधला
जाहली दक्षबाळा
वक्त्रें पांची धरूनी शिव तिज परणूं
दक्षधामासि आला
देहे तो एक त्यासी म्हणवुनि वर तो
पूर्ण कांहीं न जाला ' १०४

भुजंगप्रयात

' उमेनें पुन्हा घातलें दक्षयागीं
शिवें सेविलें रान होऊनि योगी
वधायासि देवीं तदा तारकाला
हरा पुत्र व्हावा असा यत्न केला ' १०५

तोटक

' हिमराज गिरीकुळिं जन्म उमा
पुनरेव करी धरि रूपसिमा

अवदान सुरीं मदनासि दिजे
मग शैलसुताशिवयोग किजे ' ९०६

' हर पंच मुखें नगजे परणूं
सुर आणिति रे परि एक तनू
मग षण्मुख नंदन जन्मउनी
वधिला रिपु तारक दैत्य रणीं ' ९०७

भुजंगप्रयात

' असो टाकिली शापमुद्रा पुन्हा ही
वराची क्रिया पंचकीं पूर्ण नाहीं
उमा चंद्रमौळी वनामाजिं पाहीं
सुखें बैसिली वर्तलें चोज कांहीं ' ९०८

पृथ्वी

ऋतारुढ तयांपुढें सुरभि भोगकामा क्रमे
शतैकवृषभांतरीं क्रिडत जातसे संभ्रमें
उमा तिसि म्हणे ' इचा मदन पूर्ण एकें नसे
निलज्ज कशि हे पती प्रकट पंच भोगीतसे ' ९०९

फिरौनि सुरभी म्हणे ' विहित कर्म आम्हांप्रती
प्रधान असतां तुवां अशुभ निंदिलें पार्वती
अवश्य तुज ही तऱ्ही वरुन पंच ही भोगिती
शतैक मम हे तुला पिडक शत्रु होती क्षितीं ' ९१०

द्रुतविलंबित

थरथरी मग ते जगदालया
'पति कसें करुं मी वचनासि या'
पशुपती वदला 'न धरीं भया
धरिन पंचमुखें तनु पांचि या' ९११

स्वागता

'शाप ताप न चुके सुरभीचा
जन्म पुण्य हवनीं नृपतीचा
पर्णु येइन तुला वर पंचें
वैरि मारिन तुझें भय कैचें' ९१२

भुजंगप्रयात

'अरे तेचि हे जन्मली पद्मनेत्रा
विभू पंच हा पूर्ण राया पवित्रा
नसे रे पुढां जन्म येथूनि याला
वराची क्रिया शंकरोत्तीर्ण जाला' ९१३

अमृतललिता

'पावन तूं नर धन्य तुझें घर हें
कुसुमापुर धन्य क्षिती रे
धन्य मनोदय धर्म धरालय
धन्य मखालय वर्णु किती रे

हा स्वय शंकर वोडवितो कर
दान उमा कर शीघ्र गती रे
झांकितसे नृपनेत्र करें मुनि
पाह तुं पांडव को जगतीं रे ' ९१४

स्रग्विणी

पुत्रपंडू वपू वर्ण तो कर्पुरी
एक जालीं मुखें लागलीं अंबरीं
चंद्रभाळीं जटाजूट माथा दिसे
मुंडमाळा गळां शेष माजी असे ९१५

व्याघ्रदिव्यांबरें खड्ग डौरो पहा
शूळ शक्ती धनुर्बाण बाहू दहा
ठेंगणें स्वर्ग पाताळ भेदी पदीं
आदिमाया कडे देखिली द्रौपदी ९१६

' बाप रे बाप रे ' व्यास राया करी
लोटला भूप तो पाय दोन्ही धरी
' धन्य जालों जगीं रूपनिर्धारणीं
अर्पि रे आत्मजा वंश-उद्धारणीं ' ९१७

भुजंगप्रयात

असो भूप दानीं निसंदेह जाला
वधू निंद्य तो वंद्य होऊनि ठेला

'उमा दान ज्याचें हरू पात्र दाना
जगीं धन्य तो पुण्य मेरू तुळेना' ९१८

असे शब्द होती सभे दीर्घ घोषें
चिदानंद तो दाटला पूर्ण तोषें
कथा भारतीं हे यथा-पुण्य आहे
म्हणे दास काशी सुधातुल्य पाहे ९१९

*॥ इति श्री द्रौपदीसैंवर विश्रांताध्याय सर्ग तेरावा ॥*

# सर्ग चौदावा

**श्रीकृष्णाय नमः**

स्रग्धरा

श्रीकृष्णार्चौनि रायें वर-सदन-पदीं
पूजिले बंधु पांची
रत्नालंकार वाहे नवल पटकुळें
दिव्य दिव्यांबरांचीं
बाशिंगें मोतियांचीं झळकति मुकुटीं
कांकणें रत्नकांचीं
अश्वीं अर्चौनि पांची मिरवित नृपती
पंक्ति हें पांडवांची ९२०

मालिनी

सुरनरसह शौरी शोभला पृष्ठिं पाहीं
अगणित घन वाद्यें वाजिलीं पार नाहीं
द्रुपदिसहित कौंती राजधामासि मानें
गजर करित नेल्या शूद्रसेनप्रधानें ९२१

स्वागता

दुर्गराज रचना कनकाची
गोपुरें झळकती खचितांचीं
चुंबिते गगन मांडवशाळा
सांठवी जगत आंत विशाळा ९२२

पंक्ति पंच वळिनें वर ठाले
अंत्रपाट धरिते द्विज जाले
अर्जुनाकरिं वधू कर वोपी
बंधु त्यासि करिती करसिंपी ९२३

भुजंगप्रयात

मधीं पार्थ भागद्वयीं बंधु चारी
जशा पंचमांगोळिका एक हारी
असे मध्यमा उच्च या माजि जाणा
तसा मध्य बंधू तदा पार्थराणा ९२४

हरा मध्यभागीं तिजा नेत्र आहे
म्हणोनी नरें भेदिलें यंत्र पाहे
वदे अंश गीतांतरीं पार्थ पाही
असो मंगळोच्चार केले द्विजांहीं ९२५

शार्दूलविक्रीडित

आले किन्नर देव ते दिगपती
देवांगना नृत्यती
ब्रह्माशंकर नारदू गणपती
व्यासादि साधू तपी
आले यादवराव आणि जगती
शेषादि पृथ्वीपती
जांवाई हर पार्थराज विजयी
कुर्यात्सदा मंगलम् ९२६

द्वारीं धर्मगुढी स्वधर्म उभवी
चौघीजणी तिष्ठती
वाणें देति रिधी निधी मिरविती
सिद्धी गृहीं वर्तती
चारी विक्रम भाट होउनि सभे
रायासि वाखाणिती
जांवाई हर पार्थराज विजयी
कुर्यात्सदा मंगलम् ९२७

पंडूचे सुत प्राण पंच असती
तद्‌वृत्ति हे द्रौपदी
क्रोधादी रिपु जिंतिले परिणिली
ब्रह्मा करी आरती

ना ना ते स्मर पंचबाण वरिते
लावण्यराशी रती
होतो योग जिवाशिवादि डुलती
कुर्यात्सदा मंगलम् १२८

ब्रह्मज्ञान श्रुती सवेद्पठणं
व्याकर्ण हो ज्योतिषं
वेदांगादिरहस्य तोयतरणं
चातुर्यतासेवनं
वाद्याभ्यासप्रबंधचापधरणं
नृत्यं तथा गायनं
विद्यानामचतुर्दशस्य निपुणं
कुर्यात्सदा मंगलम्[1] १२९

आतां सावध विप्रराज म्हणतो
सूलग्नसें बोलतो
वाद्यें सादवितोहि ऐक्य वदतो
एकात्मही कुर्वतो
राजा सार्थक दिव्यदान करितो
पुण्यासनीं बैसतो
वाद्यंत्रींसह सावधानसमयो
कुर्यात्सदा मंगलम् १३०

१ यांत फक्त संस्कृतचा आभास आहे. अर्थ नीट नाहीं. टिप्पणी पाहा.

इन्द्रवज्रा

ॐ पुण्य बोले गुरुराजवाणी
वाधावनी घाव पडे निशाणी
आनंद झाला अतिशाल सृष्टी
केली सुरेंद्रें वरि पुष्पवृष्टी ९३१

अमृतललिता

धन्य सुमांडव जे वर पांडव
नाचति तांडव मंगलमूर्ती
नारद किन्नर तुंबर सुस्वर
गाति मनोहर मंगलकीर्ती
अष्टहि सुंदरि घेति सु-भोंवरि
जेवि नभांतरिं विद्युत चक्रें
तल्लिन भूनर तल्लिन निर्जर
तल्लिनता धरिली हरिशक्रें ९३२

शिखरिणी

असो जालें पाणीग्रहण द्रुपदीचें अतिसुखें
करी कन्यादाना द्रुपद नृपती ब्राह्मणमुखें
सभे चौघे बंधू मग नमुनि देवासि बसती
वरक्रीडा वौलां सकळविध पार्था विलसिती ९३३

नृपें केलीं दानें विविध करिजे वर्णन किती
असो योजी पंक्ती मग कनकशाळे पुरपती
ऋषी राजे सर्वें यदुकुळपती आणि जगती
सुमंत्री सन्मानें सकळ बसवी भोजनवृती ९३४

कशीं वर्णूं अन्नें सुरवर सुधापान करिती
करूणा ये जन्मीं प्रभु निकट जेऊंचि म्हणती
रिधी सिध्दी जेथें सहित रसपूर्णा मिरविती
उणें कैचें तेथें त्रिभुवन करी तृप्त नृपती ९३५

स्वागता

मानपान सकळांसहि देती
कीर्तनें उपरि मंडपिं होती
पावला सकळही विधि वृध्दी
आइका मग कुरेश-कुबुध्दी ९३६

गुप्तहेर नगरांतरिं होते
चालिले चरित पाहुनि हो ते
वंदिला नृपति सन्मुख आले
'हे पते प्रकट पांडव जाले' ९३७

दूत शब्द नव्हती द्वय भाले
वज्रपावक उरांत विझाले

कर्ण कौरव समस्त मिळाले
द्रोण-भीष्म-विदुरादिक आले ९३८

ते विचार करिती कुरु नाना
बोलिले वडिल पांडव आणा
मानलें वचन हें सकळांसी
चालले द्रुपदराज-पुरासी ९३९

पावले सकळ मंडप ठायां
वेष्टिल्या हृदयिं पांडवकाया
अग्निघात चुकलाग्रजराया
मोकळी म्हुन सुयोधन धाया ९४०

चार वासर पुन्हा करवी तो
वारणीं वधुवरें मिरवी तो
जाहली सकळ लग्न विराजी
तिष्ठला करुनि पांडव राजी ९४१

शार्दूलविक्रीडित

केलें धर्मसमूखनासि वडिलीं
वंदूनिया श्रीहरी
विज्ञप्ती बहुतांपरी नृप करी
पादाब्ज दोन्ही धरी

न्यावे पांडव राणिवे पुनरपी
इत्यर्थ जाला असा
श्रीशौरी मग चालिला निजभरें
इंद्रप्रहस्ता कसा ९४२

राजा द्रौपद पांडवांसि समयीं
दायादिकीं आदरी
रत्नांची भरि मांदुसें बहुत तीं
ते दिव्य हेमांबरीं
शाळा रुक्मरथांचिया हय करी
लक्षान्त सालंकृती
संकल्पी शतपंच भीमनगरें
श्रृंगारदासी किती ९४३

पांची दिव्य सिहासनें सचवरें
छत्रातपत्रें वरी
वैडूर्यादि विचित्र चित्रपटही
संख्या कशी को करी
भेरी झल्लरि टाळ दुंदुभि तुरें
माही निशाणें वरी
हे दे पंचसहस्र उत्तम महा
सेनामुखींचे करी ९४४

शस्त्रें शक्तिलता रता असिलता
विद्युल्लता माधवी
चापें बाण भरोनि पंचरथ दे
पंचार्क जैसे भुवी
कस्तूरें हरिणें जवादिक शुनें
गौराणवृंदें मही
सुभीं शार्दूल सिंह राणमाहिषे
चित्ते तथा व्याघ्रही ९४५

रावे कोकिळ सारिका सुवचनी
मोरें मराळें तुही
सुस्वानें सिकरे सुबाज बहिरी
बाणे ससाणे कुही
चित्रें नृत्यचरित्र यंत्र पुतळ्या
नानापरी देखणी
दे श्रीद्रौपद भीम दाइज असें
पंडूसुतां आंदणीं ९४६

त्यानंते शिबिकाद्वयीं झळकल्या
श्रीद्रौपदी कौंतमा
पाल्हाळें परिचारिका मिरविल्या
सेना निघाली सिमा

गेले निर्जर दैत्य पन्नगपती
योगी मुनी आश्रमा
जाती सर्व महींद्र घेउन हरी
इंद्रप्रहस्तागमा ९४७

इन्द्रवज्रा

सेनासमुद्रें जिकडोनि जावें
शैलाचळांहीं तिकडे निजावें
जाल्या नद्या पोखरिणी सपाटा
केलें दळानें धरणीस पाटा ९४८

जे रानहस्ती हयराण होते
होऊनि ठाती हयराण हो ते
घेती खगाच्या भय भार जाती
इंद्रप्रहस्ता मग भार जाती ९४९

आले पुढें नागरसाववाणी
केले स्तुतीचे वरुषाव वाणीं
भेटोनि धर्में पुरवासियांसीं
'द्या रे म्हणे कर्पुरवास यांसी' ९५०

तूं धन्य तूं धन्य वदेति वाणी
सत्कार भाटां बहु दे सिराणी

होऊनि मायातुर ते विनेती
शक्रासि जेवीं सुर तेंवि नेती ९५१

केला महामंडप राजयानें
भद्रीं बसे यादवराज मानें
मिळोनि तेथं महिच्या नृपांहीं
धर्मासि केला अभिषेक पाहीं ९५२

वसंततिलका

रायाप्रती पृथक पाहुनि चार धर्में
केले अती निगुति राजनिती स्वधर्में
श्री मंडपीं भुवनमंडनभू विराजे
ते मांडिती स्तवन वंदन भूविं राजे ९५३

कामदा

दास तारणें दैत्य मारणें
हे क्रिया तुला सत्य सारणें
आणि दाविली व्यक्त भूवरी
धर्म तारिला कर्म-जोहरीं ९५४

श्येनिका

जोडलासि तूं असा जयाप्रती
धन्य धन्यते सुजन्म ये क्षितीं

पूर्ण जाहले मनोर्थ आमचे
देखिले तुझे पदाब्ज वाणिजे ९५५

शिखरिणी

स्तुती केल्या ऐशा असुप अवनीच्या नृपवरीं
दयाब्धी संतोषे पृथक सकळां गौरव करी
मणी माळा रत्नें खचित पदकें दिव्यवसनें
प्रभू दे सर्वांसी नमुनि निघती भूपवहनें ९५६

असे गेले राजे हरुषरस ठेऊनि वदनीं
करी लक्ष्मीपूजा तव द्रुपदजा राजसदनीं
पती जो लक्ष्मीचा वश तिज असे तोचि वचनीं
रिधी सिध्दी झाल्या मग सहचरी धर्मभुवनीं ९५७

शार्दूलविक्रीडित

श्रीकृष्णासि तदा निगर्व सदनीं
विध्युक्त पूजीतसे
द्रोण द्रौपद भीष्म आदि करुनी
पंक्तीसि योजीतसे
केले आदर मान गौरव बहू
दुर्योधनें द्रौपदा
आज्ञा घेउनि चालिले महिपती
ते आपुलाल्या पदा ९५८

ऐसे भक्त-विलास-रास करि हो
कैवारिया श्रीहरी
संतांचा निजसोयरा सम सखा
जो दासदुःखें हरी
केलें पांडव कोड गोड जगतीं
सत्कीर्ति व्याली नभा
राज्यीं स्थापुनि धर्मराज मग तो
आज्ञेसि मागे उभा ९५९

इन्द्रवज्रा

कुंती म्हणे 'तूं निज आत्मजांसी
कोणा प्रती रे निरवूनि जासी'
आते तुझे नंदन पांच पाही
या वेगळा मी क्षण एक नाहीं' ९६०

'जातों असें वो दिसतें जनासी
आहें परी मी त्वत्सुतांसि[1] पाशीं
निश्चित राहे कवतूक पाहे'
संतुष्ट कौंती मग होत आहे ९६१

१ 'त्व' शब्द ऱ्हस्व उच्चार

स्रग्विणी

आरती घेउनी द्रौपदी पातली
राउळी सांवळी मूर्ति वोंवाळिली
कर्पुरेंशीं विडा केशवें घेतला
बोळवी धर्मजी श्रीहरी चालिला ९६६

पावला द्वारका दाटि केली जनीं
हर्षल्या संपदा रुक्मिणी-भूवनीं
काय त्यानंतरें धर्मधामीं पहा
वर्तलें चोज अद्‌भूत मागें महा ९६३

शिखरिणी

तनू श्रीपांचाळी प्रतहिं मखकुंडांत निरवी
नवी काया माया करुनि निज ठायांत मिरवी
ऋषी-आज्ञापाळी पृथक पति पाळीसि फिरवी
वसे रात्रीं जेथें उपरि मन तेथेंचि थिरवी ९६४

मखाग्नी आरोपें विमल वपुवोपें उजळली
विजू जैसी अस्ताविण सदन-स्वस्थांत वळली
नव्हे कृष्णा जाया जागें भुवन-माया प्रकटली
स्वतेजें ब्रह्मांडोदर घट विभांडोनि नटली ९६५

कळा व्योमीं बारा माहिसि मजखा येक विलसे
शशी जाला तारावनिवर रवी तोक विलसे

अरातीनाराती सकळ समधाती दिसतसे
चुके ब्रह्मा वाणी गणित वदतांही दिस तसे ९६६

भुजंगप्रयात

नव्हे चित्रगुप्तासि आयुष्यलेखा
म्हणे सर्व देवा यमोपाय देखा
मिळौनी सुरीं प्रार्थिलें ब्रह्मयासी
उद्देलें क्षिती विघ्न शांतावयासी ९६७

शशी-सूर्य लोकीं विटंबूनि गेले
कसे चालती जे तुम्हीं धर्म केले
विधीलागिं चिंता पडे सत्यलोकीं
निघे नारदू मृत्युलोका विलोकीं ९६८

स्वागता

पावला त्वरित पांडव ठाया
भेटला मग युधिष्ठिरराया
पूजिला मुनि सिंहासनिं पाहे
हात जोडुनि उभा नृप राहे ९६९

शिखरिणी

ऋषी बोले धर्मा अशुभ तुम्हि कर्मीं न विटले
कशी एकी रामा करुनी रतकामा विनटले

विषाची हे वल्ली मधुर म्हुण सेऊनि उगले
तुम्ही आहां पाहा परि विषयदाहांत पडले १७०

भुजंगप्रयात

यदर्थीं कथा आइके येक राजा
निघालेति जे कर्म ऐसें कराया
दितीपुत्र होते सखे दोन्हि बंधू
तयां नाम सुंदोपसुंद प्रसिद्धू १७१

तिंहीं एक अंगुष्ठ केलें तपासी
सहस्रें दहा दैत्य दोघे उपाशी
प्रसन्न प्रजानाथ जाला तयासी
न व्हावा जगीं मृत्यु आम्हां द्वयांसी १७२

स्वागता

'आपणांत तुम्हि युद्ध कराना
सर्वथा तरि कदापि मराना'
लाधले वर धुरंधर ऐसा
बाणला हरुष त्यांप्रति कैसा १७३

स्रग्धरा

'प्राणाचे प्राण आम्हीं रण तरि न करूं
कल्पकाळीं स्वबंधू

पृथ्वीचा काय लेखूं प्रथम यम धरूं
इंद्रचंद्रांसि बांधूं'
हाकारा दैत्यराजे तळिमहितळिंचे
सर्व तेथें मिळाले
केली स्वर्गीं चढाई नभ दुमदुमिलें
वारधी उष्ण जाले ९७४

आले रे दैत्य आले सुर गजबजिले
मेरु मांदार भ्याले
प्रौढी कांहीं न चाले मिळुनि गुरुपदीं
मंत्र योजूं निगाले
देऊनी सत्त्व देवीं तिळतिळ रचिली
रत्नराशी तिळोत्मा
वर्णूं लावण्य तीचें तरि सुर भुलले
मोहिलें सूर्यसोमा ९७५

पंचचामर

वसंत देउनी सवें वसुंधरे तिलोत्तमा
सुरेश शीघ्र पाठवी अमित्रशासनोद्यमा
कुळाचळीं रिपूदळें समार्जिलीं नसे सिमा
प्रदेश पाहुनी वसंत शोभवी वनोत्तमा ९७६

बहूमतीसि त्या मुखें न वर्णवेल कानना
मधीं करी विलास गायनासि चंद्रिकानना

सुगंध गंध सूटला दळांत त्या विसंचला
सुरारि-बंधु बोलले ' वनांत संचरों चला ' ९७७

धरौनि हात मांडिला प्रवेश त्या सहोदरीं
अपूर्व देखिलें कसें विलोकितां वनोदरीं
निजौनि पक्षि राहिले कुरंग जाहले जमा
शिळा द्रवौनि वाहती मधीं उभी तिलोत्तमा ९७८

धरौनि माळ ते करीं उदीत होय लौकरी
पुढें प्रयाण जो करी पति प्रियेसि तो वरी
भुलौनि देहभावना सकाम दैत्यनंदना
मदें विरोध कंदना प्रवर्तले निकंदना ९७९

गदा धरौनि हस्तकीं मदें करौनि मस्तकीं
निरक्षिती समस्त कीं ऱ्हाटिल्या समस्तकीं
निजौनि दैत्य राहती अशुद्ध पूर वाहती
सुरांत जाय ते सती अमित्र भार नासती ९८०

वसंततिलका

सुंदोपसुंद शमले प्रमदा-प्रयोगें
धर्मा तुम्ही निसुर कां रतिसौख्य भोगें
घंटालई मृग भुलोनि मरोनि गेले
दीपीं पडौनि उपडौनि पतंग मेले ९८१

गंधें मधूप शफरी मरती भुकेले
तैंसे तुम्ही रतिमनोरथ काय केले
होईल विघ्न न कळूनि तुम्हांसि जेव्हां
मानाल सत्य विषयार्थ अनर्थ तेव्हां ९८२

मालिनी

परिसुनि ऋषिवाणी धर्म कंपीत जाला
विनवित ' मुनिदेवा शब्द आम्हांसि आला
परि तुम्हि ऋषिराया ज्या प्रतीपाद्य कर्मा
विहित करुनि द्या हो आचरूं त्या स्वधर्मा ' ९८३

' वचन शिरिं धरावें तैं पहा धाक दावा
जइं मुनि न करावें तैं महा पाप लावा
अजुनि तरि मुनींद्रा कर्मबुद्धी उपेणे
मथित करुनि देणें निस्तरूं जन्म जेणें ' ९८४

' नृपति वरुषगर्भी पंचपाळीसि बांधा
तदुपरि मग नोहे सर्वथा विघ्नबाधा
गणित दिवस बारा मासही दोन पाहे
प्रमित करुनि दारा एक धामींच राहे ' ९८५

इन्द्रवज्रा

'येकान्त त्याचा दुसरा विलोकी
तो दीर्घ दोषी तरि होय लोकीं

तीर्थें करावीं मग सर्व तेणें
प्रायश्चितें होइल मुक्त येणें ' ९८६

आज्ञा धरी मस्तकिं भूपती तो
गेला मुनी ब्रह्मपदाप्रती तो
कृष्णा सती तेवि गती प्रमाणें
वर्षें करी पंच मखोपन्हाणें ९८७

तेणें महातेज कळा निवाली
पूर्वीं जशी सृष्टि तशीच जाली
श्रीद्रौपदीसैंवर पूर्ण आतां
कर्ता रमानाथ विधीविधाता ९८८

शार्दूलविक्रीडित

श्रोतेनो परिसा यथार्थ विलसा
काव्याचिया सौरसा
माझा ज्ञान ठसा रवीविण जसा
गर्भांध राहे तसा
नाहीं पुण्यपसा कथाब्धि-उपसा
होईल का माणुसा
कोणें ग्रंथ रसासि आणुनि असा
संपूर्ण केला कसा ९८९

शास्त्रार्थादि मथावसासि अरथा
नाहीं मती सर्वथा

अर्थाचा उलथा वितर्कुनि यथा
योजूं कसें भारता
नाहीं भक्तिपथासि लोटुनि रथा
म्यां आक्रमीलें तथा
कोणें हे त्रिपथा रचौनि वितथा
संपूर्ण केली कथा ९९०

नाहीं पिंगळ पाहिलें नि अजबा
सारस्वतांचा लिपा
नाहीं कर्मजपादि धर्म सलपा
केलें न गेलों तपा
ऐसा अंधकुपांत दीपमलपा
दावूनि काव्यामुपा
कोणें हा रस पावऊनि पडपा
संपूर्ण केली कृपा ९९१

कैसें संस्कृत पद्य एक नुपजे
छंदोपछंदादिकें
हे निभ्रांत हरी-दया म्हुण जया
गेली कथा कौतुकें
कैसी रे तुजला दया कवण तूं
कोणें गुजा वोपिलें

तुम्ही संतमहंत मायपितरें
सांगूं तुम्हां आपुलें ९९२

श्रीवंशाधिपती निशारमण तो वृत्ती स्वदेशाननी
सोळंखी कुळधर्म श्रीपति कुळस्वामी रुद्रलोचनी
भारद्वाज सुगोत्र जाण जननी ते अन्नपूर्णा असे
तात श्री अवचीतराव अवनीं प्रौढीप्रतापें वसे ९९३

पितृराज तयासि भक्ति पढिये श्रीकेशवाची सदा
ठेवी श्रीपति पौरनाम नगरा सेवी हरीच्या पदा
वृत्तीपाळण सैन्यपाळण करी शत्रू रणीं मोडिले
तेणें विग्रह वाढला मग जगीं वैरी बहू जोडिले ९९४

त्या दुःखें त्यजिला निवास जनकें गोपाळ नामें गिरी
बांधूनी बळकाविला नृपदळें चालौनि आलीं वरी
संग्रामीं गड नागवे मग तिहीं विश्वासघातक्रिया
केलें बंधन संकटांत पडिलों हा हा हरी सावया ९९५

बंधू त्र्यंबकराज तात विषयीं होते सवें सोयरे
आतां काय उपाय घाय न चुके दिल्येंद्र मारील रे
ऐशा घोर भवार्णवांत जनकें बोधासि आरोपिलें
ध्यारे ध्या हरि सांवळा तिं वचनीं सर्वांतरीं लागलें ९९६

गेले दोष मनांत तोष भरले श्रीकृष्णघोषें पहा
कैसें बंधन मुक्त युक्त हृदयीं आनंद जाला महा

श्रीकृष्णें निजरूप दावुनि मला स्वप्नांत आलिंगिलें
प्रेमाचा पुर फूटला मग मुखीं वक्तृत्व हें लोटलें ९९७

स्वानंदें जिविंच्या गुजासि वदलों मानाल हो अन्यथा
जालों पावन मी पतीत पतनीं पितृप्रसादें यथा
त्या पितृपतिचें उतीर्ण जगतीं होऊं कसें सज्जना
जेणें देउनि जन्मकर्म नयनीं केलें परेशांजना ९९८

देतो जन्म पिता परंतु जनकें नाहीं गती दीधली
नाहींही म्हणतां नये महितळीं कोणें असे शोधिली
वक्तृत्वामुळ हें म्हणोंनि वदती हे सज्जना वोपिली
आतां सारविचार फार वदणें राहो कथा संपली ९९९

भुजंगप्रयात

तुम्हीं संत केला कृपें ग्रंथ सर्ता
गुरुत्वें गुरू श्रीपती सर्व कर्ता
नमूनी तुम्हां ज्ञानवंतां महंतां
लडीवाळ मी मागतों एक आतां १०००

मऱ्हाटी टिका देशभाषा मऱ्हाटी
मऱ्हाटी कुळी जन्मवाणी मऱ्हाटी
गुरुग्रंथही सेविला म्यां मऱ्हाटी
करावी क्षमा न्यूनते पूर्णदृष्टी १००१

मालिनी

विधिसुत-सुत-साक्षी-पल्लवी नाम होता
निशिवर-सुतवारीं श्रावणीं शुद्धभूता
वचन-सुमन-राशी तद्दिनीं पूर्ण जाली
अवचितसुत काशी दास साष्टांग घाली १००२

शार्दूलविक्रीडित

ज्या नामें पृथिवी समूळ तरली[१]
तें नाम वाचे वासो
ज्या रूपें सगरात्मजा समजली
तें रूप ध्यानीं असो
ज्या पादें फणि काळिया स्परशिला[२]
तो पाद भाळीं वसो
ज्या हस्तें गिरि (गो) वर्धना धरियला[३]
तो हस्त माथां बसो १००३

हा सारांशविचार सार दुसरें
नाहीं जगीं माणुसा

---

मु. मधील श्लोक
१ ज्या नामें गणिकात्मजा समजली तें०
२ ज्या पादें विधिची सुता स्परसली०
३ ज्या हस्तें गजईन्द्र सोंड धरिली०

शास्त्रें वेदविवेक शोध मुनिचे
शेषादिकांला पुसा
बह्मा शेखर वासवादि करुनी
हा सर्व ध्यानीं ठसा
काशीदास निवास कृष्ण चरणीं
दासामनीं भर्वसा १००४

*॥ इति श्रीन्ममहाभारते आदिपर्वप्रकरणे श्रीमद्द्रौपदी सैंवर विश्रांताध्याय सर्ग चतुर्दश ॥*

# टिप्पणी

## श्रीसद्‌गुरु

ग्रंथारंभीं ' मंगल ' आवश्यक असतें. संस्कृत साहित्यांत मंगलाचरणाचें महत्त्व अनेक तऱ्हांनी गाइलें आहे. मराठींत प्राचीन ग्रंथकार ही प्रथा कटाक्षाने पाळतात. प्रस्तुत कवीने प्रथम विघ्नहर्ता ' श्रीगणराज ' व ' ब्रह्मसुता ' सरस्वती यांचा आशीर्वाद मागून तिसऱ्या श्लोकांत काव्यांतील कथानकाची सूचना बीजरूपाने दिली आहे.

( १ ) टिप्पणींतील अंक श्लोकनिदर्शक आहेत.

( २ ) हस्तलिखितांत प्रायः शब्द सुटे सुटे लिहिण्याचा प्रघात नसतो. म्हणून या ग्रंथांतील श्लोकांच्या पदपाठाबद्दल मतभेद होणें अशक्य नाही हें रसिकांनी ध्यानांत ठेवावें.

१ **श्रीगणराजधिराज** – श्रीगणराज + धिराज ( अधिराज-सार्वभौम ). **मनांतरी** – मनांत. **माज** – वृद्धि पाव. **विराज** – प्रकाशमान हो. **नवाज** – रक्षण कर. **महराज** – महाराज. **सिरताजन** – सिरताज, मुकुट. **भाजकी** – भजक, भक्तजन. **गाज** – आविर्भूत हो. **कविकाजगतीसी** – कवीच्या कार्याच्या प्रसाराला. **गंडन** – गंड – गंडस्थल. **मंडन** – शोभा. **रसराजरति** – श्रेष्ठ रसांचें प्रेम, शृंगारप्रीति.

२ **ब्रह्मसुता** – ब्रह्मदेवाची कन्या, सरस्वती. **सिनते** – शिणते, दमते. **वीणवते** – विनविते. **रसखाणीं** – प्रेमाच्या किंवा शृंगारादि रसांच्या साठ्यांत, समृद्धींत. **वाणी** – हे सरस्वती देवी. **निज** – आत्मस्वरूप. **निदानीं** – संकटांत. **उलथा** – उलथी कर, वर्षाव कर. **विचरोत्तरीं** – विचर + उत्तरीं – माझ्या शब्दांत ( उत्तरीं ) म्ह. काव्यांत विचर, संचार कर. **सज्जनध्यानीं** – सज्जनांच्या चिंतनांत.

३ **आदि्** – आदिपर्व. महाभारताच्या आदिपर्वांत प्रस्तुत कथा आहे. **सत्कृत** – सज्जनांना मान्य झालेला. **संस्कृत** – संस्कृत भाषेंत. **हे वचनाकृत** – परंतु माझ्या या काव्याची आकृत – आकृति – रूप. **प्राकृत** – मराठी. **वाग** – वाचा. **शरासन** – धनुष्य. **रसो** – रस. **गुण-दूषण** – काव्यगुण व काव्यदोष. **गुणि** – धनुष्याच्या दोरीवर. **धरा** – पृथ्वी. **धनुर्धर** – धनुष्यधारी. **अनचि** – अन्य, दुसरा. या चरणांत कथेंतील बीज आलें आहे.

४ **जन्मेजय** – जनमेजय; अर्जुनपुत्र. अभिमन्यूचा नातू. याचा पिता परीक्षित राजा सर्पदंशाने मृत झाल्यामुळे याने उत्तंक ऋषीच्या आदेशावरून सर्प-सत्र केलें. **मुनिसि** – वैशंपायन नांवाच्या ऋषीस. हा व्यासाचा शिष्य, ह्याने जनमेजयास महाभारत सांगितलें. **सैंवर** – स्वयंवर. **द्रुपद** – पांचाल देशाचा राजा. द्रोणाचा गुरुबंधु. यास द्रौपदी कन्या व धृष्टद्युम्न, शिखंडी इत्यादि सहा पुत्र होते. याच्याकडे द्रोण धनयाचनार्थ गेला असतां त्याचा याने अपमान केला. म्हणून यास द्रोणाने अर्जुनाकडून बांधवून आणविलें व त्याचें अर्धराज्य घेऊन त्यास सोडून दिलें. **कुसुमायावति** –- कुसुमा-वती – द्रुपदराजाची राजधानी. छंदाच्या सोईसाठी ' कुसुमावती 'मधील ' मा ' हें अक्षर दोन मात्रांनी ( ऽ ऽ ) लांबविलें असावें. लेखकांनी कुसुमा ऽ ऽ वतिं लिहितांना ऽ ऽ बद्दल ' या ' अक्षर घातलें असेल असें म. म. पोतदार म्हणतात तें योग्य वाटतें.

५ संदर्भकथा १ पाहा. **नगजा** – पर्वतापासून जन्मलेली पार्वती. **वहिलें** – प्रथम.

६ **द्रुष्टद्युम्नु** – धृष्टद्युम्न. **शीखंडी** ( शिखंडी ) – काशीराजाच्या तीन कन्या अंबा, अंबिका, अंबालिका यांना स्वयंवरकाळीं भीष्माने जिंकून आणल्या. पण अंबेने शाल्वराजास आधीच मनाने वरल्याचें समजल्यावरून तिला सोडून दिलें. पुढे शाल्वहि तिला पत्करीना. शेवटीं भीष्मावर रागावून त्याच्या नाशार्थ तिने उग्र तप केलें व शिखंडीरूपाने द्रुपदाच्या यज्ञांत ती उत्पन्न झाली. द्रोणापासून धनुर्विद्या शिकून पांडवांच्या बाजूने लढला. यास पुढे करून अर्जुनाने भीष्मास जर्जर केलें. स्त्रीजात म्हणून भीष्माने याच्यावर शस्त्र धरलें नाही. लग्न होईपर्यंत हा स्त्री होता. पुढे एका

यक्षास स्त्रीत्व देऊन हा पुरुष झाला होता. अश्वत्थाम्याकडून अंतीं मारला गेला. **सौरी** – शौरी; शूर नांवाच्या यादव कुळांत जन्मलेला, श्रीकृष्ण.

७ **द्विजवर्धन** – ब्राह्मणश्रेष्ठ. **ज्येष्ठमुख** – ज्येष्ठ मुलगा धृष्टद्युम्न याच्या तोंडाकडे पाहून.

८ **द्रोणदृष्टदमनू** – द्रोणाच्या बाबतींत धृष्टद्युम्न असा. धृष्टद्युम्न म्हणजे – धृष्टत्वादत्यमर्षित्वाद् द्युम्नाद्युत्संभवादपि । धृष्टद्युम्नकुमारोऽयं द्रुपदस्य भवत्विति ॥ आदिपर्व १६७-५३ ॥ अर्थ – धीटपणामुळे, अत्यंत असहनशीलतेमुळे आणि ( कवचकुण्डलादि ) सहज धनामुळे द्रुपदाचा हा कुमार धृष्टद्युम्न ( नांवाने प्रसिद्ध ) होवो.

**निमाया** – मारण्यासाठी.

११ **नरवर्धन** – नरश्रेष्ठ अर्जुन. **ऐरावती** - कथासंदर्भ २ पाहा.

१२ **शूद्रसेन** – द्रुपदाचा प्रधान.

१३ **सबंधु** – बंधूंसह. **घटितार्थ** – वधूवरांच्या पत्रिकांचा मेळ, विवाहनिश्चिति.

१४ **नरदेव** – राजा.

१५ **मखरत्नराणी** – यज्ञांत उत्पन्न झालेली उत्कृष्ट स्त्रियांची राणी. जातौ जातो यदुत्कृष्टं तद् रत्नमभिधीयते ।

१७ **धृतराष्टरासी** – धृतराष्ट्रासी. ( स्वरभक्तीचें उदाहरण ) **इंद्रप्रहस्त** – इन्द्रप्रस्थ. ( उच्चारसुकरतेसाठी थ मधील ह वर्ण आधीं आला. व्यंजनभक्ति )

१८ **नवटे** – वाटलें नाही. **वरुणावती** – वारणावत, तत्कालीन एक प्रसिद्ध नगरी.

१९ **मठ** – घर. **अभाळभाळ** – आकाशाच्या डोक्यापर्यंत.

२१ **साजणें** – सहा जण.

२४ **बिजें** – आगमन. ' **हेडंब** ' मधील ' हे ' ऱ्हस्व-उच्चार.

२५ **पर्णिली** – विवाह केला. हेडंब उच्चार वरीलप्रमाणे.

२६ **हित** – कल्याण करणारा. **गयंद** – मोठा हत्ती.

**गुढरा** – गुढर गुढार ( सं. गुड – हत्तीचें कवच; का. गुडार. तंबू )

हत्तीचें खोगीर, हौदा, अंबारी.
**पांखरणें** – पसरणें, उभारणें.

२७ **अभरवा** – आभारवा – उपकाराच्या ओझ्याचें दडपण आणा. **नकरा-करातें** – काय करावें व काय करूं नये तें सर्व. **मकराकर** – समुद्र.

२८ **धर्मागती** – धर्मासंबंधी घडलेली गोष्ट.

२९ **कुमातकरणी** – घडलेली वाईट गोष्ट.

३० **त्राह्य, त्राह्य** - त्राहि, त्राहि; ' नको, नको ' या अर्थाचे उद्गार. ' त्राहि ' मूळ अर्थ ' रक्षण कर. ' **चंड** – प्रचंड.

३२ **कुरेश** – कुरु + ईश. कौरवांचा राजा. **तक्षक** – साप.

३३ **सुतार्पणें** – सुता (मुलगी) + अर्पणें.

३४ **हळाहळ – शूळपाणी** – हलाहल विष भक्षण करणारा शंकर. **ज्वाळ-वाणी** – आगीसारखें.

३६ **जळनास** – जळेनास. **हृदहळाहळ** – ज्याच्या अंतःकरणांत विष भरलें आहे असा. **कुळपारधी** – कुळाची पारध–नाश करणारा.

३७ **दृग** – डोळा. **तोय** – पाणी.

३८ **जल्प** - बोल. **कींव –करुणामय** – केविलवाणी.

३९ संदर्भ कथा ३ पाहा.

४० **निमाले** – मृत्यु पावले. **कृष्णार्चिला** - कृष्ण + अर्चिला – पूजिला.

४२ **मंडप** – दरबार, सभा.

४३ **काळविलसा** – काळविलास–काळाची क्रीडा, विलसा - विलास ( अ ची जागापालट ). **पवाडे** - वाढतो. **राजलाजलतिका** – राजाला वाटणारी लज्जा हीच कुणी वेल.

४५ **सुढाळ** – सुरचित. **वाजी** – दवंडी, जाहीर खबर. **चातुरंग** – चतुरंग. रथ, वारण ( हत्ती ), वीर ( पायदळ ), वाजी ( घोडे ).

४६ परमेश्वराच्या ( श्रीकृष्णाच्या ) दर्शनलाभाला सात्त्विक गुण मिळविले पाहिजेत व तामसी गुण त्यागिले पाहिजेत. सात्त्विक गुण–**धीरत्व–भावगहनत्व** – ( निरतिशय भक्ति ), **महत्त्व** ( औदार्य ), **मानू** – ( स्वाभिमान ), **संतत्व, सत्त्वपरमत्त्व**--( परमसत्त्व ), **प्रमाणू** ( श्रद्धा ).

४७ **वैराग्य इ. छंद** – ध्यास. तामसी – गुण. **कुरुकंक** – कुरु ( उपाध्याय ),

कंक ( वेषधारी ) दांभिकपणा. **कुडा** – कुडाभाव, कपट. **कलशु** – क्लेश ( कलेष स्वरभक्ति ).

४९ **परेखतांचि** – प्रेक्षतांचि, पाहतांच ( प्रेक्षतां – परेखतां – स्वरभक्ति ).

५१ **ढिसाळा** – मोठमोठ्या. **पालाण** – खोगीर, आच्छादन.

५३ द्वारकेला पद्म-कमळ म्हटलें आहे.

५४ **शक्रावती** – अमरावती. **निर्जर** – देव.

५५ **ताळमाळां** – ताडमाडांनी. **जन** – समूह.

५६ **राजमानें** – राजाच्या मानाने. **हेमबद्ध** – सोन्याने मढविलेल्या.

५७ **रहाटांतरें** – रहाटागणिक. **लाग** – दाटी.

५८ **स्वर्ग-वारांगना** – अप्सरा.

५९ **विहंगम्** – विहंगम. ( उच्चारानुसार अंत्य म व्यंजन ) **हिळे-पिंगळे** – पक्षिविशेष.

६१ **नराकारला** – नराचा आकार घेतला. नराकारपासून नामधातु नराकारणें.

६२ **विप्रसिंधु** – वि + प्र + सिंधु – विशेष असा महासागर. विप्र + सिंधु असाहि पदपाठ शक्य आहे.

६४ **द्रुमोदार** – द्रुम + उदार – भव्य वृक्ष. **अतिक्राळ** – अति विक्राळ.

६५ **कनकभूखचितें** – सोन्याच्या भूमीने युक्त.

६६ **जगत** – जगत्. **कुरवंडी** – ओवाळणी.

६७ **व्यस्त** – वि + अस्त – चारीबाजूंस पसरलेलें. **कैवल्यकेणें** – मोक्षरूपी माल

६८ **दुर्गीरहीं** – कठिण ठिकाणीं वा गुप्त स्थानांत. वासनाहि विनाश रिघे (रिघूं ) ना शके.

६९ **द्वारभाळ** – दरवाजाचे वरचे भाग. **अभाळ** – आभाळ. **दुर्गशाळ** – प्रचंड किल्ले. **केत** – झेंडे. **अंबर** – आकाश आणि वस्त्र.

७० **तुंबळांगणीं** – तुंबळ + अंगणीं ( अंगणांत ). **आंकणीं** – ताब्यांत.

७१ **सुपर्ण-पक्ष** – गरुड. **लालसा**–इच्छा.

७२ **राचिला** – लेप केला.

७३ **कामावतारी** – स्वेच्छेने अवतार घेणारा. **धूर्** ती-मंडपाचा तो अग्रभाग.

७४ **ज्वाळमाळा** – चकचकणारा. **चंद्रढाळा** – चंद्रासारखी प्रकाशणारी.
७५ **ते** – द्रुपद. **प्रमाण** – मान्य.
७८ **जगतमाया** – जग निर्माण करणारी आदिशक्ति ( रुक्मिणी ).
**कणुनि** – आकर्णुनी – ऐकून. **दिव्य-दानी** – मोक्षसुख देणारा ( कृष्ण ).
८० **गुह्याशाळा** – गुप्त जागा, एकान्त.
८१ **उच्चारिजे** – उच्चारिजे. **गुजांतरीं** – गुज + अंतरीं ( मनांत ).
**सुतार्जुनासि** – सुता + अर्जुनासि. **म्यांर्पिली** – म्यां + अर्पिली.
८३ **स्वभू** – प्रभु, स्वयंभु. **वर्मकाळिमा** – वर्मी लागलेला काळेपणा ( दुःख ).
**विचारला** – ध्यानांत आणला.
८४ **कपिध्वज** – अर्जुन. **वांचलेसती** – वांचले असती.
८८ **साकर्णिले** – बोलावून आणिले.
८९ **मायाजनकतनया** – मायेने उत्पन्न झालेली मुलगी ( द्रौपदी ).
**अनळजा** – अग्नींतून जन्मलेली.
९० **परिस**–सारखी, ऐक. **ताळे–माझ्या**. या ठिकाणीं तिनी ताळे–तिन्ही लोक.
९१ **रमणारती** – रमणा + आरती.
९२ **क्षेम** – आलिंगन. **माया** – आदिशक्ति ( द्रौपदी ). **करमाया** – क्रीडा करावयास.
९३ **असमानी** – अनुपम. **सर्वस** – सर्वस्व. **सिराणी** – समाधान.
९५ **भीमदूतदळ** – भीम + दूतदळ. दूतांचा मोठा समुदाय.
९७ **हाटकी** - सोनार.
९९ **बनकरी-वनहारिका** – उद्यानपालिका. **स्मरकारिका** – मदन निर्माण करणाऱ्या, प्रेमभावना उत्पन्न करणाऱ्या. **निरज** – धुळीविरहित.
**नवनीरज** – नुकतींच फुललेलीं कमळें.
१०० **तमाळ** – तमालवृक्ष. यांतील कल्पना काव्यमय आहे.
१०१ **मकरंद** – मध. **समिर** – वारा.
१०२ **दाही** – दाह. **सारस** – ( श्लेष ) पक्षिविशेष, कमळ.
**मार्जे** – मध्ये, **माजे** – माजतें.
१०४ **मंडपकारक** – मंडप तयार करणारे.

१०५ **वितळातळ** – पाताळ. **ताळिणी** – ताळे – मजले असलेली. **कळपेखणी** – यंत्रामुळे प्रेक्षणीय.

१०६ **गवाक्ष** – छिद्र. **पांचिबंधें** – पांचहि बाजूला केलेलें बांधकाम.

१०७ **अलघू** – जड. **हिंदोळविले** – टांगले. **गोत्रा-शिरीखा** – पर्वताच्या शिखरावर असावे तसे (शिखर-शिरीख – वर्ण – विपर्यय किंवा शीर्ष-शिरिख). **पेरोजादि** – हे सर्व रत्नांचे प्रकार. **पुक्ष** – पुष्कर ( पुष्क-पुक्ष - वर्णविपर्यय व र – लोप )

१०९ **अध्वर** – यज्ञ ( स्वयंवरयज्ञ ). **वाणी**–सारख्या.

११० **झुकार** – झुंबर.

१११ **पाकधाम** – स्वयंपाकघर.

११३ **कारक** – काम करणारे

११४ **वित्पती** – उत्पत्ति, उभारणी.

११५ **मुडे** – लोडें, तक्के. **आइति** – तयारी.

११६ **गाढेंगुढें** – गुप्त, समजण्याला कठीण ( गाढ – अगाध; आद्यवर्ण लोप )

११७ **पयराशी-कुमरी** – समुद्राची कन्या – लक्ष्मी.

११८ **रारायंत्र** – रारा – मंत्र. गुप्त मंत्राच्या साहाय्याने निर्माण केलेलें यंत्र ( मत्स्ययंत्र ). **मृदुवन** – मऊ मऊ.

११९ **मुळपत्र** – निमंत्रणपत्र.

१२० **श्रीइंदिरीं** – श्रीलक्ष्मीशीं.

१२३ **प्रचळवी** – वेगाने चालव.

१२४ **श्लोक** – कीर्ति. **आसाधारण** – असाधारण ( छंदाच्या सोईसाठी अ चा आ ). **भीमार्जिला** – मोठ्या प्रमाणांत आरंभिला.

१२७ **निरवीली** – स्वाधीन केली. **हलधर** – बळराम. **गंभिरविणे** – (गंभीर पासून क्रियाधातु ) गंभीरपणें चालविली.

१२८ **उद्धव, अक्रूर, सात्त्विक** – ( कृष्णाचे अनुयायी ), **पुष्ठि** – पृष्टीं, मागील बाजूस. **महारथी** – ( दहा हजार योद्धयांशीं एकटा लढणारा ). अत्यंत शूर योद्धा.

१२९ **चळथा** – टोळी, समूह. **मंथर** – मंदरपर्वत ( समुद्रमंथनप्रसंगीं मंदर रवीसारखा; मंथनाचा संबंध आल्यामुळे मंदराचा मंथर झाला हा

सादृश्याभास ( False Analogy ) ( किंवा उच्चारसौकर्यासाठी द चा थ झाला. )

१३० **रविरंग** – सूर्यप्रकाश. **राजे** – शोभते. **वाहिनी** – सेना. **गिरी गर्व०** या चरणांत अत्युक्ति आहे.

१३१ **पांचाळ** देशाबद्दल कवीची कल्पना जरा विचित्र आहे. पांचाळदेश इन्द्रप्रस्थाच्या पूर्वेस, एक दक्षिण पांचाल, दुसरा उत्तर पांचाल. या श्लोकांत कृष्णाचा मार्ग सौराष्ट्र, गुर्जर देश, सह्याद्रि ते गोदावरी असा दिला आहे. पांचाळ नांवाचे लोक दक्षिणेंत राहतात यावरून कदाचित् कवीला हें सुचलें असावें. कुसुमावतीचें नांव कलियुगांत **खांदार** ( कंदाहार ? ) झालें तें गाव कोणतें ? नांदेड जिल्ह्यांत कंधार हें प्राचीन गाव आहे तें असेल का ?

१३२ **ढालागणित** – ढाला + अगणित.

१३४ **सुखासन** – पालखी. **नागवाहनी** – हत्ती हेंच वाहन.

१३५ विविधव्यवसायी कोण कोण होते तें पाहा. **चाटे** – कापडाचे व्यापारी, **साव** – सावकार, **उदमी** – व्यापारी, **पांडे** – कुलकर्णी इत्यादि वतनदार. **हडपी** – विडे करणारे ( कोकणांत न्हाव्याला हडपी म्हणतात. ). **श्रीपाद** – संन्याशांतील विशिष्ट वर्ग. **तीर्थाटणी** – तीर्थयात्रा करणारे. **निजध्यासनी** – परब्रह्माचें सतत चिंतन करणारे योगी.

१३६ **जंगम** – विशिष्ट शैवपंथी साधु. **सेवडे** ( शेवडे ) – गोसावी. **आरवें** – आवाजानें.

१३८ **पवळी** – पावळीं – छपराचें टोक किंवा भिंत. **दारा** – ( मूळ अर्थ पत्नी ) येथे स्त्रिया ( भाषाशास्त्रांतील अर्थप्रक्रियेंत अर्थविस्तार हा नियम ). **विधिलय पदपद्मं** – ज्या ठिकाणीं सर्व विधि ( शास्त्रें ) लय पावतात अशीं चरणकमलें म्हणजे श्रीकृष्ण. विधीचा अर्थ ब्रह्मदेव असाहि करतां येईल.

१४० **वेंधला** – चढला. **कुकुर** – यादव.

१४१ **षोडशोपचार** – आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा, प्रदक्षिणा-नमस्कार, मंत्रपुष्प हे पूजेंतील सोळा विधि. **धायतों** - तृप्ति होईपर्यंत.

१४२ **स्तवनादरी** – स्तवन + आदरी. **हरिखे** – हर्षे. ( स्वरभक्ति; संस्कृत ष् बद्दल प्राकृतांत ख् )

१४४ **रतिरूप** – अत्यंत सुंदर. **सुधा०** – अमृतपानाचें सुख.

१४५ **दिव्यदानोदयीं** – स्वर्गीय दानाच्या वेळीं ( विवाहवेळीं ).

१४६ **पालाणितो** – भरून टाकतो.

१४८ **वऱ्हाड-काम** – लग्नाच्या वेळचीं कामें.

१४९ – १५० **भाव–सात्त्विक** – प्रेमळ, सात्त्विक नांवाचा यादव. **सारण, सात्यकी, चक्रज** हे यादव. **विखार** – साप.

१५१ **चाउरी** – ( चावर ) चौरंग, उंच आसन.

१५२ **निगम-हरणू-प्राण-हरिया** – कृष्ण ( संदर्भकथा ४ पाहा ).

१५४ **धात्रिका** – पृथ्वी.

१५५ **हस्तनाकृतपुर** – हस्तिनापुर – हास्तिपुर; सोमवंशीय पुरुकुलोत्पन्न हस्तिन् किंवा हस्ति या राजाने वसविलेलें नगर. दिल्लीच्या आग्नेयेस गंगेने वाहून नेलें म्हणून नामशेष. **कुरुपति** – दुर्योधन. त्याचा स्त्रैण स्वभाव चौथ्या चरणांत आहे.

१५७ **सायुज्य०**– मोक्षाच्या आनंदाचें स्थान.

१५८ **घोषवारें** – घोष करीत.

१५९ **अध्वरासि** – अग्नींत, लाक्षागृहांत.

१६० **मखजा** – द्रौपदी.

१६१ **सेनासिले** – सैन्य तयार केलेलें ( सेनापासून सेनासणें, नामधातु. ) **संजुति** – संयुति – एकत्र आलेले, एकत्रित.

१६२–६३ **त्यानंतें** – त्यानंतर ( छंदाची सोय, अन्त्य र लोप ). **दंडी** ( दांडी )– शेपूट. यानंतर घोड्याचें वर्णन आलें असून तत्कालीन घोड्यांचे विविध प्रकार कवीने उल्लेखिले आहेत. ( नारायण हरि तुळपुळेकृत ‘ अश्वपरीक्षा ’ हें मराठी पुस्तक व ‘ शालहोत्रसंग्रह ’ हा हिंदी ग्रंथ यांच्या आधारें कांही प्रकारांचें विवेचन पुढे दिलें आहे. ). **सारंगा** – विविध रंगांचे. **जरदे** – पिवळट-करड्या रंगाचे. **कुमाइत** – जो तांबडा सकळ वर्ण विशाल डोळे । दांडी अयाळ गुडघे पदकर्ण काळे । जाणा कुमाइत तुरंगम तो बळाचा । देई रणांत यश तो गुण घ्या तयाचा ॥ **पंचाक्षरीकल्याण** –

पंचकल्याण : नसे खोडि जो नेटका एक रंगी । मुखीं चौपदीं शुभ्रपट्टा अभंगीं । असे पंचकल्याण संतोष सांगे । घरा आणुनी तो सुखें बांध पागे ॥ **माने** – 'ग्वालिआरिका मानी' असें 'शालहोत्रसंग्रह' पृष्ठ ३५ वर आहे. तो हा असावा. **मोर समंद बोर** ( ? ). **तुरकी** – ज्याची अयाळ मृदु लांबवरी विलासे ॥ दांडी अयाळ सडक चामर घोंस भासे ॥ दोनी फुटे सघट ठोंबस खूर जाणा । चाले विशेष तुरकी पळतां थकेना ॥. **चालेति तोयावरी**–पाण्यावर चालणारे–या घोड्यांना "आभा" हें नांव आहे. चाले तुरंग उदकावरि शुभ्र आभा । वायूसमान पळतो न दिसेचि ऊभा । भासे उभा बहुत उंच नसे रुपाचा ॥ भिंतीवरून उडतो बळवंत पांचा ॥ **गंगावर्ण विशाम** कर्ण उजळे यालाच **श्यामकर्ण** म्हणतात. सर्वांग शुभ्र बहु सुंदर कान काळे । विख्यात दे यश मनोगतिनेचि चाले ॥ तो श्यामकर्ण गुणवंत निधान घोडा ॥ नाहीं तयास नवखंड महींत जोडा ॥ **कच्छी** – कच्छ प्रांतांतील. **विराखी** = इराखी = मेसापोटेमियांतील. **तुरी**–घोड्याचा प्रकार ( ? ) अगर तुरग शब्दाचें संक्षिप्त रूप. **लाख्या** – लाखेचे अलंकार. **दर्पणपाखरा**. लहान लहान आरसे लावलेल्या झुली. **तुमे**–तुरे. **जीन सडका**–खोगीर लगाम.

१६४ **बाजबहिरी** – बहिरी ससाण्याप्रमाणे. **उड्गणें** – उडुगणें – नक्षत्रें ( उडु चें उड् छंदाच्या सोईसाठी ). **दृशां** – डोळ्यांना.

१६५ दंती – ( श्लेष ) विशाळ सुळे असलेले, हत्ती.

१६६ **गताड** - जाडजूड. **शचिकांतबस्तु** – इंद्राचा लहानसा ऐरावत. ( संदर्भकथा २ पाहा ). **धनंजये** मधील 'ये' ऱ्हस्व.

१६७ **बोरबारें** – घोषबारें, मोठ्याने. **आर्ति** – तीव्र इच्छा. **निवाडे** – निवारे, आश्रयस्थानें.

१६८ **दैत्य देहादरे** – राक्षसी देह धारण करणारे. **तीक्षण** – तीक्ष्ण ( स्वरभक्ति ). **शक्ति** – शस्त्रविशेष. **लहुड्या** – लोखंडाचें अग्र बसविलेल्या काठ्या. **घुग्या** – आंगरखे. **बक्तरें** – चिलखतें.

१६९ **खचित्** – खचित ( छंदासाठी ). **अनळ-जनक** – वारा. ( आत्मनः आकाशः आकाशाद् वायुः वायोः अग्निः ). **वहिले** – श्रेष्ठ.

१७० **रथार्जिले** – रथाला बांधले. **रणनवरे**–रणनवरे, शूर योद्धा. ( रण् धातूवरून रणन असें नाम )

१७१ **अपर्दीं** – आपदीं, संकटांत ( छंदासाठी आ चा अ ) **तारू** – नौका. **वळघलार्कज**– वळघला ( चढला ) + अर्कज–सूर्यपुत्र, कर्ण.

१७२ **कृपेचा अग्रज** – कृपेचा मोठा भाऊ कृपाचार्य. शरद्वान् ऋषीला दोन अपत्यें; कृप हा पुत्र व कृपी ही कन्या. कृप धनुर्विद्येंत निपुण होता. द्रोणाचार्यांपूर्वी हाच कौरव-पांडवांना धनुर्विद्येचें शिक्षण देत असे. अभंगतनु, कारण कृप हा चिरंजीव आहे ( अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च बिभीषणः कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः॥ ) **मिर्वला**–मिरवला ( उच्चारानुसार ).

१७३ **द्वंद्वकंद**–द्वंद्वाची भारी आवड असणारा. **द्रोणनंदन** – अश्वत्थामा.

१७६ **दोषाथिला** – दोष लागलेला, पापी. **जैद्रथ** – जयद्रथ – सिंधुदेशाचा राजा. धृतराष्ट्रकन्या दुःशिला हिचा पति. ( य चा उच्चार ऐ, संप्रसारण य=इ व इ–ची वृद्धि ऐ ).

१७८-७९ यांतील कांही कौरवांचीं नांवें व इतर कौरवपक्षीय योद्धे.

१८० **सैन्यकार्कतनयादिक** – सैन्यक (सैनिक) + अर्कतनय (कर्ण) + आदिक–प्रभृति.

१८१ **क्षौणी**–अक्षौहिणी–कौरव-पांडवांचें एकंदर सैन्य अठरा अक्षौहिणी. त्यांत कौरवांच्या अकरा व पांडवांच्या सात अक्षौहिणी. क्षौणी शब्दाची घडण मजेदार आहे. मूळ शब्द अक्षौहिणी. आदि अ चा लोप व महाप्राणोच्चार ह क्षौ-मध्ये मिसळला व क्षौणी शब्द तयार झाला.

१८२ **क्षौणी**– अक्षौहिणींतील संख्या–२१८७० हत्ती, २१८७० रथ, ६५६१० घोडे, १०९३५० पायदळ मिळून २१८७००.

१८४ **वेद्जात**-मूळ शब्द जातवेद–अग्नि.

१८५ **यंत्रधर**–ध्वज धारण करणारे; तोफा-बंदुका वापरणारे.
**द्वादशोजन**–द्वादश योजनें.

१८९ **सप्तद्वीप** – जम्बु, कुश, प्लक्ष, शाल्मली, क्रौंच, शाक, पुष्कर. **नवखंडें**-इलावृत्त, भद्राश्व, हरिवर्ष, किंपुरुष, केतुमाल, रम्यक, भरत, हिरण्मय, उत्तरकुरु.
**धराधिपबंडें** – मोठमोठे मस्तवाल राजे.

१९० **कर्णिली** – ऐकिली.

१९१ **सप्तसमुद्र** – अम्बु (शुद्ध पाण्याचा), इक्षु (उसाच्या रसाचा), मधु (मधाचा), दधि (दह्याचा), घृत (तुपाचा), पय (दुधाचा), क्षार (खारट पाण्याचा).

१९२-९३ तत्कालीन विविध देशांचे राजे यांत उल्लेखिले आहेत. कथा-कल्पतरूच्या पांचव्या स्तबकांत बाराव्या अध्यायांत हीं नांवें बहुतेक आढळतात. त्यांपैकी कांहींची स्थलमर्यादा देण्याचा प्रयत्न केला आहे. **लाड** – लाट – नर्मदेपासून दमणगंगेपर्यंतचा प्रदेश. **भोट** आणि **महाभोट** हे दोन देश. छंदासाठी भोटः असा शब्द वापरून पुढे महा-भोट आणला व दोहोंचा संधि 'भोटस्महाभोटिचे' असा चुकीचा केला. **कालिंग + अंग. नगकोटीचे** – नगर + कोटीचे. कोट्यवधि नगरांचें. **मारू**-मारवाड. **काऊर** (?) **बागलाण** – नाशिक जिल्ह्यांतील सातपुड्याच्या उत्तरेचा प्रदेश. **परिहार**–कनोजचे प्राचीन राजे. **बर्बर**–तापीपासून वसईपर्यंतचा प्रदेश. **नागाहुरी**–नगरहर हा गांधार देशाचा एक भाग असें हुएनसँग देतो. देशांचीं नांवें विशिष्ट क्रमाने दिलेलीं नाहीत. **लीलाऊळ**–लीलायुध देशाचा उल्लेख महाभारतांत आहे. **मधुकरी**–मधू नांवाच्या दैत्याचें शहर मधुपूर. **चीनी**–हें हिमालयांतील एक गांव आहे. **महाचीन**–चीनदेशाला म्हटलें असावें.

१९४ **मेळाद्री**–मलयपर्वत. **उदयगिरी**–उदयपर्वत. **हिमगिरी**–हिमालयपर्वत. **मंद्राचळ**–मंदरपर्वत. **मेरूमंडळ**–मधला मेरु व भोवतालचे पर्वत. **कुळाचळ**–महेन्द्र, मलय, सह्य, शुक्तिमान्, ऋक्ष, विन्ध्य व परियात्र हे सात पर्वत. **चन्द्राचळीचे** (?) **नगवती** – पर्वतासारखी. **शेषाद्रि**–शेषपर्वत, या ठिकाणीं सेषासि असाहि एक पाठ आहे, पण तोहि अर्थ लागू पडत नाही. **वाहिनी**– सैन्य.

१९५ **दिक्मंती**–दिशा असलेली मही, दिशांसह मही.

१९६ **कनकगिरी** – मेरुपर्वत. **निर्जर** – देव.

१९८ **पेखणी**–प्रेक्षणीय, सुंदर. **अष्टनायका**–उर्वशी, मेनका, रंभा, पूर्वचिती, स्वयंप्रभा, भिन्नकेशी, जनवल्लभा, तिलोत्तमा, या इन्द्राच्या अष्टनायका.

१९९ **धिराजित** – अधिराजित (आद्यस्वर लोप).

२०१ **बागशाही** – सुंदरब गीचे. **बळी** – ओळी – हारी.

२०२ **धाडा**–कळप. **उष्ट्र**–उष्ट्र–उंट (स्वरभक्ति). **कबाडा**–ओझें वाहणारा. **सामा**–सामान. **आत्मचाडा**–आपल्या आवडीचें.

२०४ **सर्ते**–सरते–श्रेष्ठ. **पुर्ते**–पुरते–निपुण.

२०५ **धीशें**–अधीशें (आद्य स्वर लोप).

२०८ **वनेंद्र**–वनाचा मुख्य राजा. **अदट**–धीट. **दिग्गज–बळी**–दिग्गजाचें बळ असलेला. दिग्गज–आठ दिशांना असलेले आठ हत्ती–ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम, सुप्रतीक.

२०९ **परिणीली** – विवाह केला. **निजपणे**–आपलेपणाने. **माया**–कपटविद्या, जादू. **रूपस्तंभ**–मायेने निर्मिलेलें सुंदर रूप.

२१० **निशाक्षि०**– राक्षसी हेडंबेची भेट होण्यापूर्वी. **भव भवेना**— संसार होत नाहीं.

२१२ **दाझे**–दाहे–जळतो.

२१३ **चुकला असल** ( बोलींतील रूप असेल याचें )

२१४ **विग्रह**–कलह. **पातां** – पाहतां./

२१५ **नभरे**–जात नाही. **विपति** – विपत्ति.

२१६ **महदंत**–भयंकर.

२१७ **कीमिरू**–किर्मीर. **सल्लज**–सलज्ज (छंदाच्या सोईसाठी).**स्वगर्भक्रिया**–आपली गर्भवतीत्वाची स्थिति.

२१८ **सकुन**–सकृत, एकदा. **कामाख्या**–देवीचें नांव.

२१९ **स्त्रीबुद्धि** – प्रलयोगत–स्त्रीच्या सांगण्याप्रमाणे वागणारा नाश पावतो. सुभाषित – आत्मबुद्धिः सुखायैव गुरुबुद्धिर्विशेषतः ॥ परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयंगता ॥ प्रलयंगता ऐवजी प्रलयावहा, प्रलयान्तिका असेहि पाठ आहेत. **विप्रविवेकमंडित**–ब्राह्मणबुद्धीने युक्त; ब्राह्मणाचा वेष घेतलेला.

२२१ **सखयाग्रजोत्तमा**–सखय + अग्रजोत्तम. अग्रज– मोठा बंधु.

२२३ **तोय**–पाणी.

२२६ **अमर – गज – पात – अर्जुन**—देवांच्या हत्तीला – ऐरावताला स्वर्गातून पृथ्वीवर आणणारा अर्जुन. ( कथासंदर्भ २ पाहा ). **निसुगा** – तिरसट, तुसट.

२२७ **कृतकाळीं** - योग्य वेळीं. **टाळी लावणें**-ध्यान धरणें.
२२८ **तपादरुनि** – तप + आदरुनि.
२२९ **सहित्** - सहित. ( छंदाची सोय )
२३० **विद्या** – जादू. मंत्रतंत्र. **समोगरी** – टाकतो.
२३१ **वैनत**—वैनतेय, गरुड. **विद्या विसर्जियली** – जादू काढून घेतली.
२३२ **चतुर** – चार. **वरकोदर** – वृकोदर, भीम.
२३३ **द्विकर** – दोन्ही हात. **रसकुळवती** – प्रेमानें बेहोष झालेली.
२३५ **कलत्रा** – भार्या–मूळ संस्कृत कलत्र नपुंसकलिंगी या ठिकाणीं स्त्रीलिंगी.
२३६ **रसविष** – प्रेमरूपी विष.
२३७ **आगोचरी**- अगोचरी , राक्षसी.
२४० **अहनिशी**- अहर्निश, अहोरात्र.
२४१ **निशाक्षी**- राक्षस. **वारासारी**— आवराआवर, व्यवस्था.
२४२ **शैव**— गुरव. **आद्रिजे**- अद्रिजे, पार्वती.
२४४ **नियमासि**— नवसास. **निशाचर**- राक्षस.
२४५ **कुळरूप**-मूळ स्वरूप, **कराळ** – विक्राळ, **भोज्य**- खाणें.
२४६ **दुरडी**— टोपली, कासंडी.
२४७ **षड्रस**— कटु (तिखट), अम्ल, मधुर, लवण, तिक्त ( कडू ), कषाय ( तुरट ).
२४८ **माजी**— देवळामध्ये.
२४९ **निवाडें** — निश्चयानें. **पुरवधू** – नगरांतील स्त्रिया.
२५० **ख्यातायका** – ख्याता ( कीर्ति ) + आयका.
२५१ **खेचरी मुद्रा**–हठयोगांतील एक मुद्रा. प्राणायाम करून भ्रूमध्यावर दृष्टि स्थिर करणें. **अंकनासी** – जवळ.
२५२ **दावणी**–एका दोरांत बांधलेले.
२५३ **दानवारी**–राक्षसांचा शत्रु. **पांचवा स्वात्मज** – पांचवा मुलगा भीम.
२५४ **वाचागळी**–वाचा + आगळी ( फाजील ).
**पद्मावतीचा पति** – कृष्ण.
२५५ **बोभाइला**–ओरडला.
२५६ **मुक्तली**–सोडली.

२५७ **गाळिले**-वगळले. **नवस-बाळक** नवसासाठी आणलेले मुलगे ( चार पांडव ).

२५८ **गिरिमा**—गरिमा–फार मोठेपणा.

२६३ **पुष्कर**--आकाश.

२६९ **मधरातीं** – मध्यरात्रीं.

२७२ **विप्रवृत्ति** – ब्राह्मणाचा व्यवसाय, भिक्षा.

२७५ **पुरीपंथ** – नागरी पद्धति.

२७६ **जगदंडक** – लोकांनी पाळावयाचा नियम.

२८० **पुत्रराज** – घटोत्कच.

२८१ **घटोध्वज** – घटोत्कच.

२८२ **सजनीं** – सहा जणांनी.

२८३ **वोसरी** – ओसरी, घर.

२८७ **सुष्णका** स्नुषाका ( स्वरभक्ति ) सूनबाई. **सुनानंत** – सुना + अनंत.

२८९ **मयाळा** – मायाळू.

२९० **नाभि नाभि** – भिऊं नको, भिऊं नको. **कल्प-कल्पांत** – महासंकट.

२९२ **म्हैस जाळी** – म्हशींची सांगड.

२९६ **तयासी** – भीमास.

२९७ **ब्रह्मधाम** – ब्राह्मणाचें घर. **पटशाळा** – पाठशाळा, ब्राह्मणाचें घर. **गर्ता** – खड्डा. **प्रभव** – बळ, पराक्रम.

२९८ **शतावधादि** – शतावधि – शेंकडोंशें. **तळें** – खड्डा.

२९९ **शर्करोदऱ्या** – साखरेने भरलेल्या. **घारिया**. – पुरण घालून तळलेल्या पोळ्या. **मधूसगर्भ** – मधाने युक्त. **सांजुऱ्या** – सांजापोळ्या. **पवंडी** – पक्वान्न.

३०० **राक्षसू तोचि** – तोच राक्षस म्हणजे बकासुर.

३०१ **खरकल्या** – दचकल्या. **द्विजपति** – ( या ठिकाणीं ) धर्मराजा.

३०३ **समोदरीं** – सम ( सह ) उदरीं. **वोगरणें** – वाढणें.

३०४ **मठसाळी** – माट.

३०६ **पाळी** – कांठ.

३०७ **तोंडिया** – मूळ अर्थ जाडजूड, बळकट. या ठिकाणीं बकासुर.

३०८ **मार्ग पहाणें** – वाट पाहणें. **कर्तळीं** – करतळीं – हातावर (उच्चारानुसार)

३०९ **राणमस्त** – रणमस्त, युद्धाला चटावलेला ( उच्चारानुसार ).

३११ **सिहीनाद** – सिंहनाद, मोठी गर्जना ( उच्चारसुकरता ). **वायोसुत** – भीम ( वायु = वायो ) **शचिकांत** – इन्द्र. **अचल** – पर्वत.

३१२ **नगवत** – नगवत्, पर्वताप्रमाणें (वत् = वत उच्चारानुसार). **प्याला** + अंजुळ. **वरी** – वर, पाळीवर.

३१३ **दावाग्नि** – वणवा. **व्याळ** – साप. **पुच्छासनीं** – पुच्छावर.

३१४ **मश्यका** – मशक, मुरकुट (बोलण्यांतील जोर मश्यक ). **शुद्धी** – शोध

३१६ **स्वकस्तें** – शिकस्तीनें.

३१७ **द्वंद्वासणें** – द्वंद्वयुद्धाला पेटणें ( नामधातु ).

३१८ **हस्ती हरीसा** – हत्तीला सिंहासारखा.

३१९ **प्रेतसाळ** – विशाळ प्रेत.

३२२ **कांचनरत्नराशी** – सोनें, हिरे इ० द्रव्याचा मोठा नजराणा.

३२३ **सुखसाई** – सुखाच्या छायेंत. (श वर्ण हा च वर्गाशीं संबंधित आहे. श् चा उच्चार पुष्कळदा स् सारखा होतो म्हणून छाया-शाया-साया-साई )

३२५ **गौतमी** – ब्राह्मणाच्या बायकोचें नांव. **गृहपति** – गृहस्थ.

३२६ **साजण** – सहाजण. **भीमार्जिला** – फार मोठा झाला. ( भीम शब्द श्लिष्टहि घेतां येईल. )

३२७ **पंथ-पाडक** – वाटमाऱ्या.

३३० **गुरू** – हे गुरुजी. **जनोत्तम राव** – लोकोत्तर राजा. **कंठल** – ( उच्चारानुसार ).

३३३ **आहाळियेलें** – आणिलें.

३३४ **नवपंकजाक्षी** – नुकत्याच फुललेल्या कमलाप्रमाणें जिचे नेत्र अशी ( द्रौपदी ).

३३८ **सहित्** – सहित. ( छंदाची सोय )

३४१ **परस्तूत** – प्रस्तुत, सांप्रत. ( स्वरभक्ति )

३४२ **रविरंगरश्मी** – रविकिरणांसारखा रंग ज्याच्या तेजाला आहे असा (व्यास).

३४४ **स्निहाळे** – स्नेहाळें (छंदाची सोय). स्नेह – तेल. **उत्तरकर** – डावा हात.

३४५ **सव्यैक** – सव्य+एक. सव्य याचा मूळ अर्थ डावा असा आहे, पण मराठींत त्याचा अर्थ उजवा असा होतो. श्राद्धादि कर्मांत सव्य-अपसव्य हे शब्द येतात. डाव्या खांद्यावर उजव्या हाताखाली जानवें ठेवणें हें सव्य. यांत उजव्या हाताला महत्त्व दिल्यामुळें सव्य शब्दाचा अर्थ उजवा असा झाला.

३४६ **चित्रांगद** – चित्ररथ, अंगारपर्ण अशींहि नांवें आहेत. **अवसान** – विश्रांतिस्थान.

३४७ **मेटवीर** – धैर्यशाली वीर (मेट - धैर्य). **हाकित** – मोठ्याने हाक मारीत.

३४८ **उल्का** – चूड.

३५१ **चित्रसेन** – चित्रांगद (नांवाचा घोटाळा केला आहे.)

३५२ **हाला** – हाणला. **माधवी** – (मूळरूप बहुधा माघवी. मघवन् - इन्द्र) इन्द्रासारखी.

३५३ **आव्हानिला** – आवाहन केलें.

३५६ **जळविलासिनी** – जलक्रीडा करणाऱ्या. **विजूवत** – विजेसारख्या

३५९ **गंधर्वदेवा** + अवधारीं (ऐक).

३६० **साधिसा** – जिंकण्यासारखा.

३६२ **औकळा** – अवकळा, वाईट स्थिति.

३६४ **चाक्षुषी मंत्र** – कोणताहि पदार्थ जसा दिसावा असें इच्छावें तसा तो दिसणें यासंबंधींची विद्या.

३६५ **अमित्रगण** – शत्रूंचे समुदाय.

३६६ **षष्ठम** – षष्ठ–सहावा. संस्कृत रूप षष्ठ आहे, पण पंचम, सप्तमप्रमाणें "सादृश्याभास" न्यायानें षष्ठम. **उतीर्ण** – उत्तीर्ण (छंदाची सोय).

३६७ चाक्षुषी विद्या देऊन गंधर्वानें अर्जुनाकडून अग्न्यस्त्र घेतलें.

३६८ **आर्तेक** – आर्त (तीव्र इच्छा) + एक.

३६९ **अतिथ** – आतिथ्य. **गमन-वहन**-विमान.

३७० **उपवलें** – उडालें.

३७२ **वोप** – तेज, मुलामा.

३७३ **शक्रशाळेचिवाणी** - इन्द्राच्या राजधानीसारखी.

३७७ **कुलाल** – कुंभार.

३७८ **साळई** – साळी, कुंभार.

३७९ कृष्णाची पूर्वी भेट झाली त्या वेळीं त्याने भीमाला एक अंगठी दिली होती हा संदर्भ.

३८० **पौरीं** – नगरजनांत. **नेम** – अट.

३८१ **प्रभोंवत** – सारखा फिरत. **नृपमंत्रिभद्रा** – राजाच्या मुख्य प्रधानाकडे. **मनमान** – मनाला वाटेल तितकें.

३८२ **होतान्न** - होता + अन्न. **पाकार्जिला** – शिजवून तयार ठेवला. **निसंतानिला** – चट्ट केला. **घालाना आणिक कां.**

३८३ **रांधवन** – स्वयंपाकी.

३८५ **कामारक** – नोकर. **बस्त** — बोकड.

३८६ **सुरवाडणें** – ऐकू येणें. **तया + अर्पवी**

३८७ **ग्रंथी** - गांठ, झोळी.

३९० **मृतिका** – मृत्तिका ( छंदाची सोय ). **पेंड** – भार, गोळे.

३९२ **केळोत्रमाळा** –( अर्थ लागला नाही ) केरवा मण्याची माळ असा करावा का ?

३९९ **मुसळकंद** – धटिंगण. **कळी** – तंटा.

४०२ **दिनपुढीं** - दिवसासमोर.

४०४ **रूपस** – रूपवान्. **अनळज** – धृष्टद्युम्न.

४०६ **पुरेशतनय** – राजपुत्र ( धृष्टद्युम्न ).
**सुखबाधी** – सुख नाहींसें करणारें ( द्रौपदी विवाह होऊन सासरीं जाणार हा विचार. )

४१० **प्रमय** – मय म्हणजे बनविलेलें. प्रमय म्हणजे उत्कृष्ट बनविलेलें. **खचित** म्हणजे रत्नखचित.

४११ **भीतरीं** – अभ्यंतरीं. आंत (आद्यस्वरलोप). **समेसि** – मधल्या '**मे**' चा ऱ्हस्व उच्चार.

४१२ **मुहूर्ता** + आचरा.

४१३ **मृगमद्** – कस्तूरी. **रत्नन्हार्णी** आणा. **माजी** – माझी. **माव** – **माय.**

४१४ **मुग्धा** + **अनुपम्या** – निष्पाप आणि अद्वितीय. **कामरेखा** – अतिसुंदर. **रामा** – ललना.

४१५ **सुतविणें** – सूत बांधणें. **सोज्ज्वळ** + **अभ्यंग.**

४१६ **पट्टनापटी** – रेशमी वस्त्र. **दुर्गमूकुटीं** – किल्ल्याच्या वरच्या मजल्यांत. **कुंतळ** – केस. **तळ्हातिती** – हातानें चोळतात.

४१७ **मखज्योति** – द्रौपदी. **वोपी**- ठेवते. **वोपिती** – अर्पण करतात, देतात.

४१८ **नागरा** – नागरी, शहरी. **पावकें** – अग्नीने.

४१९ **कबरी** – मूळ अर्थ वेणी. या ठिकाणीं केस. **जांबुनद्** – सोनें (जम्बु ही एक स्वर्गीय नदी. तींत तयार होतें तें जाम्बुनद.)

४२० **भाषा** + **आमची. प्रकृत** – **प्राकृत, राष्ट्रिक** – महाराष्ट्री.

४२१ **स्वदेशाथिला** – स्वदेश. झाला. **धर्म** + **आपुला. पंचतत्त्व** + **उन्मनी** – पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंच तत्त्वें; त्यांनीं युक्त असा जो देह त्याला प्राप्त झालेली उन्मनी अवस्था. जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुरीया या चार अवस्थांच्या पलीकडील पांचवी अवस्था जींत जीवात्मा परब्रह्मीं लीन होतो.

४२२ **दर्पण** + **आकृति** – आरशाच्या आकृतीसारख्या. राखडी, मूद, मोर, बोर हीं अलंकारांचीं नांवें.

४२३ वेणीचें वर्णन. **सुवर्णसुत** – सोन्याच्या तारा. **लसे** – शोभतें. **नितंब** – कमरेची मागची बाजू.

४२४ **मुक्त** – मोतीं. **नक्षत्रमाळ** – अलंकारविशेष. **अळुमाळ**-हळुवार. **शीस फूलें** – सूर्यचंद्राच्या आकाराचीं डोक्यांतील भूषणें.

४२५ **टिळा** – तिलक. **किळा** – तेज.

४२७ **निगम-धर्म** – तर्कशास्त्रांतील उपमान नांवाचें प्रमाण. **निकाई** – निकामी. नृपजानासा कल्पवल्ली कळि असा अन्वय.

४२८ **सुर०** – देवपितर इत्यादींचें नाशापासून रक्षण करणारा शंकर (?) वायु असाहि अर्थ संभवतो.

४२९ नथीचें वर्णन. **नृत्यैकार मयूर** – नथीचा आकार नाचणाऱ्या मोरासारखा. **बेसर** – नथ. **बिकी** – शोभा. **उडुगणें** – नक्षत्रांचे समुदाय. नथीचा चौकडा व झिळमिळीं यांमध्ये दोन मोतीदाणे असतात. त्यांना शुक्र व तारापति (गुरु) यांची उपमा दिली आहे.

४३० मुखाचें वर्णन. **सात्रृतांत** – सहा ऋतूंत, **आश्वीनिशी** – आश्विन + निशी (रात्र) (दोन समानवर्ण एकत्र आले तर एकाचा लोप होतो. सुकें केळें – सुकेळें. तोच नियम या शब्दांत आहे.) **त्या + अनंत + दंत + प्रभा**. अनंत शब्द प्रभा शब्दाचें विशेषण. दंतप्रभांना देवसभांची उपमा. **लक्षणें**-सामुद्रिक शास्त्रान्वयें बत्तीस शुभचिन्हें.

४३१ **कुडा** – कुरठा. कंदर्प या शब्दाचा मराठींत विचित्र अर्थ केला जातो. कंदर्प म्हणजे मदन. पण याचा विग्रह कुत्सित दर्प (गर्व, वास) असा करून कंदर्प – गर्विष्ठ किंवा कांदा असा करतात. या ठिकाणीं गर्विष्ठ. **आंगोळिमा** – आगोळ-तांबडा. " रक्तिमा " सारखा हा शब्द सादृश्या-' भासाने बनविला.

४३२ **सुधाधर्ता** – चंद्र. **सुधा** – सुद्धां. **हीन** – कमी.

४३३ कानांतील दागिने–पंखे, मोतीं, बाळ्या. **तरणी** – सूर्य. बाळ्यांना लावलेल्य झळमुक्ती, झिळमिळ्यांतील मोतीं. रवीच्या प्रत्येक महिन्यांतील एक अशा बारा कला व चंद्राच्या प्रत्येक दिवसाची एक अशा सोळा कला.

४३४ **चापी** – पाळी. **रजगुणें** – रजतगुणें. चांदीच्या तारेने. **स्वभूचक्र**-कृष्णाच्या हातांतील चक्र-सुदर्शन. **तळपदक** – खाली पदक असलेली. **तरवणे** – कानांतील एक दागिना. [संभाव्य व्युत्पत्ति. सं. ताटंक. मराठी तानवड (वर्णविपर्ययाने) ताडवन – तरवण.] **कंबूकंठ** – कंबू (शंख) सारखा कंठ. **प्रभाळा** – अत्यंत पाणीदार, प्रकाशमान.

४३५ **चौसरा** – (चार सर असलेला). **अंबरसा** (गळ्यांतील एक दागिना) + अब्जमाळा – कमळमाळा, रत्नावली, मोहनमाळ, मोत्यांची माळ, चंदनहार (चंद्रहार), एकावळी हे सर्व दागिने.

४३६ **धुकधुकी** (धुगधुगी), पेटी हेहि दागिने. **प्रभार** – मोठें ओझें.

४३७ हस्तभूषणें. **अकामयोगी** – मदनबाधा जिंकणारे योगी.

४३८ **कटीनिबंध** – कमरपट्टा. **बिजावर** – कपाळावरील दागिना.

४३९ **रूळ्या** – पायांतील एक दागिना. **अनोट** – अनवट – पायांतील एक दागिना.

४४१ **मुख + अंभोज + आलोकीं** – मुखकमल पाहण्यासाठी. **मुकुर** – आरसा – **यथा + अनुक्रमवुनी** ( नामधातु ).

४४२ **वानिमा** – शोभा. **द्वंद्वोदर वारधी** – घुसळला गेलेला सागर. **विनमथें** – मंथनाशिवाय. **क्षोभ॰** क्षोभरूपी हिमालय.

४४३ **साकृतवणें** – साकळणें.

४४४ मलिन शरिरीं ती कांप करी.

४४५ **गहन गवसीता** – रानांत शोध करणारी. **अष्टैंगाना** – अष्ट नायिका.

४४६ **द्वारांगना** – द्वार + अंगना ( अंगणांत ).

४४७ **कर्णिका** – ऐका. **लौकर्णिका** – लोक + करणीक. लोकव्यवहाराला धरून, असा अर्थ संभवतो. ( समानवर्ण लोप ).

४४९ **विव्हळरससुधा** – करुण रस. **सुधावेळ** – अमृतासारखी वेळ. **चरती** – चालली. **अमरसी** – अमर्षि – दुःखी.

४५० **सालंकार + अयुत** ( दहा हजार ) + **गजसुत** किंवा **गजसुता + उपायनवती** ( नजराणा जवळ असलेली ).
**लाभस्तेषाम्** – लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः। येषामिन्दीवरश्यामो हृदयस्थो जनार्दनः॥ हा शुभ श्लोक.

४५१ **गयंदू शाम जाला** – हत्ती काळा पडला.

४५२ **रुक्मबंदी** - सोनेरी बांधणीवर.

४५३ **महामंती** – महात ( स्त्री ). **फरें** – परशु. **ग्रीवसदरें** – विस्तीर्ण मानेवर. **तारा + अचल** – स्थिर तारका. **मेघसदन** – आकाश. **तडित् + वा + कीं** – वीज किंवा अचल तारा.

४५४ **चक धरणें** – दचकणें, चकित होणें. **वासरमणी** – सूर्य. **भ्रमोदारा** – भ्रम ( विभ्रम ) + उदारा, विलासांत निपुण. **दारा** – स्त्रिया (अर्थविस्तार).

४५५ **भोगदळें** – उपभोग्य वस्तूंचा समुदाय. **परिमळ** – **उद्धळिती**(उधळती).

परिमल धुळि. **सुवासिक** – अबीर, बुक्का, चंदन वगैरेंची पूड. **रसराजस** – प्रेमळ. **राजसा** – सुंदर.

४५७ **अनुजोत्तम** – उत्तम असा बंधु ( धृष्टद्युम्न ). **पंचमशर** – पंचशर मदन.

४५८ **मुनी** – व्यास. ही कथा पुढे आहे. ( श्लोक ८९९ व पुढील )

४६१ **राजस्थित** – राजेलोक असलेल्या. **पुष्कर** - आकाश.

४६२ **शानी** – हा प्रत्यय बोलीभाषेंत येतो. म्हणूनशान, करूनशान इ०

४६३ **लीळागगन** – सुंदर आकाश.

४६४ **लोचन तार** – डोळ्यांनी सुंदर. **परा** - वाचेची पहिली अवस्था किंवा आदिशक्ति.

४६७ **सहाकृत** – साह्य करणारा. **मधुकैटभ + अरी** – विष्णु ( कृष्ण ). मधु व कैटभ हे दोन असुर विष्णूच्या कर्णमलापासून जन्मले. त्यांना विष्णूने ठार केलें. **कीट**–ठिणगी.

४६८ **कलौवास** – कलियुगांतील राहणें.

४६९ **अष्टौदिक्पति**– आठ दिशांचे आठ अधिपति – इन्द्र, वह्नि, पितृपति ( यम ), नैरृत, वरुण , मरुत् ( वायु ) कुबेर, ईश ( शिव ).

४७० **स्पर्धी**– स्पर्धा करणारे. **चित्र + चमू + उपमा.**
**चोज** – आश्चर्य. **चाकाटणें** – स्तब्ध होणें.

४७२ **मयंक** – मृगांक, चंद्र. **व्याकर्णनें** – विवेचन करणें.
**को**– कोणतें.

४७५ **वेधनाचे** - विद्ध करणारे. **वेध** – आकर्षण, चटका.

४७६ **वधू** - वध, मृत्यु.

४७७ **वसंततिलक + अमर + कोकिळा + आदि** – वसंतऋतूला भूषणभूत झालेल्या अमर कोकिळा इत्यादि.

४७८ **निवाइला** – वाहिला. धारण केला. **पावकीं लावहि** – अग्निपरीक्षा घ्या. **कोत्तमा** – कोण उत्तम.

४७९ **सर्वसा** – सर्वस्व. **वसन** – वस्त्र.

४८० **सागरबळें** – सागराच्या वेगाने. **पणकळा** – पणांतील यंत्र.

४८१ **माती** – मावतात, राहतात.

४८२ **सोसपसोस** – श्वासोच्छ्वास.

४८३ **वित्पती** – विपत्ति, संकट ( वर्णविपर्यय ). **मंदाक्रांत** – हळूहळू भरलेलें.

४८४ **नवकमलपत्राक्ष** – आताच फुललेल्या कमळाच्या पाकळीप्रमाणे नेत्र ज्याचे आहेत असा ( कृष्ण ).

४८५ **निढळीं** – डोक्याला.

४८७ **काम** – मदन.

४८८ **बोहरी** – नाश करतो.

४९० **प्रतिज्ञा + अनुवादिजे** ( स्पष्ट करावी ).

४९१ **समाविलें**– सामावलें.

४९३ **भावितां**–विचार करतां. **भान** – प्रकाशमान.

४९४ **राराभीरा** – रारा म्हणजे यंत्र ( मत्स्ययंत्र ) + आभीर म्हणजे गवळी. या ठिकाणीं श्रीकृष्ण; म्हणून गोळाबेरीज अर्थ – मत्स्ययंत्र तयार करणाऱ्या श्रीकृष्णा, हा संभवनीय अर्थ दिसतो. **आचावचाल्या** – असमर्थ झाल्या. ( अच्यावच्यापासून विशेषण धातु ). **उपदा** – संपत्ति. **अंकिली** – योजिली, मिळविली. –**यागाधगाध** – **या + अगाधगाध** ( अत्यंत गहन ).

४९५ **कुकुचिता** – कु + कुचित – मोठी चेष्टा, थट्टा. **सर्ता** - सरता, पूर्ण, श्रेष्ठ, धन्य. **तमिं** — अज्ञानांत .

४९६ **सुखद्रूप** – सुखरूप, सुखी. ( फलद्रुप या शब्दाचा सादृश्याभास ).

४९७ **रसोक्षिसी** – रक्षिसी. **शिखरिणी** – गोड पक्वान्न ( आनंद ).

४९८ **प्रभूमिका** – उच्च भूमि.

५०२ उपस्थित राजांचीं नांवें: – **गवेशण** - गवेषण, यादवांपैकी एक. **मचेंद्र**– मत्स्य देशाचा राजा. **यौनाश्व** – यौवनाश्व. **नामाथिले** – नामवंत.

५०३-४ कालविपर्यास दोष पत्करूनहि आपल्या काळचे किंवा आपणांस ठाऊक असलेले मराठे राजेहि द्रौपदीस्वयंवरप्रसंगीं उपस्थित केले आहेत : शिसोदे, शिरसाट, वाघ, चवरे, शेलार, साठे, गाडे, गायकवाड, घोरपडे, घाटगे, डेवरे, सोळंखे, जगताप, जाधव, इंडायिते, इंगळे, माने, तुंबर, मोहिते, मगर, मोरे, खंडागळे, सावंत, निकुंभ, राठवडिये, ( राठोड ), गौड, गुंजाळ, कोकाटे, कुरु, कांकळीज, सुर्वे, काटे, धुमाळ, चव्हाण, पवार, सोनगरिये, काळे, शितोळे, शिंदे, अहीर, दोरक कड्ड, खैरे.

५०५ **सोमांशादिक** – सोमवंश इत्यादि.
छत्तीस राजेकुळी : ( १ ) कालच्छुरिक, ( २ ) कविनिस ( ३ ) राजपाल, ( ४ ) निकुंभवर ( ५ ) धान्यपालक ( ६ ) मट ( ७ ) कमाष ( कलाष ) ( ८ ) गौर (९) हरितट (१०) हुल ( ११ ) कोटपाल ( १२ ) कारट्टपाल ( १३ ) दधिष्टट् ( १४ ) प्रतिहार ( १५ ) यातिक ( १६ ) अनिग ( १७ ) सैंधव ( १८ ) टांक ( १९ ) देवरा ( २० ) रोसजुत ( २१ ) राठोड ( २२ ) परिहार ( २३ ) चापोत्कट ( २४ ) गुहिलोत ( २५ ) गोहिल ( २६ ) गरुअ ( २७ ) मकवान ( २८ ) दायेमत ( २९ ) अभीयर ( ३० ) सिलार ( ३१ ) छंद ( ३२ ) चालुक्क ( ३३ ) चाहुवान ( ३४ ) सदावर ( ३५ ) परमार ( ३६ ) काकुत्स्थ ( चि. वि. वैद्य-मध्ययुगीन भारत, भा. २ पृ. ७८ ) **वितंड्**-वितंड ( छंदाची सोय ).

५०६ **अही** – सर्प.

५०८ **घोरांद्र** – भयंकर ( घोरांधार – घोरांद्र. )

५१० **अजासर्पन्याय** : संस्कृतांत अजाकृपाणीयन्याय आहे. शेळी जावयास व तिच्यावर तलवार पडण्यास एकच गांठ पडणें असा काकतालीय न्याया-प्रमाणें अनपेक्षित, यदृच्छया एखादी गोष्ट घडणें असा अर्थ. प्रस्तुत कवितेंत हा अर्थ लागू पडतो. म्हणून अजासर्पन्याय हा शब्द कवीनें योजला असावा. अजासर्प म्हणजे अजगर असेल का ? **म्हणियरा**– म्हटलेलें करणारा.

५११ **रारा**– मंत्र, जादू.

५१२ **नरयाग**–मनुष्ययज्ञ.

५१३ **राजकाळी**– मृत्यु आणणारी देवता.

५१५ **सहस्रार्जुन**– कार्तवीर्य. ( संदर्भकथा ६ पाहा )
**बाळजाया**–लहान स्त्री.

५१८ **थोरावले**– वाढले (विशेषण धातु ). **वाग्बंद**– बंद आहे वाचा ज्यांची असे.

५१९ **काशेश्वर**– काशी + ईश्वर ( रामेश्वरप्रमाणें सादृश्याभास ). **प्रतापाथिला** पराक्रमी झाला.

५२० **हरास** – ऱ्हास (स्वरभक्ति ).

५२१ **शक्तिगत**– गतशक्ति, निर्बळ.
५२३ **निगम**– वेद. **नितीसि मिळेना** - राजनीतीला धरून नाही.
५२५ **श्रीचतुराननें**— (कथासंदर्भ ७ पाहा)
५२९ **वरान्तप्रयाणी** – वराला मृत्यु आणणारी. **महामारगामी** – महामारी (मृत्यु ) प्रत नेणारी. **मरीची असामी** - मरणदशेच्या ताब्यांत असलेली व्यक्ति. (या सर्व एकप्रकारच्या शिव्याच आहेत ). **शिवाच्यान** -शिवाची शपथ.
५३० **चतुर्**–चतुर ( छंदाची सोय ).
५३२ **कांबिटें**– धनुष्यें. **कांता**–स्त्री. **मातां**–उन्मत्त होतां.
५३३ **पण+उच्चारिला.**
५३४ **क्षेत्रि** – क्षत्रिय.
५३५ **सुरालय** – स्वर्ग.
५३७ **रजकाज** – अत्यंत छोटें असें हें काम.
५३८ **रज** ( श्लेष ) – रजोगुण ( पराक्रम ), कण. **रजक** – धोबी.
५४० **भटवाटिव** – शूरांचा पराक्रम.
५४५ **अंगणीं** – समरांगणीं. **सोमराज** – चंद्र.
५४७ **जळवाणा** – पाणीदार.
५४८ **कुमुद्वंश** – चंद्रवंश ( संभवनीय अर्थ )
५४९ **वार्ता कीतिक** – किती बोलावें ?
५५० **शंकरावहने०** – एकदा विष्णूने गरुडास कैलास पर्वतावर कामानिमित्त पाठविलें. त्याला आपल्या बळाचा गर्व होता. नंदीने त्याचा गर्व नाहीसा केला. इतक्या जोराने नंदीने श्वास आंत घेतला की त्या श्वासाबरोबर गरुडहि आंत ओढला जाई आणि उच्छ्वासासरशी बाहेर येई.
५५१ **मेरूमान** – मेरूचें प्रमाण-माप.
५५२ **त्रेतायुगीं०** – रावण.
**भूतो न भविष्यति** – झाला नाही, होणार नाही. **भू** – पृथ्वीवर.
५५३ **रजराजे** – राजेरजवाडे ( अभ्यस्त शब्द )
५५४ **दशगज०** – दहा हजार हत्तींच्या बळानें जसें उन्मत्त व्हावें तसा उन्मत्त. **सपष्टीं** – स्पष्ट रीतीने ( स्वरभक्ति ).

५५६ **मन + उच्चाटलें** – ( चरकलें )

५५७ **भवदंड** – मोठा दंड; भव म्ह० संसार तो नाहीसा करणारा दंड.

५५८ **दृगमंद** – दृग्मंद – मंददृष्टीचा धृतराष्ट्र.

५६१ **परावे** – परकीय. **पऱ्हावे** – उभी राहिली.

५६३ **लाग डायानितां** – लगट करीत असतां. **लाळभाळी** – लाळ उत्पन्न करणारी, तोंडाला पाणी आणणारी.

५६४ **डाया नये** – डावाला येत नाही, मिळत नाही.

५६५ भीतिवाचक समानार्थक क्रियापदांची योजना करून दुर्योधनाच्या भीतिग्रस्त अवस्थांचें कवीने यथार्थ वर्णन केलें आहे.

५६६ **कानाडी** – कानापावेतो ओढलेली धनुष्याची दोरी. **कळसूत्री** – सर्व कळा ज्याच्या हातांत आहेत असा ( कृष्ण ).

५६८ **खेटक** – ढाल.

५७४ **माळा + अद्यापि** – चरणांत मोठी थट्टा भरली आहे.

५७५ **कणकदानी** – सोन्याचें दान करणारा.

५७७ **भास्करी** – कर्ण. यदुवर + उत्तर.

५७८ **तुला जाले** – तूं केलेंस हे काम असा उपहास किंवा तुला करतां आलें तर कुरुपति दुर्योधनाला कढईपासून वांचव.

५८० **भतैं** – भावनांचा आवेश. **दीर्घदोष + आचरा. कर्मकूप** – पापी आचरणरूपी विहीर.

५८३ **वचनैसें** – वचन + ऐसें.

५८४ **कृत ज्या प्रदानी** – ज्याला या प्रदानीं दान घेणारा केला आहे किंवा कृत-कृतार्थ जो या दानांत कृतार्थ झाला आहे. **रथांगपाणी** – चक्रपाणी ( कृष्ण ).

५८६ **विराजमान** – विराजमान् ( छंदाची सोय ) शोभणारा. **जिभाट** – फार बोलके.

५८७ **मोघवे** – घोंस, गुच्छ.

५८८ **आसाधारण** – असाधारण ( छंदाची सोय ).

५८९ **सस्मेर** – सहास्य.

५९१ **कुरुवर्धन** – कुरुश्रेष्ठ ( दुर्योधन ).

५९२ **क्षोणीन्द्र** – राजे (क्षोणी-पृथ्वी).

५९४ **समलें** – समापलें, संपलें. **शफरी**-मासा. **जळरुह**–(कमळ) + **दळ**–(पाकळी) **अक्ष** – (डोळा) कमळाच्या पाकळीसारखे जिचे नेत्र अशी.

५९७ **चत्वारांगण** –चौकाच्या मधली जागा. **वर्णीजना**–वर्णन करतां येत नाही.

५९८ **चक्षुश्रवा** – चक्षुःश्रवा. साप ( सापांना कान नसतात. ऐकण्याचें काम त्यांचे डोळे करतात अशी समजूत ).

५९९ **पुष्पावती** – कुसुमावती. **प्रातीज्ञा** – प्रतिज्ञा (छंदाची सोय).

६०० **अर्बुदान्त**– अर्बुद ( दशकोटी) + अन्त-असंख्य. **प्रगंगाथली**– महागंगा झाली.

६०२ **मद्भेदे** - मीं केलेला भेद, पक्षपात. **ब्रह्मीं** – ब्राह्मणांत. **विहित** – योग्य; शास्त्रशुद्ध.

६०३ **संसा** – संशय.

६०६ **धिरे धिरे** – दम धरा, दम धरा. **नगस्वरूपिणी** – पर्वतासारखी (धीट).

६०७ **मुनिमान** – ऋषितुल्य.

६११ **स्परसलों** – स्पर्शलों (स्वरभक्ति)

६१३ **अमर–वारण–चेवो** – देवांचा हत्ती (ऐरावत) त्याला चेव आणणारा (संदर्भ-कथा २ पाहा.)

६१४ **क्षात्रधर्म** – प्रकृतिस्त्वां नियोक्षति – भगवद्गीता.

६१६ **आनंदणें** – (नामधातु).

६१८ **भणतां** - म्हणतां. **सभले सभले**-शाबास, शाबास.

६२० **मूर्धनी** – मूर्धन् – डोकें.

६२१ **भवगारीं** - भव + अगारीं-संसाररूपी घरांत (छंदाची सोय).

६२२ **बतमारी** – (बत-दुःख, निंदा) दुःख हरण करणारा.

६२३ **बोलताल्हाद** – बोलतां + आल्हाद. **शाने** – बोलीभाषेंतील प्रयोग.

६२४ **दर्भशिखा** – मंतरलेला दर्भ. **समे**-त्या समयीं.

६२५ **कृष्णा** (द्रौपदी) तिचा (भावी) पति.

६२६ **स्नेहगर्भांतरीं** – तेलाच्या आंतील बाजूस. **मीनभा** – माशाचें प्रतिबिंब. **भानुसी** – सूर्यासारखी.

*

६२७ इन्द्रवज्रा. **नाहो** – नवरा. **मीन-मयंक-राहो** – मासा हाच कोणी चंद्र. त्याला राहूप्रमाणे असणारा.

६२८ **उग्रमान्** – उग्रमान. **विराजमान्** – विराजमान (दोन्ही रूपें छंदाच्या सोईसाठी).

६३० **साधिला** – जिंकला. **गयंदी**- हत्तीण. **रविसुत** (कर्ण) + **रिपु** (शत्रु) म्हणजे अर्जुन.

६३२ **सभालोकितां** – सभा + आलोकितां – पाहतां.

६३४ **कर्ण** + **अरि** – कर्णाचा शत्रु.

६३५ **घोरम्** – घोर.

६३६ **द्वंद्वोदर** – युद्धाला उत्सुक.

६३८ **सूकर** – डुक्कर.

६३९ **भवा** – व्हा. **पुसिं**– शेपटीला.

६४१ **साउमें** – समोर.

६४९ **डालूं** – झाकूं.

६५६ **निगमरंजन** – वेद हा ज्याचा आनंद आहे असा (कृष्ण).

६५८ **नेम-निर्गम** – पण पार पाडणें.

६५९ **प्रेमविला** – (नामधातु) प्रेमाने भरून गेला. **सरास** – हर्षाने. **पुत्रेंसी** – पुत्रासह.

६६१ **वेढिला** + अर्जुन. **महमंतिका** – स्त्रीमहात. **परिथाटिका** – चारी बाजूंला असलेलें सैन्य.

६६५ **पणोद्धार** – पणाची पूर्ति.

६६७ **रथलागे** – रथाच्या बाजूला.

६६८ **अधर्** (ओठ) – अधर (छंदाची सोय).
**रद्** – दांत.

६७२ **भानुचक्रोपमा** – सूर्यमंडलासारखें.

६७६ **आपुलाचि०** स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः। –भ. गी.

६७८ **भाज** – भाजा, पत्नी. **फटकाळ**– फटकळ. **अभद्र** – घाणेरडा. **संबंधु** संबंध.

६८० **रोम** – केस.

६८२ **वासवी** – अर्जुन. **मार्तंडपुत्र** – कर्ण.

६८४ **वांचुनि** – जिवंत राहून. **आमृत** – अमृत (छंदाची सोय). **प्रजडता** – मोठा जडपणा.

६८५ **गुमाने** – गर्वाने.

६८७ **वारें लावणें** – पळवून सोडणें.

६८८ **जीमुत**– – मेघ. जीवनं ( पाणी ) मुंचति (सोडतो) तो.

६८९ **परिघ** – घेर.

६९० **परपावक** – शत्रूंना आगीसारखा.

६९१ **व्रति** – ब्रह्मचारी. **कंक** – ब्राह्मणाचा वेष घेणारा.

६९२ **हेळा** – सहज, गमतीने.

६९३ **मूर्छना** + **अद्भुत**.

६९४ **महदंतवेदना** – अंतकाळींची मोठी वेदना, दुःख.

६९५ **गुणगुतीं** – धनुष्याच्या दोरीवर. **सहजाचे** – सहज. **कार्मुक** – धनुष्य.

६९६ **पायखोडी** – पाय लाथाडणारा.

६९९ **स्मर** – मदन. **उजु** – सरळ.

७०१ **दासराय** – श्रेष्ठ दास ( अर्जुन ).

७०२ **मृगन्यायें** – हरिणांवर पारधी किंवा सिंह धांवावा तसा. **भारद्वाज** ( द्रोण ) + **आत्मज** ( मुलगा ) – अश्वत्थामा.

७०३ **खगेश्वर** – गरुड.

७०४ **समर्** – समर ( छंदाची सोय ).

७०५ **गुण** – बाण. **ग्रहगुणें** – नऊ संख्येने. **सतेजाळ** ( प्रकाशमान ). + **आभाळी**.

७०७ **सुपर्ण** – गरुड. **तदन्यायें** – तद् + न्यायें (छंदाची सोय). **शासिनइले**– शासन केलें ( नामधातु ).

७०९ दोघेहि एकाच गुरूचे ( द्रोणाचार्यांचे ) शिष्य, पण अश्वत्थामा यशत्व अधर्मीं नाथिला ( नासला, व्यापला ).

७१६ भिंडपाळ, पाश, बाण, शूळ, चक्र, चंडक, मुसळ, गदा, परीघ, अर्गळा हीं सर्व शस्त्रें. पैकीं चंडक म्हणजे प्रचंड असा अर्थ घेऊन विशेषण म्हणतां येईल.

७१७ **धुंदभार** – अंधकार. **कपिध्वज** – कपि ( मारुति ) आहे ध्वजावर ज्याच्या असा ( अर्जुन ).

७१९ **वामदोर्दंड** – डावा हात. **दंडीं** – हातांत. **दंडी** – प्रहार करणें, शासन करणें.

७२२ **अघटितोत्तर** – अत्यंत आश्चर्यकारक.

७२३ **तळातळ** – पाताळ. **साहे** – साह्याला.

७२५ **काळांत** (प्रलयकाळ) + **काळ** + **प्रभा**. प्रलयकाळासारखें भयप्रद आहे तेज ज्याचें असा क्षोभमहोदधी.

७२६ **सिहंनाद** – सिंहनाद ( छंदाची सोय ). **वाराहदाढा** – वराहावतारांत विष्णूने वराहरूप धारण करून आपल्या सुळया दांतांवर पृथ्वी उचलून धरली आहे. भीमाच्या आवाजाने पृथ्वी हादरली व तो क्लेश वाराह ( वराहाच्या ) दाढांना झाला.

७२७ भीमाच्या किंवा सर्वांच्याच आवाजाचा परिणाम कसा झाला ? **आत्मक्रिया वंचिली**--माणसांची स्वतःची हालचाल थांबली.

७२८ **विधी–आडवारा** – युद्धविधींतील वादळ.

७२९ **रिपूरजथाटी**– शत्रुरूपी कणांची रास.

७३० सांग रूपक. लाट, घाणा, तीळ हे तेल्याच्या व्यवसायांतील शब्द. उडीद, पाटा, वरौटा ( वरवंटा ) हे घरांतील नित्याचे शब्द.

७३२ **विभांडी**-हैराण करतो. **अश्वारूढ**– घोडेस्वार.

७३३ **खेटक** ( ढाल ). **बल्वंड** – शस्त्राचें नांव. बल्लम म्हणजे भाला याचें बल्वंड असें रूप योजिलें असावें. **फिरंगापट**– तलवार, फिरंगी म्हणजे गोरे लोक – विशेषतः पोर्तुगीज – त्यांजकडून मराठे लोक तरवारी घेत.

७३५ विवाहाचें सांग रूपक– विक्रम– नवरा. कीर्ति– वधू. भांडणारे योद्धे– वऱ्हाड. जेवणाचें पक्वान्न– रुधिर. बुक्की – भात. घृत ( तूप )– लात. गर्जना–गूळ. कोप– कढी. थाप ( चापट ) पुऱ्या. पद ( पाय ) – पापड, तेलवऱ्या ( तेलांत तळलेल्या पोळ्या ). वरण– मरण.

७३८ **सिंहवातवसें** – सिंहाच्या वाऱ्याच्या जोरानें.
( वसें – वशें )

७४३ **तुंग** - जमाव.

७४६ **लाग** – पाठलाग. **कटिशक्ति** – कमरेचें बळ.

७४७ **प्रयाची** – प्रायचि ( छंदाची सोय ).

७४८ **हताहाता** – हातघाई.

७४९ **वपुवैभवें** – शरीराच्या सामर्थ्यामुळे.

७५० **अर्जुनावर्त** – अर्जुनाभोंवतालचा.

७५१ **मुक्तिला** – मोकळा केला ( मुक्त–विशेषण धातु ).

७५२ **कर्णारि** – अर्जुन. **वेल्हाळाग्रज** – प्रियेचा मोठा बंधु ( धृष्टद्युम्न ). **अंतकमयी** – यमासारखा. **उरगपति** – शेष.

७५३ **तरूरारापाणी** – वृक्षरूपी यंत्र ज्याच्या हातांत आहे असा भीम. **विगती** – जोरानें.

७५८ **शाळ** – विशाल, मोठा.

७६० **मल्लयुद्ध + रचना + असंभाव्य** ( अद्‌भुत ).

७६१ **नाग** – हत्ती. **रौंदळी** – रवंदळी, दाणादाण, गोंधळ. **कळा** – पेंच. **जीवनस्थळ** – मर्मस्थळ.

७६२ **व्याळ**–साप किंवा वाघ. **वेद्‌जात** – जातवेद – अग्नि. **नगोदरें** – पर्वताचे आंतील भाग.

७६३ यांत लढणाऱ्या प्रसिद्ध जोड्या आहेत. **शक्रवृत्र**— इन्द्र आणि वृत्रासुर. **रुद्र–अंधक**— शंकर व अंधकासुर. **वाळी–दुंदुभि** — वाळी वानरराजा व दुंदुभी नांवाचा दैत्य. **कृतांत–अंतक**— हे दोन्ही यम या अर्थीचे शब्द. **नक्र-गजेन्द्र**— सुसर आणि हत्ती. **स्वामी-तारकासुर**– कार्तिकस्वामी आणि तारकासुर ( कथासंदर्भ ८ पाहा )

७६४ **द्वयद्वंद्वरास**–दोघांच्या मल्लयुद्धाची क्रीडा.

७६२ **विजिली**–हाकारिली.

७६८ **पारीं**–बाजूला. **आंगीसिलें**–अंगांत घातलें.

७६९ **रुक्मस्यंदनपती**–सोन्याच्या रथाचा मालक ( कर्ण ).

७७० **चतुश्चक्री** – चार चाकांचा रथ. **तेजतरणी** – सूर्यासारख्या प्रकाशमान. **चपळपवनापक्षि**–जोराच्या वाऱ्यापेक्षाहि. **वहिला**–अधिक. **अकस्मात + अर्जुना.**

७७२ **कुरेश** (कौरवराजा ) + कटक ( सैन्य ). **अर्णवपाणी** – समुद्राचें पाणी.

७७३ **जननीजनताता**-आईबाप.

७७४ **सख्य + सौरस + सुधा** – मैत्रीचें गोड गोड अमृत.

७७६ **रसोदरशीला**– प्रेमळ व उदार स्वभावाच्या. **रसाची** –प्रेमाची. **र**–रे.

७७९ **बद्रीफळाचा क्रीम**– बोरांतील क्षुद्र कीटक. **सुपर्ण** – गरुड.

७८२ **भानात्मज**– कर्ण. **फाल्गुन**– अर्जुन.

७८३ **गगन्**– गगन.

७८५ **कर्णा**– ऐका.

७८६ **भार्गव**–परशुराम.

७८८ **उबाळा**– जोर, आवेग. **खेचर**– देव.

७९० **वोपिला** ( सोडला )+**अद्भुत. जळंधर बाण** – मेघास्त्र.

७९४ **बाणासन**–– धनुष्य. **सीत** – दोरी.

७९५ **अर्चिला** ( पूजीला )+ **असैल.**

७९९ **मृगगति**–– हरिणाची गति, जलद गतीने.

८०२ **हारी** ( हार ) – पराभव होतो.

८०६ **सहोदराननां** – सख्ख्या बंधूचें तोंड. **बोलिला + अग्रजा.**

८०७ **विप्रीत** – विपरीत ( प् चा उच्चार पूर्ण न केल्याने ).

८०९ **वारुवा** – घोड्यांना. **साट** – चाबकाचा फटकारा. **आपंपरी** – आपो-
आप किंवा अपरंपार.

८१० **सैन्यक + अर्क कुमार ( कर्ण ) + आदिक.**

८१४ **रणरमावर** – रणप्रिय कृष्ण.

८१७ **भुजा + आतूर.**

८२० **निशीनायिका**-रात्ररूपी नायिका. **समाजणें**–एकत्र होणें (नामधातु).

८२३ **विभ्रम**- गोंधळ. **व्यालि**–निर्माण झाली. **शार्वरी**–काळोखी रात्र.

८२४ **गर्गरा + अनुभविति**

८२७ **आमृतरुची** – अमृत + रुची (छंदाची सोय).

८२८ कुटीगता सा त्वनवेक्ष्य पुत्रौ प्रोवाच भुङ्क्ष्वेति समेत्य सर्वे । झोपडींत असलेल्या कुंतीने पुत्र न दिसतांहि सांगितलें " सर्वजण मिळून खा. " हा भारतांतील श्लोक.

८३३ **दीर्घ माया**–पत्ता न लागणारें गारुड.

८३५ मीं ज्यांना माझे ( भक्त ) म्हटलें, ते जर चुकले तर लोकनिंदाच पेटेल.

८३६ **समेळीं**– एकत्र असतांना. **आइती**– तयारी.

८३७ **प्रतक्ष**– प्रत्यक्ष ( छंदाची सोय).

८३८ वात्सल्याचा उत्कृष्ट नमुना.

८३९ **बराडी**– खादाड, अधाशी, गरीब.

८४१ **हृत्कंजीं**– हृदयकंजीं – हृदयकमळांत.

८४८ **विपति**– विपत्ति, संकटें ( छंदाची सोय ).

८४९ **हानर्थ**– हा + अनर्थ ( अर्थरहित ).

८५० वाणी प्रकार चार— परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी.
**धातया**– ब्रह्मदेवाला. **हरा**– शंकराला.

८५२ **महामंडप**– मोठी सभा, दरबार.

८५३ **टणकणें**– शिणणें. **अहवारीं**–मृदु, हळुवार. **अवर्जणें**–अर्पण करणें.

८५४ **पडिभरें**– मोठ्या प्रमाणांत. **विखार**–सर्प.

८५५ **बाळणी**– माडी, सज्जा, ओटा.
**कळापेखणी**–यांत्रिकत्वामुळे पाहण्याजोग्या.

८५६ **शहाण्णौकुळी**-महाराष्ट्रीय क्षत्रियांची शहाण्णव कुळें प्रमुख मानलीं जातात. (१) भोसले (२) गायकवाड (३) पवार (४) शिंदे (५) सावंत (६) मोहिते (७) चव्हाण (८) डुगळे (९) महाडीक (१०) कदम (११) काळे (१२) माने (१३) आंग्रे (१४) जाधव (१५) साळुंके (१६) हुंडे (१७) काकडे (१८) राणे (१९) घाटगे (२०) जगताप (२१) चाळके (२२) जाधव (२३) ढमढेरे (२४) लाड (२५) जगदाळे (२६) ढवळे (२७) दाभाडे (२८) धुमाळ (२९) थोरात (३०) दळवी (३१) नलवडे (३२) पानसरे (३३) पिसाळ (३४) मालप (३५) फाळके (३६) आंगणे (३७) शिसोदे (३८) विचारे (३९) मालुसरे (४०) तावडे (४१) मोरे (४२) खैर (४३) बागवे (४४) राऊत (४५) रेणुसे (४६) वाघ (४७) पांढरे (४८) भोगले (४९) बागराव (५०) भागवत (५१) पुळीक (५२) सुर्वे (५३) क्षीरसागर (५४) शितोळे (५५) ठाकूर (५६) सकपाळ (५७) शिर्के (५८) तोवर (५९) मधुरे (६०) महांबरे (६१) बांडे (६२) तेजे (६३) देवकांते (६४)

शेलार ( ६५ ) सांबारे ( ६६ ) फाकडे ( ६७ ) हरफळे ( ६८ ) निकम ( ६९ ) दरबारे ( ७० ) कोकाटे ( ७१ ) ढेकळे ( ७२ ) थोटे ( ७३ ) अहीर ( ७४ ) पारटे ( ७५ ) सालव ( ७६ ) पालांडे ( ७७ ) फाटक ( ७८ ) जगधने ( ७९ ) धायबर ( ८० ) पिंगळे ( ८१ ) फडतरे ( ८२ ) भोवारे ( ८३ ) रसाळ ( ८४ ) खडतरे ( ८५ ) दांडे ( ८६ ) ढोणे ( ८७ ) निसाळ ( ८८ ) पाठारे ( ८९ ) बाबर ( ९० ) भोईटे ( ९१ ) गव्हाणे ( ९२ ) गवसे ( ९३ ) नालिधरे ( ९४ ) ढमाले ( ९५ ) पाळवे ( ९६ ) खंडागळे.

**कांबिक**- धनुष्यें.

८५८ **लक्षान्त** – अगणित. **वहिलें** – पहिलें.

८५९ **गुढरणें** – अलंकार चढवून सज्ज करणें. **मुळ** – निमंत्रण.

८६० **झळक** – चमक. **कोटिर** – मुकुट. **पवित्र** – अंगठी.

८६२ **जानवसा** ( जानोसा ) – वधू किंवा वर यांची राहण्याची जागा.

८६४ **भेंवभाले** – भीतिरूपी भाले.

८६६ **चाउर** – उंच आसन, चौरंग. **वर्जुनि** – थांबवून.

८६६ **न + अन्यथा + अमान्य** – नाहीतर माझें बोलणें तुम्हाला संमत नाही असें नाही.

८६७ **को** – कोण. **वाणी** – सरस्वती.

८६७ **सुधाकर वंश** – चंद्रवंश. **निजालय** – माता.

८६७ **भाटही भूप झाले** - स्तुतिपाठकांना एवढी संपत्ति दिली की, ते राजासारखे श्रीमंत झाले.

८७८ द्रुपद राजा भावसमाधींत लीन झाला.

८८० समाधीचें वर्णन. विश्राम + अष्टांग + भोगी – **विश्राम म्ह० समाधी. अष्ट अंगें** – यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि. ( सविस्तर माहिती श्री. कृष्णाजी केशव कोल्हटकरकृत ‘ भारती मानसशास्त्र ’ अथवा ‘ सार्थ आणि सविवरण पातञ्जल योगदर्शन ’ या पुस्तकांत दिली आहे. )

८८१ – ८८६ – आनंद मेरूचें सविस्तर वर्णन. **अइरावत** – ऐरावत (स्वरभक्ति) ( छंदाची सोय).

८८८ **चेतन**– व्युत्थान, समाधि उतरणें.

८८९ **मलावतार**– मला + अवतार.

८९० **दासविलासरास**– भक्तांच्या प्रेमाची क्रीडा.

८९२ **कार्य-सर्जी**– कार्य निर्माण करणारा.

८९३ कांही निंदा–अपवाद आले, तरी मनाने बळकट राहा. आपला शब्द खरा कर.

८९५ **अनुशब्द**– मागाहून आलेला, किंवा नुसत्या अनुमतीदाखल उच्चारलेला शब्द, आज्ञा नव्हे.

८९८ **सर्वसे**– सर्व असे.

९०२ **सुरवरवरदी**– मुख्य देवांना वर देणारी. **आदिनारायणी**– आदिमाया.

९०३ **संख्यापुराणें**— अठरा.

९०५ **घातले**— शरीर घातलें, उडी घातली.

**तारकाला**– कथासंदर्भ ८ - ५ पाहा.

९०६ **अवदान**– आहुति.

९०८ **शापमुद्रा**— शापांतील अर्थ.

९०९ **रुतारूढ**— ऋतुवती. **सुरभि**— देवांची गाय.

९१० **विहित**— शास्त्रपूत. **पंच**– हेच पुढे पांडव व **शतैक** हेच एकशे एक कौरव झाले.

९१३ **शंकर + उत्तीर्ण.**

९१५ **पंचमुख**– महादेवाच्या स्वरूपांत दिसले.

९२० **श्रीकृष्णा + अर्चांनि. पटकुळे = पट्टकुल** – उंची रेशमी वस्त्रें. **दिव्य + अंबर** (वस्त्र).

९२३ **करसिंपी** -- हाताला हात लावणें.

९२५ **पांडवानां धनजयः** – गीता अ. १० . ३७

९२७ **चौघीजणी** -- सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता या चार मुक्ति किंवा परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चार वाणी.

**चारी विक्रम** – धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष.

९२९ **श्रुति सवेदपठन** - सवेद श्रुति – सर्व वेदांचा अभ्यास. विद्या नाम चतुर्दशस्य– चौदा विद्या – चार वेद + सहा वेदांगें (शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदस्, ज्योतिष) + न्याय + मीमांसा + पुराणें + धर्मशास्त्र.

९३१ **वाधावन**– वर आला हें सुचविणारीं मंगलवाद्यें.

९३३ **बौलां**– बहुल्यावर.

९४० **चुकला + अग्रजराया**–धर्माला.

९४१ **चार वासर**—चार दिवस लग्नसोहळा.

९४२ **धर्मसमुखन**– धर्माचें सान्त्वन.

९४३ **दायाद्**– नातेवाईक. **मांदुस** – मंजूषा, पेट्या.

९४४ **सचवरे**– चवऱ्यांसह. माही– मोठीं (?). **सेनामुखेचे करी**–आघाडीचे हत्ती.

९४५ **शक्तिलतारता असिलता**– यांचा पदपाठ नीटसा होत नाही. यांत शस्त्रांचीं नावें आहेत. शक्ति हें एक शस्त्र आहे. लतारता हें काय? किंवा शक्तिलता घेतलें तर रता हें काय? रता म्हणजे लाडक्या, आवडत्या असें घ्यावें का? **मही** –मोठी. **सुर्भी** – सुरभि– कामधेनु. **राणमहिषें**– रानरेडे.

९४६ **मराळे**– हंस. तुही (?). कुही (?). **सिकरे**–ससाणे. **दाईज**–हुंडा.

९४७ **पल्हाळें**– विस्तारानें.

९४९ **हयराण** (श्लेष)– उत्तम हत्ती, हैराण.

९५० **कर्पूरवास**– विडे.

९५३ **चार**– आचार.

९६४ **प्रतहिं**– प्रत्यहीं– दररोज; प्रत्येक पतीचा सहवास झाला म्हणजे दररोज द्रौपदी यज्ञकुंडांत उडी घेऊन शुद्ध होई. यामुळे तिचें तेज सर्वांना असह्य होऊं लागलें. **ऋषी**– व्यास.

९६६ रवीच्या बारा कळांचें तेज एका द्रौपदींत प्रकाशत होतें. **तोक**– लहान (मूल). **अरातिनाराती** – शत्रुमित्र. **ताराबनिवर** – तारा + अवनिवर.

९६७ **यमा + उपाय.**

९७२ **अंगुष्ठ तप**–एका अंगठ्यावर उभें राहून केलेलें तप.

९७५ **सत्त्व**–बळ. **तिळोत्मा**–तिलोत्तमा.

९७८ गायनाचा परिणाम पक्षी व हरिण यांवर झाला. पत्थर द्रवूं लागले.

९८० **अशुद्ध**–रक्त.

९८१ **निसुर**– स्वैर.

९८४ **उपेणे**--विश्रांतिस्थान.
**प्रमित** - मोजलेलें, निश्चित केलेलें.

९८६ द्रौपदीची दररोजची यज्ञांतील उडी थांबली व वर्षाला पांचदांच हीं यज्ञस्नानें होऊं लागलीं.

९९० **अरथा**--अर्था ( स्वरभक्ति ) ( छंदाची सोय ). **त्रिपथगा**-गंगा ( काव्य-गंगा ).

९९१ **पिंगल**–पिंगलाचें छन्दःशास्त्र. **अजपा** – अजब. **सलप**– स्वल्प ( छंदाची सोय. ) **दीपमलपा**– दीपरूपी दृष्टि. **पडपा**– लाडाने.

९९३ **निशारमण**–चंद्र. **स्वदेशानन**– देशमुख. **रुहूलोचनी**– चंद्र ( रुहू–हरिण ).

९९४ **पितृराज**– ( छंदाची सोय ). **विग्रह**– तंटा.

९९६ **दिल्येंन्द्र**– दिल्लीचा राजा ( औरंगजेब ).

९९८ **परेशांजन**— परमेश्वराचा साक्षात्कार घडवून आणणारें अंजन–काजळ. ( गुरू अंजनेवीण तो आकळेना–रामदास ).

१००२ प्रस्तावना पाहा— काव्याचा कालनिर्देश.

## संदर्भ-कथा

१—श्लोक ५. द्रोण व द्रुपद हे दोघे एकाच गुरूच्या आश्रमांत विद्या शिकत होते. दोघांची मोठी मैत्री होती. अशा वेळीं द्रुपदाने द्रोणाला वचन दिलें की, मला राज्य प्राप्त झाल्यावर तुला अर्धें देईन. पुढे राज्यप्राप्ति झाल्यावर द्रोण द्रुपदराजास भेटण्यासाठी गेला, त्या वेळीं द्रुपदाने द्रोणाला ओळखहि दिली नाही. उलट रागारागाने त्याने अपशब्दहि उच्चारले. द्रोण संतापला व म्हणाला, ‘ द्रुपदा, या मानभंगाबद्दल तुला चांगली शिक्षा लावून तुझें राज्य घेईन तरच हा द्रोणाचार्य ! ’ पुढे कौरव-पांडवांच्या गुरुस्थानीं द्रोणाची नियुक्ति झाली. अर्जुन हा त्याचा आवडता शिष्य होता. धनुर्विद्येंत तो निष्णात झाल्यावर द्रोणाने त्याला द्रुपद राजाला पकडून आणण्यासाठी पाठविलें. द्रुपदाचा पराभव करून त्याला पकडून अर्जुनाने द्रोणापुढे ओढीत आणलें. द्रुपदराजा शरण गेला. द्रोणाने त्याचें राज्य त्याला परत दिलें. तो परत आला, पण त्याचें मन त्याला स्वस्थ बसूं देईना. झालेल्या अप्रतिष्ठेबद्दल द्रोणाचा सूड उगविण्याचा त्याने निश्चय केला. वसिष्ठ ऋषीच्या उपदेशानुसार महान् तपोनिधि व विलक्षण सामर्थ्य असलेल्या याज व उपयाज या नांवाच्या ऋषींना तो शरण गेला. द्रोणाचा वध करण्याला समर्थ असा पुत्र प्राप्त व्हावा म्हणून द्रुपदाने या ऋषींकरवी यज्ञ आरंभिला. पूर्णाहुतीच्या वेळीं यज्ञकुंडांतून एक सुंदर पुत्र बाहेर आला. त्याचा वर्ण तप्त लोखंडाप्रमाणे लाल होता. त्याच्या मस्तकावर मुकुट होता, अंगावर वस्त्रें-भूषणें होतीं. हातांत धनुष्य-बाण-गदा इत्यादि आयुधें होतीं. ऋषींनी त्याचें नांव धृष्टद्युम्न असें ठेविलें. नंतर यज्ञकुंडांतून एक सुंदर कन्या निघाली. ती कृष्णवर्णाची होती. तिचें नांव कृष्णा असें ठेविलें. हीच द्रौपदी. शिखंडीचा जन्महि असाच यज्ञकुंडांतून झाला.

२--श्लोक ११. आपल्या व्रतांत गजगौरीव्रत नांवाचें व्रत आहे. भाद्रपदांत हस्त नक्षत्रीं सूर्य येतो त्या दिवशीं हें व्रत करतात. शंकर, पार्वती व गणपति यांच्या सोन्याच्या मूर्ति सोन्याच्या हत्तीवर बसवून दान देणें हा या व्रतांतील मुख्य विधि. धृतराष्ट्रपत्नी गांधारी ही पट्टराणी असल्यामुळे तिने हें व्रत मोठ्या वैभवाने केलें. कुंतीला हें शक्य नव्हतें. ती कष्टी झाली. अर्जुनाला हें समजतांच त्याने इंद्राचा ऐरावत प्रत्यक्ष खाली आणला व आपल्या मातेचें व्रत पुरें केलें व गांधारीला लाजविलें. त्याने स्वर्गापर्यंत बाणांचा जिना केला व भीमाने आपल्या पाठीवरून ऐरावत खाली आणला. निरनिराळ्या तऱ्हांनी ही कथा सांगितली जाते. स्त्रीगीतांतून ही फार आवडती कथा आहे.

३--श्लोक ३९. गोकुळवासीयांनी इंद्रयाग केला नाही, म्हणून क्रुद्ध झालेल्या इंद्राने गोकुळावर प्रलयकाळासारखी वृष्टि केली. जिकडे तिकडे पाणीच पाणी. त्यांत पराकाष्ठेची थंडी व सोसाट्याचा वारा यांमुळे त्रस्त झालेले गोपगोपी श्रीकृष्णाला शरण गेलीं. इंद्राचें गर्वहरण करावें म्हणून, जसें एखादें लहान मूल अळंबें ( छत्राकमिव बालकः ), तसा तो चार कोस लांब पर्वत श्रीकृष्णाने आपल्या डाव्या हातावर उचलून धरला. सात दिवसपर्यंत गोपगोपी त्या पर्वताखाली सुरक्षित होते.

४--श्लोक १५२. समुद्राचा पुत्र शंख या नांवाचा अत्यंत पराक्रमी असुर समुद्रांत राहत असे. आपल्या पराक्रमाने सर्व देवांचा त्याने पराभव केला व सुवर्णपर्वताच्या गुहेत त्यांना हाकलून लावलें. देवांचें सर्व बल वेद आहेत हें जाणून त्याने चारी वेद समुद्रांत लपविले. पुढे विष्णूने मत्स्यरूप धारण करून शंखासुराला मारलें व वेद मुक्त करून आणले.

५—श्लोक १८१. एकदा पंडुराजा आपल्या स्त्रिया बरोबर घेऊन शिकारीसाठी हिमालय पर्वतावर एका अरण्यांत गेला. फार वेळ फिरूनहि शिकार न मिळाल्यामुळे राजाच्या मनाला चुटपुट लागली होती. त्याच अरण्यांत अत्यंत पवित्र, सदाचारी, तपोनिष्ठ कर्दम नांवाचा ऋषि राहत होता. तो व त्याची पतिव्रता पत्नी हरिण-हरिणींच्या रूपांनी रतिरंगांत दंग होतीं. अशी ही जोडी यदृच्छया पंडुराजाच्या दृष्टीस पडतांच त्याला आनंद झाला. त्याने एकाच बाणाने दोघांनाहि विद्ध केलें. राजा जवळ आल्याबरोबर तो हरिण क्रुद्ध स्वरांत बोलला, " राजा, वंशवृद्धीसाठी हरिणरूपाने रत असतां तूं आम्हांस विद्ध केलेंस. मृग, पक्षी हे मृगयेने वध्य

आहेत हें खरें, पण संभोगसमयीं त्यांना मारणें हें मोठें पाप आहे. म्हणून मी तुला असा शाप देतों की, तूं स्त्रीशीं रममाण झाला असतांना तुला मृत्यु येईल. पुढें माद्रीच्या सौंदर्याने बेहोष झालेल्या पंडुराजाला मृत्यु आला.

६—श्लोक ५१५. कृतवीर्यांचा पुत्र अर्जुन हा मोठा दत्तभक्त होता. प्रसन्न होऊन दत्ताने त्याला सहस्र हात दिले होते. म्हणून त्याला सहस्रार्जुन म्हणत. हा एकदा जमदग्नि ऋषीच्या आश्रमांत गेला होता. कामधेनूच्या साहाय्याने ऋषीने राजाचा मोठा सत्कार केला. कामधेनु आपणाकडे असावी अशी लोभबुद्धि राजाच्या मनांत उत्पन्न झाली व त्याने ऋषीकडे मागणी केली. ऋषीने नकार देतांच राजा बलात्काराने धेनु घेऊन गेला. जमदग्नीचा पुत्र परशुराम याने राजाचे सहस्र हात तोडून त्याला ठार केलें. बरेच दिवस लोटले, परशुराम आश्रमांत नाही असें पाहून कार्तवीर्य पुत्रांनी आश्रमावर हल्ला केला व जमदग्नीस ठार केलें. पुढे परशुरामाने क्षत्रियवधाची प्रतिज्ञा केली. जमदग्नीची पत्नी रेणुका ही महापतिव्रता. तिने पतीच्या मृत्यूनंतर सहगमन केलें. सहस्रार्जुन अप्रत्यक्षपणें तिच्या मृत्यूला कारणीभूत झाला.

७—श्लोक ५२५. अहल्या ही ब्रह्मदेवाची मानसकन्या. ही अत्यंत सुरूप होती. हल्य म्हणजे कुरूपपणा हिच्या ठायीं नव्हता. म्हणून अहल्या असें सार्थ नांव ब्रह्मदेवाने ठेविलें होतें. ब्रह्मदेवाने हिला गौतमाजवळ ठेव म्हणून ठेविली. वयांत आल्यावर गौतमाने तिला परत पितृगृहीं पाठवून दिलें. ऋषीचें हें जितेन्द्रियत्व पाहून ब्रह्मदेवाने गौतमाशीं अहल्येचा विवाह निश्चित केला; पण इन्द्रादिदेव, दानव, राक्षस यांनाहि हिचा अभिलाष होता. तेव्हा प्रत्येकाची सामर्थ्यपरीक्षा करावी असें ब्रह्मदेवाने ठरविलें. जो पृथ्वीप्रदक्षिणा करून प्रथम येईल त्याला कन्या द्यावी असा पण होता. सर्वांनी प्रदक्षिणेला आरंभ केला. पण अर्धप्रसूत धेनु ही पृथ्वीच आहे हें शास्त्रवचन मानून गौतमाने धेनुप्रदक्षिणा केली व ब्रह्मदेवाकडे आला. उभयतांचा विवाह झाला. इन्द्राला वाईट वाटलें व पुढे त्याने अहल्येच्या पातिव्रत्याचा भंग केला.

८—श्लोक ७६३ ( १ ). ऋग्वेदांत इन्द्र हा प्रचंड योद्धा असें वर्णिलें आहे. त्याने मेघ फोडले. वृत्र शब्दाचा अर्थ मेघ असा आहे. इन्द्र आणि वृत्र यांचें युद्ध होऊन त्यांत वृत्र मारला गेला.

( २ ) रुद्र–अंधक. अंधक हा कश्यपपुत्र. उग्र तप करून त्याने सर्व

देवांना जिंकण्याविषयी शंकराकडून वर मिळविला. फक्त शंकर आणि विष्णु यांना तो जिंकूं शकणार नव्हता. त्याने सर्व देवांचा अमाप छळ केला. विष्णूच्या सांगण्यावरून शंकराने त्याच्याशीं युद्ध आरंभिलें. अंधकाच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबापासून दैत्य निर्माण होऊं लागला. त्या वेळीं शंकराने चामुंडेची आठवण केली. तिने त्याचें सर्व रक्त शोषून पिऊन टाकलें. त्या वेळीं तो शंकराला शरण गेला. शंकराने त्याला आपल्या गणांचा अधिपति केला. तोच भृंगीश होय.

(३) वाली–दुंदुभि. दुंदुभि हा मयासुराचा पुत्र. दीर्घ तप करून याने सहस्रावधि हत्तींचें बळ प्राप्त करून घेतलें. महिषाचें रूप धारण करून हा युद्ध करण्यासाठी समुद्राकडे गेला. समुद्राने त्याला हिमालयाकडे पाठविलें, हिमालयाने वालीकडे त्याची बोळवण केली. वालीबरोबरच्या युद्धांत तो पराभूत झाला व एका गुहेंत शिरला. तेथे वालीने त्याला ठार केलें.

(४) नक्र–गजेंद्र. हाहा आणि हूहू हे दोन गंधर्व होते. देवल ऋषीच्या शापाने त्रिकूट पर्वतावर त्यांतील एक गज होऊन रानांत भटकूं लागला व दुसरा तेथील सरोवरांत नक्र झाला. पुढे तो गजेंद्र तृषार्त होऊन पाणी पिण्यास त्या सरोवरावर आला असतां नक्राने त्याला आंत ओढलें. त्या दोघांची बराच काळ झटापट चालली होती. तेव्हा गजेंद्राने श्रीविष्णूचा धांवा केला व एक कमळ तोडून विष्णूकडे टाकलें. विष्णु प्रसन्न होऊन धांवत आला व गजेंद्राची मुक्तता केली. गजेंद्रमोक्ष हें आख्यान प्रसिद्ध आहे.

(५) स्वामी-तारक. स्वामी म्हणजे कार्तिकस्वामी. तारक म्हणजे तारकासुर हा कश्यप आणि दिति यांचा पुत्र. उग्र तपश्चर्या करून याने ब्रह्मदेवाला प्रसन्न केलें व त्याजकडून अमरत्व मिळविण्याचा प्रयत्न केला; पण तो प्रयत्न सिद्धीस न गेल्यामुळे त्याने असा वर मागितला की, सात दिवसांच्या मुलाच्या हातून मरण यावें. ब्रह्मदेवाने ' तथास्तु ' म्हटलें. या वराने उन्मत्त होऊन तारकासुराने इंद्रादि देवांचा पराभव केला. शंकराच्या औरस पुत्राच्या हातून तारकाचा मृत्यु ठरलेला होता, परंतु मध्येच एक अनपेक्षित घटना झाली होती. दक्षप्रजापतीची कन्या सती ही शंकराची भार्या. दक्ष शंकराची सारखी निंदा करी. एकदा दक्ष यज्ञ करीत असतां सती निमंत्रण नसतांना पितृगृहीं गेली, परंतु तिचा त्या ठिकाणीं कुणींहि आदरसत्कार केला नाही. त्यामुळे रागावून तिने यज्ञकुंडांत उडी घेऊन देहत्याग केला. हें

कळतांच शंकराने वीरभद्रादि गणांकडून यज्ञविध्वंस केला व पत्नीविरहाने दुःखित होऊन तो हिमालयांत तप करण्यासाठी निघून गेला. सती हिमालयाची कन्या म्हणून जन्माला आली. या दोघांचें पुनर्मीलन घडवून आणण्याचें काम देवांनी केलें व त्यांना स्कंद नांवाचा मुलगा झाला. ह्या मुलाने वयाच्या सातव्या दिवशीं तारकाचा वध केला. स्कंदालाच कार्तिकेय, षडानन, कुमार, कार्तिकस्वामी इत्यादि नांवें आहेत.

## द्रौपदी - स्वयंवरांतील वृत्तें

हें काव्य विविध वृत्तांत रचिलें असून आधारभूत हस्तलिखितांत प्रत्येक श्लोका-पूर्वीं वृत्तनाम दिलें आहे. कांही स्थळीं वृत्ताची नोंद चुकीची असल्यामुळे तीं सुधारून घेतलीं आहेत. एक-दोन वृत्तांचीं नांवें छंदोरचनादि ग्रंथांत आढळत नाहीत. उदा० वनमाला. 'अथ गीतछंद' हें नांव अनेकदा आलें असून ते श्लोक स्वागता, द्रुतविलंबित इत्यादि वृत्तांत आहेत, म्हणून "गीतछंद" न म्हणतां तीं तीं वृत्तें त्या त्या ठिकाणीं उल्लेखिलीं आहेत. डॉ. ना. ग. जोशी यांच्या मतें, "पूर्वी केव्हा गेय पद्धतीने हीं वृत्तें गाइलीं जात असतील, सामगायनांत ११-१२ अक्षरी वृत्तें गातात, म्हणून 'गीत छंद' नांव कवीने योजिलें असेल. द्रुतपदा, द्रुतविलंबित, अच्युत, स्वागता इत्यादि दोन वृत्तांच्या संयोगांतहि कांही श्लोक आहेत. छन्दोरचनाकारांनी (पृष्ठ १९९-२०६) अर्धसमवृत्तें दिलीं आहेत. त्यांत या ग्रंथांत येणारीं वृत्तें नाहीत. "अशाच वृत्तांचा निर्वाह पूर्वी 'उपजाति' या सामान्य संज्ञेने करीत" या डॉ. ना. ग. जोशी यांच्या सूचनेचा अवलंब प्रस्तुत ग्रंथांत केला आहे. वृत्तगणनिर्देशानंतर असलेला कंसांतील आंकडा अक्षर संख्यावाचक आहे.

अच्युत : र स स ल ग ( ११ )

अभीष्ट : न भ र ल ग ( ११ )

अमृतललिता : भ भ भ भ भ भ भ ग ग ( २३ )


या वृत्ताला 'सवाई' असें नांव मराठी कवि देतात. प्रा. मा. त्रिं. पटवर्धनकृत छन्दोरचना ( प्र. काळ खिस्तशके १९३७ ) या ग्रंथांत पृ. १६७ वर ५६८ 'हेमकला' ( मोदक + दोधक ) हें वृत्त दिलें आहे. त्याचा वृत्तविस्तार अमृतललितासारखाच आहे. डॉ. ना. ग. जोशी, बडोदें, लिहितात की, सवाई–सवैया–प्रकार मात्रावर्तनी जातिप्रकार. पूर्वी ३२ मात्रांच्या गेय जातीला ( क्वचित् ३१, ३० मात्रांच्या रचनेलाहि ) सवाई म्हणत. प्रस्तुत ग्रंथांत मूळ हस्त-लिखितांत सर्व ठिकाणीं योजलेला 'अमृतललिता' हाच शब्द कायम ठेविला आहे. छन्दोरचनेंत अमृतललिता हा शब्द नाही.

इन्द्रवंशा : त त ज र ( १२ )
इन्द्रवज्रा : त त ज ग ग ( ११ )
कलिन्दनन्दिनी : ज र ज र ज ग ( १६ )
कामदा : र य ज ग ( १० )
शुद्धकामदाः न र र ल ग ( ११ )
तूणक : र ज र ज र ( १५ )
तोटक : स स स स ( १२ )
द्रुतपदा : न भ ज य ( १२ )
द्रुतविलम्बित : न भ भ र ( १२ )
दोधक : भ भ भ ग ग ( ११ )
पंचचामर : ज र ज र ज ग ल ( १७ )
पृथ्वी : ज स ज स य ल ग ( १७ )
प्रमाणिकाः ज र ल ग ( ८ )
भुजंगप्रयात : य य य य ( १२ )
मन्दाक्रान्ता : म भ न त त ग ग ( १७ )
मरालिका : र य ज ग ( १० )
मालती : न ज ज र (१२)
मालिनी : न न म य य ( १५ )
यूथिका : र न भ र ( १२ )
रथोद्धता : र न र ल ग ( ११ )
वसंततिलका : त भ ज ज ग ग ( १४ )
शार्दूलविक्रीडितः– म स ज स त त ग (१९)
शिखरिणीः य म न स भ ल ग (१७)
श्येनिकाः– र ज र ल ग (११)

श्येनिकेप्रमाणेच सुपथ्या व वैतिका यांचा वृत्तविस्तार आहे. नावें निराळीं कां दिलीं तें समजत नाही ( छंदोरचना, पृ. १८० )


स्रग्धरा : म र भ न य य य ( २१ )
स्रग्विणी : र र र र (१२ )
स्वागता : र न भ ग ग (११)

● ● ●





पान १५६

श्लोक ४९२





पान १५६ श्लोक ४९३










श्लोक ४९५




पान १५७ श्लोक ४९६





पान १९४

श्लोक ६२५




पान २९२ श्लोक १९१

## शोधन पत्र

| पृष्ठ | ओळ | सदोष | निर्दोष |
|---|---|---|---|
| १५ | टीप | जलक्रिडा | जलक्रीडा |
| १७ | १ | महाभारत ? | महाभारत १ |
| २० | टीप | स्पष्टत | स्पष्टता |
| २९ | १६ | ( दग ) | ( दग् ) |
| २९ | २३ | वितत्ती मध्ये | य ची इ |
| **श्लोक** | **ओळ** | **सदोष** | **निर्दोष** |
| ३२ | ४ | आणिले | आणिलें |
| ३४ | २ | दग्धधरणीं | दग्ध धरणीं |
| ८१ | २ | ' उच्चारिजे | ' उच्चारिजे ' |
| ८२ | ४ | तुल | तुला |
| १०६ | ४ | भतळ | भूतळ |
| १२१ | ४ | व्यापकांतरि | व्यापकांतरीं |
| २३० | १ | धम | धर्म |
| २५० | १ | ख्याता यका | ख्यातायका |
| २७४ | ३ | बरें | बरे |
| २७६ | ३ | जग दंडक | जगदंडक |
| ३२३ | ४ | धरिं | धरि |
| ३२७ | ४ | जन्म जरा जळ | जन्मजराजळ· |
| ३३४ | ४ | नव पंकजाक्षी | नवपंकजाक्षी |
| ३३७ | ४ | सुता नंद | सुतानंद पोटीं |
| ३६० | १ | श्रीगंधर्व | श्रीगंधर्व |
| ३६९ | ४ | गमन वहनीं | गमनवहनीं |
| ३९१ | १ | पाह | पाहे |
| ३९३ | ४ | मन | मग |
| ४२३ | २ | वेणिमहा | वेणि महा |
| ४४१ | २ | करी | करीं |

| श्लोक | ओळ | सदोष | निर्दोष |
|---|---|---|---|
| ४५१ | २ | गती चिंतनीं | गतीचिंतनीं |
| ५४३ | ३ | निंदिलें | निंदिले |
| ५४४ | ३ | दंडिलें | दंडिले |
| ५५० | १ | शंकर वाहनें | शंकरवाहनें |
| ५५० | २ | विहंगम पती | विहंगमपती |
| ५७७ | ३ | भास्करीं | भास्करी |
| ६२० | २ | घरौनी | घरौनी |
| ६२२ | ४ | नोवराहोय | नोवरा होय |
| ६२७ | | हा श्लोक इन्द्रवज्रा आहे. | |
| ६६५ | १ | झाला | जाला |
| ६९३ | ४ | शात्वनामा | शाल्वनामा |
| ७३१ | ३ | सागरि | सागरिं |
| ९७३ | ४ | केसा | कैसा |
| १००३ | १ | वासो | वसो |
| १००४ | ३ | बह्मा | ब्रह्मा |
| **पृष्ठ** | **ओळ** | **सदोष** | **निर्दोष** |
| ३०२ | ४ | कणुनि | कर्णुनि |
| ,, | ६ | गुह्याशाळा | गुह्यशाळा |
| ३०९ | १ | सुंदर बगीचे | सुंदरबगीचे |
| ,, | २५ | सखय | सखया |
| ३१३ | २३ | ३६४ | ३६३ |
| ३२१ | २० | शंकरावहने | शंकरवाहनें |
| ३२९ | २७ | पुळिक | मुळिक |

श्लोकाचा क्रमांक २७१ वगळला गेला म्हणून एकूण श्लोकसंख्या १००३ होते. मंगलाचरणाचे तीन वगळले तर १००० संख्या खरी.

॥ प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीचरणार्पणमस्तु ॥

॥ ॐ तत्सत् ॥

## महाराष्ट्र साहित्य परिषद्

### प्रकाशनें

१ मराठी भाषेचा
व वाङ्मयाचा इतिहास
कै. बा. अ. भिडे *

२ म. सा. परिषद्–इतिहास
द. वा. पोतदार ३=००

३ संतवाङ्मयाची सामाजिक
फलश्रुति (नवी आवृत्ति)
गं. बा. सरदार

४ वाङ्मयीन–वाद
(पुरस्कृत) ३=००

५ वाङ्मय समालोचन
(१९४७) २=००

६ निबंध विकास
('प्राज्ञ' साठी) २=५०

७ साहित्य सुगंध
('प्रवेश' साठी) २=५०

८ सारस्वत प्रवेश
('प्रथमे' साठी) २=००

९ शुद्धलेखन नियम ०=१५

* प्रत शिल्लक नाहीं.

*क्र. ३ व ४ या पुस्तकांची मागणी मॉडर्न बुक डेपो, पुणें २ व प्रसाद प्रकाशन, पुणें २ यांचेकडे करावी.*

इतर चौकशी–
चिटणीस, महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, पुणें २.

# संपादकांचा परिचय

## वासुदेव दामोदर गोखले

जन्म ३० नोव्हेंबर १८९८ वगुर्ले येथे. एम.ए; बी.टी. (मुंबई विद्यापीठ) व पीएच. डी. (पुणें विद्यापीठ). संस्कृतचे प्राध्यापक, ना. दा. ठाकरसी कॉलेज, पुणें ४; माजी चिटणीस, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें व माजी प्रिन्सिपाल, गांधी ट्रेनिंग कॉलेज, पुणें. तत्वज्ञान, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, व्याकरण हे व्यासंगाचे प्रमुख विषय. स्वराज्यांतील गृहांगना, हिंदच्या स्वातंत्र्याचे जनक, अहल्याबाई होळकर, मानसशास्त्र-प्रवेश (प्रि. शरयू बाळ यांच्या सहकार्याने), मालाकार चिपळूणकर, मराठी भाषेचा लघुशब्दकोश, भोजसंगृहीता नाममाला (डॉ. ए. द. कुळकर्णी डेक्कन कॉलेज, यांच्या सहकार्याने) नवसाक्षरांसाठी शब्दसंग्रह इत्यादि पुस्तकांचे कर्ते. अलीकडे श्रीखंडोबाचीं पदें हा ग्रामीण गीतांचा संग्रह प्रसिद्ध, महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे (संशोधन विभाग) अनुभवामृताची (ज्ञानदेव) संशोधित आवृत्ति संपादन करीत आहेत. याशिवाय मराठींत आलेले संस्कृत शब्द व चितपावनी भाषेची विचिकित्सा या विषयांवरील अप्रकाशित साहित्य.

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

## संपादकांचा परिचय
### वासुदेव दामोदर गोखले

जन्म ३० नोव्हेंबर १८९८ वेंगुर्ले येथे. एम.ए., बी.टी. (मुंबई विद्यापीठ) व पीएच. डी. (पुणें विद्यापीठ). संस्कृतचे प्राध्यापक, ना. दा. ठाकरसी कॉलेज, पुणें ४; माजी चिटणीस, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें व माजी प्रिन्सिपॉल, गांधी ट्रेनिंग कॉलेज, पुणें. तत्वज्ञान, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, व्याकरण हे व्यासंगाचे प्रमुख विषय. स्वराज्यांतील गृहांगना, हिंदच्या स्वातंत्र्याचे जनक, अहल्याबाई होळकर, मानसशास्त्र-प्रवेश (प्रि. शरयू बाळ यांच्या सहकार्याने), मालाकार चिपळूणकर, मराठी भाषेचा लघुशब्दकोश, भोजसंगृहीता नाम-माला (डॉ. ए. द. कुळकर्णी डेक्कन कॉलेज, यांच्या सहकार्याने) नवसाक्षरांसाठी शब्दसंग्रह इत्यादि पुस्तकांचे कर्ते. अलीकडे श्रीखंडोबाचीं पदें हा ग्रामीण गीतांचा संग्रह प्रसिद्ध, महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे (संशोधन विभाग) अनुभवामृताची (ज्ञानदेव) संशोधित आवृत्ति संपादन करीत आहेत. याशिवाय मराठींत आलेले संस्कृत शब्द व चितपावनी भाषेची विचिकित्सा या विषयांवरील अप्रकाशित साहित्य.

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

ि. न. म. द वा. पोतदार,
ग्रं१७ रुप